**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी.**: वन कायद्यामुळे अडचणीत आलेले विदर्भातील प्रकल्प.

**मु.शी.**: वन कायद्यामुळे अडचणीत आलेले विदर्भातील प्रकल्प या विषयावर सर्वश्री जैनुद्दीन जव्हेरी, सुधाकर गणगणे, सय्यद जामा, राजन तेली, जितेंद्र आव्हाड, राजेंद्र जैन, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा,चंद्रपूर, गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानपरिषद नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

"विदर्भात मोठया प्रमाणात जंगल अस्तित्वात असणे, कालांतराने यात घट होऊन सुध्दा प्रशासनाच्या दस्ताऐवजावर त्याची जंगल अशीच नोंद दाखविल्यामुळे विकासाची कोणतीही कामे करीत असताना केंद्राचा 1980 चा वन कायदा विकासाच्या आड येत असणे, सदर काद्याच्या अटी जाचक असल्यामुळे विकास कामाच्या प्रकल्पांना केंद्र शासनाकडून मंजुरी मिळण्यासाठी वर्षानुवर्षे वेळ लागत असणे, त्यामुळे विकास कामात अडथळा निर्माण होणे, पर्यायाने मोठ-मोठे प्रकल्प रखडलेले असणे, किंवा त्यांना मंजुरी न मिळणे, त्यामुळे विदर्भ विकासास बसलेली खीळ, यामुळे विदर्भातील जनतेत निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना, यावर शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

यानंतर कु.जयश्री.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी......

सभापती महोदय, सन 1980 मध्ये केंद्रसरकारचा वनसंवर्धन हा कायदा आला. त्यापूर्वी महाराष्ट्राच्या सर्व जिल्हयामध्ये जे 7/12 चे उतारे होते, त्यावर सरकार मालकी लिहिली जात होती. जंगले, वने, झुडुपी जंगले, गायरान वगैरेची जमीन असली तरी ती जमीन सरकारची अशी केली जात होती. त्याबद्दल शासनाकडून विचारणा आली की जेथे झुडुपी जंगले आहेत, मोठी जंगले आहेत पण त्यासंबंधी नोंद घेऊन ती जमीन फॉरेस्ट डिपार्टमेंटला ट्रान्सफर करण्यात यावी पण अशी परिस्थिती निर्माण झाली की, पूर्ण विदर्भात चंद्रपूर, गडचिरोली, जालना येथे म्हणजे ज्या भागात मोठया प्रमाणात जंगले आहेत तेथे अशी कोणत्याही शासकीय अधिका-यांनी चौकशी न करता, पटवाऱ्याचा रिपोर्ट न बघता, ग्रामपंचायत, जिल्हापरिषद यांचे सहाय्य न घेता घरी बसून 7/12 चे उतारे बनविले. जी जमीन ग्रामीण भागात ग्रामपंचायतीला लागून नव्हती परंतु गायराने होती, तेथे त्या गावातील जनावरे चरत होती आणि ती गायराने ही संबंधित ग्रामपंचायतीच्या अखत्यारित होती. ती जमीन देखील वन खात्याला ट्रान्सफर करण्यात आली. उदाहरणार्थ चंद्रपूर जिल्हयामध्ये बल्लारपूर शहरात सन 1964 मध्ये महापूर आला त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.वसंतराव नाईक यांनी 365 हेक्टर जमिनीपैकी 31/1 ची जमीन आजूबाजुंच्या शहरांना विकासाकरिता दिली. नदीकडील वस्ती ट्रान्सफर करण्यासाठी त्यातील काही जमीन पेपर मिलला देण्यात आली, काही जमीन गावांना देण्यात आली. त्यातलीच थोडीशी जमीन महानगरपालिकेला हस्तांतरित करण्यात आली होती. पण ती जमीन वन विभागाला लागून आहे, म्हणून ती जागा वनविभाग आम्हाला देत नाही. बल्लारपूर शहरात म्हणजे पूर्ण अहेरी, सिरोंचा, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्हा एक होता तेथे जंगलातून जे लाकूड येत होते, त्याचा डेपो बल्लारपूरमध्ये होता. बल्लारपूरपैकी काही शहरामध्ये कोठेही जंगल नाही. त्या ठिकाणी लाकडाच्या डेपोमध्ये फॉरेस्टचे ऑक्शनचे हॉल होते. 100-150 एकर सपाट जमीन त्याला लागून होती, तेथे लाकूड ठेवले होते, त्यांचे ऑक्शन करण्यात येत होते. ती जागा सरकारची होती. झुडुपी जंगले ही सरकारची असल्यामुळे त्यांच्या 7/12 मध्ये कोठेही ती झुडुपी जंगल, गायरान जंगल आहे असे लिहिलेले नव्हते. तरीही शासनाने ज्यावेळी ट्रान्सफर पध्दत अवलंबिली त्यावेळी शासनाची जी जंगल म्हणून वापरातील जमीन होती त्यावर पूर्ण जंगल म्हणून त्याच्या 7/12 च्या उता-यामध्ये लिहून टाकले

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी......

आणि ती वन विभागाकडे ट्रान्सफर करण्यात आली. वन विभागाची जमीन म्हणजे ती महाराष्ट्र शासनाची जमीन होती. ती जमीन जरी वन विभागाची असली तरी मुख्य शहरामध्ये होती. माननीय वन मंत्र्यांना देखील ही गोष्ट माहीत आहे. बल्लारपूर हे एक मोठे शहर आहे. तेथे स्टेडियम, बगीचा, तहसील कार्यालय वगैरे अशा गोष्टी बांधून ते अधिक डेव्हलप करावयाचे आहे. चार वर्षापूवी बल्लारपूर हे तहसील म्हणून डिक्लेअर झाले. परंतु या शहरामध्ये तहसील कार्यालय बांधण्यासाठी कोठेही जागा उपलब्ध नाही. तेथे जी जागा वन खात्याची म्हणून शासनाने डिक्लेअर्ड केली असली तरी तेथे वन म्हणून लहानसे लाकूडही आता सापडणार नाही. सन 1980 मध्ये तेथील जमिनींचे 7/12 चे उतारे वन विभागाने बनविले होते. राजुरा तालुक्यामध्ये तसेच गडचिरोलीमध्ये अनेक सिंचनाचे प्रकल्प वन खात्यामुळे प्रलंबित आहेत. मागील चार-पाच वर्षापूर्वी आमच्या तेथील विभागामध्ये तत्कालीन खासदार श्री.नरेश पुंगलिया हे केंद्राच्या वन समितीमार्फत दिल्लीवरुन 20-25 खासदारांची टीम घेऊन आले होते. त्यांच्यासोबत त्यावेळी मीही होतो. चंद्रपूरमध्ये खासकरुन नागभीड येथे कॅनॉल बांधण्यात यावा, अशी त्यांची सूचना होती. वन विभागाच्या वन्यजीव संरक्षक अधिका-यांनी असे सांगितले की, ज्या ठिकाणी आपल्या समितीला कॅनॉल बांधावयाचा आहे, तो आमच्या जंगलातील वाघाचा येण्या-जाण्याचा रस्ता आहे. जर आपण तेथे कॅनाल बांधला तर आमच्या जंगलातील वाघ कुठून येणार आणि जाणार ? कॅनॉल बांधण्यासाठी एक एकर जमीन पाहिजे होती त्यासंदर्भातील सर्व क्लिअरन्स झाला होता परंतु वन्य जीव संरक्षक अधिका-यांनी उपरोक्त आक्षेप घेतला. म्हणजे याचा अर्थ असा होतो की," माणसं मेले तरी चालतील, परंतु वाघाचा येण्या-जाण्याचा रस्ता हा सुरक्षित राहिला पाहिजे. असा हा सन 1980 चा वन संरक्षण कायदा आहे. त्या कायद्याच्या एवढया अडचणी येत असूनही त्या कायद्यावर शासनाने कोणताही विचार केला नाही. याकरिता तेथील जिल्हाधिकाऱ्यांवर वरुन प्रेशर येत होते. म्हणून यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने गांभीर्याने केला पाहिजे. गडचिरोली, चंद्रपूर जिल्हयातील प्रकल्पांवर आम्ही आमच्या हाताने ते जे काही म्हणतात ना, मराठीमध्ये एक पुराणातील गोष्टही प्रसिध्द आहे, ती अशी की,

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी .....

एकदा भगवान शंकराच्या आशीर्वादाचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या दानवास भगवान शंकरांनी नृत्य करताना त्याच्याच डोक्यावर हात ठेवायला लावून त्या दानवाला भस्म करुन टाकले. अशा प्रकारे शासनाने येथील सर्व जागा फॉरेस्ट विभागाला दिल्यामुळे आता आमचे भस्म होण्याची वेळ आली आहे. गडचिरोली जिल्हयात गोसीखुर्दसारखे अनेक प्रकल्प आहेत. परंतु कायद्यात विविध त्रुटी व अडचणी असल्यामुळे काही प्रकल्प प्रलंबित आहेत. पूर्वीच्या मूळ चंद्रपूर शहराची परिस्थिती सांगतो. येथे एका बाजूला वन विभागाच्या कार्यालयाची 5-6 एकर जमीन आहे, पूर्वी ही जमीन शासनाकडे होती. सध्या शासनाला या जमिनीचे काही काम नाही. चंद्रपूर शहरात आपण पाहिले तर असे लक्षात येईल की, वन विभागाच्या कार्यालयाच्या अखत्यारित विविध ठिकाणी 20 ते 50 एकर जमीन आहे. चंद्रपूर शहराचा विकास होण्यासाठी या जागेची आवश्यकता आहे. परंतु सध्याचा वन कायद्याच्या विचार करता कोणतेही काम होत नाही. अधिकारी वर्ग विविध प्रोजेक्टसाठी बल्लारपूर शहर येतात. बल्लारपूर हे नाव कसे पडले ते सांगतो. बल्लार शहा नावाचा बादशहा होता, त्याच्या नावावरुन या शहरास बल्लारपूर असे नाव पडले आहे. 400 वर्षे जुने असलेले हे शहर आहे. या शहरात बायपास व शहरात इंटरनल रोड आहेत. याबाबत बी अँड सी. विभागाकडून लिहून आले आहे की, एका दिवसात येथून 20 ते 30 हजार ट्रक धावताना दिसतात. येथे एका वर्षात महाविद्यालयीन मुलांसह 385 अपघात झालेले आहेत. काही वर्षापूर्वी माझ्या भावाचा येथे अपघात झाला व त्याचा मृत्यू झाला आहे. याबाबत त्यावेळी माननीय मुख्यमंत्री महोदयांना मी कल्पना दिलेली आहे. येथे बाहेरुन जाण्यासाठी बायपास रस्त्याची मागणी केलेली आहे. मी नगराध्यक्ष होतो. या रस्त्यांसाठी अनेक कागदी घोडे नाचविले आहेत. तेवढयापुरते अधिकारी येतात व वेगवेगळे फॉर्म भरुन घेतात व जातात. ते मुंबई व दिल्लीहून कसे येतात हे मला माहिती नाही. बल्लारपूर येथे चार एकरासाठी फॉरेस्ट खात्याला रोड दिला जातो, त्या रस्त्यावरुन फक्त त्यांचीच वाहने जातात. इतर कोणाच्याही गाडया जाण्यासाठी परवानगी दिली जात नाही कारण ती वन खात्याची जमीन आहे असे सांगितले जाते. बायपासवर पूर्वी 100-100 गाडया येथे येत होत्या, 1000 गाडया येत होत्या तेव्हा ठीक होते. परंतु आता 20 हजार गाडया व

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MMP/

श्री.जैनुद्दीन झव्हेरी .....

विविध वाहने रोज धावत आहेत, असा बी अँड सी. विभागाकडे डाटा आहे. वन विभागाचे ऑफिस भोपाळ येथे आहे. वन विभागाच्या अधिकाऱ्यांना भेटून माहिती किंवा त्रुटी विचारली असता कोणत्याही लोकप्रतिनिधींना ते माहिती दाखवित नाही. मी आमदार झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेऊन त्यातील अनेक त्रुटी सांगितल्या आहेत. झुडपी व जंगल कायद्यामधील त्रुटी सांगितल्या आहेत. चंद्रपूर व बल्लारपूर शहराच्या मध्ये भिमकुंड नावाचे गाव आहे. येथे 1972 मध्ये मी स्वत: नवीन 10 एकराची मायनींग लिज घेतली आहे. तेव्हा ही जागा राज्य शासनाची होती. त्यावेळी मला सर्व्हे नं.105 मधील ही जमीन 5 वर्षासाठी मायनिंग लीजकरीता देण्यात आली. या शेजारची 300-350 एकर जमीन विविध युध्दात कामगिरी केलेल्या माजी सैनिकांना व स्वातंत्र्यसैनिकांना अलॉट करण्यात आलेली आहे. परंतु ज्यांनी या जमिनीवर शेती केली नाही त्यांची जमीन सरकारजमा केली आहे. यातील काही जमीन सरकारने मायनिंग लीजसाठी दिली. ही जमीन परत मिळावी म्हणून काही लोक कोर्टात गेले. 1972 मध्ये आम्ही लिजवर ही जागा घेतली. तेथे मायनिंग लीज असल्याने दुसऱ्यांदा 5 वर्षे ही जमीन आमच्याकडे ट्रान्स्फर झाली. परंतु 1980 मध्ये कायदा आला व जिल्हाधिकारी यांनी आम्हाला लेखी पत्र दिले की, ही जमीन वन खात्यातील डी.एफ.ओ. कार्यालयाला लागून आहे. या जमिनीच्या मोजणीवरुन बरीच चर्चा झाली. माझे टेंपररी लीज रद्द करण्यात आले. मी त्या ठिकाणी ब्रीज तयार करणार होतो. शासन कसे चालत आहे याचे मी उदाहरण दिले आहे. अशा प्रकारे वन विभागामुळे कितीतरी अडचणी तेथे निर्माण झालेल्या आहेत. आता आम्ही कलेक्टरकडे पुन्हा अपील केलेले आहे की, 1972 चे रेकॉर्ड आहे. माझ्याकडील रेकॉर्ड एकदा पहावे. हा कायदा 1980 मध्ये आलेला आहे. जी जमीन वापरात नव्हती, ज्यावर लिज नव्हते, ज्यावर कोणतेही काम होत नव्हते, जंगल होते ती जमीन वन विभागाला ट्रासन्फर करा असे शासनाने सांगितले, तसेच सात-बाराचे उतारे ट्रान्स्फर करा असेही सांगितले आहे.

नंतर कु.धनश्री......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SBT/ MMP/ प्रथम श्री. गागरे... 10:30

श्री. जैनुद्दीन जव्हेरी ......

आम्ही त्या जागेवर वीट बनवतो. ती जमीन वन विभागाला कशी काय आपण दिली ? ते म्हणाले हा सर्व व्यवहार वरिष्ठ पातळीवर झालेला आहे. अजून बऱ्याचशा जमिनीचे वाटप व्हावयाचे आहे. महोदय, मी मराठीमध्ये भाषण करीत असल्यामुळे कोणी मध्ये बोलल्यास माझी बोलण्याची लिंक तुटते. त्यामुळे मध्ये कोणी बोलू नये. सभापती महोदय, याबाबत मी आपल्याला एक उदाहरण सांगू इच्छितो. या प्रकरणाचा यासंदर्भात मी स्वत: कलेक्टरांकडे गेलो होतो. 300 एकर जमिनी वन विभागाला दिली होती. त्या जमिनीवर वन विभागाने कब्जा केला. ती जमीन माजी सैनिकांना दिली होती परंतु त्यांनी तेथे शेती केलेली नसल्यामुळे ती जमीन सरकारकडे जमा झाली. मी त्यांना त्या जमिनीचे 7/12 चे 1954 चे रेकॉर्ड दाखविले, यासंदर्भातील सगळया फाईल्स दाखविल्या. तसेच यासंदर्भात मी कोर्टात देखील गेलो. त्यांनी मला सांगितले की, आपण प्रोसीजरप्रमाणे प्रथम सरकारकडे अपील करावी. मुंबई येथे चर्चगेट समोर वन आणि महसूल खात्याचे एक कार्यालय आहे. तेथे मी गेलो. अपील केले. कोणताही वकील मी लावला नाही.तेथे् एक निवृत्त सचिव बसले होते. त्यांना सर्व रेकॉर्ड दाखविले. त्यांना सांगितले की, काही निवृत्त सैनिकांनी येथे शेती केली, काही लोकांनी शेती केली नाही. याबाबत कोर्टामध्ये केस प्रलंबित आहे तरीदेखील ही जमीन वन विभागाला ट्रान्सफर केली,असे मी त्यांना सांगितले. 105,106,107,108,109,110,111,112. या क्रमांकांच्या जमीनी आहेत. त्या ऑफीसरने मला सांगितले आपण थोडया वेळ थांबा. मला त्यांनी तेथे तीन तास बसविले. डीएफओ यांना बोलावून सर्व कागदपत्रे त्यांनी पाहिले. ते म्हणाले हे कागदपत्रे खरे आहेत की नाही हे मला माहीत नाही परंतु माझ्याकडे ऑर्डर आहे. मी त्यांना 7/12 चे उतारे, लीजचे कागदपत्रे,सैनिकांना दिलेले पट्टे, त्यांना दिलेले लीजचे कागदपत्रे दिले. डीएफओ व त्यांच्यात काय चर्चा झाली, हे मला माहीत नाही परंतु त्यांनी संध्याकाळी 5 वाजता मला बोलविले व सांगितले की, तुम्ही केलेला अपील आपण जिंकला आहात. तुम्हाला मी ऑर्डर देतो. त्या जमिनीवर जे खड्डे आहेत, त्याबाबत दंडाची जी रक्कम आहे तेवढी आपण भरावी. जमीनीची ऑर्डर कलेक्टरांना देण्यात येईल. लीज ट्रान्सफर करुन मिळेल. ही जमीन महाराष्ट्र शासनाची आहे. ती जमीन वन विभागाची नाही. मी दोन तीन दिवसांनी ऑर्डर घेऊन चंद्रपूर जिल्हयामध्ये आलो. कलेक्टरांकडे ही जमीन आली. त्यांनी ही जागा सरकारकडे जमा करुन घेतली. या जमिनीचे लीज त्यांनी मला दिले नाही. त्यांनी मला

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ SBT/ MMP/ 10:30

श्री. जैनुद्दीन जव्हेरी ......

सांगितले की, वृध्दाश्रम, सैनिक शाळा इत्यादी संस्थाकरिता ही जमीन आता शासनाला देत आहे. मी याबाबत त्यांना विचारले तेव्हा त्यांनी मला सांगितले की, ही 300 एकर जमीन शासनाने कलेक्टरांकडे रिझर्व्ह ठेवली आहे. ती जमीन कोणालाही देता येणार नाही. बल्लारपूर, चंद्रपूर जिल्हयातील जमीन शासकीय कार्यालयासाठी शासनाला न देता ती जमीन वन विभागाला देण्यात आली. अशी अनेक उदाहरणे आहेत. चंद्रपूर जिल्हयामधील जमिनीवर झुडपी जंगल आहे अशी नोंद 7/ 12च्या उताऱ्यावर केली आहे. तेथे झुडपी जंगलेच नाही. पण ही नोंद करताना तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत,जिल्हापरिषद, आमदार यांना विचारले गेले नाही. त्या जागेच्या पट्यावर लीज हवी असेल तर एनओसी आणा, हे आणा, ते आणा, तेथे खड्डे आहेत काय, असे अनेक प्रश्न विचारले जातात. चंद्रपूर,गडचिरोली जिल्हयामध्ये काही जागा केंद्र शासनाला दिलेली आहे. सभापती महोदय, यासंदर्भात मी आपणास विसापूर येथील एक उदाहरण देऊ इच्छितो. तेथील काही जागेवर जनावरे चरत असत,. येथे झुडपी जंगले आहेत असे दाखवून या जमिनीवर जनावरांना चरण्यासाठी बंदी घालण्यात आली. ही जागा ग्रामपंचायतीच्या ताब्यातील जागा होती. आता तेथील वन विभागाचे अधिकारी पैसे दिले तर जनावरांना चरण्यासाठी परवानगी देतात.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/SBT/MMP. कु. गायकवाड नंतर --- 10:35

श्री. जैनुद्दीन जव्हेरी .....

मग आमचे लीडर जातात आणि सोडून द्या म्हणून सांगतात. वन खात्याचे अधिकारी आम्हाला महाराष्ट्र सरकारची भीती दाखवत नाहीत तर दिल्ली सरकारची भीती दाखवितात, त्यांची ऑर्डर दाखवितात. आणखी एक गोष्ट म्हणजे तुमच्या गाडीमध्ये काही लाकडे मिळाली तर मग लगेच तुमच्यावर कारवाई केली जाते. शेवटी सरकार कोणतेही असेल, दिल्लीचे असेल वा महाराष्ट्र राज्याचे असेल, सरकार हे लोकांच्या उपयोगासाठी असते, जनतेच्या भल्यासाठी असते. जनावरांच्या भल्यासाठी नाही. दयाधर्म जरूर जनावरांसाठी आपण ठेवा. पण जी जनावरे गावात राहतात, गाई-म्हशी, शेळ्या-मेंढ्या वगैरे जनावरे आहेत ती निदान कास्तकारांना दूधासाठी उपयोगी आहेत, शेतीसाठी उपयोगी आहेत त्यांचा आपण जरूर विचार करा, पण जंगली जनावरे आहेत त्यांचा आपण इतका विचार कशासाठी करता ? दुसरे असे की, आम्ही काही तेथे पोल्यूशन करीत नाही. आम्ही तेथे पोल्यूशन करीत असू तर आपण जरूर तेथे येऊन पहावे, आम्हाला तसे दाखवून द्यावे. असे म्हटले जाते की, जंगले गेली की पोल्यूशन होते. पण तुम्ही तेथे जी फॅक्टरी देता त्याने पोल्यूशन होत नाही का ? मी आपल्याला एक उदाहरण सांगेन. तेथे एक हजार एकरावर मोठे जंगल होते, संपूर्ण वनजमीन होती. पण ती सहा महिन्यामध्ये माणिकगड सिमेंट फॅक्टरीला देऊन टाकली. असे अनेक उद्योग तेथे येतात, त्यांच्या खाणीसाठी जागा दिली जाते. हे उद्योगपती कोठे जातात, कोणाला भेटतात, ते काही कळत नाही, त्यांचे एमओयू कसे आणि केव्हा होतात तेही माहीत पडत नाही. एकदम समजते की, ही जागा कोणा तरी उद्योगपतीला फॅक्टरी उभारण्यासाठी दिली गेली आहे. सभापती महोदय, हे सरकार कोणाचे आहे ? या उद्योगपतींचे आहे की, सामान्य जनतेचे आहे, गरीबांचे आहे ? कास्तकारांच्या वेदना प्रकट करणारे सरकार आहे, पण त्या ठिकाणी 67 वर्षे कास्तकार कास्तकारी करीत आहे, तेथील जनता गरीब आहे, चंद्रपूर गडचिरोली येथै मोठी शेतजमीन आहे, त्याच्या आजूबाजूला जंगल नाही तर संपूर्ण साधी जमीन आहे. पण तेथे रानडुक्करे आहेत आणि ती एकदम शेतात घुसतात. आता ही रानडुकरे कोण आहेत हे मला समजत नाही मात्र तेथे त्यांचे झुडपी जंगल आहे असे अचानक सांगितले जाते. हा काय प्रकार आहे हे समजत नाही. सभापती महोदय, विदर्भामध्ये सिंचनाचा बॅकलॉग आहे पण चंद्रपूर गडचिरोलीमध्ये तसे नाही. तेथे डॅम झालेला आहे, त्याचे पाणी मात्र कास्तकाराला मिळत नाही तर ते उद्योगपतींना मिळते. कारण त्यांची त्याबाबत ॲग्रीमेंट करून टाकले आहे. तेथे

...... इ 2 ...

श्री. जव्हेरी .....

135 कोटीची फॅक्टरी होते आणि त्याला पाणी मिळावे यासाठी तेथे डॅम केला गेला आणि त्यासाठी मग 100-200 कोटी खर्च त्याचे झालेच असणार. त्याचे ॲग्रीमेंट केले की, डॅम झाला की, तुम्हाला आम्ही पाणी, कोळसा, लाकूड देऊ. आता जेव्हा त्याचा कॅनॉल सुरू झाला आणि कास्तकाराला पाणी मिळेल असे वाटू लागले तेव्हा मात्र ते पाण कास्तकाराला दिले जात नाही. पाणी नाही म्हणून सांगितले जाते आणि पाणी द्यायचे तर मग डॅमची उंची वाढवावी लागेल, पण त्यासाठी सरकारकडे पैसा नाही, शिवाय तेथे झुडपी जंगलाचा प्रश्न निर्माण होतो. अशी अनेक कारणे सांगितली जातात. जर ते तेथे झुडपी जंगल वगैरे आहे तर मग तेथे पाईप्स कसे काय टाकले गेले ? अंबानीच्या केबल्स टाकल्या जातात तेव्हा हे प्रश्न निर्माण होत नाहीत का ? सभापती महोदय, नगरपरिषदेला एखाद्या रस्त्याची रूंदी थोडी वाढवावयाची असेल, त्यासाठी तेथील झाडे काढावी लागली तर लगेच नगराध्यक्षाला तुरूंग दाखविला जातो पण अंबानी आणि त्यांच्या सारख्या इतर उद्योगपतींना मात्र हे नियम लागू नाहीत. तेथे हिरवे पिवळे, लाल पट्टे दाखविले जातात. आम्ही जेव्हा जमिनीसाठी विचारतो तेव्हा आम्हाला परवानगी घ्यावी लागेल म्हणून सांगितले जाते. साधी माती काढायची असेल, खड्डे करायचे असतील तर तेही करू दिले जात नाही, त्यासाठी लगेच नियम दाखविले जातात. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... एफ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी...

याठिकाणी तुम्ही गटार करु शकत नाही. त्याचे काही नियम आहेत असे सांगितले जाते. हे नियम लोकप्रतिनिधी आणि ग्रामीण जनतेसाठी आहेत. म्हणून मी शासनाला विनंती करतो की, झुडपी जंगलामुळे लहान-मोठे प्रकल्प अडकून पडले आहेत त्याकरिता आपण विचार करा. मंत्रिमहोदय स्वत: समझदार व्यक्ती आहेत. आपणास सर्व अडचणी माहित आहेत. 1980 सालामध्ये हा कायदा पास झालेला आहे, त्यानंतर आतापर्यंत अनेक प्रकल्प अडून पडले आहेत. आपण बल्लारशहाला माझ्याबरोबर चला, त्याठिकाणी स्पॉट इन्सपेक्शन करा. त्याठिकाणी झुडपी जंगल होते काय? झाडे होती काय हे पहावे. 1980 सालापासून त्याठिकाणी झाडे होती काय? ती तोडली असतील तर कां तोडली? त्या जागेवर जंगल नसतांना सुध्दा बोगस रेकॉर्ड तयार केले गेले आहे. ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामध्ये किंवा शहराला लागू असलेल्या क्षेत्रामध्ये 2 ते 4 किलोमीटरच्या परिसरामध्ये गायरानासाठी जमीन राखून ठेवली असली पाहिजे. त्याकरिता आपण नवीन कायदा करावा. झुडपी जंगलामुळे वन विभागाची परवानगी मिळत नाही, ती मिळविण्याकरिता आपण हा प्रस्ताव दिल्लीला पाठवावा. ही जमीन जर अंबानी किंवा टाटा, बिरला यांना द्यावयाची असेल तर त्याठिकाणी झुडपी जंगलाचा कायदा आड येत नाही. त्यावेळी आपणास रानडुक्कर, रानमांजरे, वाघ इत्यादी प्राणी दिसत नाहीत. अंबानी यांच्यासाठी एक कायदा आणि सर्वसामान्य गरीब जनतेच्या विकासाच्या कामासाठी दुसरा कायदा असा भेदाभेद आपण करु नका. माझी आपणास विनंती आहे की, हा ठराव सर्वांनुमते संमत करण्यात यावा अशी मी शासनाला विनंती करतो. त्याठिकाणी लहान लहान प्रकल्प प्रलंबित आहेत ते मंजूर करण्याची आवश्यकता आहे. आज त्याठिकाणी तुलतुली प्रकल्प, हुमना प्रकल्प, कारवाफा प्रकल्प, पोहारा प्रकल्प, हत्तीगोडा प्रकल्प, चैना प्रकल्प, बडगानाला प्रकल्प इत्यादी लहान मोठे प्रकल्प झुडपी जंगलांमुळे अडकून पडले आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे झाली. 1980 मध्ये हा कायदा संमत होऊन 27 वर्षे झाली तरीही अजूनपर्यंत गोरगरीब जनतेला न्याय मिळत नाही. आज शेतकरी मोठया प्रमाणावर आत्महत्त्या करीत आहेत. 3,200 कोटी रुपयांचे प्रकल्प अडून पडले आहेत. 200 कोटींचा एक प्रकल्प आज 2 हजार कोटींचा झाला आहे. अशीच जर प्रकल्पांची किंमत वाढत राहिली तर आपल्याला बजेटमधून निधी मिळणार नाही. आपल्याला टाटा, बिर्ला, अंबानी हे पैसे देतील, त्याकरिता आपण त्यांच्याकडे झोळी घेऊन जाणार काय? ते म्हणतील आपण आम्हाला जमीन द्या, तरच आम्ही तुम्हाला पैसे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी....

देतो. त्यांच्या लाल, पिवळया, हिरव्या रंगाच्या पाईप्सना जमिनीमध्ये टाकण्याकरिता मंजूरी द्या, तरच ते तुम्हाला पैसे देतील. सभापती महोदय, माझी शासनाला विनंती आहे की, विदर्भामध्ये प्रलंबित असलेल्या अनेक प्रकल्पांना मंजूरी देण्याकरिता मी हा प्रस्ताव सभागृहापुढे मांडला आहे, तो सभागृहाने मंजूर करावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

----

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी यांनी एक अत्यंत महत्वाचा प्रस्ताव या सदनामध्ये मांडला त्याबद्दल त्यांचे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे मी मनापासून स्वागत करतो. ज्या ज्या वेळी वन खात्याची चर्चा झाली त्या त्या वेळी त्या चर्चेमध्ये मी भाग घेतलेला आहे. आपण आपल्या डोळ्यासमोर जंगले उद्ध्वस्त होत असताना पाहतो, अनुभवतो त्याची अनेक उदाहरणे मी दिली परंतु वन खात्रे मात्र निर्ढावलेल्या गेंड्याच्या कातडीसारखे जरा सुध्दा हलत नाही. त्यांचे अधिकारी काय करतात ? धुळ्याचे माननीय वनमंत्री कसे गेले हे आपल्याला कळले असेलच. मी आपल्याला धुळ्याचे उदाहरण सांगेन. या प्रस्तावाच्या थोडे बाजूला जाऊन मी सांगेन की, धुळे जिल्ह्यामध्ये तोरणमाळला जाताना जंगल लागते. ते सर्व जंगल उद्ध्वस्त करुन टाकले आहे. ताडोबाला एकही सागाचे झाड शिल्लक राहिलेले दिसत नाही. जी आहेत ती खुंटासारखी छोटी छोटी झाडे आहेत. ती झाडे कोण उद्ध्वस्त करतात ? किती वृक्षतोड होते ? सागाची झाडे किती तोडली जातात ? माननीय वन मंत्री वारीला जातात. ते पंढरीचे भक्त आहेत. ते ज्ञानेश्वराची कवने सांगत असतात. वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे हे आपल्याला माहीत असेलच. परंतु प्रत्यक्ष अनुभव अत्यंत विदारक आहे. मी त्यांना सिंहगड इन्स्टिट्यूटचे उदाहरण दिले होते. लोणावळा येथे ही सिंहगड इन्स्टिट्यूट वन क्षेत्रात बांधलेली आहे. तेथील ग्रामपंचायत कोर्टात गेली परंतु वन खात्याने त्यांना सपोर्ट केला नाही. ती संस्था कोर्टात गेली. आपले खाते काय करते ते आम्ही बघतो. सदनात मुद्दा मांडल्यावर माननीय मंत्रिमहोदय सांगतात की, आम्हाला माहिती द्या, काय करावयाचे ते बघतो. परंतु काही होत नाही. नुसते ढोंग कशाला करता ? या ठिकाणी झुडपी जंगलाच्या बाबतीत सांगण्यात आले. शासनाला खरोखरच कळत नाही असे दिसते. आपल्याकडे जबरदस्तीने हे खाते दिले म्हणून आपण काम करीत आहात. मला दोन गोष्टी सांगावयाच्या आहेत. वणव्याच्या संदर्भात मी सांगितले होते. जेव्हा जेव्हा वणवे लागतात तेव्हा तेव्हा त्यासंदर्भात संशयाचे वातावरण असते. मी अशी सूचना केली होती की, आपण एस.ओ.एस. सारखे नंबर द्यावेत. गेल्या पाच वर्षात सातत्याने सजेशन फॉर ॲक्शन असे उत्तर दिले गेले. आज सुध्दा वन खात्याने एस.ओ.एस. नंबर दिलेले नाहीत. रस्त्याने जाताना वणवा दिसल्यानंतर तो कोणी लावला की चुकून लागला याबाबत कारवाई

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ......

सुरु केली पाहिजे. कालपरवा आपण फ्रांस आणि इतर ठिकाणी काय झाले ते पाहिले. तेथील लोकांना पळून जावे लागले असे चित्र आहे. रायगड जिल्ह्यात मुरुड-जंजिरा येथील जंगलातून जाताना लोक लाकडाचे भारे घेऊन जाताना दिसतात. सकाळी साडेसहा ते सात वाजताच्या दरम्यान आपण प्रवास केला तर त्या ठिकाणी जंगलतोड चालू असताना दिसते. मुरुडवरुन रोह्याकडे जाताना वर्दळ नसते. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर जंगलतोड होते. त्या ठिकाणी हिरवट झाडे तोडली जातात. त्याबाबत काही कारवाई होत नाही.

सभापती महोदय, झुडपी जंगलाच्या नावाखाली विदर्भाचा विकास अडवला जात आहे. सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी यांनी जो प्रस्ताव मांडला त्याला पाठिंबा देत असताना मी एकच विनंती करणार आहे. 1980 चा वन कायदा हा केंद्र सरकारचा कायदा असला तरी आपण शासन म्हणून येथील महत्वाच्या प्रश्नासंबंधी, पाण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. जव्हेरी यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यासंदर्भात दोन्ही सदनाने मिळून एक प्रस्ताव करुन तो राज्य शासनाने केंद्राकडे पाठविला पाहिजे. जसे आपण सीमा प्रश्नाबाबत करतो तशा पध्दतीने झुडपी जंगलामुळे जो विकास अडलेला आहे त्याला वाव देण्यासाठी दोन्ही सभागृहाने मिळून प्रस्ताव करुन केंद्र सरकारकडे पाठवावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र जैन (भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माझी देखील मराठीमधून भाषण करण्याची इच्छा आहे. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार तसेच सन्माननीय सदस्य श्री. अरुणलाल गुजराथी यांचे क्लास मी लावलेले आहेत. अजून मला चांगली मराठी अवगत झालेली नसल्यामुळे मराठी बोलताना चुका होऊ नयेत म्हणून तूर्त मी हिंदीमधून भाषण करीत आहे.

सभापति महोदय, विदर्भ में बड़े पैमोने पर झुडपी जंगल अस्तित्व में होने कारण यह समस्या पैदा हो रही है. केन्द्रीय सरकार के 1980 के वन कानून से विदर्भ को कितनी मार पड़ी है, उसके संबंध में यह प्रस्ताव है. निसर्ग को बचाने के लिए इस सदन के किसी भी सदस्य का विरोध नहीं है. लेकिन वन को बचाते समय विकास के बारे में भी विचार होना चाहिए. विदर्भ में बहुत सारा जंगल है. 1980 के वन कानून से विदर्भ को बहुत मार पड़ी है. सम्माननीय सदस्य श्री जेनुद्दीन जव्हेरी जी ने जैसे बताया कि रास्ते के दोनों तरफ जंगल है और वहां पर कॅनाल बनाना है तो परमीशन नहीं मिलती. कॅनाल बनाने से किसानों को बहुत फायदा होगा, विकास भी होगा. लेकिन फिर भी परमीशन नहीं मिलती. सिंचाई विभाग की ओर से कॅनाल बनाने की परमीशन मिल जाने के बाद भी वन विभाग कॅनाल बनाने नहीं देता. वन विभाग कहता है कि उस रास्ते से शेर, बंदर जाते हैं, वाईल्ड लाईफ बचाना जरुरी है. लेकिन हम कहते हैं कि उससे भी ज्यादा जरुरी है सिंचाई प्रोजेक्ट. इस वन कानून की वजह से विदर्भ किस परिस्थिति से जूझ रहा है, मैं उसके संबंध में एक उदाहरण देना चाहता हूं. गोंदिया जिले में कुड़वा गांव में मिल्क स्कीम का कार्यालय है और उसी के आस-पास अन्य शासकीय कार्यालय है. वहां पर एक ओपन प्लाट है. आंबेडकर अकादमी ने वहां पर आंबेडकर का स्मारक एवम् ग्रंथालन बनाने के लिए वह जगह मांगी है. कई वर्षो से आंबेडकर अकादमी उसके लिए प्रयास कर रही है. लेकिन हमेशा वन विभाग यह लिख कर देता है कि वन कानून के कारण मान्यता नहीं दी जा सकती. इस प्रकार का यह झुडपी जंगल का कानून है. किसी भी काम के लिए इजाजत नहीं मिल रही है. दूसरा उदाहरण देना चाहूंगा. नागझीरा में अभयारण्य है. वहां पास के एक गांव में विद्युतीकरण हुआ है. अब केवल वहां पर चार इलेक्ट्रिक पोल लगाने बाकी है. लेकिन वन कानून के कारण काम रुका हुआ है. वहां के नागरिक जब पूछने जाते हैं, निवेदन देते हैं तो उनको यह जवाब दिया जाता है कि वहां के

...2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री राजेन्द्र जैन...

7/12 के उतारे पर झुडपी जंगल लिखा है. मेरी समझ में नहीं आता है कि यह किस तरह का कानून है जो विकास काम के आड़े आ रहा है.

(सभापतीस्थानी श्री. अरविंद सावंत )

मेरा सम्माननीय मंत्री जी से अनुरोध है कि वे इस विषय में गंभीरता से विचार करें और जिम्मेदारी से देखें. हम यहां की परिस्थिति उन्हें दिखाना चाहते हैं.हम उन्हें तथा अधिकारी हमारे साथ चलेंगे तो हम सबको परिस्थिति दिखाने के लिए तैयार है. इस वन कानून के कारण करोड़ों रुपये के प्रोजेक्ट अटक गए हैं. 1974-75 में भूतपूर्व प्रधानमंत्री श्री नरसिंह राव ने एक प्रोजेक्ट का भूमिपूजन किया था. उस समय इस प्रोजेक्ट की लागत 24 करोड़ रुपये थी. लेकिन अब झुडपी जंगल के कानून के कारण प्रोजेक्ट का काम आगे नहीं बढ़ रहा है. आज इस प्रोजेक्ट की कीमत 520 करोड़ रुपये हो गई है. बहुत प्रयास करने के बाद प्रोजेक्ट शुरु हो सका था. आज इस प्रोजेक्ट का 85 प्रतिशत काम पूरा हो गया है, केवल 15 प्रतिशत काम रह गया है. अब वन विभाग कह रहा है कि वन कानून का भंग हुआ है. वन विभाग के अधिकारी सुप्रीम कोर्ट जाने की बात कर रहे है. इस प्रोजेक्ट के बन जाने के बाद लाखों एकड़ कृषि भूमि को सिंचाई की सुविधा प्राप्त हो सकेगी. एक साल से काम रुका पड़ा है. काम रुकने से इस प्रोजेक्ट की लागत और बढ़ जाएगी. फिर से हमें धनराशि के लिए सरकार की तरफ हाथ फैलाना पड़ेगा. यह कैसा कानून है ? जहां जंगल नहीं है, एक भी वृक्ष नहीं है, ग्राउण्ड है, वहां पर भी किसी प्रोजेक्ट के लिए परमीशन मांगने जाते है तो वन अधिकारी पेपर पर लिख देते हैं कि यहां पर झुडपी जंगल है. वन कानून का डर दिखाया जाता है. अभी जैसा सम्माननीय सदस्य श्री जैनुद्दीन जव्हेरी ने बताया कि इसी वन कानून के होते हुए बड़े-बड़े उद्योगपतियों के प्रोजेक्ट पास हो जाते हैं. बड़े-बड़े उद्योगपति अपना काम करने में कैसे सफल हो जाते हैं, उनके पास कौनसा जरिया है, मैं इस बारे में कुछ नहीं कहना चाहता. मैं सिर्फ यह पूछना चाहता हूं कि जिस प्रोजेक्ट को बनाने में 500 करोड़ रुपये खर्च हुए है, जिस प्रोजेक्ट से लाखों एकड़ कृषि जमीन पर सिंचाई होगी, क्या उसके लिए कानून में परिवर्तन नहीं किया जा सकता है ? आज इस वन कानून में सुधार करना जरुरी हो गया है. कानून इंसान ही बनाता है. इसलिए कानून में परिवर्तन करने के लिए संबंधित अधिकारियों को समझाने की जरुरत है. वन मंत्री विदर्भ के इलाके का दौरा करें. इसमें राजनीति

...3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री राजेन्द्र जैन ...

नहीं लानी चाहिए. अगर मैं यह कहू कि विकास न होने के कारण विदर्भ के कुछ इलाकों में नक्सलवादी गतिविधियां बढ़ गई है, तो वह गलत नहीं होगा. विदर्भ में सिंचाई प्रकल्प पर्याप्त न होने के कारण, किसान कर्ज में डूबे होने के कारण नक्सलवादी गतिविधियां बढ़ रही है. आज विदर्भ के कई ऐसे प्रकल्प है जिन्हें प्रशासकीय मान्यता मिल गई है, करोड़ों रुपये खर्च हो चुके हैं लेकिन अब वन कानून की वजह से उनका काम रुक गया है.

भाषण अपूर्ण, इसके बाद श्री दत्त.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ DD/ MAP/ ( श्री तालेवार के बाद ) 10:55

श्री राजेंद्र जैन

मैं कहना चाहूंगा कि इस नागपुर के अधिवेशन में इस सदन में यदि कोई सही चर्चा हुई है तो वह चर्चा किसानों के संदर्भ में ही हुई है. हमारा कहना है कि आप इस झुंडपी जंगल की समस्या यदि केंद्र सरकार के सामने सही ढंग से नहीं रखेंगे तो छोटे छोटे काम की फाइल भी इसी तरह से घूमती रहेगी. पहले उसके लिए भोपाल जाना पड़ेगा उसके बाद वह फाइल मुंबई आएगी फिर से वह फाइल भोपाल जाएगी और उसके बाद वह फाइल दिल्ली जाएगी. इस बारे में काम करने वाले जो प्रतिनिधि हैं या उसका फालोअप करने वाले प्रतिनिधि हैं उनको बहुत कष्ट होता है. लेकिन उसका रिजल्ट तो कुछ नहीं आता है. मैं सिर्फ विदर्भ की बात नहीं कर रहा बल्कि पूरे महाराष्ट्र में जहां जहां पर भी झुड़पी जंगल की परेशानी होती है वहां पर ध्यान दिया जाना चाहिए. जहां पर रास्ते बनाने में अड़चन है या जो प्रोजेक्ट पूरे होने में अड़चन आ रही है वहां पर सरकार को ध्यान देना चाहिए. कुछ प्रोजेक्ट तो इस परिस्थिति में हैं कि यदि आप इस कायदे में थोड़ा परिवर्तन कर देंगे तो कल या परसों से या कहिए कि आने वाले कुछ ही दिनों में वहां पर सिंचाईं का काम कर सकते हैं.

मैं कहना चाहता हूं कि विदर्भ के बारे में सरकार की भावना बहुत अच्छी है. लेकिन प्रोजेक्ट में आने वाली अड़चनों को दूर करने के लिए कुछ सुधार करने की आवश्यकता है. यदि अपनी बात आप अच्छी तरह से प्रस्तुत नहीं करेंगे तो कोई फायदा नहीं होगा और फिर आप कहेंगे कि यह तो केंद्र सरकार का मामला है. मेरा कहना है कि केंद्र सरकार में जो कायदा बनाने वाले लोग हैं उस बारे में मैं किसी पर आरोप करना नहीं चाहता लोकिन कहना चाहता हूं कि उनके मन में इस तरह की भावना है कि झुड़पी जंगल का जो कायदा 1980 में बना था वह खत्म नहीं होना चाहिए. यदि इस कायदे को खत्म करने के लिए सरकार द्वारा अपनी बात सही ढंग से प्रस्तुत नहीं की जाएगी तो यह कायदा खत्म नहीं होगा और उसकी वजह से किसानों का बहुत नुकसान हो रहा है. इस कायदे से होने वाले नुकसान के उदाहरण भी मैंने यहां पर दिए. मैंने यहां पर एमएसईबी का उदाहरण दिया, प्ले ग्रांउंड का उदाहरण दिया, बाबा साहब अंबेडकर स्मारक का उदाहरण दिया. हम पूरे विदर्भ के किसानों की भावना इस प्रस्ताव के माध्यम से

...2

श्री राजेंद्र जैन.....

आपको पहुंचाना चाहते हैं कि यदि आपने इस कायदे को सही ढंग से प्रस्तुतत किया तो कई प्रोजेक्ट का काम पूरा हो जाएगा और यहां का किसान कई फसल ले सकेगा. और लोग आत्म हत्या करना बंद कर देंगे. माननीय वन मंत्री महोदय का भगवान से बहुत अच्छा रिश्ता है यह बात सभी जानते हैं. मैं कहता हूं कि भगवान आपको हमेशा इसी तरह से आशीर्वाद देता रहे और आप किसान की ओर ध्यान देते रहें. एक बात मैं और कहना चाहूंगा और वह यह कि यहां पर हमारे माननीय सदस्य श्री जैनुद्दीन जव्हेरी साहब ने बताया कि धीरुभाई अंबानी ग्रुप का कोई प्रोजेक्ट हो तो वह प्रोजेक्ट झुड़पी जंगल से चला जाता है हमारा कहना है कि झुड़पी जंगल किसान के रास्ते में भी न आये. यदि ऐसा हुआ तो किसान को उसका बहुत फायदा होगा.

माननीय सभापति जी, आपने मुझे बोलने की अनुमति दी इसके लिए आपको धन्यवाद देते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

-0-

J-1

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ SBT/ MAP/ प्रथम श्री. भोगले... 11:00

**तालिका सभापती ( श्री. अरविंद सावंत ) :** एक गोष्ट मी सदनास नमूद करु इच्छितो की, या प्रस्तावारील चर्चा आपल्याला 12.30 वाजता संपवावयाची असून 12.00 वाजता माननीय मंत्रीमहोदयांच्या उत्तराला सुरुवात होणार आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात आपले विचार या प्रस्तावाच्या संदर्भात विशद करावे. या प्रस्तावावर ब-याच सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करावयाचे आहेत. या प्रस्तावाच्या संदर्भात ब-याच सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे नावे पाठवली असून अजूनही बरीच नावे येत आहेत, त्यामुळे माझ्याकडे पहिल्यांदा जी नावे आलेली आहेत त्यांना मी प्रथम बोलण्याची संधी देणार आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी या प्रस्तावावर आपले विचार थोडक्यात व्यक्त करावेत.

श्री. परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, वन कायदा शासकीय यंत्रणा आणि वन अधिकारी सोईस्कर रित्या वापरतात. ज्या ठिकाणी छोटया छोटया शेतक-यांचे प्रश्न असतात तेव्हा हा वन कायदा कडक केला जातो आणि मोठया मंडळींचा प्रश्न आला तर हा वन कायदा सोईस्कर रित्या लवचिक केला जातो. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये हिरांनदानी बिल्डरने एक हजार एकर जमीन खरेदी केली असून त्यातील काही जमिनी हया वन जमिनीतील आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश धुडकावून, वन कायदा धाब्यावर बसवून त्या ठिकाणी चौक्या, तळी बांधली जात आहेत. यासंदर्भात वन अधिका-यांना पत्र देऊन सुध्दा संबधित अधिका-यावर काही सुध्दा कारवाई झाली नाही. उलट त्या वन अधिका-याची तातडीने दुसरीकडे बदली करण्यात आली व जिल्हयात असे वातावरण तयार करण्यात आले की, मोठया बिल्डरने तक्रार केल्यामुळे या अधिका-याची बदली करण्यात आली.

सभापती महोदय, कोकणामध्ये मोठया प्रमाणात मायनिंगचे प्रोजेक्ट सुरु करण्यात आलेले आहेत. वन जमिनीमध्ये वन अधिका-यांची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता मोठया प्रमाणात बोअरिंग घेतली जात आहे. कोकणातील एखाद्या गावात जाण्यासाठी रस्ता पाहिजे असेल तर त्यावेळेस जनतेसाठी वन कायदा आडवा केला जातो. यासंदर्भातील एक उत्तम उदाहरण सिंधुदुर्ग जिल्हयात घडलेले आहे. वन सज्ञेच्या संदर्भात सभागृहात प्रश्न उपस्थित करण्यात आला होता त्यावर उत्तर देतांना माननीय मंत्रीमहोदयांनी सभागृहाला आश्वासन दिले होते की, यासंदर्भात शासन सर्वोच्च न्यायालयात ॲफिडव्हीट दाखल करुन कॅबिनेटपुढे हा विषय आणेल. परंतु एवढया मोठया प्रमाणात जमिनीचा विषय असतांनाही शासन ॲफिडव्हीट का दाखल करीत नाही यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात माहिती द्यावी अशी विनंती आहे. ....2

श्री. परशुराम उपरकर....

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित झालेला असतांना देखील या ठिकाणी मोठया प्रमाणात मायनिंगचे काम केले जात आहे. मायनिंगमुळे सिंधुदुर्ग जिल्हयातील झाडांची मोठया प्रमाणात कत्तल केली जात आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील झाडे तोडण्याची कामे बंद झाली नाहीत तर सिंधुदुर्ग जिल्हयातील निसर्ग सौंदर्य नष्ट होईल व त्याचा पर्यटनावर देखील विपरीत परिणाम होईल. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हयातील झाड तोडणीला बंदी आणावी एवढी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया प्रस्तावावरील विषया पुरतेच विचार मांडावेत. आता सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी भाषणाला सुरुवात करावी.

यानंतरचे हिंदी भाषण श्री. तालेवार यांच्याकडे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान (नामनियुक्त) : सभापति महोदय, मैं सम्माननीय सदस्य श्री जैनुद्दीन जव्हेरी जी का अभिनंदन करती हूं कि उन्होंने एक महत्वपूर्ण चर्चा इस सदन में उपस्थित की है. इस प्रस्ताव पर अब तक जो चर्चा हुई है, उसके निचोड़ से यह दिखता है कि कुछ विकास के प्रकल्पों पर जिन पर करोड़ों रुपये खर्च हुए हैं, वन कानून के कारण उन प्रकल्पों को पूरा करने में अड़चन आ रही है.अब तक इस प्रकार की चर्चा हुई है. इस संबंध में मेरा यह कहना है कि विकास के प्रोजेक्ट बहुत जरुरी है. विदर्भ जैसे क्षेत्र में जहां किसान आत्महत्या कर रहे हैं, जहां बड़ी संख्या में गरीब लोग रहते हैं, वहां के सिंचाई के प्रोजेक्ट, पीने के पानी की योजना व अन्य कोई योजना जब वन कानून के कारण रुक जाती है तो वह बहुत ही चिंता का विषय है. लेकिन दूसरी तरफ इस बात का ध्यान रखना भी जरुरी है कि नैसर्गिक संतुलन न बिगड़ जाए. नैसर्गिक संतुलन रखने के लिए 33 प्रतिशत हरियाली जरुरी है. लेकिन आज यह हरियाली 11 प्रतिशत भी नहीं है. इसका परिणाम नैसर्गिक संतुलन पर होगा. पर्याप्त हरियाली नहीं होगी तो पर्याप्त बरसात नहीं होगी, पर्याप्त बरसात नहीं होगी तो फसल पैदा नहीं होगी और फसल पैदा नहीं होगी तो किसान कैसे जिंदा रहेगा, तो फिर किसान के आत्महत्या करने की बात आ जाएगी. 1980 का जो वन कानून है, मेरे हिसाब से वह बहुत अच्छा कानून है. इस कानून में कोई त्रुटि नहीं है, जो किसी योजना के आड़े आ सके. क्यों कि इस कानून में यह साफ कहा गया है कि जितनी वन जमीन विकास कार्य के लिए लेनी है उतनी जमीन वन विभाग को दी जाए और उस जमीन पर वन निर्माण करें. कानून में इस प्रकार का प्रावधान है. अगर यह व्यवस्था है और समस्या हल हो जाती है तो वन कानून की कोई अड़चन नहीं आनी चाहिए, मैं ऐसा समझती हूं. कोई अधिकारी वन कानून की बात कर रहे हैं तो मुझे लगता है कि वे कानून का बहाना बना कर काम रुकवा रहे हैं. अगर वन कानून की अड़चन होती तो उद्योगपतियों के प्रस्ताव पास नहीं होते. क्योंकि अभी यहां बताया गया है कि उद्योगपतियों के प्रस्ताव पास हो जाते हैं. इसी वन कानून के होते हुए उद्योगपतियों के प्रस्ताव पास हो जाते हैं और सार्वजनिक हित/उपयोग के प्रस्ताव पास नहीं होते है तो इसका अर्थ यह है कि वन कानून की कोई दिक्कत नहीं है बल्कि लालफीताशाही द्वारा पैदा की गई दिक्कत है. ब्यूरोक्रेसी बराबर काम नहीं कर रही है. इसलिए इस संबंध में अधिकारियों को जिम्मेदार ठहराना चाहिए न कि वन कानून को. ब्यूरोक्रेसी बराबर काम नहीं कर रही है,यह हमारी चिंता का विषय होना चाहिए. सही जगह पर पल्स पकड़ते हैं तो विकास के

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान...

काम अच्छी तरह हो सकते हैं. जिस प्रकार से उद्योगपतियों के प्रस्ताव पास हो रहे हैं, उसी तरह पब्लिक उपयोग के प्रस्ताव भी पास हो सकते हैं. अड़चन के कारणों तक पहुंच जाते हैं तो हल निकल सकता है. यह हल वन मंत्री जी के हाथ में है. इसलिए वन कानून को दोष देने के बजाए, सरकारी मशीनरी के दोष को दूर करें.

भाषण अपूर्ण, श्री दत्त.

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान....

मुझे कहना है कि वहां पर करेक्शन करने की आवश्यकता है. मुझे लगता है कि हमारी स्टेट की मिनिस्ट्री के अंदर एडमिनिस्ट्रेशन सेट अप गड़बड़ है. हमारे यहां पर अधिकारियों के केडर में जिस तरह का पावर बेलेंस होना चाहिए वह नहीं है. सुपर क्लास वन आफिसर ज्यादातर बाहर के स्टेट से आये हुए हैं, आय.एफ.एस. अधिकारी बाहर से आये हुए हैं. उनको हमारी जमीन से कोई लेना देना नहीं है. उन्हें यहां की कोई न चिंता है और न ही सहानुभुति है. वे फील्ड पर भी नहीं जाते.जबकि इन आय.एफ.एस. अधिकारियों के हाथ में ही सारे पावर सेंट्रेलोइज किए गए हैं. हर डिसीजन के लिए फाइल उनके पास जाती है और उनके सिगनेचर जरुरी होते हैं और यही सबसे बड़ी प्रॉब्लम है. मझे कहना है कि पावर का बेलेंस्ड होना बहुत जरुरी है. जिस तरीके से तहसीलदार तथा दूसरे रिवेन्यु अधिकारी होते हैं और उन्हें डिसीजन लेने का और एक्शन लेने का अधिकार होता है उसी तरह का अधिकार वन विभाग के अधिकारियों को भी होना चाहिए. हर केडर के अधिकारियों के पास पावर न होने की वजह से ही इतना बड़ा चक्कर हमारी फाइल्स को लगाना पड़ता है. यही वजह है कि अधिकारी लोग कायदे पर दोष लगाकर सारी बात निपटा लेते हैं. मुझे कहना है कि पूरे विभाग का जो आर्गेनाइजेशन सेटअप है उसको रिआर्गेनाइज करने की जरुरत है.यदि आप महाराष्ट्र के हित में कोई निर्णय लेना चाहते हैं तो इस के लिए आप एक कमीशन बैठाकर एक धोरणात्मक निर्णय इस बारे में लें. ऐसा करना महाराष्ट्र राज्य के हित में होगा. मैं यहां पर विनती करुंगी कि आप ऐसा न कहें कि मॅडम यजमान फारेस्ट डिपार्टमेंट में हैं इसलिए आप ऐसा कह रही हैं. यहां जो कुछ मैं बोल रही हूं वह बात मैं अपने अनुभव के आधार पर और स्टडी करने के बाद बोल रही हूं. इसलिए मंत्री महोदय से मेरा निवेदन है कि मेरी बात को गंभीरता से लिया जाये तथा कमीशन बैठाकर इस डिपार्टमेंट के सेटअप का रिआर्गेनाइजेशन किया जाये तथा अधिकारियों के अधिकारों को बेलेंस्ड किया जाये. सी.आर.पी.सी का जो अधिकार है वह फील्ड आफिसर को दिया जाये. अभी वह अधिकार फील्ड आफिसर को नहीं है. आज वहां पर फारेस्ट गार्ड मार खा रहे हैं. आज उनके पास कोई पावर्स नहीं हैं. छोटी सी मशीनरी वहां पर है. आज फारेस्ट कटते जा रहे हैं और हम यहां पर प्रोजेक्ट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान...

डॅवलपमेंट की बात कर रहे हैं याह बात योग्य नहीं है. असल मुद्दे को हल करने की आवश्यकता है. हमारा फारेस्ट आज बीमार है. उसको अच्छे डाक्टर और सर्जन की जरुरत है.

माननीय सभापति जी, हमारे माननीय मंत्री महोदय इतने अच्छे और इतने सज्जन हैं कि वह जहां भी जाते हैं सब जगह उनको अच्छा दिखाई देता है,खुशहाल दिखायी देता है. क्योंकि एक शेर इस तरह का है कि --

उनके देखने से जो आती है मुंह पर रौनक
वे समझते हैं कि बीमार का हाल अच्छा है.

लेकिन मैं कहना चाहूंगी कि बीमार का हाल अच्छा नहीं है. महाराष्ट्र सरकार को इस बारे में उचित निर्णय लेने की आवययकता है. मैं उम्मीद करती हूं कि हमारा फारेस्ट डिपार्टमेंट एक धोरणात्मक निर्णय लेगा और यहां पर एक ऐतिहासिक तब्दीली लाकर दिखाएगा. इतना कहकर मैं अपना स्थान ग्रहण करती हूं. धन्यवाद.

--

L -1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनसंबंधी.**

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन असा आहे की, सन्माननीय सदस्या याठिकाणी अतिशय जाणीवपूर्वक मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करीत आहेत व माननीय वन मंत्रीही त्यांचे मुद्दे मन लावून ऐकत आहेत. बाजूच्या लॉबीमध्ये जे मंत्रालयीन अधिकारी बसलेले आहेत, ते माननीय मंत्री महोदयांना चिठ्ठया पाठवित आहेत. परंतु याठिकाणी सन्माननीय सदस्या आपले म्हणणे पोटतिडकीने मांडत असताना, लॉबीमध्ये बसलेसले अधिकारी त्यांच्या बोलण्यावर हसण्याचे काम करीत आहेत. अशाप्रकारे एखादा सन्माननीय सदस्य सभागृहात बोलत असताना अशाप्रकारे हासून कॉमेंटस् करणे योग्य आहे का ?

**तालिका सभापती** : तेथे बसलेल्या अधिकाऱ्यांचा संबंध सभागृहाशी येत नाही. त्यामुळे त्यासंदर्भात उल्लेख करण्याची गरज नाही.

श्री.धोंडीराम राठोड : परंतु ते आमच्या बोलण्यावर कॉमेंटस् करीत आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सदनातील अधिकाऱ्यांची लॉबी ही अदृश्य असते. याबाबतची माहिती कदाचित सन्माननीय सदस्यांना नसावी, अथवा त्यांना त्याबाबतीत मार्गदर्शन केले नसावे. परंतु लॉबीमध्ये बसलेल्या अधिकाऱ्यांची वागणूक ही सन्मानाची असली पाहिजे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांच्या मताशी मी सहमत आहे. हा विषय आपण येथेच थांबूया. सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी आपले भाषण सुरु करावे.

---------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 अन्वये याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री जैनुद्दीन जव्हेरी व अन्य सन्माननीय सदस्यांनी जो प्रस्ताव मांडला आहे, त्याचे समर्थन करण्यासाठी व त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, विदर्भातील जंगलाचे अस्तित्व, जंगलात होणारी घट, वन कायद्यामुळे विकासात येणारी अडचण व कायद्यातील जाचक अटी यादृष्टीने सदरचा प्रस्ताव याठिकाणी मांडलेला आहे. सभापती महोदय, पूर्व विदर्भासंबंधी मी बोलणार आहे. पूर्व विदर्भात जंगल भरपूर आहे, परंतु त्या जंगलांची अवस्था फारच वाईट झालेली आहे. आज त्याठिकाणी पूर्वीप्रमाणे घनदाट अरण्य दिसत नाही. आज त्याठिकाणी वन्यप्राणीही राहिलेले नाहीत. तेथील जंगलाची अशाप्रकारची अवस्था का निर्माण झाली, याची कारणे शोधण्याची आवश्यकता आहे. आज तेथील वन खात्याचे अधिकारी व कर्मचारी वनाची सुरक्षा व्यवस्थित करीत नाही, त्यामुळेही आज जंगलाची अवस्था चांगली नाही. तेंदूपत्त्याच्या उत्पादनासाठी जंगलाला आग लावली जाते, परंतु त्या आगीमध्ये वन्यजीव होरपळून मरत आहेत. वन्यजीवांची व जंगलांची आपल्याला काहीही पडीलेली नाही. केवळ तेंदूपत्त्याच्या उत्पादनासाठी आपण अशाप्रकारे जंगलात आग लावीत आहात. याबाबतीतही विशिष्ट ठेकेदारच असून जंगलाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या सर्व गोष्टींना अटकाव केला पाहिजे, असे मला वाटते. आज अनेक ठिकाणी झुडपीजंगलामुळेही अनेक प्राजेक्टस् थांबलेले आहेत. आज अशी परिस्थिती आहे की, ज्या ठिकाणी चांगले जंगल आहे त्याठिकाणी संरक्षण नाही आणि ज्या ठिकाणी झुडपीजंगल आहे त्याठिकाणचे काम कायद्याने अडवले जात आहे.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर..........

केंद्र शासनाचा सन 1980 चा कायदा आहे, ज्यामुळे अनेक प्रकल्प थांबलेले आहेत. हलबीटोला तलाव, शंकर तलाव, खडकली तलाव, काशीनाला तलाव आणि निंबा तलाव हे सालेकसा तालुक्यातील पाच प्रकल्प वन विभागामुळे रखडलेले आहेत. वन विभागाने या प्रकल्पांना मंजूरी दिली तर शंभर टक्के सिंचन होऊ शकते. कारण पुजारीटोलाचे पाणी येते, शिरपूरचे पाणी येते आणि हे तलाव झाले तर सालेकासा परिसरात शंभर टक्के सिंचन होऊ शकते, पण हे होत नाही. शासन पूर्णपणे उदासीन आहे, शासन लक्षच देत नाही, असा माझा आरोप आहे.

सभापती महोदय, पिंडकेपार येथील प्रकल्पाचे सन 1983 मध्ये भूमिपुजन झाले. वन विभागाने या प्रकल्पाला मंजूरी दिली असली तरी अद्याप या प्रकल्पाचे काम सुरु झालेले नाही.

सभापती महोदय, गोदावरी आणि कवलेवाडा या प्रकल्पांना निधी मिळूनही खर्च झाला नाही, ही सिंचन विभागाची उदासिनता आहे. वन विभागाकडून परवानगी मिळाली तर सिंचन विभाग काम करीत नाही आणि सिंचन विभागाने काम करायचे म्हटले तर वन विभागाची परवानगी मिळत नाही. अशा परिस्थितीत प्रकल्प कसे होणार आणि तेथील शेतक-यांचे प्रश्न कसे सुटणार ? सभापती महोदय, सातबैनीचा प्रकल्प तयार झाला असता तर आंगणेवाडी, सालेकसा आणि गोंदिया तालुक्याला पाणी मिळाले असते. त्या ठिकाणी सिंचनाची क्षमता आज तीस टक्के एवढीच आहे. सातबैनीचा प्रकल्प झाला असता तर सिंचनाची व्यवस्था 50 टक्के झाली असती. परंतु, शासन उदासीन आहे.

सभापती महोदय, परंतु या परिसरातील सर्व प्रकल्प अडकलेले आहेत. गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हयामध्ये जे प्रस्तावित प्रकल्प आहेत त्याबाबत मी शासनाला विनंती करतो की, या प्रकल्पांकडे लक्ष द्यावे. त्यांनी हे सर्व प्रकल्प वन कायद्यातून सोडवावेत. भात उत्पादकांना न्याय मिळेल, आमच्याकडे फार कमी प्रमाणात शेतकरी आत्महत्या करीत आहेत. शासनाला विनंती करतो की, या भागातील सर्व प्रकल्पांची माहिती पटलावर ठेवली पाहिजे. या चार जिल्हयांमध्ये किती प्रकल्प रखडलेले आहेत, कशामुळे रखडलेले आहेत, यासंबंधी शासन कोणती कार्यवाही करीत आहे, ही सर्व माहिती पटलावर आली पाहिजे, मंत्रीमहोदयांच्या उत्तरात हे अपेक्षित आहे.

....2........



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर..........

सभापती महोदय, जांबळी आणि दंडारी या दोन तलावांची मुक्तता वन कायद्यातून केल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. परंतु, सिंचन विभागाने पुढे काम केले नाही, हे देखील खेदाने नमूद करावेसे वाटते.

सभापती महोदय, ख-या अर्थाने जंगलाची सुरक्षितता ठेवली पाहिजे, वन्य प्राण्यांचे रक्षण केले पाहिजे आणि कार्यक्षम अधिकारी आणि कार्यक्षम लेबर लावले पाहिजे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी हा जो प्रस्ताव या ठिकाणी मांडला आहे त्याला मी समर्थन देतो आणि या भागातील रखडलेल्या प्रकल्पांच्या अडचणी दूर कराव्यात, अशी शासनाला विनंती करतो. वेळेचा अभाव असल्यामुळे मी या प्रस्तावाला अनुमोदन देतो आणि थांबतो.

---------------

.....3.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आमचे मित्र, सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दिन झवेरी यांच्या पुढाकाराने हा जो प्रस्ताव आला आहे तो विदर्भाच्या दृश्टीने अतिशय महत्वाचा आहे. अशा या गंभीर विषयावर अनेक वर्षांपासून चर्चा या सदनातही झाली, सदनाच्या बाहेरही अनेक आंदोलने झाली. झुडपी जंगलांमुळे विदर्भातील अनेक प्रकल्प रखडलेले आहेत. विदर्भाचा अनुशेष दिवसेंदिवस वाढत आहे, याचे प्रमुख कारण असे आहे की, झुडपी जंगलांमुळे विदर्भातील अनेक प्रकल्प केंद्र सरकारच्या परवानगीसाठी प्रलंबित आहेत. सन 1985 मध्ये 500 मेगावॅट उर्जा प्रकल्प माझ्या भागात व्हावा याकरिता आम्ही प्रयत्न केले. राज्य शासनाने पुढाकार घेतला, लाखो रुपये सर्वेक्षणावर खर्च केले. परंतु जेव्हापासून झुडपी जंगलाचा प्रश्न निर्माण झाला हा प्रकल्प रखडलेला आहे.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ प्रथम श्री.रोझेकर ......... 11:20

श्री.सुधाकर गणगणे ..........

1985 मध्ये या प्रकल्पाची किंमत 700 कोटी रुपये होती. परंतु आता तो प्रकल्प 7 हजार कोटी रुपये खर्च करुन सुध्दा पूर्ण होईल की नाही, अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. ज्यावेळी आम्ही आमच्या भागामध्ये हा प्रकल्प प्रस्तावित केला त्यावेळी हा प्रकल्प पूर्ण झाला असता तर आज राज्याला त्यातून 500 मेगावॅट वीज मिळाली असती. नगाणा हायड्रो इलेक्ट्रीक प्रोजेक्ट तयार झाला असता. पण वन खात्याच्या परवानगीमुळे हा प्रकल्प रखडला. आपणा सर्वांचे सौभाग्य आहे की, या राज्याचे वनमंत्री हरिभक्त परायण आहेत. ज्या भागामध्ये, ज्या जिल्हयामध्ये मी राहतो त्या जिल्हयाच्या बाजूला मध्यप्रदेश आहे. मध्यप्रदेशमध्ये औंकारेश्वर नावाचे तीर्थक्षेत्र आहे. आमच्या भागातील लोक तेथे पायी जातात, वा-या करतात. या भागामध्ये रस्ता व्हावा म्हणून आम्ही राज्य शासनाकडे प्रस्ताव दिलेला आहे. परंतु वन खात्याच्या परवानगीमुळे हिवरखेड ते बारातांडा हा रस्ता अनेक दिवसापासून रखडलेला आहे. मध्यप्रदेश सरकारने या रस्त्याला परवानगी दिलेली आहे. मध्यप्रदेशातील लोक रस्ता करण्यासाठी आणि सहकार्य करण्यासाठी तयार आहेत. कारण त्यांना माहिती आहे की, या भागातील अनेक यात्रेकरु औंकारेश्वर येथे येत असतात. औंकारेश्वर हे देशातील पवित्र तीर्थक्षेत्र आहे. अनेक वर्षापासून आम्ही या रस्त्याच्या कामासाठी प्रयत्न करीत आहोत. परंतु या रस्त्याचे काम अद्याप वन खात्याच्या परवानगीमुळे रखडलेले आहे. तसेच, सातपुडा पर्वताच्या पायथ्याजवळील अनेक सिंचनाचे प्रकल्प वन खात्याच्या परवानगीमुळे रखडलेले आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी सांगितले की, विदर्भामध्ये शेतक-यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे. हा भाग आपण सिंचनातून सुजलाम-सुफलाम करु शकलो तर त्याचा शेतक-यांना खूप मोठा फायदा होईल. मी माननीय वनमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आमच्या भागातील अनेक सिंचन प्रकल्प मग ते लघु प्रकल्प असोत, मेजूर प्रकल्प असोत ते आजही रखडलेले आहेत. सातपुडा पर्वताच्या पायथ्याजवळील अनेक विकासाचे प्रकल्प वन खात्याच्या परवानगीमुळे रखडलेले आहेत. माझी माननीय वन मंत्री महोदयांना विनंती आहे की, हा विदर्भातील महत्वाचा प्रश्न आहे, गंभीर प्रश्न आहे. यासंदर्भात या भागातील लोकप्रतिनिधींची वन विभागाच्यावतीने बैठक बोलवावी आणि कोणते प्रकल्प झुडपी जंगलामुळे रखडलेले आहेत याबाबतची माहिती घेऊन ते प्रकल्प पूर्ण करावेत. मी माननीय वन मंत्री महोदयांना सांगू इच्छितो

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे ..........

की, जर आपण पुढाकार घेतला तर अनेक शेतक-यांचे आणि जनतेचे आशीर्वाद आपल्याला मिळाल्याशिवाय राहणार नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांना मी पुन्हा एकदा धन्यवाद देतो. महाराष्ट्रातील सर्वात जास्त वन विदर्भात आहे. त्यामुळे निर्माण झालेला झुडपी जंगलांचा प्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावाला मी समर्थन देतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

--------

..3...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली, भंडारा या भागातील अनेक प्रकल्प झुडपी जंगलामुळे पूर्ण झालेले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर कु.जयश्री........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ प्रथम श्री.बोरले.... 11:25

श्री.राजन तेली....

याठिकाणचे शेतकरी गुरे चारण्यासाठी,किंवा तेथील लाकूडफाटा गोळा करुन जाळण्यासाठी ती जंगले वापरीत होते. काही वर्षांनी तेथे अशी परिस्थिती निर्माण झाली की, तेथील जमिनींवर अनेक झुडुपे होती म्हणून त्यांना "झुडुपी जंगले" असे सात बाराच्या उता-यावर नाव देण्यात आले. 1980 साली जो केंद्राचा वन कायदा आला, त्या कायद्याबरोबर सुप्रिम कोर्टाच्या काही गाईडलाईन्स पण आल्या होत्या. या गाईडलाईन्स प्रमाणे या जंगलांच्या सात बारावर झुडुपी जंगले असे लिहिण्यात आले. यामुळे तेथे अशी परिस्थिती निर्माण झाली की, शेतक-यांना गुरे चारण्यासाठी जागा उपलब्ध नाही, कोणतेही लोकोपयोगी प्रकल्प करता येत नाहीत. आज त्या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे इरिगेशनच्या प्रकल्पांना सुरुवात झाली. या प्रकल्पांना सुरुवात झाल्यानंतर ज्यावेळी त्यांची किंमत 50 - 60 कोटी रुपये होती त्यावेळी ते अपूर्ण राहिल्यामुळे आज त्यांची किंमत 500 ते 600 कोटी रुपयांपर्यंत येऊन पोहोचली आहे. आज तेथून कोणतेही रस्ते काढता येत नाही, इरिगेशनचे लोकोपयोगी असलेले प्रकल्प पूर्ण करता येत नाहीत. लोकांच्या सोयीचे प्रकल्प रस्ते,पाण्याच्या योजना,सिंचनाचे प्रकल्प,विजेचे प्रकल्प सुरु करता येत नाहीत. यामुळे फार मोठया प्रमाणात अडचणी निर्माण व्हायला लागल्या आहेत. शासनाने याची गंभीरतेने दखल घेण्याची गरज आहे. मला माहित आहे की, हे राज्यशासनाच्या अखत्यारित येत नाही. विदर्भामध्ये मोठयाप्रमाणात जंगले आहेत,कोकणामध्येही मोठया प्रमाणात जंगले अस्तित्वात आहेत. यासंदर्भात शासनाने दखल घेऊन तेथील लोकप्रतिनिधींची एक बैठक बोलाविली पाहिजे. केंद्राकडे जाऊन सुप्रिम कोर्टामध्ये या अडचणींच्या संदर्भात एक ॲफिडेव्हिट दाखल केले पाहिजे. आज जर आपण अशा प्रकारचे ॲफिडेव्हिट दाखल केले तर त्याचा काहीही फायदा होणार नाही असे नाही राज्यशासनाने केंद्राला यासंदर्भात विनंती केली तर सन 1980 पासून जे लोकोपयोगी प्रलंबित प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण होणे गरजेचे आहे, ते पूर्ण होतील. माझ्या माहितीप्रमाणे केंद्राच्या हा वन कायदा आल्यानंतर देशातील इतर राज्यांनी वेळोवेळी सुप्रिम कोर्टामध्ये यासंदर्भात ॲफिडेव्हिट दाखल केलेले आहेत. माझा प्रश्न आहे की, जसा विदर्भातील हा प्रश्न आहे,त्याचप्रकारे कोकणात देखील हीच समस्या आहे. मी वर्तमानपत्रामध्ये बातमी वाचली की, यासंदर्भात राज्यशासन सुप्रिम कोर्टामध्ये ॲफिडेव्हिट दाखल करणार आहे. कोकणामध्ये सन

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली......

1997-98मध्ये जे प्रकल्प सुरु झाले त्यांचे 75 टक्के काम पूर्ण झालेले आहे, उर्वरित 25 टक्के काम बाकी आहे. यासंदर्भात राज्यशासनाने एक ठराविक धोरण तयार करणे आवश्यक आहे. शासनाने अधिकारी मंडळांनी छोटया छोटया, नको त्या गोष्टींमध्ये लक्ष घालू नका असे सांगून त्यांना योग्य त्या सूचना देऊन जर प्रयत्न केले तर ते प्रकल्प लवकर पूर्णत्वास जातील,असे मला वाटते. मी एक उदाहरण सांगतो की, मी निवडणूकीच्या निमित्ताने रामटेक येथील पेंच प्रकल्पाच्या भागामध्ये गेलो होतो, याप्रकल्पासाठी येथील स्थानिक लोकांच्या जागा अतिशय कमी भावामध्ये संपादित केल्या गेल्या,आणि त्यांचे पुनर्वसन अत्यंत शोचनीय पध्दतीने करण्यात आलेले आहे. या धरणामध्ये ज्यावेळी येथील लोक मासेमारीसाठी जातात त्यावेळी वन खात्याचे लोक त्यांना त्रास देतात आणि त्यांना सळो की पळो करुन सोडतात. या लोकांना या धरणामध्ये मच्छिमारीसाठी तात्पुरत्या स्वरुपात पोल टाकण्यासाठी त्रास देतात. या भागामध्ये इलेक्ट्रिक प्रोजेक्टस करावयाचे असले तरी वन खात्याचे अधिकारी अडचणी निर्माण करतात. ज्या ठिकाणी मोठमोठी जंगले सपासप तोडतात,त्यावेळेला हे अधिकारी काहीही आक्षेप घेत नाहीत,मी नेहमी विरोध करतो अशातला भाग नाही. आता यासंदर्भात गांभीर्याने लक्ष घालून विदर्भ आणि कोकणातील लोकप्रतिनिधींची एकत्र बैठक बोलवावी आणि आपल्या अधिका-यांना यादृष्टीने योग्य ते प्रयत्न करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात,ही विनंती करतो. देशातील अन्य राज्यांनी जसे प्रयत्न केले त्याचप्रमाणे आपल्या राज्याकडूनही ते प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे. यासाठी एक कालबध्द कार्यक्रम आखण्याची गरज आहे. सन 1980 पासून 25-30 वर्ष जे प्रकल्प रखडले आहेत,ते भविष्यात कधी पूर्ण होतील की नाहीत, अशी शंका जनतेच्या मनामध्ये निर्माण झालेली आहे. या ठिकाणी प्रकल्प प्रलंबित असल्यामुळे ते कधी ना कधी तरी पूर्ण होणार म्हणून शासन त्या ठिकाणी त्यादृष्टीने इतर सुखसोई, सुविधा देत नाही. या ठिकाणच्या लोकांसाठी पाण्यावर,विजेवर,रस्त्यांवर पैसे खर्च करीत नाही.

मी काल या ठिकाणी उल्लेख केल्याप्रमाणे टाळंबा प्रकल्पामुळे आजुबाजूची एकूण 17,000एकर जमीन ओलिताखाली येणार आहे.

यानंतर श्री.गागरे...

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.राजन तेली.....

परंतु दुदैवाने ही जागा वन खात्याची असल्यामुळे अडचण निर्माण झालेली आहे. 1982 पासून ही जागा वन खात्याकडे गेल्यामुळे मानगाव खोऱ्यामधील लोकांना कोणतीही स्कीम देता येत नाही. ही जागा हेतूपुरस्सरपणे वन खात्याला दिली आहे. सुरुवातीस केंद्र सरकारने ही जागा गायरान जमीन असल्याचे सांगितले होते परंतु आता ही जागा डेम्पो या उद्योगसमुहास दिलेली आहे. डेम्पोने तेथे व्यवसायही सुरु केलेला आहे. गोरगरीब शेतकरी वनात गेले, किंवा मासेमारीसाठी तलावात गेले तर त्यांच्यावर कारवाई करु अडचणीत आणले जाते. परंतु डेम्पो सारख्या उद्योगपतीला कोणाचे आशिर्वाद आहेत. 55 हेक्टर क्षेत्रात डेम्पोचे अधिकारी राजरोसपणे काम करीत आहेत. म्हणून माझ ी मंत्री महोदयांना विनंती आहे की, येथील सामान्य लोकांच्या प्रश्नाकडे आपण लक्ष द्यावे. विदर्भ व कोकणातील जलसिंचनाचे प्रश्न सोडविण्यासाठी केंद्र सरकार, सुप्रीम कोर्टाकडे लवकरात लवकर ॲफेडेव्हीट दाखल केले तर माझी निश्चित खात्री आहे की, सुप्रीम कोर्टही मान्यता देईल. याकरिता आपले प्रयत्न कमी पडत आहेत. आपण जास्तीत जास्त प्रयत्न कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो. या प्रस्तावाला संमती दर्शवून माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय सदस्य सर्वश्री जैनुद्दीन जव्हेरी, सुधाकर गणगणे, सय्यद जामा, राजन तेली, जितेंद्र आव्हाड, राजेंद्र जैन, यांनी यांनी 260 अन्वये जो प्रस्ताव आणलेला आहे, त्याला पाठींबा देण्यासाठी मी उभा आहे. हा विषय खूप व्यापक आहे. हा प्रस्ताव निश्चितपणे विदर्भाच्या संदर्भात आहे. महाराष्ट्रामध्ये वनासंबंधीच्या निरनिराळया प्रकारच्या कायद्यामुळे विपरीत परिणाम झालेले आहेत व अजूनही त्याचे परिणाम होत असलेले आपल्याला दिसत आहे. वन कायदा फार जाचक आहे, त्याची अनेक प्रकारची उदाहरणे माननीय सदस्यांनी दिलेली आहेत. पर्यटनस्थळे, धरणे किंवा विकास कामामध्ये बऱ्याच अडचणी यामुळे येत असतात. यामध्ये शासनाचा पाठपुरावा कशा पध्दतीचा आहे याला महत्व आहे. वन कायदा हा केंद्राचा कायदा असून त्याबाबत कोर्टाचेही काही आदेश आहेत. त्यामुळे सर्व विकास कामे रखडलेली दिसत आहेत. काल मी एक उदाहरण दिले आहे, ठाणे जिल्हयातील अनेक धरणातील पाणी मुंबई शहरात जात आहे. ठाणे जिल्हयात सुर्या व भातसा ही धरणे बांधून तयार आहेत परंतु कालव्यासाठी वन जमीन अधिग्रहीत करावयाची असल्याने ते काम रखडलेले आहे. लोकांसाठी कालवे निर्माण झालेले नाही, त्यांना पाणी उपलब्ध झालेले नाही. ही जमीन मिळाली तर 18 हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येऊन शेतकऱ्यांना वापरता येऊ शकेल. त्यामुळे या कायद्यामध्ये बदल करण्याच्या दृष्टीने ज्या ठिकाणी विकास कामे चालू आहेत त्या कामाची एकत्रित यादी घेऊन त्याचा पाठपुरावा करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. सभापती महोदय, पर्यावरणाचा समतोल बिघडूनही चालणार नाही. माणसाने निसर्गाचा समतोल बिघडविण्याचा प्रयत्न केला तर निसर्ग स्वत: आपला समतोल राखण्याचा प्रयत्न करतो. परंतु समतोल राखत असताना कोठेतरी अतिवृष्टी किंवा दुष्काळाचा फटका देतो. त्यामुळे विकास कामाची परवानगी देत असताना वनाचे संवर्धन आणि संरक्षण करणे तेवढेच महत्वाचे आहे असे मला वाटते. मला या निमित्ताने एक उदाहरण द्यायचे आहे की, जंगलतोड मोठया प्रमाणावर होत आहे, याची सर्वजण आरडाओरड करतात. तेथील अधिकारी राजरोसपणे संगनमत करीत असतात. मुरबाड तालुक्यात टोकावडे भागात सागाच्या झाडाची जंगलतोड झाल्याचे मी स्वत: निदर्शनास आणून दिली आहे. वन खाते व माननीय वन मंत्री महोदयांना निवेदने दिलेली आहेत तेथे सागाची 76 झाडे तोडल्यामुळे मी त्याचे

.....3

श्री.संजय केळकर .....

मोजमाप करुन दाखविले. त्याचे फोटो व बुंध्याची मोजणी दाखविली. तरी देखील तेथील वन अधिकाऱ्यांवर आजपर्यत कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. एका बाजूला आपण म्हणतो की, जंगल तोड करु नये. वनसंवर्धन झाले पाहिजे. परंतु कडक कारवाई केली नाही, कडक धोरण आपण जोपर्यत स्वीकारले नाही तर जंगल राहणार नाही.

यानंतर कु.धनश्री.....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .......

यासंदर्भात शासन जोपर्यंत कडक धोरण स्वीकारीत नाही तोपर्यंत जंगल तोड कमी होणार नाही.सभापती महोदय, जंगल तोड व त्यासंदर्भात होत असलेला लाखो रुपयांचा भ्रष्टाचार याबाबत माझी अशी मागणी आहे की, ज्या ठिकाणी जंगलतोडीचे प्रकार होत असतील तेथील वनअधिकाऱ्यांवर तातडीने शासनाने कारवाई केली पाहिजे. सन्माननीय वन मंत्री श्री. बबनराव पाचपुते यांनी वन खात्यामार्फत अतिशय चांगला उपक्रम राबविला आहे . एका बाजूला वनांची तोड होत असताना,दुसऱ्या बाजूला वनीकरण होणे आवश्यक आहे. ठाणे जिल्हयामध्ये सहाकारी बँकेच्या माध्यमातून वनखात्याने काही जमीन लीजवर दिली आहे. या उपक्रमामध्ये माननीय वनमंत्री महोदयांचा फारमोठा सहभाग आहे. याबाबत मी त्यांचे अभिनंदन करतो. झाडे लावण्यासाठी, सहाकरी बँका, उद्योग, एनजीओ, यांच्या माध्यमातून वन जमीन लीजवर देण्यात आली. झाडे लावण्यासाठी मोठया प्रमाणात कार्यक्रम हातात घेण्यात आला. सभापती महोदय, यासंदर्भात मला अशी सूचना करावयाची आहे की, महाराष्ट्रामध्ये जाहिराती देऊन अशाप्रकारच्या संस्थांना अपील करुन वनीकरणाचा कार्यक्रम मोठयाप्रमाणामध्ये राबविला गेला तर निसर्गाचा समतोल पुन्हा प्राप्त होईल.याबाबत ज्या जाचक अडचणी आहेत त्यादेखील दूर करण्याची आवश्यकता आहे.सहकारी बँका, किंवा उद्योग यांनी वनीकरणासाठी निधी वापरण्याची परवानगी अजुनही मिळालेली नाही हा निधी वापरण्याची त्यांना परवानगी मिळाली पाहिजे. खर्च केलेल्या रकमेकरिता त्यांना आरबीआयची 2 टक्के सूट दिली पाहिजे. यासंदर्भात केंद्र शासनाच्या माध्यमातून निरनिराळे प्रकल्प राबविले पाहिजे. हे काम पूर्ण करण्याचा पाठपुरावा आपले वन खाते करीत आहे अशी मला खात्री आहे. एका बाजूला जंगलतोड सुरु असताना दुसऱ्या बाजूला वनीकरण करण्याचे काम मोठया प्रमाणात राबविले पाहिजे.

सभापती महोदय, मला आणखी एक शेवटचा मुद्दा मांडावयाचा आहे. मुंबईमध्ये नवीन इमारती बांधण्यात आला. त्या इमारतींचा प्लान महापालिकेने मंजूर केला. सर्व कायदेशीर मंजुरी देण्यात आली. त्यानंतर वन खात्याला जाग आली. ही जमीन वन विभागाची जमीन आहे असे त्यांनी सांगितले. याठिकाणी शेकडो, हजारो मध्यमवर्गीयांनी फल्ॅट धेतले होते. वन विभागाने हरकत धेतलयामुळे त्या फलॅटचे रजिस्ट्रेशन झाले नाही. त्यामुळे आजही हे लोक त्या फलॅटमध्ये

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .......

रहावयाला जाऊ शकले नाही. त्यांनी ही घरे कर्ज घेऊन खरेदी केली होती. ठाणे जिल्हयातील घोडबंदर रोड वरील मध्यमवर्गीय कुटुंबांना यामुळे फारमोठा फटका बसला आहे. त्यामुळे यासंदर्भात वन खात्याने ॲफिडेव्हिट सादर करावे व मुंबईतील जनतेला हा जो जाच होत आहे यामधून त्यांना मुक्त करावे. एवढे माझे मनोगत व्यक्त करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

.................

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3...

श्री. गिरीश गांधी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, या जिल्हयातील एक कार्यकर्ता म्हणून आणि विदर्भातील एक नागरिक म्हणून याठिकाणी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आला आहे त्याचे समर्थन करण्याकरिता मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, मी आपणास सांगू इच्छितो की, वनीकरणाच्या संदर्भात येथे जो प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे, त्या प्रश्नाच्या दोन प्रमुख बाजू आहेत. एक जंगल तोड व दुसरी बाबू झुडपी जंगलांच्या संदर्भात आहे. आपल्या देशामध्ये 329 मिलियन हेक्टर इतके क्षेत्रफळ वनांनी व्यापलेले आहे. सर्व देशातील तज्ञांनी मिळून याबाबत निर्णय धेतला की, प्रत्येक देशामध्ये एकूण क्षेत्रफळाच्या 33 टक्के क्षेत्र हे वनांसाठी राखीव असावयास पाहिजे. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी आपल्या देशामध्ये 75 दशलक्ष हेक्टर म्हणजेच 22 टक्के क्षेत्र वनांनी व्यापलेले होते. माननीय श्री. कन्हैयालाल मुन्शी हे त्यावेळी केंद्रातील पहिले वन मंत्री होते. त्यांच्या कार्यकाळामध्ये एक चांगली वननिती राबविण्यात आली. त्यावेळी असे धोरण ठरविण्यात आले होते की, देशातील एकूण 33 टक्के जमीन उत्तम घनता असलेल्या वनांनी व्यापलेली असावी.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/D/KTG/MMP. कु. गायकवाड नंतर --- 11:40

श्री. गिरीश गांधी .....

मी वादामध्ये जात नाही. कारण वेगवेगळे अधिकारी त्याबाबत वेगवेगळे आकडे देतात. परंतु आज आपल्याकडे सॅटेलाईट वगैरेची अत्याधुनिक व्यवस्था आहे. एक गोष्ट खरी आहे की, आपल्याकडे 22 टक्क्यावरून 33 टक्के वनीकरण होण्याऐवजी त्यात आज घट झालेली आहे आणि हा चिंतेचा विषय आहे. संयुक्त राष्ट्रसंघानेदेखील याबाबत चिंता व्यक्त केली होती आणि आशियामध्ये, विशेष करून भारतात मिसेस ब्रुकलँड, ज्या नॉर्वेच्या अध्यक्षा होत्या त्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती या संदर्भात नेमली होती. त्या समितीच्या अहवालातील काही भाग मी येथे आपल्याला वाचून दाखवितो, या समितीच्या अहवालाबाबत अधिक सांगू लागलो तर त्यासाठी दिवस पुरणार नाही. म्हणून मी काहीच भाग वाचून दाखविणार आहे. त्या समितीच्या अहवालात असे म्हटले होते की, 'Already the process of desertation is started in India, first victim is Maharashtra, second will be Madhya Pradesh, third will be Orissa and fourth will be Rajasthan.' अशा पद्धतीने एका पाठीमागे एक राज्ये या वाळवंटीकरणाच्या प्रक्रियेला बळी पडतील आणि त्यात महाराष्ट्र राज्य हे पहिले असेल. म्हणून मी हा संदर्भ देण्याचा येथे प्रयत्न केला आहे. सभापती महोदय, एकंदरीत महाराष्ट्राच्या संदर्भात आपण विचार केला तर महाराष्ट्राचे एकूण क्षेत्रफळ जे 3 लाख 6 हजार 713 चौ.कि.मी.चे आहे त्यात वनक्षेत्र 22 टक्के आहे, कोणी म्हणते 20 टक्के आहे परंतु हे प्रमाणसुद्धा फार कमी आहे. काही जिल्हे तर असे आहेत की, तेथे 2 टक्के देखील वन नाही. विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, अमरावतीतील मेळघाट, नागपुरातील रामटेक, कोकणातील काही भाग आणि ठाणे जिल्हा असा राज्यातील काही भाग सोडला तर ही परिस्थिती अतिशय चिंताजनक आहे यात शंका नाही. म्हणून एकीकडे वनाची संख्या वाढणे आणि वनांमुळे जी विकासाची कामे करणे आवश्यक आहे त्यात अडथळा निर्माण न होणे या दुहेरीमध्ये गंभीर विचार आपल्याला करावा लागणार आहे. काही प्रश्न असे असतात की, ते राजकीय पक्षांच्या देखील वरचे असतात. मग तो पर्यावरणाचा प्रश्न असेल, साक्षरतेचा प्रश्न असेल वा लोकसंख्या वाढीचा प्रश्न असेल. हे असे प्रश्न कोणत्याही एका पक्षाचे नाहीत, देशाचे नाही तर साऱ्या जगात अतिशय महत्त्वाचे असतात. दुर्दैवाने काही राजकीय पक्षांनी तर जंगले कापा आणि तेथे शेती करा असे आवाहन केले आणि कोणी आक्रमण केले तर त्यांच्यावर धनुष्यबाण घेऊन प्रतिआक्रमण करा

....... आर 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गिरीश गांधी ....

असे सांगितले. हे बरोबर नाही. सभापती महोदय, विदर्भातील झुडपी जंगलाच्या बाबतीत देखील असाच प्रश्न निर्माण झालेला आहे. या झुडपी जंगलाच्याबाबतीत ज्याला वाटेल तशी तो व्याख्या करतो. यामध्ये विनोद म्हणून मी सांगतो की, एकदा दिल्लीमध्ये एकाने 'झुडपी जंगल म्हणजे नेमके काय आहे' असा प्रश्न विचारला असता त्याला तेवढ्याच विनोदाने उत्तर दिले गेले. आपण सन्माननीय सुशीलकुमार शिंदे यांना पाहिले असेलच. त्यावेळी त्यांच्या डोक्यावर पुढील भागामध्ये एक केसांचा छोटासा झुपका होता, पण आता मात्र तो सर्व साफ झालेला आहे. पण त्यावेळी विनोदाने त्या प्रश्नाला जे उत्तर दिले तेही तितकेच मजेदार आहे. उत्तर देणाऱ्याने सांगितले की, सुशीलकुमार शिंदे यांच्या झुपक्याप्रमाणे आजूबाजूला सारे साफ असेल आणि मध्येच कोठे तरी अशा प्रकारे झाडे वा गवताचा भाग असेल तर त्याला झुडपी जंगल म्हणतात. म्हणजे आजूबाजुला सुपीक आहे आणि मध्ये वा एका बाजूला काही झुपकेदार निघाले तर त्याला झुडपी जंगल म्हटले जाते. सभापती महोदय, पूर्वी विदर्भाचा भाग मध्यप्रदेशमध्ये होता. मध्यप्रदेशाचे 22 जिल्हे तेव्हा होते. आता तेथे आठ जिल्हे आहेत. पण त्यावेळेस मध्यप्रदेशची राजधानी नागपूर ही होती. पण असे असतानाही आज मध्यप्रदेश राज्यामध्ये हा झुडपी जंगलाचा प्रश्न अजिबात नाही. कारण तेथील अधिकाऱ्यांनी याबाबत पाठपुरावा करून हा प्रश्न निर्माण होऊच दिला नाही. दुर्दैवाने या कामामध्ये आम्ही कमी पडलो. आता ही वस्तुस्थिती आहे की, सन्माननीय श्री.बबनराव पाचपुते हे वनमंत्री झाल्यानंतर या बाबतीत त्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न सुरू केलेले आहेत. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... एस 1 ..

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

DGS/ D/ MMP/ KTG/ 11:45

श्री. गिरीश गांधी...

सभापती महोदय, दोन महिन्यापूर्वी माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार साहेबांच्या दालनामध्ये केंद्रीय वन मंत्री, माननीय वन मंत्री श्री. बबनराव पाचपुते आणि काही केंद्रीय अधिकारी बसले होते. त्यावेळी महाराष्ट्रातील काही प्रमुख अधिकाऱ्यांबरोबर संयुक्त बैठक घेण्यात आली. त्या बैठकीमध्ये केंद्रीय अधिकाऱ्यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांनी प्रतिज्ञापत्रामध्ये चुका केल्या आहेत. यावरुन आपल्या प्रशासनामध्ये किती गलथानपणा आहे हे दिसून येते. दुर्दैवाने त्याचा भुर्दंड विदर्भाच्या विकासाला बसत आहे, या गोष्टीची गंभीरपणे या सभागृहाने नोंद घेतली पाहिजे. वन विभागाचे क्षेत्र मराठवाडयामध्ये 4 टक्के आहे, उर्वरित महाराष्ट्रामध्ये 39 टक्के आहे तर विदर्भामध्ये 56 टक्के आहे. संपूर्ण राज्याकरिता आवश्यक असणारे फॉरेस्ट एकटया विदर्भामध्ये आहे. महाराष्ट्रापासून विदर्भ वेगळा आहे असा यामधून भावार्थ काढावयाचा नाही. परंतु एकटया या विभागानेच जंगले वाचविण्याचे काम करावे आणि दुसऱ्या विभागांनी विकासाचे सातत्य टिकवावे ही अन्यायकारक गोष्ट आहे. यामुळे विदर्भावर फार मोठा अन्याय झाला आहे. किंबहुना, तुमच्याकडे झुडपी जंगले आहेत म्हणून प्रकल्पांना मान्यता मिळत नाही असे सांगून राजकारण केले जाते. अशाप्रकारच्या राजकारणातील सुरस कथा सांगण्यासाठी मी उभा नाही. ही वस्तुस्थिती, तथ्य आपण लक्षात घेतले पाहिजे. या राज्याची पहिली मोजणी 1819 साली झाली, 1848 साली कमिशनची स्थापना झाली, 1878 मध्ये लँड रेव्हेन्यू कोड अंमलात आला. जमिनीचे सुरुवातीचे अ,ब,क,ड,ई इत्यादी रेकॉर्ड विदर्भामध्ये होते. 1928 च्या दरम्यान 7/12 चा उतारा अस्तित्वात आला. त्या काळात 3 ते 4 वेळा सेटलमेंट झाले होते. तरीसुध्दा वार्षिक सेटलमेंट करण्याची तरतूद होती. शेवटचे सेटलमेंट 1931 मध्ये झाले. त्यानंतर ही गंभीर अवस्था झाली आहे. म्हणून या संदर्भात विनंती आहे की, 7/12 च्या नोंदीमध्ये पिकपाणी, भोगवटा, वहिवाटीमध्ये बदल होतो, मूळ नोंदीमध्ये, आकार क्षेत्रामध्ये बदल होत नाही. सर्व्हे सेटलमेंट ॲक्टप्रमाणे कारवाई झाली पाहिजे. ते काम 1931 पासून थांबले आहे.

सभापती महोदय, आज आपण नागपूर येथे अधिवेशनासाठी आलो असतांना या नागपूरच्या महाराज बागेतील चंदनाचे झाड कापल्याचे आढळले आहे. आपल्या महाराष्ट्रामध्ये अधिक जंगली भाग आहेत, त्यामध्ये कोहरादेवीचे जंगल आहे. इतर जंगलांमध्ये आपल्याला कडूनिंब, बाभळीची झाडे आढळतात. परंतु या कोहरादेवीच्या जंगलाचे वैशिष्टय असे की, त्याठिकाणी फक्त चंदनाची झाडे निघतात. ती झाडे जोपासण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. मला अर्थशास्त्र समजत नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MMP/ KTG/

श्री. गिरीश गांधी...

माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी आपल्याला सांगतील. या जंगलामध्ये सात ते साडे सात लाख चंदनाची झाडे निघतात. ती वर्षे दीड वर्षाची झाल्यानंतर कापून टाकली जातात. त्यामुळे इतक्या मोठया प्रमाणावर या वन संपत्तीची हानी होत आहे. यापैकी जर आपण 30 झाडे वाचवू शकलो तर महाराष्ट्राची एक पंचवार्षिक योजना त्यामधून होऊ शकेल. इतके हे पोटेंशिअल आहे. आलापल्लीच्या जंगलामध्ये मोठमोठी झाडे आहेत, सागवानाची झाडे आहेत. त्या जंगलामध्ये बैलबंडीमधून दारुचे पिंप नेतात, बोकड कापून नेतात आणि एका बाजूला रात्रभर ते शिजविण्याचे काम चालू असते तर दुसऱ्या बाजूला झाडांची कटाई सुरु असते. ज्याप्रमाणे लोक पिकनिकला जातात त्याप्रमाणे त्याठिकाणी झाडांची कटाई सुरु असते. एकंदरीत प्रशासनाच्या वेगवेगळया क्षेत्रात काम करणारे अधिकारी, जिल्हाधिकारी, वन विभागात काम करणारे अधिकारी असतील,

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गिरीश गांधी......

पोलीस खाते असेल, या सर्वांचा कोठे तरी समन्वय होण्याची गरज आहे. फॉरेस्टमधून आपण महाराष्ट्राची चांगली अर्थव्यवस्था उभी करु शकतो एवढी क्षमता असलेले हे खाते आहे. सुदैवाने माननीय वन मंत्र्यांनी लक्ष घातले आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. परिस्थिती फार बिघडलेली आणि चिघळलेली आहे त्यामुळे हा प्रश्न सोडविण्यासाठी काही काळ लागेल. झुडपी जंगलासंबंधीचा प्रश्न दूर झाला पाहिजे. जे विकासाचे प्रकल्प असतील मग ते विदर्भातील असो किंवा इतर ठिकाणचे असो ते मार्गी लागले पाहिजेत. त्यादृष्टीकोनातून या प्रस्तावाला अनुमोदन देऊन मी माझे भाषण संपवितो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाचा विषय या ठिकाणी चर्चेला आणलेला आहे. विदर्भातील वन जमिनीच्या संदर्भात हा विषय आहे. ती व्याप्ती वाढवून मी असे सांगेन की, हा संपूर्ण महाराष्ट्रातील वन जमिनीचा प्रश्न आहे. वनाशिवाय विकास नाही ही वस्तुस्थिती आहे. वन आणि आदिवासी यांचा जो संबंध आहे तो अत्यंत महत्वाचा आहे. त्यांच्या उदरभरणापासून ते विकासापर्यंत वन हे अत्यंत महत्वाचे आहे. परंतु हा जो 1980 चा वन कायदा आलेला आहे त्याचा धसका प्रत्येकाने घेतलेला आहे. त्या जिल्ह्यामध्ये जे आमदार असतील, जे खासदार असतील ते प्रकल्प किती वर्षात पूर्ण होतील हे कोणी सांगू शकत नाही. हा 1980 चा कायदा आहे. 2003 साली काही नियम करण्यात आले. 2004 मध्ये त्यात सुधारणा झालेली आहे. हा कायदा आणि वन याचा काय संबंध असला पाहिजे ? वन कशा कशासाठी पाहिजे ? पहिली बाब म्हणजे घराच्या बांधकामासाठी वन पाहिजे. घराच्या बांधकामासाठी ते देऊ नका. शासनाने देखील असे म्हटले आहे की, ज्या ठिकाणी इमारतीचे बांधकाम करतो त्यासाठी वन द्यावयाचे नाही. आदरणीय वन मंत्र्यांना माझी विनंती आहे. वन खात्याला कर्तबगार मंत्री लाभलेले आहेत. कोणी घर बांधले असेल तर ते अतिक्रमण नियमित करा असे कोणीही सांगणार नाही. त्यानंतर दुसरी बाब म्हणजे वन जमीन ही रस्त्यासाठी लागते. रस्त्यासाठी वन जमीन देण्याच्या संदर्भात काही प्रमाणात विचार व्हावयास पाहिजे. ज्या ठिकाणी कार्ट ट्रॅक आहे आणि दोन्ही बाजूला एक एक फूट अशी दोन फूट रुंदी वाढवावयाची असेल तर त्याला वन खाते नाही म्हणते. त्या कायद्याची जरब आणि भीती वन खात्याच्या अधिकाऱ्यांना इतकी आहे की, ते महाराष्ट्राच्या वन मंत्र्यांच्या सूचना सुध्दा ऐकत नाहीत. कारण त्यांना जेलमध्ये ठेवले जाईल अशा पध्दतीची या कायद्यात तरतूद आहे. त्यांना भीती आहे की, आम्हाला तुरुंगात ठेवले जाईल. वन जमिनीमधून एक टोपली माती घ्यावयाची असली तरी घेणारा घाबरतो आणि अधिकारी देखील घाबरतात. या नंतर विचार केला पाहिजे तो इरिगेशन प्रकल्पांच्या संदर्भात. या इरिगेशन प्रकल्पाच्या माध्यमातून त्या वन विभागातील, वन क्षेत्रातील आदिवासींचे जीवन संपन्न होणार आहे त्यामुळे इरिगेशन प्रकल्प हे अतिशय महत्वाचे आहेत. ज्या ठिकाणी जमीन उपलब्ध होत नाही त्या ठिकाणी आम्ही असे सांगतो की, गावतळे, शेततळे होत नसेल तर वनतळे करावेत. आदिवासींच्या

...3...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ....

पाण्याचा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. म्हणजे वन जमीन लागणारी तिसरी बाब म्हणजे धरण. धरणासाठी किंवा कालव्यासाठी वन जमीन लागते. चौथी बाब म्हणजे शाळा, रुग्णालये बांधण्यासाठी वन जमीन लागते. ही बाब अत्यंत महत्वाची आहे. माझ्या मतदार संघातील चार वर्षापूर्वीची एक महत्वाची बाब मी सांगतो. वन विभागात असलेले ते गाव होते. त्या गावाला महसुली जमीन नव्हती. त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची अडचण होती. ज्या ठिकाणी पाणी लागेल असे सांगण्यात आले ती जमीन वन क्षेत्रात होती. बोअरींगसाठी 25 फूट बाय 25 फूट जमीन मिळाली नाही.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ MMP/ 11:55

(श्री. अरुण गुजराथी पुढे सुरु..)

त्यासबंधीचा प्रस्ताव भोपाळला पाठवावा लागला. कायदा करीत असताना त्यामध्ये लवचिकता असली पाहिजे. ती लवचिकता 1980च्या कायद्यामध्ये दिसत नाही. हा कायदा कडक असला पाहिजे या मताशी मी सहमत आहे. वन कमी होत चालले आहे, ते वाढत नाही ही देखील वस्तुस्थिती आहे. जोपर्यन्त वन वाढत नाही तोपर्यन्त शेतीची आणि जीवनाची समृध्दी नाही. परंतु 25 X 25 फुटाची जागा बोअरवेलसाठी मिळू शकत नाही अशा कायद्याचा आपल्याला कोठेतरी विचार करण्याची आवश्यकता आहे. नंतर वनाची आवश्यकता असते ती एनर्जीसाठी. त्याचे वेगळे नोटिफिकेशन आहे. विदर्भामध्ये जसा सातपुडा पर्वत आहे तसा खानदेशमध्ये देखील सातपुडा आहे. येथे रेशिमचे उत्पादन करण्यासाठी वन जमीन लागते. ही वन जमीन मिळू शकली तर वन क्षेत्रामध्ये राहाणा-या आदिवासींना त्याचा फायदा मिळेल. त्यानंतर वन खात्याची जमीन हवी असते ती पॉवर प्रोजेक्टसाठी, रेल्वेसाठी, टेलिफोनसाठी आणि कोठे स्ट्रीट लाईट हवी असेल तर त्या स्ट्रीट लाईटची लाईन टाकण्यासाठी. मघाशी सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, त्यांना केवळ चार पोलची आवश्यकता होती.. चार पोलमधून वायर टाकण्यासाठी माननीय मंत्री महोदयांपर्यन्त जाऊन देखील 10 वर्षापूर्वी ते काम होऊ शकले नाही. शेवटचा इलाज म्हणून सौरऊर्जेवर चालणारी लाईट त्या गावांना देण्यात आली. हा वन संरक्षण कायदा विकासाच्या विरोधी आहे अशा पध्दतीचा समज किंवा गैरसमज आहे. म्हणून विकास करण्याच्या दृष्टीकोनातून या कायद्यामध्ये बदल करण्याच्या संदर्भात सर्व राज्य शासनांनी मिळून विचार करणे अत्यंत गरजेचे आहे.

सभापती महोदय, या वन कायद्यातील काही तरतुदी मी वाचून दाखवू इच्छितो. Mr. Chairman, Sir, it reads as under: "1.1.(i) Definition: The term "Forest land" mentioned in Section 2 of the Act refers to reserve forest, protected forest or any area recorded as forest in the Government records. Lands which are notified under Section 4 of the Indian Forest Act would also come within the purview of the Act. (Supreme Court's Judgement in NTPC case.)"

Contd.on U-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ MMP/

(श्री. अरुण गुजराथी....)

Sir, I would also like to invite your kind attention to the Clarification. It reads as under: "The term "Forest" shall not be applicable to the plantations raised on private lands, except notified private forests." कोणती जमीन, हे यामध्ये सांगितलेले आहे. त्याबाबतची डेफिनिशन दिलेली आहे. नोटिफाईड प्रायव्हेट फॉरेस्टला देखील या कायद्याच्या तरतुदी लागू केलेल्या आहेत. झाडाची देखील व्याख्या केलेली आहे. कॉम्पेन्सेटरी लॅण्ड कोणती, हे देखील या कायद्यामध्ये सांगितलेले आहे. समजा, एखाद्या प्रकल्पासाठी 20 एकर जमीन लागत असेल आणि आपण आपल्या लॅण्ड बँकेतून 20 एकर जमीन दिली की, या लॅण्डची क्वॉलिटी चांगली नाही असे सांगितले जाते. म्हणजे येथूनच या प्रकल्पाला अडथळा सुरु होतो. कॉम्पेन्सेटरी लॅण्ड हा नियमाचा भाग आहे. केन्द्र शासनाने म्हटलेले आहे की, राज्य शासनाने 210 दिवसात केन्द्र शासनाकडे हा प्रस्ताव पाठविला पाहिजे.Sir, I quote:" After having received the proposal, the State Government or, the Union Territory Administration, as the case may be, shall process and forward it to the Central Government within a period of two hundred and ten days of the receipt of the proposal including the transit period." तेव्हा केन्द्र शासनावर देखील या बाबतीत कोठेतरी बंधन टाकण्याची गरज आहे की, केन्द्राने देखील अमूक इतक्या दिवसात प्रस्ताव मंजूर केला पाहिजे. तसे झाले नाही तर अनेक प्रकल्प रखडतील. सन्माननीय मंत्री महोदयांनी माझ्या मतदारसंघामध्ये जेथे सभा घेतली तेथील चिंचपाणी योजनेतील तीन बंधारे 15 वर्षापासून रखडलेले आहेत. मी त्यांना विनंती करतो की, आपण कायमस्वरुपी एक अधिकारी दिल्लीला ठेवावा आणि प्रत्येक जिल्ह्यातील प्रकल्प पूर्ण करण्याच्या संदर्भात विचार करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

...नंतर श्री. भोगले...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, विदर्भामध्ये जे पाटबंधारे विकास महामंडळ आहे ते प्रयत्न करीत आहे याची सर्वांना कल्पना आहे. पाटबंधारे प्रकल्पांच्या दृष्टीने केंद्राचा कायदा आडवा येतो हे चर्चेतून समोर आले आहे. यासाठी महाराष्ट्र शासनाने सर्व खासदारांचा समावेश असलेला अभ्यास गट नेमण्याची गरज आहे. विदर्भामध्ये वन क्षेत्रातून पाणी घेण्यासाठी ज्या अडचणी येतात, सिंचन तलावांसाठी मान्यता घ्यावी लागते, कॅनॉलसाठी मान्यता घ्यावी लागते. असे न करता महाराष्ट्र शासनाने एकदाच या सर्व बाबींचा सर्व्हे करावा. कोणकोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे, त्याचा एकदाच सर्व्हे झाला तर एकाच वेळी केंद्र सरकारकडे त्याची अनुमती मागता येईल. यादृष्टीने दोन्ही सभागृहाचा एकत्रित ठराव मंजूर करावा. वन कायद्याबाबत आपण लिबरल आहोत. जंगल सांभाळतो. पर्यावरणासाठी त्याची आवश्यकता आहे. डोंगरातील माती वाहून जाऊ नये हेही महत्वाचे आहे. परंतु आज वन क्षेत्रातील तलाव गाळाने भरत आहेत. सिंचन त्यामुळे कमी होत आहे. पर्यायाने सिंचनाचा अनुशेष वाढत आहे. वन संरक्षण झालेच पाहिजे. वन वाढले पाहिजे. परंतु मानवाच्या विकासाला अडथळा येणार नाही ही भूमिका केंद्र शासनाच्या लक्षात आणून देण्यासाठी सभागृहाने ठराव पारित करावा. महाराष्ट्रातील प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी एक अभ्यास गट नेमून त्यांनी सर्व प्रश्नांवर एकत्रित अहवाल तयार करुन केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा. वन कायद्यामुळे निर्माण झालेले प्रश्न सोडविण्यासाठी खासदारांनी वारंवार केंद्र शासनातील संबंधित अधिका-यांसमवेत बैठक घेणे आवश्यक आहे एवढेच मला सांगावयाचे आहे.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते (वनमंत्री) : सभापती महोदय, याठिकाणी अत्यंत महत्वाच्या ठरावावर चर्चा होत आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी आणि त्यांचे सहकारी यांचे आभार मानतो. विशेषत: वन खात्याच्या बाबीवर प्रकाश टाकण्यासाठी चांगल्या प्रकारची चर्चा घडवून आणली आहे.

सभापती महोदय, 12 सन्माननीय सदस्यांनी या चर्चेत भाग घेतला आणि त्यांची परखड मते त्यांनी मांडली आहेत. वन संज्ञा कायदा, 1980 हा केंद्र शासनाने केलेला कायदा आहे. या कायद्यामध्ये आपल्याला हस्तक्षेप करता येत नाही म्हणून वन खाते जरी महाराष्ट्रात असले तरी केंद्र सरकारच्या कायद्याच्या आधीन राहूनच वन विभागाचे कामकाज चालते. त्या पध्दतीने आपल्याला काम करावे लागते. आज महाराष्ट्रातील वन क्षेत्र 61939 चौ.मि.असून त्यापैकी विदर्भामध्ये 34600 चौ.मि. म्हणजे 56 टक्के इतके वन क्षेत्र विदर्भामध्ये आहे. मराठवाड्यात 4.1 टक्के क्षेत्र आहे. उर्वरित महाराष्ट्रापैकी कोकणामध्ये जे वन आहे ते खाजगी मालकीचे आहे. तेथे 8.1 टक्के वन क्षेत्र आहे आणि उर्वरित 32 टक्के महाराष्ट्रातील वनक्षेत्र आहे. हा कायदा आल्यानंतर साधारणत: अडचणी निर्माण होऊ लागल्या हे आपण म्हणत असलो तरी हा कायदा आल्यामुळेच वन शिल्लक राहिले आहे. 1980 चा वन कायदा आल्यामुळे मोठया प्रमाणात वन संरक्षण झाले आहे. सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी यांनी सांगितले की, वनाचा ऱ्हास होत आहे, वन कमी झाले आहे. आपल्याला 33 टक्के वनाची गरज आहे. जागतिक पातळीवर 33 टक्के वन असले पाहिजे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, झुडपी जंगलाच्या बाबतीत या सभागृहामध्ये तीन वेळा चर्चा झालेली आहे. माननीय मंत्रीमहोदय सातत्याने त्याच प्रकारचे उत्तर देत असतात. जंगल राहिले पाहिजे हे मंत्रीमहोदय सांगत आहेत ते ऐकून आम्ही आता कंटाळलो आहोत. वन कायद्यामुळे जे प्रकल्प अडले आहेत ते पूर्ण कसे होतील या संदर्भात मंत्रीमहोदयांनी उत्तर द्यावे अशी आमची अपेक्षा आहे. मागील अधिवेशनात चर्चा झाल्यांनतर मंत्रीमहोदयांनी अशाच प्रकारचे उत्तर दिले होते. मागील अधिवेशनात या विषयावर चर्चा झाल्यानंतर जे सिंचन प्रकल्प अडले आहेत त्याबाबत काय कारवाई केली याचे उत्तर द्यावे, इतर आकडेवारी आम्हाला नको आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्या मुद्याचेही मी उत्तर देणार आहे. परंतु भाषणाला सुरुवात करतांना प्रस्तावनेवर थोडक्यात विचार मांडावे लागतात.

सभापती महोदय, विदर्भातील वनाचे क्षेत्र 55.56 टक्के आहे. मी वन खात्याचा मंत्री झ ााल्यापासून विदर्भामध्ये कार्यालय सुरु केलेले आहे. सुट्टीचा दिवस सोडून सर्व दिवस हे कार्यालय सुरु असते. या कार्यालयामध्ये मी आतापर्यंत 61 बैठका घेतलेल्या आहेत. प्रत्येक महिन्याला मी विदर्भामध्ये एक किंवा दोन बैठका घेत असतो. मी केवळ येथे बैठकच घेतो अशी स्थिती नसून विदर्भातील प्रोजेक्ट पूर्ण व्हावेत यासाठी मी प्रत्यक्षात खूप काम केलेले आहे. तयार करण्यात आलेल्या प्रोजेक्टला केंद्राची मान्यता मिळावी, मंजूरी मिळावी यासाठी प्रयत्न केलेले आहेत आणि या प्रयत्नांना यश देखील आलेले आहे. जलसंपदा मंत्र्यांबरोबर तीन बैठका घेतलेल्या असून बाकीच्या मंत्र्यांना तसेच सन्माननीय सदस्यांना देखील या बैठकीस निमंत्रित केलेले आहे. विदर्भातील कार्यालयामध्ये मी नियमित बैठका घेतलेल्या असून त्याचा रिझल्ट देखील चांगला आलेला आहे. मला वाटते या ठिकाणी कायद्याचे विश्लेषण करण्याची गरज नाही. आपल्याला प्रोजेक्ट तयार करावयाचे असतात त्यासाठी परिपूर्ण प्रस्ताव तयार केले नाही तर त्याला केंद्राची मंजूरी मिळत नाही. पाटबंधा-यासाठी प्रोजेक्ट तयार करावयाचा असेल तर तेथील वन जमिनीचा सर्व्हे करुन, सर्व विभागातील अधिका-यांना एकत्र बसवून यामध्ये काय काय अडचणी निर्माण होतील त्याचे निराकरण करुन, नेट प्रेझेंट व्हॅल्यू भरुन हे प्रस्ताव केंद्राला पाठवावे लागतात. आतापर्यंत या परिसरात जे प्रोजेक्ट राहिलेले होते ते पूर्ण होत आलेले आहेत. यासंदर्भात 23 प्रस्ताव प्रत्यक्ष पूर्ण झालेले असून यामध्ये 49.54 हजार हेक्टर क्षेत्र ओलिता खाली येणार आहे. तसेच 25 प्रस्तावांना तत्वत: मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे 81,552 हेक्टर इतके क्षेत्र विदर्भातील ओलिताखालील येणार असून 3 वर्षात 1 लक्ष 3 हजार 606 हेंक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. एवढया मोठया प्रमाणात प्रोजेक्ट पूर्ण करावयाचे असल्यामुळे नोडल ऑफिसर्सची नेमणूक करुन त्यांना स्टाफ देखील उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. जलसंपदा विभागाचे व माझ्या विभागातील अधिकारी एकत्र बसून काम करीत आहेत. यासंदर्भात दोन कार्यशाळा देखील घेण्यात आलेल्या आहेत. अगोदर प्रस्ताव चांगल्या प्रकारे तयार केले जात नसल्यामुळे खरे म्हणजे

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते.......

काम अडले होते. परंतु मी या खात्याचा मंत्री झाल्यापासून परिपूर्ण प्रस्ताव तयार करुन ते केंद्राकडे पाठवून, त्याचा पाठपुरावा करुन केंद्राची मान्यता मिळवलेली आहे. अगोदरच्या काळात प्रस्ताव चांगल्या प्रकारे तयार केले गेले असते, त्यांचा पाठपुरावा केला गेला असता तर आजची ही वेळ आली नसती. खरे म्हणजे 20-20,22-22 वर्षापासून योग्य प्रस्ताव तयार झाले नव्हते. खरे म्हणजे योग्य प्रस्ताव पाठविले गेले तर केंद्र सरकारही त्याला नाकारित नाही. त्यामुळे प्रस्ताव पास होऊन पास होण्यापर्यंतची सर्व जबाबदारी मी तसेच माझे अधिकारी पार पाडीत आलेले आहे. माझ्या अधिका-यांनी उत्कृष्ठ काम केलेले आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील जे प्रोजेक्ट वन विभागाच्या हरकतीमुळे थांबले होते ते आता सुरु झालेले आहेत. केवळ जे प्रस्ताव अपूर्ण होते तेच प्रस्ताव मंजूर होऊ शकले नाहीत. परंतु हे प्रस्ताव देखील मंजूर करण्याच्या संदर्भात मी प्रयत्न करीत आहे. ज्या ठिकाणी प्रोजेक्ट घ्यावयाचे आहेत त्या ठिकाणच्या जमिनीची मोजणी करुन, झाडांची मोजणी करुन , नेट प्रोजेक्ट व्हॅल्यू भरुन प्रस्ताव पाठविण्यात आलेले आहेत. गेल्या तीन वर्षात माझ्या विभागाने मोठया प्रमाणात काम केलेले आहे ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, झुडपी जंगलाच्या संदर्भात सुरुवातीला चुका झालेल्या आहेत. 1980 चा वन कायदा आला त्यावेळेस प्रस्ताव व्यवस्थित तयार केले गेले असते तर अजून चांगल्या प्रकारचा रिझल्ट आपल्याला मिळाला असता. अगोदर काम चांगल्या प्रकारे केले गेले असते तर आता अडचणी आल्या नसत्या ही देखील वस्तुस्थिती आहे. विदर्भात 1,80,523 हेक्टर इतकी जमीन आहे. झुडपी जंगल "ड" मध्ये 32229 हेक्टर इतकी जमीन आहे, अतिक्रमणाखाली 27501 हेक्टर इतकी जमीन आहे, वनेतर वापरासाठी असलेली जमीन 26672 हेक्टर आहे, उर्वरित राहिलेली जमीन 92115 हेक्टर आहे, उर्वरित जमीन, राखीव वने जोपर्यंत डिक्लेअर होत नाही तोपर्यंत या जमिनीची सोडवणूक होणार नाही. यासंदर्भात मी 2-3 वेळेस बैठक घेऊन चर्चा देखील केलेली आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते...........

आपण "ड"वर्गात असलेली जमीन राखीव जमीन म्हणून घोषित करीत नाही.

सभापती महोदय, झुडपी जंगल असलेली जमीन मोकळी करता येत नाही. त्यामुळे प्रोजेक्टस रखडतात. पण याचा सखोल अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी पर्यायी जमिनी शिल्लक नाही असे सांगितले. काही प्रोजेक्टसमुळे वन विभागाची जमीन मोठ्या प्रमाणावर जात आहे. यासंदर्भातील आकडेवारी माझ्याकडे आहे, ती सांगून मी सभागृहाचा जास्त वेळ घेऊ इच्छित नाही. साधारणत: 61 हजार हेक्टर क्षेत्रापेक्षा जास्त जमिनीची आवश्यकता आहे. आपण वन विभागाला पर्यायी जमीन देत नाही तोपर्यंत आपले प्रोजेक्टस मान्य होणार नाहीत. आपण निधीची व्यवस्था करु, परंतु जमीन उपलब्ध नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे गेली 12-13 वर्षे प्रोजेक्ट आहेच त्याठिकाणी ठप्प झालेले आहेत.झुडपी जंगलाची जमीन मागितल्यास वन विभाग पर्यायी जमिनीची मागणी करीत असे. तेव्हा हा प्रश्न सोडविण्यासाठी केंद्र सरकारच्या अधिकाऱ्यांबरोबर मिटींग घेतली. माननीय कृषि मंत्री श्री.शरद पवार यांचे सहाय्य घेतले. गोसीखुर्द, बावनथडी,तुडतुडी या प्रोजेक्टसवरील पर्यायी जमीन देण्यास आम्ही तयार झाल्यामुळे विदर्भातील हे प्रोजेक्टस् मार्गी लागले आहेत. ही कामे करण्यासाठी वन विभागाच्या सिनिअर ऑफीसर्सना दिल्लीला पाठविण्यात आले होते. दिल्लीला काम असल्यामुळे काही जास्त काळ त्याठिकाणी रहावे लागेल असे त्यांना सांगण्यात आले. सुरुवातीच्या काळात काही अडचणी आल्या, परंतु नंतर सर्व व्यवस्थित पार पडले. आमच्या विभागाच्या कामाबरोबर पाटबंधारे विभागांच्या कामाचा पाठपुरावा केल्यामुळे त्याचा रिझल्ट चांगला आलेला आहे. सर्व प्रोजेक्टस लवकरात लवकर क्लिअर व्हायला लागले.

सभापती महोदय, या चर्चेमध्ये भाग घेताना अनेक सन्माननीय सदस्यांनी काही प्रश्न उपस्थित केले. तसेच काही मागण्या देखील केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे यांनी वन विभागाशी संबंधित असणाऱ्या सर्व खासदार व आमदारांची बैठक बोलावावी असे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते...........

सांगितले. मला बैठक बोलाविण्यात काहीही अडचण नाही. बल्लारपूर जमिनीच्या संदर्भात प्रश्न विचारण्यात आला. मी संदर्भात माहिती घेतलेली आहे. कोणती जमीन पाहिजे त्याबाबत प्रस्ताव तयार करण्यात येईल. या जमिनीच्या 7/12वर 1931 साली नोंदी झालेल्या आहेत. खाजगी जमीन असेल तर त्यावेळी ती नोंद झाली असेल. 1931 नंतर नोंदी झालेल्या नाहीत. नोंदणीपूर्वी ज्याच्या नावावर जमिनीची नोंद झाली असेल त्याला ती देण्यास काहीही हरकत नाही. परंतु त्यासाठी परिपूर्ण प्रस्ताव तयार केला पाहिजे. नेट प्रेझेन्ट व्हॅल्यू देण्यास तयार असतील तर ती मागणी पूर्ण करण्यास तयार आहोत. परंतु यामध्ये खूप अडचणी आहेत.

सभापती महोदय, शाळा उभारावयाची असेल, हॉस्पीटल, गावठाण उभारावयाचे असले तरी एक गुंठा देखील जमीन मिळत नाही. त्यामुळे हे प्रश्न सोडविण्यासाठी मी दोन-तीन वेळा भोपाळ व दिल्ली येथे जाऊन संबंधितांशी चर्चा केली.संबंधितांना सर्व परिस्थिती पटवून देऊन किमान दोन हेक्टरपर्यंतची परवानगी आम्हाला द्यावी अशी मागणी केली. रस्ते, गावठाण, शाळा, हॉस्पीटल इत्यादी 13 कारणांसाठी दोन हेक्टरची परवानगी मागितली. आम्ही केलेल्या प्रयत्नाला यश येऊन आम्हाला दोन हेक्टरऐवजी एक हेक्टरची परवानगी मिळालेली आहे.

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )

श्री.बबनराव पाचपुते...

तशी परवानगी मिळाल्यापासून या सर्व छोटया छोटया गोष्टी आम्ही संपवून टाकलेल्या आहेत. मध्यंतरी परत परवानगी रद्द झाली होती. कारण बाकीच्या राज्यांनी याचा गैरफायदा घेतला होता. यामध्ये एकमेव महाराष्ट्र राज्यानेच योग्य पध्दतीने मिळालेल्या संधीचा फयदा घेतलेला आहे. परवानगी रद्द झाल्यामुळे परत आम्ही दिल्लीत गेलो व परत आम्हाला डिसेंबर,2008 पर्यंत परवानगी मिळालेली आहे. आता 1 हेक्टरपर्यंतचे सगळे लहान-मोठे प्रस्ताव आम्ही आमच्या पातळीवर पूर्ण करणार आहोत. वन खात्याने वनामध्ये अनेक कार्यक्रम राबवले. पाणी आडवा पाणी जिरवाचा कार्यक्रम, मातीचे कार्यक्रम, जलसंधारणांचे कार्यक्रम या सर्व कार्यक्रमांमध्ये आम्ही टॉपवर होतो. टॉप टू बॉटम पाणी अडवण्याचा कार्यक्रम वनात झालेला आहे व इतरही कार्यक्रम वनामध्ये घेण्यात आलेले आहेत. गेल्यावर्षीपासून वनामध्येही वन तलाव, नालाबंडींग, पाझर तलाव, वन तळे, कंट्रोल बंडींग, सीसीटीची कामे, बंधारे, साठवण बंधारे, केटीवेअरची कामे, ही सगळी कामे वनामध्ये घेण्याचा निर्णय आपण गेल्यावर्षीपासून घेतलेला आहे. परंतु अशी कामे सुरु केल्यानंतर यासंदर्भातील सर्व्हे करण्याची अडचण निर्माण झाली व त्यामुळे कामे ठप्प झालेला आहे. त्यामुळे यासंदर्भातील सर्व्हे करण्याचा व टेक्निकल सँगशन देण्याचा अधिकार आरएफओ, एसएफला आणि डीएफओला दिलेला आहे. अशाप्रकारचा जी.आर. आपण काढला असून यावर्षी पासून सदरची कामे जोरात सुरु आहेत. पाणी अडवायचे असेल तर मातीही अडवली पाहिजे. परंतु आज सामान्य माणसाला जंगल हे शाप वाटत आहे. जंगल आहे म्हणून माझी कामे होते नाहीत, रस्ता होत नाही, पोल टाकता येत नाही, शेतात जाता येत नाही, अशाप्रकारची त्यांची समज आहे. परंतु या सगळया गोष्टी आता आपण संपवायला सुरुवात केलेली आहे. यातून योग्य पध्दतीने आपण मार्ग काढीत आहोत. वन्यजीवांना उन्हाळयामध्ये जंगलात पाणी मिळत नसल्यामुळे ते बाहेर येतात. परंतु जंगलांमध्ये आता आपण पाणी अडवण्याची व इतर सगळी कामे करीत आहोत. त्यामुळे आता जंगलात पाणी मिळणार असून त्याचा फायदा जंगलालगत असणाऱ्या शेतकऱ्यांनाही होणार आहे. जंगलात आपण अशी कामे केल्यामुळे त्यांच्या शेतीतील विहिरीत पाणी वाढलेले आहे. त्यांना असे वाटायला लागले आहे की, जंगल माझे आहे व माझे जंगल मला फायदा देत आहे. सभापती

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते...

महोदय, आपण जेएफएम कमिटीचा कार्यक्रमही घेत आहोत. या स्कीमध्ये गेल्या 3 वर्षापूर्वी महाराष्ट्र खालून एक नंबरवर होते, ते आता वरुन एक नंबरवर आलेले आहे. महाराष्ट्रामध्ये 45 हजार खेडी आहेत, त्यातील 6 हजार 300 खेडी प्रत्यक्षात वनाच्या संदर्भातील आहेत. साडे पंधरा हजार गांवामध्ये 10 हजार हेक्टरपेक्षा जास्त जमीन वनाची आहे. बहुतेक सगळया ठिकाणी आम्ही जेएफएम कमिटया तयार केलेल्या असून त्यांना अधिकारही दिलेले आहेत. 33 प्रकारचे वनउपोज मिळण्याच्या दृष्टीने कामही सुरु केलेले आहे. यासाठी आपण संत तुकाराम वनग्राम योजना अंमलात आणली असून आपण यासंदर्भात 7 लाखांचे, 10 लाखांचे, 15 लाखांचे बक्षिसही ठेवलेले आहे. यासंदर्भात जोरात स्पर्धा सुरु झालेली आहे. मघाशी वनवणव्याचा विषय निघाला. याठिकाणी सांगण्यात आले की, वनवणवा तेंदूपत्त्यावाले लावतात. सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे. तेंदूपत्ता जमा करण्याचा कार्यक्रमा आपण करीत होतो. महाराष्ट्र सरकारच्या वन विभागाने एक अतिशय क्रांतीकारी व पुरोगामी निर्णय संदर्भात घेतलेला आहे की, जेवढे तेंदूपत्त्याचे पैसे मिळतात किंवा त्या माध्यमातून जो महसूल मिळतो तो पैसा ज्या लोकांनी काम केले त्यांना, त्यांचे रेकॉर्ड ठेऊन तो वाटण्याचा निर्णय घेतलेला आहे. गेल्या वर्षी आम्ही 14 कोटी रुपये आणि यावर्षी जवळपास 82 कोटी रुपये वाटणार आहोत. डिसेंबर संपण्याच्या अगोदर आम्ही गेल्यावर्षीचे पैसे देणार आहोत व यावर्षीचे पैसे मार्च संपण्याच्या अगोदर देणार आहोत. आज वनाच्या संदर्भात अनेक अडचणी निर्माण होत आहेत. ग्लोबल वॉर्मिंगमुळे अडचण निर्माण झालेली आहे. सभापती महोदय, जंगल वाढविले पाहिजे, हे खरे आहे. परंतु जंगलामुळे अडचणी निर्माण होऊ नयेत, यादृष्टीनेही आम्ही काळजी घेत आहोत. जंगले हे एक वरदान असून त्यासाठी आम्ही नवीन युको टुरिझमची पॉलिसी तयार केली आहे, ती आम्ही लवकरच कॅबिनेटसमोर ठेवणार आहोत व त्यानंतर येथेही ती ठेवली जाईल. युको टुरिझमची पॉलिसी व पर्यटनाची पॉलिसी नव्हती, ती आता आपण घेतलेली आहे. मोठया प्रमाणात वन झाल्यानंतर त्या लगतच्या लोकांना व पर्यटकांना त्याचा फायदा होणार असून त्या माध्यमातून आपल्याला उत्पन्नही मिळणार आहे.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.रोझेकर....

श्री.बबनराव पाचपुते..........

आदिवासी विकास मंत्री महोदयांचे सहकार्य आम्ही याबाबत घेणार आहोत. आदिवासी मुलांना प्रशिक्षण देऊन त्यांना हॉटेल व्यवस्थापनाची संधी उपलब्ध करुन देणार आहोत. यासाठी लागणारी फी शासनाकडून भरण्यात येणार आहे. या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी विदर्भातील 56 ठिकाणे निवडलेली आहेत. या ठिकाणी येणा-या पर्यटकांना एक दिवसाचे, दोन दिवसाचे पॅकेज देण्यात येईल. नागपूर शहराचा झपाटयाने विकास होत आहे कारण या ठिकाणी आशिया खंडातील सर्वात मोठे कार्गो हब तयार होत आहे. त्याचप्रमाणे वन विभागातर्फे गोडेवाडा झू प्रकल्पाचे काम सुरु आहे, हा झू देखील आशिया खंडातील सर्वात चांगला झू असेल, अशा प्रकारचे प्रयत्न आहेत. जानेवारीच्या पहिल्या आठवडयामध्ये या कामास सुरुवात होणार आहे. त्यामुळे कामे रखडली आहेत, कामे होत नाहीत, अशी परिस्थिती नाही. एवढीच विनंती आहे की, परिपूर्ण प्रस्ताव दिला तर हा प्रस्ताव 90 दिवसांच्या आत मंजूर करण्याचे बंधन केंद्र शासनाच्या वन विभागावर आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशाप्रमाणे सेंट्रल एम्पॉवर कमिटीची स्थापना करण्यात आली आहे, ही कमिटी सुध्दा विकासाच्या आड येत नाही. परंतु, त्यांचे म्हणणे एवढेच आहे की, जंगल राहिले पाहिजे. या जंगलांना क्षती न पोहोचता आपण काम करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, आता कार्बन क्रेडिटची नवी संकल्पना पुढे येत आहे. याचा फायदा मिळविण्यासाठी केंद्रीय वन मंत्र्यांना आम्ही पत्र लिहिले आहे, केद्रीय मंत्री सन्माननीय श्री.शरद पवार यांना देखील पत्र लिहिले आहे. संपूर्ण देशातील वनमंत्री, पर्यटन मंत्री, सचिव या सर्वांची एकत्रित कार्यशाळा घेऊन त्यांना या नवीन संकल्पनेची माहिती दिली पाहिजे. झाडे आम्ही लावणार असू आणि आम्हाला त्याचा फायदा मिळणार नसेल तर आम्ही झाडे का लावावी ? दुस-याने कारखाने काढायचे, प्रदुषण वाढवायचे आणि तुम्ही-आम्ही मात्र जंगलांचे संरक्षण करायचे, झाडे लावायची, अशाप्रकारचीही भावना लोकांमध्ये आहे. झाडे लावली आणि त्याचा फायदा मिळत राहिला तर जंगल वाढेल, अशी ही कार्बन क्रेडिटची संकल्पना आहे. यादृष्टीनेही प्रयत्न होत आहेत.

सभापती महोदय, ऑगस्ट महिन्यामध्ये माननीय पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली सर्व राज्यातील वन सचिवांची बैठक आयोजित करण्यात आली होती, या बैठकीला सर्व पी.सी.सी.एफ.यांनाही बोलाविण्यात आले होते. चर्चा झाल्यानंतर माननीय पंतप्रधानांनी आपल्या भाषणात असे सांगितले

...2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते........

की, सॅटेलाईटव्दारा संपूर्ण भारतातील जंगल बघितल्यानंतर असे लक्षात येते की, महाराष्ट्रातील जंगलामध्ये गेल्या तीन वर्षात वाढ झाली आहे. हे मी सांगत नाही तर माननीय पंतप्रधानांनी मारलेला शेरा आहे. आज आपण चांदोली परिसरात गेला तर आपल्याला दिसून येईल की, या परिसरात सूर्याची सावली देखील पडलेली नाही, अशाप्रकारचे घनदाट जंगल त्या ठिकाणी आहे. या जंगलांचे जतन करायचे आहे, जंगल वाढवावयाचे आहे.

सभापती महोदय, पुनर्वसनाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित झाला. पुनर्वसना अंतर्गत मोठया प्रमाणात गावे आहेत. अभयारण्यांमध्ये जी गावे आहेत ती त्या ठिकाणांहून हलवली पाहिजे. ही गावे हलवली तर चांगल्याप्रकारचे जंगल त्या ठिकाणी होऊ शकते. यासंबंधी आम्ही पूर्ण तयारी केलेली आहे. आज 79 गावे काढावी लागणार आहेत, पुनर्वसन पूर्ण झाल्याशिवाय, गावे बाहेर काढल्याशिवाय चांगले जंगल होऊ शकणार नाही. या गावांच्या पुनर्वसनासाठी एका कुटुंबाला एक लाख रुपयांचा मोबदला देण्यात येणार होता, हा मोबदला केंद्र शासनाकडून देण्यात येतो. लोकांमध्ये निराशा होती. यासाठी महाराष्ट्रातील केंद्रीय मंत्र्यांचे सहकार्य घेण्यात आले. केंद्रीय वनमंत्र्यांबरोबर तीन वेळा बैठक झाली. सन्माननीय श्री.शरद पवार यांच्याकडेही बैठक झाली. या पाठपुराव्याला यश येऊन आता केंद्र शासनाने 1 लाख रुपयांऐवजी प्रत्येक कुटुंबाला 5 लाख रुपये मोबदला देण्याचा निर्णय घेतला आहे. आता या गावातील लोक पुनर्वसनासाठी तयार झाले आहेत. हे सर्व झाल्यानंतर त्या ठिकाणी उत्कृष्ट प्रकारचे जंगल होऊ शकेल.

सभापती महोदय, असाही मुद्दा उपस्थित करण्यात आला की, जनावरे येतात, वाघ येतात, त्रास होतो. या प्राण्यांचेही काही नियम आहेत. जगा आणि जगू द्या, तुम्हाला जसा जगण्याचा अधिकार आहे तसाच जनावरांनाही आहे, ही संकल्पना आपण मान्य केली आहे. ज्या जंगलात वाघ असतो ते उत्तम प्रकारचे जंगल मानले जाते. ताडोबाचे जंगल हे जगातील उत्कृष्ठ 10 जंगलांपैकी एक आहे. सगळीकडे अशी चर्चा होत असते की, वाघांची संख्या कमी झाली आहे. परंतु, महाराष्ट्रामध्ये गेल्या तीन वर्षात वाघ वाढलेले आहेत. दर चार वर्षांनी वाघांचा सेंसस होतो. गेल्या वर्षी झालेल्या सेंससची आकडेवारी आपल्याला हे दर्शविते की, राज्यात 260 वाघ आहेत, वाघांची संख्या वाढलेली आहे. विधानसभेच्या सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्या मतदारसंघामध्ये कालच एका वाघाने मुलाला नेले, यापूर्वीही 7 लोकांना या वाघाने मारले आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन या वाघाला शूट करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ प्रथम श्री.रोझेकर .......... 12:25

श्री.बबनराव पाचपुते ...........

त्या ठिकाणी शूटर सुध्दा पाठविलेले आहेत. ज्यावेळी अशी घटना घडते त्यावेळी काही तरी करावे लागते. वन वाईट आहे, वनामुळे आमचा विकास थांबलेला आहे, वन नसेल तर आम्हाला सर्व चांगल, असे नाही. वन आहे म्हणून आपण आहोत. सन्माननीय सदस्यांनी वारकरी म्हणून माझा उल्लेख केला आहे. मी वारकरी आहे. कथा कोणती आहे ते मला माहीत नाही. असे म्हणतात की, समुद्र मंथनाच्या वेळी विष हे रत्न बाहेर निघाले आणि ते शंभूमहादेवांनी प्राषण केले. त्यामुळे त्यांचे नाव निळकंठ असे पडले. कार्बन डाय ऑक्साईड, वाहने यामुळे जे प्रदूषण होते ते प्रदूषण संपविण्याचे काम कोण करते ? हे प्रदूषण संपविण्याचे काम वन आणि झाडे करतात. वन आणि झ ाडे हे ख-या अर्थाने शंभूमहादेवाचे अवतार आहेत. म्हणून वन वाढविले पाहिजे आणि टिकवले पाहिजे. वन टिकवण्यासाठी आपणा सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्राचे वन उत्तम प्रकारचे आहे.

**उपसभापती** : वन व्यवस्थित करीत असतांना लोकांना वणवण फिरावे लागणार नाही याकडे सुध्दा आपण लक्ष द्यावे. आम्ही त्याचा अनुभव घेतलेला आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, जंगलामध्ये येणारे लोक शांततेसाठी येणार नाहीत. जंगलामध्ये येणारे लोक खाण्यापिण्यासाठी, मजा करण्यासाठी येत असतात. वन विभागाचे 750 विश्रामगृह आहेत. आम्ही असा निर्णय घेतला की, वन विभागाच्या विश्रामगृहावर आम्ही नॉन व्हेज देणार नाही आणि दारु पिण्याला परवानगी देणार नाही. त्यामुळे तेथे शांतता निर्माण झाली. जे लोक जंगलामध्ये येणार असतील त्यांनी यावे आणि सन्मानाने तेथे रहावे. जंगल आपले आहे. जंगल, पाणी या सर्व गोष्टी वाढविल्या पाहिजेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, प्रकल्प पूर्ण करण्यासाठी वन विभागाची अडचण आहे. परंतु तसे अजिबात नाही. काल जलसंपादामंत्री श्री.अजित पवार यांना आम्ही दाखवून दिले की, जे प्रकल्प राहिलेले आहेत ते अधिका-यांच्या हलगर्जीपणामुळे, अधिका-यांनी व्यवस्थित प्रस्ताव न पाठविल्यामुळे राहिलेले आहेत. मागील तीन वर्षात वन विभागाकडून कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण झालेली नाही आणि उद्या सुद्धा अडचण येणार नाही. तुमच्या विकासाच्या आड वन खाते मुळीच येणार नाही. इको टुरिझम झाले तर आम्ही विदर्भातील हजारो मुलांना नोक-या देऊ शकतो, त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडवू

..2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते ...........

शकतो. उत्तम प्रकारे काम करण्याची वन विभागाची तयारी आहे. सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांना माझी विनंती आहे की, त्यांनी हा प्रस्ताव मागे घ्यावा आणि यासंदर्भात वेगळे काही सांगण्यापेक्षा केंद्र शासनाला प्रस्ताव पाठवावा आम्ही आपल्या विकासाच्या आड येणार नाही.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, झुडपी जंगलाबद्दल मी माझ्या भाषणामध्ये बोललो. माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात सांगितले की, आम्ही 12 कोटी रुपये बोनस दिलेला आहे. माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, आपण पैसे पाठविलेले आहेत. परंतु ते वाटलेले नाहीत. ते गरीब लोकांचे पैसे आहेत. माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात सांगितले की, आम्ही पैसे दिले. परंतु ते पैसे मजुरांना मिळालेले नाहीत. दुसरा मुद्दा असा आहे की, जंगलाला आग लावल्यामुळे हजारो लोकांच्या पिकाचे नुकसान झालेले आहे, त्यांना सुध्दा नुकसान भरपाई मिळालेली नाही.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, नुकसान भरपाईसंदर्भात आपले राज्य इतर राज्यांपेक्षा जास्त नुकसान भरपाई देते. एखाद्या माणसाचा मृत्यू झाला तर दुस-या राज्यामध्ये 40-50 हजार रुपये दिले जातात. परंतु आपण दोन लाख रुपये देतो. भात पिकाचे नुकसान झाले, जनावरांचे नुकसान झाले तर आपण बाजारभावाप्रमाणे नुकसान भरपाई देतो. गाईचे, म्हशींचे नुकसान झाले तर आपण पूर्वी 300 रुपये देत होता. आता आपण 15 ते 20 हजारापर्यंत नुकसान भरपाई दिलेली आहे. यावर्षी 5 कोटी 34 लाख रुपये नुकसान भरपाई वाटण्याचे काम सुरु झालेले आहे आणि तेंदू पत्त्याचे पैसे डिसेंबरपर्यंत दिले जातील.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदन, वनसंज्ञे संदर्भात उपोषण झाले होते त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते की, आम्ही उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करु. मायनिंगचे जे काम सुरु आहे तेथे वन जमिनीवर चौक्या बांधण्याचे काम सुरु आहे त्यासंदर्भात आपण कारवाई करणार आहात काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मायनिंगचे एकही काम विना परवानगी सुरु नाही. मायनिंगच्या कामाला केंद्र शासनाची परवानगी घेतलेली आहे. वनसंज्ञेबाबत न्यायालयात ॲफिडेव्हिट सादर करण्यासंदर्भात आपली तयारी झालेली आहे.

यानंतर कु.जयश्री........

अशुध्दप्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.राजन तेली : वनसंज्ञेच्या संदर्भात राज्यशासन सुप्रिम कोर्टामध्ये ॲफिडेव्हिट कधी दाखल करणार आहात ? डेन्काचे काम केसरी पिंजवडे येथे 55 हेक्टर जमिनींवर सुरु केलेले आहे.

श्री.बबनराव पाचपुते : ज्या जमिनींबाबत आपण बोलत आहात,ती जमीन खाजगी गायरान जमीन आहे. यासंदर्भात राज्यशासन एक पूर्ण प्रस्ताव बनविणार आहे आणि तो सुप्रिम कोर्टामध्ये दाखल करणार आहे.

प्रा.फौजीया खान : माननीय सभापति महोदय, यहां पर माननीय मंत्री महोदय ने बताया कि यदि व्यवस्थित ढंग से प्रस्ताव भेजा गया तो 90 दिन के अंदर उसका उत्तर केंद्र सरकार से आना चाहिए. मैं पूछना चाहती हूं कि वह व्यवस्थित प्रस्ताव केंद्र सरकार के पास कौन भेजने वाला है ?

श्री.बबनराव पाचपुते : सदर प्रस्ताव तयार करण्याचे काम ज्याला गरज आहे,त्याने वन खात्याकडे येऊन प्रस्ताव तयार करुन घेतला पाहिजे वन खात्यामधील त्यासाठी एक स्वतंत्र विभाग आहे,हा विभाग अशा प्रकारचे प्रस्ताव तयार करण्यासाठी मदत करतात व राज्यशासनाकडून केंद्रशासनाकडे पाठविण्याची व्यवस्था करतात. यासंदर्भात अधिका-यांच्या अधिकारामध्ये अडचणी निर्माण झालेल्या आहेत. या अधिका-यांच्या अधिकाराचा प्रश्न निर्माण झालेला आहे,यासंदर्भात वनखाते आयोग नेमण्यास तयार आहे.

**उपसभापती** : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केलेला आहे. सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन्हा सुरु होईल.

( सभागृहाची विशेष बैठक दुपारी 12 वाजून 31 मिनिटांनी, दुपारी 1 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आजची कार्यक्रम पत्रिका पाहिली तर असे लक्षात येईल की, 36 तासाचा कार्यक्रम आहे व सभागृहासमोर वेळ कमी आहे.

**सभापती** : मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या अधिवेशनाचे सुरुवातीचे 2-3 दिवस आपणास अपेक्षा असताना, सर्वांचे सहकार्य असताना, जेवढे काम पूर्ण करणे आवश्यक होते तेवढे काम पूर्ण झाले नाही. आज कामकाज सल्लागार समितीची बैठक होणार असून विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर व माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार उपस्थित राहणार आहेत, तेथे याबाबत चर्चा करता येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये असा संकेत ठरला होता की, सायंकाळी 6.00 नंतर सभागृहाचे कामकाज चालविण्यात येऊ नये. सुरुवातीचे तीन दिवस पुरेसे कामकाज झाले नाही, त्यामध्ये आमचा कोणता दोष आहे ? वाया गेलेला वेळ भरुन काढण्यासाठी 20-20 तास सदस्यांना सभागृहात बसविणे हे योग्य नाही. काल रात्री पुरवण्या मागण्यांवर चर्चा करताना रात्री 11.00 वाजले होते. त्यापेक्षा हे कामकाज पूर्ण करण्यासाठी अधिवेशनाचा कालावधी 2-3 दिवस वाढविला पाहिजे.

**सभापती** : कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत याबाबत चर्चा करण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत चर्चा झाली तेव्हा असे स्पष्ट केले होते की, सायंकाळी 6.00 नंतर सभागृहाचे कामकाज करावयाचे नाही. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, कालच्या सारखीच आजची कार्यक्रमपत्रिका आहे. कामकाज व्हावे ही आमचीही इच्छा आहे. परंतु दोन आठवडयात 10 दिवसच अधिवेशनाचे कामकाज होते. परंतु एकाच दिवशी एवढे कामकाज कार्यक्रमपत्रिकेवर दाखविण्याची गरज नाही. एवढे कामकाज दर्शविण्याचा निर्णय कसा घेतला जातो ?.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ D/ KTG/

**सभापती** : मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ज्या दिवशी कार्यक्रम पत्रिकेवरील एखादे कामकाज अपूर्ण राहते, ते कामकाज आपण लॅप्स केले नाही तर त्याचा समावेश दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रम पत्रिकेत केले जातो. अशा रितीने मागील दोन दिवसाचे उर्वरित कामकाजाचा आजच्या कार्यक्रम पत्रिकेत समावेश आहे. आज हे कामकाज पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सभागृह नियमाप्रमाणे चालले पाहिजे असे आपण म्हणता. कामकाजाबाबत सदनाचे हे कोणते नियम आहेत ?

..... यानंतर कु.धनश्री.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : एखादी लक्षवेधी सूचना किवा अन्य काही काम ठरविलेल्या दिवशी झाले नाही तर ते लॅप्स होते. परंतु अशाप्रकारे लक्षवेधी सूचना किंवा अर्धा तास चर्चा लॅप्स करावयाच्या नाहीत असे ठरविण्यात आले आहे. त्यामुळे एखाद्या लक्षवेधी सूचनेवर ठरविलेल्या दिवशी चर्चा झाली नाही तर ती त्यानंतर घेण्याचा प्रयत्न असतो. आपल्याला 11 अर्धातास चर्चा करता आल्या नाही. काल किमान 8 अर्धातास चर्चा पूर्ण करण्यात आल्या. दैनंदिन कामकाज व यापूर्वी जे कामकाज राखून ठेवलेले आहे, ते कामकाज या दृष्टीने आजची कामकाजपत्रिका तयार करण्यात आलेली आहे. आजच्या कामकाजपत्रिकेवरील जास्तीत जास्त कामकाज पूर्ण होण्याच्या दृष्टीने दोन्ही पक्षाचे सन्माननीय सदस्य मला सहकार्य कराल अशी मला अपेक्षा आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी येथे 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे . त्याबद्दल त्यांनी एक ते दोन मिनिटात बोलावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

## नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, येथे एका अतिशय गंभीर विषयावर या प्रस्तावाच्या अनुषंगाने मी आपले लक्ष वेधू इच्छितो. भारतीय संविधानाने प्रदान केलेले जे अधिकार आहेत त्याचप्रमाणे भारतीय संविधानामध्ये जाणीवपूर्वक वरिष्ठ सभागृह निर्माण केलेले आहे. या वरिष्ठ सभागृहाला येथे नख लावण्याचे काम केंद्र शासनामध्ये सुरु आहे. वीरप्पा मोईली कमिटीने विधान परिषदे मधील शिक्षण आणि पदवीधर मतदारसंघ असू नये अशी भूमिका घेऊन त्याची शिफारस केंद्र शासनाकडे केलेली आहे. वीरप्पा मोइली कमिटीकडे हे काम नसताना त्यांनी ही शिफारस करुन विधानपरिषदे च्या अस्तित्वाला नख लावण्याचे काम केले आहे. भारतीय घटनेमध्ये लोकशाहीला पूरक म्हणून विधान परिषद या वरिष्ठ सभागृहाची निर्मिती करण्यात आली. अशाप्रकारचे वरिष्ठ सभागृह असावे की नसावे याबाबत बरीच चर्चा झाली होती . मी आता त्या चर्चेचा तपशील देत नाही. संविधानसभेमध्ये माननीय डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली बरीच चर्चा झाली होती. या चर्चेच्या अंती असा निर्णय घेण्यात आला की, अपर चेंबर या देशामध्ये असण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्र विधीमंडळाला 146 वर्षाची प्रदीर्घ परंपरा आहे. सन 1861 मध्ये सुरुवातीला विधान परिषद सभागृह निर्माण झाले व त्या नंतर विधानसभा अस्तित्वात आली. त्या सभागृहाच्या अस्तित्वाबद्दल रगानी आणि कामतांनी आक्षेप घेतला होता. त्यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले की, विधीमंडळामध्ये आपण सेकंड थॉट किंवा फेर विचार करण्याची आवश्यकता आहे. यासाठी अशाप्रकारचे चेंबर असणे आवश्यक आहे. याची रचना कशी असावी याबाबत चर्चा झालेली आहे. त्याअनुषंगाने शिक्षक व पदवीधर मतदारसंघाची निर्मिती करण्यात आली.तेथील उमेदवार हे शिक्षकांचे व पदवीधरांचे प्रतिनिधी म्हणून येथे येतात हा समज खोटा आहे......

**सभापती** : मी आपल्यालाया प्रस्तावावर काही वेळ बोलण्याची संधी दिलेली आहे. या प्रस्तावावर सविस्तर बोलण्याची आवश्यकता नाही. केवळ एक ते दोन मिनिटात आपण आपले विचार मांडावे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, संविधानातील निर्णय हे घटनेनुसार, कायद्यानुसार झ ाले पाहिजे. विधान परिषद हे सर्वोच्च सभागृह आहे अशी आपणा सर्वांची भावना आहे. असे असताना माननीय पंतप्रधानांना, एका महिन्यापूर्वी मुंबईतील एका उद्योगपतीने एक निवेदन दिले आणि .शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघ कायमचे रद्द करावे अशी मागणी केली. ही अतिशय गंभीर बाब आहे. सभापती महोदय, एखाद्या उद्योगपतीने मागणी करावयाची आणि केवळ त्यामुळे कायदे बदलायचे, सभागृहाची रचना बदलावयाची हा प्रकार भारतीय घटनेला हात लावण्याचा आहे. हा प्रश्न केवळ शिक्षक व पदवीधर मतदारसंघापुरताच मर्यादित नाही तर भारतीय राज्यघटनेने ज्या हेतूने सभागृहाची रचना केली त्याला  नख लावण्याचेच काम केले गेले जात असेल तर त्याचा आपण प्रतिकार केला पाहिजे.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ D/ MMP. कु. गायकवाड नंतर --- 13:10

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, कालच्या वर्तमानपत्रात आपणा सर्वांनाच एक बातमी वाचावयास मिळाली आहे की, दोन दिवसापूर्वी प्रशासकीय सुधारणा समितीचे अध्यक्ष श्री.वीरप्पा मोईली यांनी या देशाच्या पंतप्रधानांना 422 पृष्ठांचा अहवाल सादर केलेला आहे. "Local Governance & Inspiring journey into future" या नावाचा हा 422 पृष्ठांचा अहवाल माननीय पंतप्रधानांना सादर केला आहे त्यात ग्रामीण आणि शहरी भागातील दरी दूर करणे, प्रशासकीय सुधारणा, निवडणुकीसंबंधात आरक्षणाच्या बाबतीतील काही गोष्टी, निवडणूक आयोग असे अनेक विषय समितीसमोर होते. त्यांनी त्याबाबतीतील अहवाल दिलेला आहे. परंतु त्याचबरोबर या अहवालात ज्या ज्या राज्यांमध्ये विधान परिषद आहे, ज्यात शिक्षक मतदारसंघाचे प्रतिनिधी आहेत, पदवीधर मतदारसंघाचे प्रतिनिधी आहेत. विधान परिषद सभागृहाची ही सारी रचना घटनेतील कलम 171 नुसार करण्यात आलेली आहे. पण तरीही त्यातील शिक्षक मतदारसंघ आणि पदवीधर मतदारसंघांची तरतूद रद्द करावी अशी शिफारसही या मोईली समितीने आपल्या अहवालात केलेली आहे ही अत्यंत दुर्दैवी गोष्ट आहे. त्याबद्दल आमच्या भावना अत्यंत तीव्र अशा आहेत आणि हा विषय अतिशय महत्त्वाचा असल्याने या विषयावर तातडीने या सभागृहात चर्चा व्हावी, त्यासाठी सभागृहाचे आजचे नियमित कामकाज बाजूला ठेवून चर्चा आपण घडवून आणावी अशी आमची आपल्याला आग्रहाची विनंती आहे.

श्री. जी.एल.अैनापुरे : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नियम 289 खाली जी प्रस्तावाची सूचना दिली आहे तिच्या समर्थनार्थ मी उभा आहे. सभापती महोदय, खलील जिब्रान यांनी म्हटले आहे की, 'Pity the nation where the sages are deaf and dumb' ज्या देशाची आणि समाजाची अवस्था दयनीय होते, जेथे शिक्षक डोळे असून पाहू शकत नाही आणि कान असून त्याला ऐकता येत नाही अशी परिस्थिती होण्याचे कारस्थान दिसते. सभापती महोदय, जगातील बहुतेक सारीच परिवर्तने ही शिक्षकांमुळे झाली आहेत आणि शिक्षक हे सद्सद्-विवेकबुद्धीचे असतात, ते समाजाचे पाईक असतात, त्याचे समाजतील स्थान आईसारखे असते. आणि म्हणूनच शिक्षकांची चेष्टा करण्याची ज्यांना इच्छा होते त्यांचा विनाश फार जवळ आलेला आहे असे समजले जाते. म्हणूनच खासदार श्री.वीरप्पा मोईली यांनी जे धाडस केले आहे त्याबाबत संवेदना व्यक्त व्हाव्यात म्हणून या प्रश्नावर या सभागृहात तातडीने चर्चा होणे आवश्यक आहे असे मला वाटते. तरी आपण हा प्रस्ताव मान्य करून या विषयी येथे तातडीने चर्चा घडवून आणावी अशी माझी आपणास नम्र विनंती आहे. ..... इइ 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, या ठिकाणी नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे त्या विषयी येथे अत्यंत तातडीने चर्चा होण्याची गरज आहे. घटनेच्या कलम 171 प्रमाणे भारतीय घटनेनेच आपल्याला हा अधिकार दिलेला आहे आणि त्या कलमामध्ये हे मांडलेले आहे की, अशा अशा प्रकारची रचना होईल त्यामध्ये या सभागृहातील सदस्यांमध्ये एक बारांश पदवीधर असले पाहिजेत, एक बारांश शिक्षक असले पाहिजेत. सभापती महोदय, अशा प्रकारे विविध कॅटेगरीतील माणसे येथे निवडून येणे हा लोकशाही प्रक्रियेचाच एक भाग आहे. त्यामुळे या अतिशय महत्त्वाच्या विषयी खासदार श्री.वीरप्पा मोईली यांनी आपल्या अहवालातून जी शिफारस केलेली आहे त्याबाबत या सदनामध्ये तातडीने चर्चा होणे आवश्यक आहे, त्यासाठी आपण हा प्रस्ताव मान्य करावा अशी माझी आपल्याला नम्र विनंती आहे.

**सभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, या ठिकाणी जी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली आहे त्यावर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जी.एल.अैनापुरे, रामनाथ मोते, संजय केळकर आणि अन्य सदस्यांच्याही सह्या आहेत. त्यांचेही या पद्धतीचेच विचार जरूर आहेत. मी आपल्याला सांगेन की, भारतीय राज्य घटनेया कलम 171 प्रमाणे वरिष्ठ सभागृहाची रचना कशी असावे हे दिले आहे त्यात समाजातील अनेक विविध घटक या सदनामध्ये यावेत या दृष्टीनेच त्यात शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघ निर्माण केले गेले आहेत. या अनुषंगाने खासदार श्री.वीरप्पा मोईली यांनी केंद्र सरकारला जो अहवाल दिलेला आहे त्याबद्दल वर्तमानपत्रातील बातमी अशी आहे की, ..........

( यानंतर श्री. सरफरे .... 2एफ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**...

याबाबतीत वरिष्ठ सभागृहाचे पदवीधर मतदारसंघ किंवा शिक्षक मतदारसंघ आहेत ते असू नयेत अशाप्रकारची बातमी वर्तमानपत्रामध्ये छापून आली आहे. ही एक अत्यंत महत्वाची बाब आहे. समाजामध्ये अनेक घटक आहेत. त्या घटकांच्या माध्यमातून या वरिष्ठ सभागृहाची, विधानपरिषदेची रचना तयार होते. मला असे वाटते की, राज्य सरकारने सुध्दा या अनुषंगाने या प्रकरणी लक्ष घालणे जरुरीचे आहे. मला खात्री आहे की, राज्य सरकार सुध्दा याबाबतीत लक्ष घालील. आजची कामकाज पत्रिका पाहिल्यानंतर त्यामध्ये अशाप्रकारच्या प्रस्तावाचा कोणताही विषय नाही. त्यामुळे तांत्रिकदृष्टया या प्रस्तावाला मी मान्यता देऊ शकत नाही. या ठिकाणी माननीय मंत्री प्रा. वसंतराव पुरके उपस्थित आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, या प्रकरणाच्या बाबतीत सामान्य प्रशासन विभाग किंवा अन्य संबंधित विभागाला आपण कल्पना द्यावी. आणि त्या अनुषंगाने केंद्रीय स्तरावर प्रयत्न करण्यात यावेत.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**मानवत (जि.परभणी) येथील विद्यालयात एका सहशिक्षकाचे वेतन थकित असल्याबाबत**

**(१) * ३३५८५ श्री.विक्रम काळे , श्रीमती उषाताई दराडे , प्रा. फौजीया खान , श्री. वसंतराव चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) मानवत (जि. परभणी) येथील नेताजी सुभाष शिक्षणसंस्थचे विद्यालयात सहशिक्षक पदावर कार्यरत असलेले श्री. यु.जी. जोशी यांचे जुलै,२००६ पासूनचे १४ महिन्याचे वेतन थकित आहे हे खरे आहे काय?

२) असल्यास, उक्त सहशिक्षकांचे वेतन थकित ठेवण्याची सर्वसाधारण कारणे कोणती,

३) त्यांचे वेतन किती कालावधी देण्यात येईल?

**प्रा.वसंत पुरके** : (१) होय,

(२) सदरहू सहशिक्षकाची बदली शासनाच्या विहित पध्दतीनुसार करण्यात आलेली नाही. संस्थेच्या ठराव नसल्यामुळे शिक्षणाधिकारी (माध्यामिक) परभणी कार्यालयाने बदलीस मान्यता दिलेली नाही. त्यामुळे श्री. जोशी यांचे वेतन प्रलंबित आहे.

(३) संस्थेने बदली मान्यतेच्या प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता करुन प्रस्ताव सादर केल्यास बदली मान्यता देऊन महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील कर्मचाऱ्यांची कर्तव्ये ३ (ग) च्या अनुषंगाने थकित वेतन अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, याठिकाणी विचारण्यात आलेल्या प्रश्नाला शासनाने दिलेल्या छापील उत्तरामध्ये मंत्रिमहोदयांना काही बदल करावयाचा आहे काय?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, माननीय सदस्यांची काही सूचना असेल तर बदल करण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : आपणास छापील उत्तरामध्ये काही बदल करावयाचा आहे काय?

प्रा. वसंत पुरके : नाही.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, शासनाला या प्रश्नाच्या उत्तरामध्ये काही बदल करावयाचा आहे काय? नसल्यास, मी दुसरा प्रश्न विचारतो.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ MMP/ D/

ता.प्र.क्र. 33585...

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, संस्थेने ठराव दिलेला नाही म्हणून एका शिक्षकाचे जवळपास 14 महिन्यांचे वेतन थांबविण्यात आले आहे. एक वर्ष दोन महिने होऊन देखील त्या शिक्षकाला पगार दिला नाही. प्रश्न असा आहे की, ज्या शिक्षकाला कायम मान्यता मिळते त्या शिक्षकाची शिक्षणाधिकाऱ्यांकडून बदली होते. भविष्यामध्ये अशा शिक्षकांची बदली करणे ही त्या संस्थेची प्रशासकीय बाब आहे. एकदा शिक्षकाला मान्यता मिळाल्यानंतर पुन्हा त्याची बदली करण्यासाठी शिक्षणाधिकाऱ्याची मान्यता घेण्याची गरज भविष्यात असणार नाही, अशापध्दतीचा बदल आपण करणार काय?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, त्या शिक्षकाची बदली संस्थेने 12 ते 14 महिन्यापूर्वी केली. यामध्ये मूळ मुद्दा असा आहे की, एकीकडे दोन संस्था चालक आहेत. त्यांनी बदली केली आहे. आणि दुसरीकडे पाच संस्था चालक आहेत. या शिक्षकाची बदली होऊ नये असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे हे प्रकरण प्रलंबित आहे. दि.26.8.1985 च्या परिपत्रकानुसार त्यांचा पगार काढण्यात येईल.

श्री. जी. एल. ऐनापूरे : सभापती महोदय, ऊठसूठ किरकोळ कारणांसाठी कायम असलेल्या शिक्षकांचे पगार स्थगित करण्याचा अधिकार राज्य शासनाने कुणाला दिला आहे? दिला नसेल तर शेकडो ठिकाणी हजारो शिक्षकांचे पगार आज स्थगित आहेत. त्यासंबंधी शासन काही कारवाई करणार आहे काय?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, अनेक ठिकाणी संस्थांतर्गत वाद असल्यामुळे प्रकरणे प्रलंबित असतात.त्यामध्ये जर शिक्षक जबाबदार नसेल तर त्यांचा पगार थांबविला जाणार नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, याठिकाणी एका शिक्षिकेच्या बदलीच्या निमित्ताने थकलेला पगार 14 महिने प्रलंबित आहे. खरे म्हणजे शिक्षिकेची बदली करण्याचा अधिकार त्या संस्थेचा आहे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र.क्र.33585 ..... श्री. रामनाथ मोते ....

उत्तरावरुन असे स्पष्ट होते की, संबंधित शिक्षकाची बदली केल्यानंतर ते शिक्षक त्या शाळेमध्ये हजर झालेले आहेत आणि अशा प्रकारच्या कायम स्वरुपी शिक्षकाची जर बदली केली तर त्यांचे वेतन रोखून धरण्यात येऊ नये आणि त्यांच्या बदलीच्या प्रस्तावाला सुध्दा मान्यता घेण्याची आवश्यकता नाही अशा प्रकारचे परिपत्रक शासनाने 26 ऑगस्ट, 1985 ला काढलेले आहे. तरी सुध्दा या शिक्षकाचा पगार होत नाही, ही गंभीर बाब आहे. आता माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, त्यांचा पगार देऊ. आजच्या आज त्या संबंधित शिक्षकाचा पगार रिलीज करण्याचे आदेश शासन काढील काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, खरे म्हणजे संस्थांनी ठराव घेण्यात अडचण नाही. हा वाद संस्थांमध्ये निर्माण होतो. दोन संस्था चालक एकीकडे आहेत, ते म्हणतात की, बदली करावी आणि 5 संस्था चालक दुसरीकडे आहेत, ते म्हणतात की बदली होऊ नये. अशा वादामध्ये ते थांबले होते. त्यांचा पगार तात्काळ करण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, अनेक संस्थांमधील वादामुळे शिक्षकांचे पगार थांबलेले आहेत. त्या संस्थांचे कितीही वाद असले तरी शिक्षकांचे पगार थांबता कामा नये. सहा सहा महिने, वर्ष वर्ष पगार थांबतात. याबाबतीत शासन तातडीने आदेश देईल काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, शिक्षक दोषी नसेल तर निश्चितपणे दखल घेतली जाईल.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/

**ठाणे येथील मनोरुग्णालयातील गैर व्यवस्थापनाबाबत**

**(२) * ३३९३२ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. संजय केळकर , श्री. प्रकाश शेंडगे , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. लक्ष्मण जगताप , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. जगन्नाथ शेवाळे , श्री.भास्कर जाधव , श्री. राजेंद्र जैन , डॉ. वसंत पवार , श्रीमती मंदा म्हात्रे , प्रा. फौजीया खान , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील मनोरुग्णालयातील कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांना १५-१५ तास काम करण्याची सक्ती, वॉर्डामधील अस्वच्छता, भोजन व्यवस्थेचा अभाव इत्यादी बाबींमुळे कर्मचारी वर्गात असंतोष होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संतोषामुळेच तेथील कर्मचाऱ्यांनी विधीमंडळ अंदाज समितीच्या सदस्यांना दिनांक ९ ऑक्टोबर, २००७ रोजी रुग्णालयातच घेराव घातला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्मचाऱ्यांमधील असंतोष दूर करण्यासाठी आतापर्यंत कोणते प्रयत्न केले गेले आहेत व कोणत्या सुधारणा करण्यात आल्या आहेत ?

**श्री. रणजित कांबळे,डॉ.विमल मुंदडा यांच्याकरिता** : (१) अंशत: खरे आहे,

(२) हे खरे नाही,

(३) ड वर्गातील स्त्री परिचर संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांना या उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : नाही. उत्तर बरोबर आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी प्रश्न क्रमांक 2 मध्ये असे विचारले आहे की, या असंतोषामुळे तेथील कर्मचाऱ्यांनी विधिमंडळ अंदाज समितीच्या सदस्यांना दिनांक 9 ऑक्टोबर, 2007 रोजी रुग्णालयातच घेराव घातला होता, हे ही खरे आहे काय ? या प्रश्नाला "हे खरे नाही" असे उत्तर दिलेले नाही. माझ्याजवळ वर्तमानपत्राचे कात्रण आहे. आपल्या सभागृहाचे सदस्य त्या अंदाज समितीमध्ये उपस्थित होते. अंदाज समिती ज्यावेळी त्या ठिकाणी रुग्णालय बघावयास गेली त्यावेळी तेथील कर्मचाऱ्यांमधील असंतोष उफाळून आला. आपल्या सदनाचे सदस्य त्या समितीमध्ये होते. त्यांनी सदस्यांना घेराव घातला. ते या उत्तरामध्ये लिहिण्यास हरकत नव्हती. या उत्तरामध्ये असे लिहिले आहे की, ते खरे नाही. त्या समितीतील या सभागृहाचे दोन सन्माननीय सदस्य या ठिकाणी उपस्थित आहेत. या ठिकाणी दिलेले उत्तर चुकीचे आहे. हे उत्तर दुरुस्त केले पाहिजे किंवा आपण सन्माननीय सदस्यांना विचारले पाहिजे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/

ता. प्र. क्र. 33932......

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, जेव्हा हे सगळे सन्माननीय सदस्य त्या ठिकाणी गेले होते तेव्हा त्या ठिकाणी ज्या वर्ग 4 च्या महिला कर्मचारी होत्या त्या आल्या होत्या. त्यांच्या ज्या अडीअडचणी होत्या त्या त्यांनी सन्माननीय सदस्यांना सांगितल्या होत्या. त्यांनी घेराव केला नाही. ते सगळे येऊन सन्माननीय सदस्यांना भेटले होते.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, ज्यावेळी त्यांच्या न्याय मागण्या योग्य प्रकारे सांगितल्या गेल्या नाहीत त्यामुळे ते आमच्याकडे येऊ नये म्हणून त्या ठिकाणी पोलिसांना बोलावले होते. त्यांनी घेराव घातला होता. आमच्या गाड्या अडविल्या होत्या. आमच्या निषेधासाठी नव्हे तर आपल्या न्याय मागण्यासाठी घेराव केला होता, ही वस्तुस्थिती आहे. आम्ही त्या ठिकाणी हजर होतो.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य या ठिकाणी माहिती देत आहेत. त्यांचे शब्द गृहीत धरुन उत्तरामध्ये दुरुस्ती करु. त्या प्रश्नाला "होय" असे उत्तर देऊ. ज्यावेळी सन्माननीय सदस्य या ठिकाणी बोलतो तेव्हा त्यांचे बोलणे सत्य आहे असे गृहीत धरुन काम चालते. त्यांनी भेट दिली होती. ते निवेदन घेऊन आले होते.

**सभापती** : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी अशी माहिती दिली की, त्यांच्या ज्या न्याय मागण्या होत्या त्याकरिता ते निवेदन घेऊन आले तसेच त्यांनी घेराव केला. याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी असे सांगावयास पाहिजे की, सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली त्यादृष्टीने सुध्दा आम्ही जरुर माहिती घेऊ. कारण सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती आपण गृहीत धरतो, फॅक्चुअल धरतो.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 33932...

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, आम्ही या रुग्णालयाला भेट दिली. तेथील कर्मचा-यांची अवस्था अतिशय वाईट आहे. या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, विधिमंडळाच्या अंदाज समितीला तेथील कर्मचारी येऊन भेटले. त्या ठिकाणी मी देखील होते. ते कर्मचारी आले आणि आम्हाला भेटले. असे झाले की, काही कर्मचा-यांनी आम्हाला त्यांची दुखणी दाखविली. पायाला कशा जखमा झालेल्या आहेत ते दाखविले, त्यांना वेळेवर पगार दिला जात नाही, काम करण्यासाठी अन्य सोयीसुविधा आणि साधने दिली जात नाहीत. ह्या सर्व गोष्टी तेथील कर्मचारी आम्हाला सांगत असताना तेथील इनचार्जला त्याचा राग आला आणि त्यांनी कर्मचारी युनियनच्या अध्यक्षाला पकडण्यासाठी पोलिसांना बोलावले. संध्याकाळी मिटींग संपल्यानंतर आम्ही गाडीने जात होतो. पहिली गाडी माझी होती. ते कर्मचारी माझ्या गाडीसमोर आले आणि सांगितले की, "तुम्हाला आम्ही आमची गा-हाणी सांगितली म्हणून आमच्या लिडरला पकडायला पोलीस आलेले आहेत. तेव्हा आम्हाला असा त्रास देऊ नका, असे आपण त्यांना सांगावे." मग आम्ही तसे त्यांना सांगितले. तेथील महिला कर्मचा-यांनी सांगितले की, त्यांना 15-15 तास मनोरुग्णांची सेवा करावी लागते. एकेका महिला कर्मचा-याला 30-40 मनोरुग्णांची सेवा करावी लागते. माननीय मंत्री महोदयांनी देखील ही परिस्थिती पाहिलेली आहे.या मनोरुग्णालयातील रिक्त पदे तातडीने भरण्याची आवश्यकता आहे. ही रिक्त पदे केव्हा भरण्यात येतील ?

श्री. रणजित कांबळे : नवीन आकृतिबंधानुसार पदे भरण्याची प्रक्रिया सप्टेंबर पासून सुरु केली होती. या रिक्त पदांमध्ये जी आरक्षित पदे आहेत त्याची माहिती घेण्याकरिता कोकण डिव्हिजनकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. काही कर्मचारी 25-30 वर्षापासून काम करीत आहेत ही वस्तुस्थिती आहे. आरक्षित पदे भरण्यासाठी कर्मचा-यांकडे व्हॅलिडिटी सर्टिफिकेट असणे आवश्यक आहे. आम्ही कर्मचा-यांना व्हॅलिडिटी सर्टिफिकेट देण्यास सांगितलेले आहे. व्हॅलिडिटी सर्टिफिकेट दिले नाही तर ती पदे कमी करावी लागतील. ही पदे 25-30 वर्षापूर्वी भरलेली आहेत. त्यावेळी परिस्थिती अशी होती की, मनोरुग्णालयामध्ये कोणीही विशेषत: महिला काम करण्यास येत नव्हत्या. त्यावेळी जे लोक काम करण्यास तयार झाले त्यांची नेमणूक करण्यात आली. आता

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रिव्हाईज स्टाफिंग पॅटर्नची प्रोसेस पूर्ण झाल्यानंतर 35 पदांबाबतची माहिती आल्यानंतर ती पदे ताबडतोब भरण्याची कार्यवाही करण्यात येईल. 120 सफाई कामगारांची पदे आहेत. ते काम कॉंट्रॅक्ट बेसिसवर दिलेले आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासामध्ये हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येणार नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी कृपाकरुन खाली बसावे.

...नंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33932.........

श्री.पांडुरंग फुंडकर : मी सुरुवातीलाच हा प्रश्न उपस्थित केला होता. खरे उत्तर लपविण्याचे काही कारण नव्हते. त्यामुळे उत्तरात दुरुस्ती केली पाहिजे. अंदाज समितीने भेट दिली त्यावेळी त्यांना घेराव घातला गेला. पोलीस बोलावले गेले याची आपण दखल घेतली पाहिजे. या सभागृहातील सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत, श्री.मधुकर चव्हाण व श्रीमती मंदा म्हात्रे हे तीन सदस्य अंदाज समितीचे सदस्य या नात्याने समितीसमवेत त्या रुग्णालयाच्या भेटीसाठी गेले होते. त्यांनी याठिकाणी वस्तुस्थिती सांगितल्यानंतर तेथील रुग्णालयाने पोलीस बोलावणे योग्य नाही. ज्यांनी पोलिसांना पाचारण केले त्यांचा संबंध काय? ज्यांनी पोलीस बोलावले त्याची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई केली जाईल काय?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, आतापर्यंत सन्माननीय राज्यमंत्र्यांनी जी उत्तरे दिली ती व्यवस्थित असून खरी उत्तरे दिलेली आहेत. लोकप्रतिनिधी म्हणून मी सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांच्यासोबत दोन वेळा चर्चा केली आहे. कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबद्दल चर्चा झाली. ठाणे मनोरुग्णालयाला मी तीन वेळा भेटी दिल्या आहेत. तेथील कर्मचाऱ्यांच्या व्यवस्थापनाबाबत, किचनमधील स्वच्छतेबाबत मी माहिती घेतली आहे. मी राज्यातील चारही मनोरुग्णालयांना भेटी दिल्या आहेत. ठाणे मनोरुग्णालयातील कर्मचाऱ्यांची वैयक्तिक माहिती घेतली आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी पोलीस बोलावल्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला आहे. ज्यावेळी अंदाज समितीने भेट दिली त्यावेळी सन्माननीय सदस्यांसमोर आपले प्रश्न मांडण्याचा प्रयत्न संघटनेच्या सदस्यांनी केला. आपल्याला न्याय मिळावा म्हणून कर्मचाऱ्यांच्या संघटनेच्या प्रतिनिधींनी निवेदन देण्याचा प्रकार घडला. सन्माननीय अंदाज समितीचा आदर राखण्याच्या दृष्टीने प्रकार घडला होता. मेट्रन ज्या होत्या त्यांना धमकी दिली गेली होती. संघटनेचे लिडर वगैरे काही प्रकार नाही. मेट्रनविरुध्द वातावरण होते अशा प्रकारची कोणती भावना, कोणताही प्रश्न उद्‌भवला नव्हता.

श्री.पांडुरंग फुंडकर : अंदाज समितीच्या घोळामध्ये रुग्णालयातील प्रश्नांना न्याय मिळणार नाही. त्या रुग्णालयातील प्रश्नांना न्याय मिळाला पाहिजे.

**सभापती** : अंदाज समितीने ज्यावेळी भेट दिली, त्यावेळी खरे म्हणजे विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहाचे सन्माननीय सदस्य रुग्णालयाच्या भेटीसाठी अंदाज समितीच्या माध्यमातून गेले होते. अशा वेळी तेथील कर्मचाऱ्यांनी आपल्या व्यथा समितीपुढे मांडणे हा सुध्दा अंदाज समितीच्या कार्यभागातील एक भाग आहे असे समजले पाहिजे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, आपण जे वक्तव्य केले ते अत्यंत योग्य आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, अंदाज समिती तिथे गेल्यानंतर तेथील अडचणी समितीसमोर मांडण्याचा प्रयत्न तेथील कर्मचाऱ्यांनी करणे हे स्वाभाविक आहे. इतक्या वर्षांची त्यांची व्यथा आहे. त्यांच्या कास्ट रोस्टरचा प्रश्न आहे. 30-30 वर्षे नोकरी करुनही न्याय मिळत नसेल तर लोकप्रतिनिधींसमोर त्यांनी आपल्या भावना मांडण्याचा प्रयत्न करणे अपेक्षितच होते. तेथील अधिकाऱ्यांनी दुर्दैवाने अर्थ समजून घेतला नाही. त्यांनी तो प्रश्न प्रतिष्ठेचा करुन पोलिसांना बोलावले आणि भय निर्माण झाले. मेट्रनला धमकी दिली गेली ही पळवाट आहे. कर्मचाऱ्यांना आपल्या अडचणी मांडायच्या होत्या. जर त्यांना सांगायचेच होते तर असे सांगता आले असते की, दोन प्रतिनिधी घेऊन जा आणि समिती सदस्यांना भेटा. हे केले असते तर पुढील प्रसंग घडला नसता. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले, समितीला घातलेल्या घेरावापेक्षाही रुग्णालयातील जे मुलभूत प्रश्न आहेत ते अधिक महत्वाचे वाटतात. तेथील रिक्त पदे किती दिवसात भरली जातील? ज्यांनी पोलिसांना बोलावून प्रश्न प्रतिष्ठेचा केला त्यांच्यावर काय कारवाई करणार? रोस्टरचा विषय किती दिवसात निकाली काढणार?

(नंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 33932** .........

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, खरे म्हणजे हा कास्ट व्हेरिफिकेशनचा प्रश्न आहे. ठरलेल्या काळात कास्ट व्हेरिफिकेशन होणे गरजेचे आहे. या ठिकाणचे कर्मचारी गेल्या 30-35 वर्षापासून काम करीत आहेत. त्यामुळे यासंदर्भातही विचार करणे आवश्यक आहे. नवीन आकृतीबंध आराखडया प्रमाणे वर्ग 1, वर्ग 2 व वर्ग 3 ची पदे आपण भरलेली आहेत, काहींची प्रक्रिया चालू आहे. वर्ग 4 मधील स्वीपरची पदे कमी करुन त्या ठिकाणी ही पदे कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने भरलेली . बाकीची पदे 3 महिन्याच्या आत भरली जातील.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी प्रामाणिकपणे आपणास सांगू इच्छितो की, ज्यावेळी अंदाज समिती ठाणे रुग्णालयाला भेट देण्यासाठी गेली होती त्यावेळेस तेथील कर्मचारी आमदारांना निवेदन देण्यासाठी आले होते. परंतु या कर्मचा-यांवर तेथील अधिका-यांनी पोलीस स्टेशन मध्ये घेराव घालण्यासाठी कर्मचारी आले होते अशा प्रकारचा गुन्हा नोंदवला होता. या रुग्णलायाच्या संदर्भात समितीकडे तक्रारी आल्या होत्या त्यामुळे अंदाज समितीने या रुग्णालयाला भेट दिली होती. या ठिकाणच्या कर्मचा-यांनी समितीला वारंवार यासंदर्भातील तक्रारी केल्या होत्या. ज्यावेळेस समिती समोर अशा प्रकारचे विषय येतात त्याच वेळेस समिती भेट देण्यासाठी जात असते. त्यामुळे शासनाचे अधिकारी किती उदासीन आहे हे दिसून येते. अंदाज समिती ही विधीमंडळातील एक महत्वाची समिती आहे. ज्यावेळेस अंदाज समिती रुग्णालयाला भेट देण्यासाठी गेली असता तेथील कर्मचा-याना आपल्या अधिका-यांनी कर्मचा-यांना भेटू दिले नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे या प्रवृत्तीवर सरकार काही करणार आहे की नाही एवढाच माझा महत्वाचा प्रश्न आहे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, खरे म्हणजे जेव्हा कोणतीही समिती भेट देण्यासाठी जाते तेव्हा त्या ठिकाणच्या कर्मचा-यांच्या प्रमुख नेत्यांनी समितीला भेटून त्यांचे म्हणणे काय आहे ते थोडक्यात सांगावयाचे असते किंवा निवेदन द्यावयाचे असते. परंतु या ठिकाणी जेव्हा समिती भेट देण्यासाठी आली त्यावेळेस तेथील 450 कर्मचारी एकत्र गेले त्यामुळे त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळू शकला नाही. सन्माननीय सदस्यांच्या सुरक्षेसाठी जेव्हा .....

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : **33932** .........

**सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. आपण जर खाली बसला नाहीत तर मला दुसरा प्रश्न पुकारावा लागेल.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : या प्रश्नाच्या अनुषंगाने मी उद्या माझ्या दालनात माननीय आरोग्य मंत्री, विरोधी पक्ष नेता, अंदाज समितीचे चेअरमन आणि आपणास बोलावून चर्चा करतो व निर्णय घेतो. आता आपण पुढील प्रश्नाकडे वळू या.

----------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील बनावट व भेसळयुक्त औषधे विकणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(३) * ३३६३१ श्री. रमेश निकोसे , श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर गणगणे , श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. धनाजी साठे , श्री.राजन तेली , श्री. गोविंदराव आदिक , श्री.दिलीपराव सोनवणे :** सन्माननीय **अन्न व औषधे प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बनावट व भेसळयुक्त औषधांचे विक्रेते व निर्मात्यांवर छापे टाकून त्यांच्यावर कारवाई करावी असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाने माहे ऑगस्ट, २००७ मध्ये किंवा त्या सुमारास दिलेले आहेत व शासनाने केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने माहे सप्टेंबर, २००७ अखेर किती विक्रेते व निर्मात्यावर छापे टाकून त्यांच्यावर कोणत्या प्रकारची कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अशा घटना राज्यात पुन्हा होऊ नयेत म्हणून शासनाने कोणते कठोर निर्णय घेतले आहेत वा घेण्यात येत आहेत,

(४) अद्याप, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे, श्री.मनोहर नाईक यांच्याकरिता** : (१) होय,

(२) अन्न व औषध प्रशासनाने माहे सप्टेंबर, २००७ अखेर एकूण २०० विक्रेते व ६३ उत्पदकांकडे तपास केला. सदर तपासणीमध्ये बनावट व भेसळयुक्त औषधांची निर्मिती अथवा विक्री होत असल्याचे आढळून आले नाही, त्यामुळे त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) बनावट व भेसळयुक्त औषधांची प्रकरणे शोधून काढण्यासाठी जिल्हास्तरावर यंत्रणा कार्यरत असून त्यामार्फत नियमितपणे औषध उत्पादक, विक्रेते यांच्या तपासण्याकरुन औषध नमुने चाचणीकरिताघेतले जातात. अप्रमाणिक घोषीत नमुन्यासंदर्भात औषधे व सौंदर्य प्रसाधन कायदा १९४० व त्याखालील नियमांतर्गत कारवाई घेण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, माणूस आजारी झाल्यावर मग तो करोडपती असो, अब्जोपती असो, गरीब असो, श्रीमंत असो, आमदार असो किंवा मंत्री असो या सगळयांना औषधे घ्यावी लागत असतात. परंतु अशा प्रकारे भेसळयुक्त औषधे बनवली जात असून मुंबईतील नालासोपारा या ठिकाणी धाड टाकून भेसळयुक्त औषधे पकडली गेली आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात अशा प्रकारे किती ठिकाणी छापे टाकून भेसळयुक्त औषधे पकडण्यात आलेली आहेत.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33631...........

श्री.रमेश निकासे...........

माझा दुसरा प्रश्न, मुंबईतील नालासोपारा येथे छापा टाकण्यात आला त्यावेळी जी बनावट औषधे सापडली त्याची नावे देण्यात येतील काय तसेच संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली याची माहिती मंत्रिमहोदय देतील काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, दरवर्षी जिल्हानिहाय किती छापे टाकण्यात आले याची माहिती देण्यापेक्षा किती दरवर्षी किती छापे टाकण्यात आले याची माहिती मी सदनाला देतो. सन 2005-06 मध्ये 53 छापे, 2006-07मध्ये 65 छापे टाकण्यात आले..... (अडथळा) ..

**सभापती** : सामुदायिक जबाबदारी म्हणून कोणत्याही खात्याचा मंत्री अन्य मंत्र्यांच्या खात्याशी संबंधित असणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकतात. त्याप्रमाणे मी त्यांना परवानगी दिलेली आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, विभागनिहाय किती छापे टाकण्यात आली त्याची माहिती देतो. अमरावती-20, औरंगाबाद-18, नागपूर-32, पुणे-46, नाशिक-24, ठाणे -80 आणि मुंबई 29 असे एकूण 253 छापे टाकण्यात आलेले आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, संबंधित विभागाचे मंत्री याठिकाणी उपस्थित नाहीत. मंत्रीमहोदय सभागृहात अनुपस्थित राहणार आहेत याची माहिती त्यांनी आपल्याला दिली होती का, संबंधित मंत्रिमहोदय संजय दत्तला जेलमधून आणावयास गेले आहेत हे सत्य आहे का ?

**सभापती** : मी याबाबत अगोदरच निर्णय दिलेला आहे. मंत्रिमंडळाची सामुदायिक जबाबदारीचे तत्व आहे. त्यानुसार एखाद्या खात्याच्या मंत्र्यांचे काम दुसरे मंत्री पाहू शकतात आणि म्हणून मी त्यांना उत्तर देण्यास परवानगी दिलेली आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, उत्तरात नमूद करण्यात आले की, या औषधांचा पुरवठा शासकीय - निमशासकीय रुग्णालये, कारागृह, कामगार विमा योजना रुग्णालये व रेल्वे रुग्णालये इत्यादी ठिकाणांहून एकूण 560 नमुने चाचणीसाठी घेण्यात आले आहेत. त्यापैकी 51 नमुने अप्रमाणित घोषित झालेले आहेत. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, या सर्व वितरकांना व निर्मात्यांना ब्लॅकलिस्ट केलेले आहे काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33631...........

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, एकूण 51 नमुने अप्रमाणित घोषित झालेले आहेत त्यापैकी 31 औषधे ही परराज्यातील आहेत. त्याप्रमाणे त्या त्या राज्यातील ड्रग्ज कंट्रोलर्सना कारवाई करण्याचे कळविण्यात आलेले आहे. उर्वरित 20 अप्रमाणित नमुन्यांचे उत्पादक आपल्या राज्यातील आहेत, त्यांची लायसन्सेस कॅन्सल करण्यात आलेली आहेत.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, छापील उत्तरामध्ये व सुधारित उत्तरात तफावत दिसून येते. सुधारित उत्तरामध्ये म्हटले आहे की, सदर तपासणीमध्ये बनावट व भेसळयुक्त औषधांची निर्मिती अथवा विक्री होत असल्याचे आढळून आले नाही त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही." तर पहिल्या छापील उत्तरामध्ये ".... 51 नमुने अप्रमाणित घोषित झाले असून त्यांच्या विरुध्द कायद्यातील तरतुदीनुसार योग्य ती कारवाई करण्यात येत आहे." असे नमूद केलेले आहे. तेव्हा यातील नेमके कोणते उत्तर ग्राह्य आहे याची माहिती मंत्रिमहोदय देतील काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी अगोदर सांगितल्याप्रमाणे 51 अप्रामाणित नमुने घोषित झाले, त्यापैकी 31 हे परराज्यातील आहेत. उर्वरित 20 आपल्या राज्यातील आहेत, त्याबाबत फूड ड्रग्ज ॲक्टच्या कलम 27 नुसार संबंधितांवर कारवाई करीत आहोत.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33631...

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांचे लक्ष मी सुधारित उत्तराकडे वेधू इच्छितो. सुधारित उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "अन्न व औषध प्रशासनाने माहे सप्टेंबर, 2007 अखेर एकूण 200 विक्रेते व 63 उत्पादकांकडे तपास केला. सदर तपासणीमध्ये बनावट व भेसळयूक्त औषधांची निर्मिती अथवा विक्री होत असल्याचे आढळून आले नाही, त्यामुळे त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही." याठिकाणी मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले की, सुधारित उत्तर दिलेले बरोबर आहे. परंतु 51 लोकांवरील कारवाई करण्याची माहिती पहिल्या उत्तरात आहे. ती माहिती सुधारित उत्तरात नाही. माननीय सभापती महोदय, सुधारित व जूने दोन्ही उत्तरे आपण पहावीत.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, आपण हा प्रश्न राखून ठेवावा.

**सभापती** : ठीक आहे. मी हा प्रश्न आज राखून ठेवत आहे.

-----

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कानवड ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग येथील ग्रामसमृद्धी योजनेखालील रस्त्याच्या कामातील गैरव्यवहार**

**(४) * ३६७६६ श्री.परशुराम उपरकर** : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील कानवड ग्रामपंचयतीने यशवंत ग्रामसमृद्धी योजनेखाली सुरु केलेला कातवड मारुती मंदिर ते चव्हाणवाडी हळदणकरवाडी रस्त्याच्या कामात लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच माहे ऑक्टोबर, २००७ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामास किती निधि मंजूर करण्यात आला होता,

(३) असल्यास, अपूर्ण रस्त्याचे काम पूर्ण दाखवून पैसे हडप करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री.रणजित कांबळे, श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याकरिता** : (१) नाही.

(२) सदर कामास शासनाकडून रक्कम रु. ५,५४,५९९/- एवढा निधी मंजूर करण्यात आला होता व लोकवर्गणी रक्कम रु. ९७,८७०/- एवढी जमा करण्यात आली होती. दोन्ही मिळून रक्कम रु. ६,५२,४६९/- एवढे अनुदान उपलब्ध होते.

(३) नाही. उप अभियंता ता.मालवण यांचे अहवालानुसार मंजुर रस्त्याच्या एकूण लांबी पैकी शेवटच्या टोकाचा काही भाग जमीन मालकाच्या हरकतीमुळे केलेले नसून त्या ऐवजी मधील भागास संरक्षण भिंतीचे वाढीव काम केलेले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, हरकत घेतल्यामुळे रस्त्याचे काम थांबलेले आहे. सदर रस्त्यास यशवंत ग्रामसमृध्दी योजनेच्या माध्यमातून मंजुरी दिलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, आपण रस्त्याचे किती लांबीचे काम पूर्ण केले व त्यावर किती खर्च केला ? त्याच बरोबर हरकत घेणाऱ्या व्यक्तिचे नांव काय ? तसेच, त्या व्यक्तिने हरकत परत घेतली आहे, हे खरे आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, श्री.शहादे विठोबा हळदणकर या व्यक्तिने तक्रार वा हरकत घेतली होती. त्या रस्त्याची लांबी ५०० मिटर इतकी असून रुंदी ४.७० मिटर इतकी आहे. तसेच त्या व्यक्तिने हरकत मागे घेतलेली नाही. ग्रामपंचायतीच्या रेकॉर्डमधील नियम २६ मधील नोंदीनुसार ती जागा ग्रामपंचायतीच्या हद्दीत येते. परंतु त्या व्यक्तिने ती जागा त्याची स्वत:ची असल्याबाबत तक्रार केली. त्यामुळे ही बाब महसूल विभागाच्या रेकॉर्डवरुन तपासून घ्यावी लागेल.

..३....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३६७६६.....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, कातवड मारुती मंदिर ते चव्हाणवाडी, हळदणकरवाडीच्या रस्त्यासंदर्भातील हा प्रश्न आहे. कुठल्याही रस्त्याचे काम एनओसी घेतल्याशिवाय होत नाही. मग, हे काम कोणत्याही प्रकारची एनओसी न घेताच सुरु करण्यात आले का ? उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "...शेवटच्या टोकाचा काही भाग जमीन मालकाच्या हरकतीमुळे केलेला नसून त्याऐवजी मधील भागास संरक्षण भिंतीचे वाढीव काम केलेले आहे." अशाप्रकारे मूळ कामांमध्ये वाढीव काम करण्याचा बदल करता येतो का ? सदर रस्त्याचे काम अर्धवट झालेले आहे. या रस्त्यास आपण केव्हा व कशी परवानगी दिली ? तसेच यासंदर्भातील काम पूर्ण झालेले आहे अशी नोंद पाहूनच सदर कामाचे पेमेंट झाले का ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, ग्रामसभेच्या ठरावानुसार इस्टीमेट झाले. सदरचा रस्ता हा ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये येत असल्याची तपासणी केलेली आहे. त्या रस्त्याचे काम झाल्यानंतर हरकत घेण्यात आली. परंतु आपले म्हणणे आहे की, त्याठिकाणी संरक्षण भिंतीचे काम परवानगी न घेताच केले. परंतु हे सर्व ओरिजनल इस्टीमेटमध्ये होते. त्यामध्ये वायशेप रोड आहे. त्यामुळे सभापती महोदय, ....

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात. )

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.36766 पुढे सुरु.........**

श्री.रणजित कांबळे........

यशवंत ग्रामसमृध्दी योजनेअंतर्गत घ्यावयाच्या कामांच्या अंदाजपत्रकासाठी लिमिट ठरवून दिलेली आहे. मोठया प्रमाणावर प्रस्ताव प्राप्त होत असतात. जेवढी मागणी केली तेवढा निधी मंजूर होत नाही. त्यामुळे अंदाजपत्रक कितीही असले तरी उपलब्धतेनुसार निधी दिला जातो आणि संबंधित यंत्रणेलाही उपलब्ध झालेल्या निधीएवढेच काम करता येते.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, मालमत्ता कार्डवर चुकीचे नांव लावले असेल तर संबंधित ग्राम पंचायतीवर कारवाई करणार काय, बांधण्यात आलेला कठडा वाहून गेला, हे खरे आहे काय, तसेच, या कामाचे ठेकेदार कोण होते ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, अशाप्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

---------------

....2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## अमरकोर विद्यालय भांडुप येथील माध्यमिक शिक्षिका सौ.सुनिता दिपक कांबळे यांच्यावर झालेल्या अत्याचाराबाबत

**(५) * ३३६६८ श्री.कपिल पाटील , श्रीमती उषाताई दराडे , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. संजय दत्त , श्री.जैनुद्दीन जव्हेरी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरकोर विद्यालय भांडुप या माध्यमिक शाळेतील सहाय्यक शिक्षिका सौ.सुनिता दिपक कांबळे यांच्यावरील लैंगिक अत्याचाराबाबत त्यांनी महिला आयोगाकडे तक्रार केली आहे हे खरे आहे काय,

(२) महिला आयोगाकडे तक्रार केल्यामुळे शाळेने त्यांना नियमबाह्यपणे निलंबित करुन त्यांचे वेतन बंद केले आहे हे खरे आहे काय,

(३) त्याबाबतची तक्रार शिक्षण निरीक्षक उत्तर विभाग मुंबई यांच्याकडे केली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

**प्रा. वसंत पुरके** : (१) होय, हे खरे आहे,

(२) श्रीमती सुनिता दिपक कांबळे, सहा.शिक्षिका यांना अमरकोर विद्यालय, भांडुप या माध्यमिक शाळेच्या लालबहादूर शास्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, मुंबई या संस्थेच्या शाळेने चाचणी परीक्षा, सत्र परीक्षेचे उत्तरपत्रिका तपासणीमध्ये झालेल्या चुका व त्या अनुषंगाने कर्तव्यात केलेली कसुर व हेळसांड यासंदर्भात आरोप ठेवून महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवाशर्ती) नियमावली १९८१ मधील नियम ३५ (५) नुसार निलंबित केले आहे.

(३) होय,

(४) श्रीमती कांबळे यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी शासनाने महिला तक्रार निवारण समिती स्थापन करुन त्या अन्वये सविस्तर चौकशी करण्यास आदेश दिलेले आहेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सहाय्यक शिक्षिका सौ.सुनिता दीपक कांबळे यांच्यावर लैंगिक अत्याचार करणा-या मारुती म्हात्रे या संचालक व मुख्याधापक असलेल्याला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला होता. माझा पहिला प्रश्न असा आहे की, अशा लोकांना राष्ट्रपती पुरस्कार देण्याची पद्धत आहे काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, महिला आयोगाने त्याला दोषी ठरविलेले आहे. त्याचा अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे काय ? तिसरा प्रश्न असा आहे की, या शाळेची मान्यता काढून घेणार का ? आणि माझा चौथा प्रश्न असा आहे की, महिला आयोगाने सूचविल्याप्रमाणे ज्या शिक्षिकेला जाणीवपूर्वक निलंबित केले आहे त्यांना अन्यत्र सामावून घेणार काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नाची, त्यांना पुरस्कार मिळाला की नाही ? मला माहिती नाही. ही बाब तपासून घेतली जाईल. दिनांक 7/11/2007 रोजी महिला आयोगाने सूचित केल्याप्रमाणे समिती गठीत केली होती, या

...3........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके........

समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे व निश्चितपणे कार्यवाही होईल. तसेच, सदर महिला शिक्षिकेला सेवेत सामावून घेतले जाईल, शक्यतो त्याच ठिकाणी संरक्षण देऊन सामावून घेतले जाईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सुचित केलेली कार्यवाही किती दिवसात पूर्ण करण्यात येईल ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, फारच तातडीने हा अहवाल आलेला आहे. एक महिन्याच्या आत कार्यवाही पूर्ण केली जाईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या प्रकरणातील शिक्षिकेला निलंबित करण्यात आले होते, असे उत्तर शासनाने दिले आहे. खरे म्हणजे, महाराष्ट्र खाजगी शाळा सेवाशर्ती नियमावली 1981 नुसार आरोप ठेवून निलंबित करावयाचे असेल तर शिक्षण विभागाची परवानगी घ्यावी लागते. त्या शिक्षिकेला निलंबित करण्यापूर्वी शिक्षण निरिक्षकांनी शासनाची परवानगी घेतली होती का, शासनाने अशी परवानगी दिली का, परवानगी दिली नसेल तर हे निलंबन नियमबाह्य व बेकायदेशीर आहे. त्यामुळे निलंबन तातडीने रद्द करण्याचे आदेश आपण संबंधितांना देणार का ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, होय.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, निलंबन रद्द करण्यात आलेले आहे, त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. शिक्षण विभागाच्या अंतर्गत राज्यात अनेक महिला शिक्षिका काम करीत आहेत. त्यामुळे शिस्त पालन करीत असतांना दोन्ही बाजूंनी एकमेकांवर आरोप होत असतात, ही वस्तुस्थिती आहे. योग्य मार्गाने संबंधितांना न्याय मिळावा म्हणून महिला तक्रार निवारण समित्या शिक्षण विभागांतर्गत, प्रत्येक शाळेच्या अंतर्गत स्थापन करणे हे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बंधनकारक आहेत. तशा समित्या गठीत करणार काय आणि या शाळेत अशी समिती का गठीत केली नव्हती ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना तपासून योग्य ती कारवाई करण्यात येईल.

------------------

....4...........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कल्याण (जि.ठाणे) येथील रुक्मिणीबाई रुग्णालयातील**
**डॉ. श्राध्दे यांनी शस्त्रक्रिया निष्काळजीपणे केल्याबाबत**

**(६) * ३४७२५ श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. संजय दत्त , श्री.राजन तेली , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. धनाजी साठे :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) कल्याण (जि.ठाणे) येथील रुक्मिणीबाई रुग्णालयात कान,नाक व घसा तज्ञ डॉ. दिपक श्राध्दे यांनी एका महिलेवर कुंटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया निष्काळजीपणे केल्यामुळे त्या महिलेच्या गर्भाशयाला छिद्र पडल्याने सदर महिलेला मुंबईतील जे.जे. रुग्णालयात हलवावे लागल्याचे माहे ऑक्टोबर, २००७ रोजी वा त्या दरम्यान आढळून आले हे खरे आहे काय,
२) असल्यास डॉ. श्राध्दे हे रुग्णालयातील ऑपरेशनमध्ये हस्तक्षेप करीत असल्यामुळे इतर डॉक्टर तसेच रुग्णांना त्रास सहन करावा लागत आहे हे खरे आहे काय,
३) असल्यास,सदर डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत तसेच सदरहू महिलेला आर्थिक सहाय्य देण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही,
(२) हे खरे नाही,
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, रुक्मिणीबाई रुग्णालयातील डॉ.दीपक श्राध्दे यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे. जर ते दोषी नव्हते तर त्यांना कार्यमुक्त का करण्यात आले, त्यांना कार्यमुक्त केले याचा अर्थ त्यांना दुसरीकडे सामावून घेण्यात आले का, या प्रकरणाची आणि अन्य अनेक प्रकरणाची चौकशी करुन संबंधित डॉक्टरांना निलंबित करणार काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, ही वस्तुस्थिती आहे की, डॉ.श्राध्दे यांची वरिष्ठांशी आणि सहका-यांशी वागणूक योग्य नव्हती. त्यामुळे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने ठराव करुन तो नगर विकास विभागाकडे पाठविला होता. या ठरावाला मान्यता देण्याचे काम या विभागाने केले आहे आणि संबंधिताची बदली केली आहे. या व इतर प्रकरणांची चौकशी आरोग्य संचालकांमार्फत केली जाईल आणि चौकशीचा अहवाल आल्यानंतर कारवाई केली जाईल.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.34725** ......

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी त्या डॉक्टरची वर्तणूक बरोबर नसल्याचे मान्य केलेले आहे. त्या डॉक्टरचा संबंध नसतांना तो ऑपरेशन थिएटरमध्ये जातो आणि ढवळाढवळ करतो, अशी तेथील डॉक्टरांनी तक्रार केलेली आहे. माननीय मंत्री महोदयांनी प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराला हे खरे नाही, प्रश्न उद्‌भवत नाही असे उत्तर दिलेले आहे. त्या डॉक्टरची वर्तणूक बरोबर नसल्याचे मंत्री महोदयांनी मान्य केलेले आहे. याचा अर्थ असा आहे की, प्रशासनाच्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना जी माहिती दिली जाते ती चुकीची दिली जाते. ज्याअर्थी आपण मान्य केले आहे की, त्या डॉक्टरची वर्तणूक बरोबर नाही त्याअर्थी ही माहिती चुकीची आहे, हे खरे आहे काय आणि ज्या अधिका-यांनी चुकीची माहिती दिली त्यांच्यावर आपण आजच्या आज कारवाई करणार काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया करतांना त्या महिलेच्या गर्भाशयाला छोटे छिद्र पडलेले आहे. हा आरोग्य विभागाचा प्रश्न आहे. परंतु या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन उत्तरामध्ये हे खरे नाही, प्रश्न उद्‌भवत नाही असे जरी म्हटले असले तरी या घटनेची चौकशी करुन डेप्युटी डायरेक्टर, हेल्थ यांचा रिपोर्ट आल्यानंतर त्या डॉक्टरवर कारवाई करण्यात येईल. तो डॉक्टर दोषी आढळल्यानंतर निलंबनाचीच नव्हे तर त्यापुढची सुध्दा कारवाई करण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मला एक सूचना करावयाची आहे. कान, नाक व घसा तज्ज्ञ कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया करीत असतील तर यापेक्षा आरोग्य विभागाचे दुसरे दुर्दैव नाही.

**सभापती** : माननीय मंत्री महोदय आपण यासंदर्भात चौकशी करा. अधिकृत डॉक्टर त्या क्षेत्रातील नसतील आणि अशा प्रकारची ऑपरेशन्स होत असतील तर ते बरोबर नाही.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, होय.

---------

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बीड जिल्ह्यात बेकायदेशीरपणे गर्भजल चिकित्सा होत असल्याबाबत**

**(7) * 33682 श्रीमती उषाताई दराडे , श्रीमती मंदा म्हात्रे , प्रा. फौजीया खान , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) बीड जिल्ह्यात गर्भजल चिकित्सा केंद्रात गर्भजल चिकित्सा बेकायदेशीर होत असल्याचे माहे ऑगस्ट, 2007 मध्ये एका सर्व्हेक्षणात आढळून आले हे खरे आहे काय,
(2) असल्यास, आरोग्य विभागाने याची चौकशी केली आहे काय,
(3) चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यांत आली आहे वा करण्यांत येत आहे ?

**श्री.रणजित कांबळे, डॉ.विमल मुंदडा यांच्याकरिता** : (1) नाही,
(2) व (3) प्रश्न उद्‌भवत नाही.

**सभापती** : बीड जिल्हयात बेकायदेशीरपणे गर्भजल चिकित्सा होत असल्याबाबत या विषयावर सभागृहामध्ये लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून चर्चा झालेली आहे. तरीही मी सन्माननीय सदस्यांना एक-दोन प्रश्न विचारण्याची संधी देईन.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, प्रश्नाला दिलेल्या उत्तरामुळे माझे समाधान झालेले आहे.

डॉ.नीलम गो-हे : बीड जिल्हयात बेकायदेशीरपणे गर्भजल चिकित्सा होत असल्याबाबत लक्षवेधी सुचनेच्या माध्मातून सभागृहात चर्चा झालेली आहे. बीड जिल्हयामध्ये बेकायदेशीरपणे गर्भलिंग निदान करणारे डॉक्टर आहेत. नगर जिल्हयामध्ये श्री.उमाकांत दांगट, जिल्हाधिकारी यांनी मोहीम हाती घेतल्यानंतर 10 डॉक्टरांना पकडण्यात आले. बीडमध्ये अशी मोहीम घेण्यात आली होती काय आणि बीड जिल्हयामध्ये जे डॉक्टर्स बेकायदेशीरपणे गर्भलिंग निदान करीत असतील तर त्यांच्यावर शासन कारवाई करणार काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, बीड जिल्हयामध्ये अशी मोहीम घेण्यात आली होती. बीड जिल्हयातील तीन दवाखान्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. आपण एकूण सहा डॉक्टरांवर गुन्हे दाखल केलेले आहेत. रेड्डी हॉस्पिटल, अंबेजोगाई, प्रशांत हॉस्पिटल, बीड आणि

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे .........

भगवान हॉस्पिटल, बीड या हॉस्पिटलवर गुन्हे दाखल झालेले आहेत. भगवान हॉस्पिटलवर रेड टाकण्यात आली त्यावेळी हॉस्पिटलमधील चार डॉक्टरांना बेकायदेशीररित्या गर्भलिंग निदान करतांना पकडण्यात आले व त्या डॉक्टरांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

यानंतर कु.जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : यापूर्वी विधानपरिषद नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाकरिता प्रश्नोत्तराच्या तासाची 10 मिनिटे वाया गेली होती त्यामुळे मी आता प्रश्नोत्तराच्या तास 10 मिनिटे वाढवून देत आहे.

**सोलापूर विद्यापीठातील कुलसचिवांच्या गैरकारभाराच्या चौकशीसाठी शिक्षक संघाचे आंदोलन**

**(८) * ३७२२७ डॉ. एम. ए. अझिज , श्री. संजय दत्त , श्री. रमेश निकोसे , श्री. धनाजी साठे :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर विद्यापिठाचे कुलसचिव डॉ.पी.सी.कुंभारे यांच्या कथीत भ्रष्ट व गैरकारभाची चौकशी व्हावी, मंगळवेढ्याच्या दलितमित्र कदम गुरुजी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.सुभाष कदम यांचे पद रद्द करण्यात यावे व अन्य मागण्यासांठी शिवाजी विद्यापिठ शिक्षक संघाच्या (सुटा) वतीने दि.१.९.०७ रोजी किंवा त्या सुमारास सोलापूर विद्यापिठासमोर आंदोलने केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, व त्यात त्यांना काय आढळून आले व त्यानुसार दोषी असणाऱ्या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय?

**श्री.सुरेश शेट्टी, श्री.दिलीप-वळसे-पाटील यांच्याकरिता** : (१) आंदोलन दिनांक १.९.२००७ रोजी नसून दिनांक १.८.२००७ रोजी केले.

(२) विद्यापीठामार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली. त्यामध्ये डॉ.पी.बी.कुंभार, कुलसचिव हे सकृतदर्शनी दोषी आढळल्यामुळे त्यांना निलंबित करुन, निवृत्त जिल्हा सत्र न्यायाधिश यांच्यामार्फत त्यांची चौकशी चालू आहे. त्याचप्रमाणे श्री. कुंभार यांनी या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

दलित मित्र कदम गुरुजी मंगळवेढा येथील प्राचार्य डॉ. सुभाष कदम यांची चौकशी करण्यासंदर्भात व इतर मागण्यासंदर्भात विद्यापीठाने समित्या स्थापन केल्या आहेत. समितीचा अहवाल विद्यापीठास प्राप्त झाला असून विद्यापीठ स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.धनाजी साठे : सभापती महोदय, सदर प्रश्नाच्या उत्तरामध्ये कोल्हापूर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.कुंभारे यांना निलंबित केले गेले आहे. डॉ.कुंभारे यांना निलंबित करण्यापूर्वी त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली होती का ? डॉ.कुंभारे यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती, त्या याचिकेवर कोणता निर्णय झाला ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, ज्या व्यक्तीचे सन्माननीय सदस्यांनी नाव घेतलेले आहे, त्या व्यक्तीने हायकोर्टामध्ये पिटिशन दाखल केलेली आहे. आता आपणच निर्णय घ्यावा की, सदर प्रश्नावर आपण चर्चा करावयाची की नाही ?

**सभापती :** हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे यावर चर्चा करता येणार नाही.

-------

....२



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## वसई तालुक्यातील तुंगारेश्वर पर्यटन स्थळाच्या सुविधाबाबत

**(९) * ३३७७७ श्री. शरद रणपिसे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. रमेश निकोसे , श्री. धनाजी साठे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई तालुक्यातील लाखो भक्तांचे श्रध्दास्थान असलेल्या तुंगारेश्वर देवस्थानाला २००२ मध्ये पर्यटन स्थळ म्हणून घोषित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अजूनही तेथे वीज वा रस्ता पोहोचला नाही तसेच मंदिर परिसराचे सुशोभिकरण आणि पर्यटकांसाठी कोणत्याच सोयी सुविधा देण्यात आलेल्या नाहीत, हे देखिल खरे आहे काय,
(३) असल्यास, तातडीने संबंधित सुविधा देण्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुरेश शेट्टी श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याकरिता** : (१) होय,
(२) होय,
(३) सदर पर्यटनस्थळ हे वन विभागाच्या अखत्यारित असल्यामुळे तेथे सुविधा देण्याकरीता सविस्तर सर्वेक्षण करुन केंद्र शासनाच्या वन मंत्रालयाकडे परवानगी मागण्यासाठी प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावर होत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ब-याच सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. माझे एवढेच म्हणणे आहे की, तुंगारेश्वर देवस्थानाला सन २००२ मध्ये पर्यटन स्थळाचा दर्जा दिलेला आहे तर मग आज सन २००७ उजाडलेले असतांना देखील तेथे वीज, रस्ता व इतर कोणत्याही सोयी नाहीत. येथील जमिनीवर रस्ते बनविण्यासाठी परवानगी मागण्यासाठी कारवाई चालू आहे परंतु याकरिता काही कालबध्द कार्यक्रम आहे की नाही ? शासनाला जर पर्यटन क्षेत्राला जर गती आणावयाची असेल तर त्याकरिता टाईम बाऊंड प्रोग्रॅम आखून त्याची काटेकोर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. यासंदर्भात ढिलाई दाखविणा-या अधिका-यांवर हे शासन कारवाई करणार आहे का ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सदर प्रश्न हा वन खात्याचा आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सदर प्रश्न पर्यटनाबाबतचा आहे, तो वन खात्याचा कसा होईल ?

.....३


JPK/ / D/ MAP/ प्रथम श्री.बोरले.... १४:००

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे आधी आपण माझे पूर्ण उत्तर ऐकून घ्यावे. सदर स्थळाला जिल्हयाने "क" वर्ग पर्यटन स्थळ म्हणून घोषित केलेले आहे. सदर स्थळ "क" वर्ग घोषित झाल्यावर पैसे द्यावयाला पर्यटन विभाग तयार आहे परंतु तसा प्रस्ताव संबंधित जिल्हाधिका-यांकडून आलेला नाही. शासनाने जेव्हा पर्यटन धोरणाविषयी घोषणा केली तेव्हा कॅबिनेटच्या बैठकीमध्ये असा निर्णय झाला की, इको टुरिझम, फॉरेस्ट टुरिझम यासंदर्भात त्यांचे स्वत:चे धोरण निश्चित करुन लवकरच ते धोरण मांडतील. म्हणून वन विभागाचे हे धोरण जाहीर झाल्याशिवाय पर्यटन विभाग काहीही काम करु शकत नाही. वनविभागाने जर राज्य शासनाकडून परवानगी घेऊन धोरण जाहीर केले तर आम्ही पर्यटन स्थळाच्या सुशोभिकरणाकरिता पैसे देण्यास तयार आहोत. परंतु काम सुरु होणार नाही कारण केंद्रसरकारची परवानगी लागेल.

श्री.अरविंद सावंत : माननीय मंत्रिमहोदयांचे मी स्वागत करतो. पण दुर्देव असे आहे की, प्रश्न काय आहे की, वसई तालुक्यातील लाखो भक्तांचे देवस्थान असलेले तृंगारेश्वर सन २००२ मध्ये पर्यटन स्थळाचा दर्जा मिळाला, हे खरे आहे काय ? आजही आपण जर तीच कारणे सांगत असाल तर कसे होईल ? सुदैवाने वन मंत्री सभागृहात आहेत,त्यांनी यासंदर्भात कार्यवाही करावी,अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33777 .....

श्री.अरविंद सावंत .....

वन खात्याची परवानगी घेणे हा विषय नंतरचा आहे. याबाबतचा प्रस्ताव कोण तयार करतो ? किती कालावधीत प्रस्ताव तयार होईल ? वन खात्याकडून कधी मंजूरी येईल ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, डी.पी.डी.सी. मध्ये प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर मंत्रालयाकडे पाठविला जातो. हा प्रस्ताव मंत्रालयातील तीन खात्याशी संबंधित आहे. पर्यटन, ग्रामविकास व वन अशी ही तीन खाती आहेत. तीर्थक्षेत्राचा विकास करण्याचे काम ग्रामविकास विभागाकडे आहे. वन परीसरात पर्यटनासंबंधी व तीर्थक्षेत्रासंबंधी काही काम करावयाचे असल्यास वन खात्याचा संबंध येतो. याबाबत माझे कन्फ्युजन होत आहे.

(विरोधी पक्षाचे सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

**सभापती** : मी विरोधी पक्षाच्या सदस्यांना सांगू इच्छितो की, मी माननीय मंत्री महोदयांना तुमच्या मनातील भावना सांगत आहे. तुम्ही पर्यटन खात्याचे राज्यमंत्री आहात. तुंगारेश्वर हे देवस्थान वन खात्याच्या अखत्यारीत असेल तर You can co-ordinate with forest department. म्हणजे ग्रामविकास, पर्यटन व वन खाते हया खात्याचे माननीय मंत्री व अधिकारी एकत्र बसले तर त्यातून मार्ग निघून अंमलबजावणी होऊ शकते.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, वन विभागाचे मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहे. मी त्यांना विनंती करतो की, त्यांना इनचार्ज मिनिस्टर अपॉईंट करावे. यामध्ये आमचे जास्त काम नाही, परंतु त्यांना जी मदत लागेल ती करण्यास आम्ही तयार आहोत.

(विरोधी पक्षाचे सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

**सभापती** : माननीय वन मंत्री सभागृहात उपस्थित आहेत, त्यांनी याबाबत खुलासा करावा.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, राज्याच्या टुरीझमसंदर्भात पॉलीसी नव्हती आणि इको-टुरीझमचीही पॉलीसी नव्हती. टुरीझमची पॉलीसी झाल्यानंतर एक मिटींग झाली होती व त्यामध्ये ठरले की, वन खात्याची स्वतंत्र इको-टुरीझम पॉलीसी तयार झाली पाहिजे. ही पॉलिसी आता तयार झालेली असून मंत्रिमंडळाच्या पुढील बैठकीत मंजूरीसाठी ठेवण्यात येईल. आता असा

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33777 .....

श्री.बबनराव पाचपुते .....

प्रश्न निर्माण झाला आहे की, वनांच्या परिसरात काही मंदिरे व थंड हवेची ठिकाणे आहेत. ती डेव्हलप करावयाची असतील तर टुरीझम डिपार्टमेंटने निधी द्यावा. याबाबतचा प्रस्ताव त्यांनी तयार करावा.

(विरोधी पक्षाचे सदस्य आपल्या जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

**सभापती** : विरोधी पक्षाच्या सदस्यांनी खाली बसावे. विरोधी पक्षाच्या वतीने माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार बोलतील.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, वैधानिक कामकाजाच्या अतिशय छोटयाशा अनुभवाच्या पार्श्वभूमीवर मी सदनाला प्रश्न विचारु इच्छितो. एखाद्या खात्याच्या मंत्री महोदयांना सदनामध्ये उपस्थित राहणे शक्य होत नसेल तर त्याच्या परंपरा व पध्दत आहेत. याचा अर्थ अनुपस्थित मंत्र्याचे दुसऱ्या कोणत्याही मंत्र्याने उत्तर द्यावे असा होत नाही. संबंधित मंत्री काही महत्वाच्या कामामुळे सभागृहात अनुपस्थित राहणार असेल व त्यांच्या खात्यावर दुसरा मंत्री बोलणार असेल तर त्यासाठी पीठासीन अधिकाऱ्यांकडे अगोदर नोट दिली पाहिजे. अशा प्रकारची नोट आपल्याकडे आलेली आहे का ? माझे म्हणणे चुकीचे असेल तर तसे मला सांगावे.

**सभापती** : मी माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना सांगू इच्छितो की, याबाबत मी थोडया वेळापूर्वी निर्णय दिलेला आहे. तसेच सदरहू प्रश्नाबाबत मी सांगू इच्छितो की, माननीय वन मंत्री, पर्यटन मंत्री व ग्रामविकास मंत्री यांची संयुक्त बैठक उद्या दुपारी 4.00 वाजता माझ्या दालनामध्ये बैठक होईल, त्यावेळी या प्रश्नाशी संबंधित असलेल्या 3-4 माननीय सदस्यांनाही बोलावण्यात येईल.

-----

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**करजुबे (ता,संगमेश्वर जि,रत्नागिरी) येथील शाळा खोल्यांचे अतिवृष्टीने नुकसान झाल्याबाबत,**

**(१०) * ३६०७६ श्री. संजय केळकर , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. रामनाथ मोते :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील संगमेश्वर तालुक्यातील करजुबे येथील शाळा खोल्यांचे जुलै,०६ च्या शेवटच्या आठवडयात अतिवृष्टीमुळे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाच्या निर्दशनास आणले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शाळेच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) त्यानुसार शाळा खोल्या दुरुस्तीसाठी काय उपाययोजना केली आहे व त्यासाठी किती कालावधी निश्चित केला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वसंत पुरके** : (१) होय,
(२) सदर माध्यमिक शाळा खाजगी संस्थेची असल्याने नैसर्गिक आपत्ती अनुदानातून आर्थिक मदत करता येत नाही.
(३) संस्थेने सदर शालेय इमारतीची दुरुस्ती स्वत:च्या उत्पन्नातून केलेली असून शालेय कामकाज सुरळीतपणे सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

नंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 36076.......

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, करजुबे, ता.संगमेश्वर येथील शाळोला मी देखील भेट दिलेली होती आणि त्याबाबत सातत्याने पाठपुरावा केला होता. त्याभागात अतिवृष्टीमुळे तेथील शाळेच्या दोन खोल्या पडल्या. त्यामुळे एका वर्गामध्ये दोन - दोन, तीन तीन वर्ग चालविले जात आहे. अतिवृष्टीमुळे नुकसान होणाऱ्या अनेक घटकांना शासन मदत करीत असते. माझा यासंदर्भात स्पेसिफिक प्रश्न आहे की, या गावातील जे विद्यार्थी आहेत त्यांचे नुकसान होत आहे. त्याबाबत शासनाकडून या शाळांना विशेष बाब म्हणून मदत केली जाणार आहे काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, नैसर्गिक आपत्तीमुळे शाळेचे अतिशय नुकसान झालेले आहे. जिल्हापरिषदा, खाजगी शाळेमधील अनेक खोल्यांचे नुकसान झाले. परंतु सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न महत्वाचा आहे. जिल्हापरिषद शाळांना ज्याप्रमाणे अनुदान किंवा मदत शासनाकडून दिली जाते. त्याचप्रमाणे नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शाळांना मदत करण्यासंदर्भातील बाब मंत्रिमंडळासमोर आणून देण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ज्यावेळी कोणतीही नैसर्गिक आपत्ती येते किंवा अतिवृष्टी होते, त्यावेळी शासन वेगवेगळया घोषणा करते. याबाबत पुनर्विसन विभागाने आपले धोरण बदलण्याची आवश्यकता आहे. माझी आपणाला विनंती आहे की, ज्यावेळी अशाप्रकारच्या नैसर्गिक आपत्ती निर्माण होते त्यावेळी शाळा खाजगी असून अनुदानित असली तरी त्या शाळेला शासनाकडून मदत दिली जाणार आहे काय ? हा मुलांच्या शिक्षणाचा महत्वाचा विषय आहे त्यामुळे पुनर्वसन विभागाने ही बाब लक्षात घेऊन मदत दिली पाहिजे. अन्यथा मुलांना वर्षानुवर्ष शिक्षण घेता येणार नाही. ही बाब केवळ मंत्रिमंडळाच्या निदर्शनास न आणता , पुनर्वसन खात्याचे मंत्री व शिक्षण मंत्री यांनी मिळून याबाबत धोरण घोषित केले जाईल काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय,धोरणात्मक बाब म्हणून याबाबत निर्णय घेण्याच्या संदर्भात मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर हा प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.

**सभापती** : आता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

..............



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी : लेखी उत्तरे**

मु.शी :अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक 1 ते 17 सभागृहासमोर ठेवणे

**सचिव** : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक 1 ते 17 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक 1 ते 17 सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी )

.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3...



**पृ.शी. व मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे**

श्री.रणजित कांबळे( पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन 2004-2005 चा वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे व लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे व लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर ( पणन मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो.

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विनियमन) ( सुधारणा ) नियम, 2007 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक कृबास2007/ प्र.क्र.254/11-स, दिनांक 3 नोव्हेंबर,2007

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील ( कृषिमंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा सन 2005-2006 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे

.

श्री. रविशेठ पाटील ( आदिवासी विकासमंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित नाशिकचा अनुक्रमे सन 1999-2000 व 200-2001 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.

............

..4....



**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे.

श्री. अरविंद सावंत ( समिती प्रमुख ) : महोदय मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शुक्रवार दिनांक 30 नोव्हेबर, 2007 रोजच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय विधेयकांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 29 नोव्हेंबर.2007 रोजी समितीची बैठक झाली . अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. श्री. मधुकर चव्हाण, वि.प.स. यांचे एक अशासकीय विधेयक पुर:स्थापनार्थ आहे. त्यास 5 मिनिटांचा वेळ देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. सन 2007 चे वि.प.वि. क्र. 9 - मोटार वाहन ( महाराष्ट्र सुधारणा) विधेयक 007 श्री. संजय दत्त, वि.प.वि यांचे | 35 | मिनिटांपेक्षा जास्त नाही |
| 2. सन 2007 चे वि.प.वि. क्र. 11- महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त ( सुधारणा ) विधेयक, 2007 श्री. संजय दत्त यांचे | 35 | मिनिटांपेक्षा जास्त नाही |
| 3. सन 2007 चे वि.प.वि. क्र. 12 - अन्न व भेसळ प्रतिबंध (महाराष्ट्र सुधारणा ) विधेयक 2007 श्री. परशुराम उपरकर, वि.प.स. यांचे | 40 | मिनिटांपेक्षा जास्त नाही |
| 4. सन 2007 चे वि.प.वि. क्र. 10 - महाराष्ट्र घरेलू कामगार (कल्याण व सेवाशर्ती ) विधेयक 2007 श्री. संजय दत्त, वि.प.स. यांचे | 40 | मिनिटांपेक्षा जास्त नाही |

..5..



यापैकी कोणत्याही विधेयकाचा वेळ वाचल्यास तो त्या पुढील क्रमांकाच्या विधेयकास देण्यातयावा अशीही शिफारस समितीने केली आहे.

**सभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वये सूचना.**

**सभापती :** माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, मधुकर चव्हाण यांनी "कोकण विभागासाठी एस.एस.सी.बोर्ड निर्माण करण्याचा व मार्च 2007 ची परीक्षा या नवीन मंडळा मार्फत घेण्याची सभागृहात घोषणा करूनही त्याची अंमलबजावणी न झाल्याबाबत." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सुचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे यांनी "मौजे कांबा येथील सर्व्हे नं.22, 77, 35, 125 या मिळकती श्री.विष्णू लक्ष्मण फडके व त्यांच्या कुटुंबियांच्या मालकीच्या असलेल्या जमिनी सन 1986 मध्ये सर्वश्री कातोड पांडू सुरोशे, शांताराम गोपाळ बनकरी, रामचंद्र मोरारी कुंडले यांच्या नावाने कूळ म्हणून नोंद होऊन त्या सन 2000 मध्ये कुळांच्या नावे विक्री होऊनही कुळांचे 7-12 चे उतारे कुळांच्या नावे असतानाही त्यांची संमती न घेता बेकायदेशीररित्या विक्री केल्याबाबत." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सुचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी "यवतमाळ जिल्ह्यातील उपविभागीय पोलीस अधिकाऱ्याने इंडिका मोटारीतून जाताना मोटार सायकलवरून जाणाऱ्या विकास लाडेकर या तरूणाला यवतमाळ मार्गावरील सेलूसुऱ्यानजिक धडक दिल्याने त्याचा मृत्यू होणे, कायद्याच्या रक्षकाने मद्याच्या नशेत एका तरूणाचा बळी घेतल्याने संतप्त जमावाने केलेले रस्ता रोको आंदोलन, या अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात होत असलेली दिरंगाई." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सुचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सूचनेवरील निवेदन उद्या आले तर बरे होईल. अन्यथा शेवटच्या दिवशी गठ्ठ्यातून निवेदन आल्याने त्यावर आम्हाला चर्चा करता येत नाही.

**सभापती :** ठीक आहे, उद्या किंवा परवा या विषयी शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता यांनी 21.10.2007 रोजी अचलपूर येथे दुर्गा विसर्जनाच्या मिरवणुकीवर शेकडो मुस्लिमांनी दगडफेक

...... 2आरआर 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

करून लोकांची दुकाने जाळून करण्यात आलेली लूट, सदर दंगलीत सुमारे 75 कोटी रूपयांचे झ ाालेले नुकसान, दंगलखोर घराघरात घुसणे इत्यादीबाबत." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सुचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या विषयावरील निवेदनदेखील उद्या होणे आवश्यक आहे. हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे.

**सभापती** : ठीक आहे. उद्या या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देतो.

माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, केशवराव मानकर यांनी "सन 2006 मध्ये आलेल्या वादळी पाऊस व गारपिटीमुळे काटोल तालुक्यातील (जिल्हा नागपूर) मौजा लिंगा, सावंगी (बु.), पारडी (गो), बु. मांजरा, बोरखेंडी या पाच गावांतील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याबाबत." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सुचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

( यानंतर श्री. सरफरे ..... 2एस 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**....

सन्मा-ा-ीय सदस्य सर्वश्री. नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, केशवराव मानकर, पाशा पटेल यां-ी "गडचिरोली जिल्हयातील सुरजा गड लोहखनिज कारखाना एटापल्ली तालुक्यात उभारावा व स्थानिक सुशिक्षित बेरोजगारांना या प्रकल्पात सामावून घेण्याबाबत व अन्य न्याय्य मागण्यांसाठी आदिवासी स्वायत्त परिषदेने गेल्या 3 महिन्यांपासून गडचिरोली येथे उपोषण सुरु केल्याबाबत" या विषयावर -ियम 93 अ-वये सूच-ा दिली आहे. तो -ियम 93 चा विषय होत -ासल्या-े, मी सूच-ेस अ-ुमती -ा□रीत आहे. मात्र या विषयावर शासनाने -िवेद-ा □रावे.

सन्मा-ा-ीय सदस्य सर्वश्री. केशवराव मानकर, नितीन गडकरी, पांडुरंग, फुंडकर, सागर मेघे यां-ी "गडचिरोली जिल्हयातील नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात ठार झालेल्या पोलिसांच्या विधवांना, कुटुंबियांना व निरपराध नागरिकांच्या कुटुंबियांना नोकऱ्या मिळण्याबाबत" या विषयावर -ियम 93 अ-वये सूच-ा दिली आहे. तो -ियम 93 चा विषय होत -ासल्या-े, मी सूच-ेस अ-ुमती -ा□रीत आहे. मात्र या विषयावर शासनाने -िवेद-ा □रावे.

सन्मा-ा-ीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यां-ी "सिंधुदुर्ग जिल्हयातील रेडी या ठिकाणच्या मायनिंग प्रकल्पांचे परवानगी घेतलेल्या पेक्षा जास्त उत्खनन केल्यामुळे अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी चौकशी करुन डेक्कन मिनरल प्रा. लि. मायनिंग कंपनी व खोडगे लॉजेस्टिक या ट्रान्सपोर्ट कंपनीला सुमारे 4.5 कोटी दंड आकारुन 18 ठिकाणचे साठे जप्त करणे परंतु हा दंड आयुक्तांनी माफ केल्यामुळे शासनाचे झालेले नुकसान" या विषयावर -ियम 93 अ-वये सूच-ा दिली आहे. तो -ियम 93 चा विषय होत -ासल्या-े, मी सूच-ेस अ-ुमती -ा□रीत आहे. मात्र या विषयावर शासनाने -िवेद-ा □रावे.

सन्मा-ा-ीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यां-ी "एच.आय.व्ही. बाधित हजारो महिला वैफल्यग्रस्त जीवन जगत असून त्यांना सामाजिक बहिष्काराला, कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागत असून कुटुंबाने बाहेर काढलेल्या या विधवा महिलांचे व त्यांच्या अनाथ मुलांचे पुनर्वसन करण्याबाबत" या विषयावर -ियम 93 अ-वये सूच-ा दिली आहे. तो -ियम 93 चा विषय होत -ासल्या-े, मी सूच-ेस अ-ुमती -ा□रीत आहे. मात्र या विषयावर शासनाने -िवेद-ा □रावे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

**सभापती**....

सन्मा-ा-ीय सदस्य सर्वश्री. विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी यां-ी "कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची नियुक्ती जाहिरात देऊन परीक्षा व निवड समितीमार्फत निवड प्रक्रियेची कार्यवाही पूर्ण न करता तंत्र शिक्षण विभागाने शासन निर्णय क्र.एससीपी 2007 (163/07) मशि-2 दि.11.10.07 अन्वये 31 कनिष्ठ महाविद्यालयांच्या शिक्षकांना वरिष्ठ महाविद्यालयात नियुक्ती दिल्याबाबत" या विषयावर -ियम 93 अ-वये सूच-ा दिली आहे. तो -ियम 93 चा विषय होत -ासल्या-ो, मी सूच-ेस अ-ुमती -ा□ारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने -िवेद-ा □रावे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नियम 93 च्या सूचनेवरील निवेदनासंबंधी

**सभापती** : याठिकाणी सभागृहामध्ये सन्माननीय वन मंत्री श्री. बबनराव पाचपुते उपस्थित आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, अन्य विभागाशी संबंधित असलेली नियम 93 च्या सूचनेवरील निवेदने प्रलंबित आहेत. सदरहू निवेदने जास्तीत जास्त लवकर म्हणजे उद्या सभागृहापुढे कशी येतील यादृष्टीने आपण संबंधित विभागांच्या मंत्रिमहोदयांना सांगावे.

---

पृ.शी. : वन उपज औषधाकरिता स्वतंत्र महामंडळ निर्मितीचा प्रलंबित असलेला प्रस्ताव

मु.शी. : वन उपज औषधाकरिता स्वतंत्र महामंडळ निर्मितीचा प्रलंबित असलेला प्रस्ताव याबाबत सर्वश्री. नितीन गडकरी, विनोद तावडे, मधु चव्हाण वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. बबनराव पाचपुते ( वन मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, मधु चव्हाण, वि.प.स. यांनी "वन उपज औषधाकरिता स्वतंत्र महामंडळ निर्मितीचा प्रलंबित असलेला प्रस्ताव" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या वन विभागामधील जंगलामध्ये वेगवेगळी औषधी वनस्पती सापडते. या संबंधात शेजारच्या मध्य प्रदेश राज्यामध्ये व अन्य राज्यांमध्ये स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्यात आले आहे. आपल्या राज्यातील जंगलामध्ये जी औषधी वनस्पती मिळत आहेत. त्या औषधी वनस्पतींचा वापर करुन औषधे निर्माण करण्याकरिता जर महामंडळ निर्माण केले तर त्या माध्यमातून स्थानिक आदिवासींना रोजगार मिळू शकतो. परंतु त्याबाबत टाईम बाऊंड कार्यक्रम शासनाजवळ नाही. सन 2005 मध्ये याकरिता एक समिती गठीत करण्यात आली. आणि त्यानंतर 2007 मध्ये समितीची कार्यकक्षा वाढविण्यात आली. आणि त्यामध्ये 4 अशासकीय सदस्यांचा समावेश करण्यात आला. परंतु हे महामंडळ स्थापण्याकरिता शासनाने कोणताही टाईम बाऊंड कार्यक्रम घेतला नाही. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, पुढील अर्थसंकल्पिय अधिवेशनापर्यंत आदिवासींकरिता आपण हे महामंडळ घोषित करुन त्या महामंडळाला आर्थिक निधी मिळवून देणार काय?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या संदर्भात माहिती घेण्याकरिता मी स्वत: पुढाकार घेतला. महाराष्ट्रामध्ये आणि भारतामध्ये एकूण 47 हजार वनस्पती आढळतात. त्यापैकी 15 हजार वनस्पतींना औषधी वनस्पती म्हणून मान्यता आहे. एकूण 15 हजार औषधी वनस्पतींपैकी फक्त 500 वनस्पतींचा प्रत्यक्षात औषधे तयार करण्याकरिता वापर केला जातो.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते ....

आयुर्वेदिक औषधांचा जो वापर जगामध्ये होतो त्यांची किंमत कोट्यवधी रुपयांमध्ये आहे. आपल्या देशामध्ये 3500 कोटी रुपयांपर्यंत या वनस्पतींपासून तयार केलेल्या औषधांचा वापर होतो. आपल्या भारताचे प्रमाण अत्यंत कमी म्हणजे 0.5 एवढे आहे. आपण माल उत्पादन करुन परदेशामध्ये पाठवतो. याचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात आले की, नरक्या, आवळा, अश्वगंधा, शतावरी, हिरडा, सोनपिंपळी, ब्रम्ही, बेल अशा वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पती सहज आढळून येतात. या प्रजाती मोठ्या प्रमाणावर आढळून येतात. आता आपण कच्चा माल पाठवितो. आपण प्रोसेस करुन माल पाठवत नाही. कच्चा माल न पाठवता तो प्रोसेस करुन पाठवला तर आपल्याला कोट्यवधी रुपये मिळू शकतील. आता 70 टक्के माल कच्च्या स्वरुपात पाठवतो. तो प्रोसेस करुन पाठवला तर कोट्यवधी रुपयांची उलाढाल होऊ शकते. आपण मध्यप्रदेशच्या विंध्य हर्बल बाबत सांगितले. आम्ही वन खात्याची सर्व टीम घेऊन त्या ठिकाणी गेलो होतो. विंध्य हर्बल पाहिल्यानंतर आपण एक कमिटी नेमली होती. त्याचा अहवाल तयार झाला. त्यानंतर सरकारने औषधांसंबंधी ज्यांचा अभ्यास आहे अशा व्यक्तींची परत त्या समितीवर निवड केलेली आहे. आपल्याकडे अहवाल आलेला आहे. त्याला उशीर झालेला आहे पण माझ्याकडे अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये काही त्रुटी आहेत. काही नवीन गोष्टी होणे आवश्यक आहे. आवश्यकतेप्रमाणे त्या गोष्टी झाल्या नाहीत तर ज्यासाठी महामंडळ तयार करावयाचे आहे तशा पध्दतीचे ते होणार नाही. अनेक महामंडळे तोट्यात जातात. त्यामध्ये आणखी एका महामंडळाची भर घालावयाची काय ? हे महामंडळ कोट्यवधी रुपये फायद्यामध्ये राहील. आपल्याकडे कच्चा माल आहे. त्यावर प्रोसेस करण्याचे काम व्हावे एवढे काम आहे. आम्ही ब्रम्हपुरी येथे मध गोळा करण्यास सुरुवात केली. ज्यावेळी मध गोळा करण्यास सुरुवात केली त्यावेळी सगळ्यांनी सांगितले की, हे होणार नाही. आमच्याकडे तीन महिन्यांची ऑर्डर बूक आहे. आपण काही टन मध तयार करु शकतो. मध कसे काढावयाचे, ते जमा कसे करावयाचे याचे प्रशिक्षण त्या भागातील आदिवासी लोकांना दिलेले आहे. त्यांना कपडे दिलेले आहेत. मधाच्या पोळ्याला इजा न होता मध काढण्याचे प्रशिक्षण आदिवासींना दिले. मध काढण्यासाठी झाडे तोडणारे जे आदिवासी लोक होते त्यांना मध काढण्याचे प्रशिक्षण देऊन त्या

....2..

RDB/ D/ KTG/

श्री. बबनराव पाचपुते ......

परिसरातील मध गोळा करतो. त्यामुळे रोजगार निर्माण होतो. म्हणून हे महामंडळ तुमच्या आमच्या दृष्टीने महत्वाचे आहे तसेच राज्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे. हे महामंडळ तोट्यात जाणार नाही यासाठी लवकरात लवकर म्हणजे पुढचे अधिवेशन होण्याच्या आधी हे महामंडळ तयार करु. या महामंडळामध्ये राज्यात जे चांगले काम करणारे लोक आहेत त्यांना घेऊ. या महामंडळाची व्याप्ती राज्याची राहील परंतु प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक युनिट ठेऊ. त्या त्या जिल्ह्यामध्ये असणाऱ्या वनस्पतींचा अभ्यास केला जाईल. आपल्या राज्यात काही भागामध्ये नरक्या वनस्पती नसते परंतु सांगली, कोल्हापूर भागामध्ये नरक्या वनस्पती आहे. त्यावर जर प्रोसेस केली, त्याचे एक्स्ट्रॅक्शन केले तर भाव चांगला मिळतो. एका किलोला तीन ते चार लाख रुपये मिळतात पण प्रत्यक्ष प्रोसेस केलेली पावडर आपल्या देशामध्ये 12 लाख रुपये किलो दराने तर जपानमध्ये 35 लाख रुपये किलो या भावाने घेतात. एवढ्या चांगल्या वनस्पती आपल्याकडे अस्तित्वात असताना सुध्दा आपण त्याचा फायदा करुन घेत नाही. म्हणून या महामंडळाची गरज आहे. लवकरात लवकर हे महामंडळ तयार करु.

श्री. जगदीश गुप्ता : शासनाने खऱ्या अर्थाने अतिशय चांगला निर्णय घेतला त्याबद्दल शासनाचे अभिनंदन करतो. हा अतिशय महत्वाकांक्षी निर्णय आहे. वन क्षेत्रामध्ये राहणाऱ्या आदिवासी बांधवांना रोजगार मिळेल अशी चांगली योजना आपण आणत आहात. परंतु ती योजना आणत असताना समजा ते करण्यासाठी आपल्याला उशीर लागणार असेल तर तोपर्यंत, आमच्या मेळघाट भागात अनुभव असा आहे की, त्या भागात जी मुसळी जमा करतात त्याला योग्य भाव दिल्लीचे व्यापारी देत नाहीत. म्हणून मी या ठिकाणी सूचना करतो की, आपले महामंडळ सुरु होईपर्यंत वाट न पाहता तेथील आदिवासी जे कलेक्शन करतात त्यांना योग्य मोबदला मिळाला पाहिजे या हेतूने आपले महामंडळ त्याची खरेदी तात्पुरत्या स्वरुपात करणार आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. आपल्याकडे डिंक, आवळा तसेच बाकीच्या वस्तू जमा केल्या जातात. त्यांचे भाव ठरवण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांकडे आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. बबनराव पाचपुते..

दुर्दैवाने त्यांना व्यवस्थित भाव मिळत नाही त्यामुळे आदिवासीला रोजगार मिळत नाही. या संबंधात अधिवेशन संपल्यानंतर दोन दिवसात एक नवीन सक्युर्लर काढण्यात येईल. डीएफओ आणि आरएफओ हे भाव ठरविणार आहेत. लाखेचा भाव 3-4 रु. होता तो एकदम 40 ते 70 रुपये झ ाला. म्हणजे 15 पटीने जास्त भाव लाखेला मिळाला. डिंकाचा भाव जिल्हाधिकारी ठरवितात. परंतु त्याबाबतची त्यांना पुरेशी माहिती नसते. म्हणून वनउपजाचे भाव ठरविण्यासाठी त्यासंदर्भात मॉनिटरिंग करण्यासाठी ताबडतोबीने एक सर्क्युलर काढण्यात येईल. तसेच खेरेदी-विक्री ही वन खात्यामार्फत करण्याचाही विचार आहे. तसे झाले तर आदिवासींना त्याचा जास्तीत जास्त फायदा होईल. मोहफुलाच्या बाबतीत देखील वेगळा निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

श्री. राजन तेली : कोकणामध्ये आंबोली, चौकूळी भागात 500 प्रकारच्या वनौषधी, सुगंधी वनस्पती आहेत. कोकणातील वनौषधींचा शासनाने अभ्यास केलेला आहे काय ? नसल्यास तो केव्हा करण्यात येईल ?

श्री. बबनराव पाचपुते : कोकण आणि पश्चिम घाट हे जैविक विविधतेचे मोठे भांडार आहे. जग हे जैविक विविधतेने नटलेले आहे. पश्चिम घाटामध्ये साडेसात हजार वनस्पती अशा आहेत की त्या दुसरीकडे कोठे मिळत नाहीत. जैविक वनस्पतीमध्ये मी स्वत: रस घेतलेला आहे. या जैविक वनस्पतींच्या संदर्भात काम करणा-या लोकांना एकत्र करुन त्यांना कामाला लावायचे आहे. कोकणामध्ये अन्य ठिकाणी न मिळणा-या अनेक जैविक वनस्पती आहेत. कोकणामध्ये नरक्या, आवळा, बेडा मोठ्या प्रमाणात आहेत. त्यांची लागवड, संरक्षण आणि संवर्धन करणे, ती वनस्पती गोळा करणे आणि ती एकत्र करुन प्रोसेस करणे यासाठी संयुक्त वन व्यवस्थापन समित्या स्थापन झालेल्या आहेत. अशा प्रकारचा कार्यक्रम आपण सिंधुदुर्ग जिल्ह्यापासून सुरु करु.

श्री. पांडुरंग फुंडकर : नैसर्गिकरित्या जी वनौषधी निर्माण होते त्याबाबतीत आपण प्रोत्साहन देत आहात त्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो. आमच्या बुलढाणा जिल्ह्यामध्ये शेतक-यांनी अशा वनौषधींची शेती करायला सुरुवात केलेली आहे. शेतकरी मुसळीची शेती करीत आहेत. ही शेती करण्यासाठी शासन प्रोत्साहनपर अनुदान देते. परंतु ते अनुदान न मिळाल्यामुळे





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

वनौषधींची शेती करणारे शेतकरी कर्जबाजारी झालेले आहेत. त्या शेतक-यांना अनुदान दिले तर वनौषधींची शेती वाढण्यास मदत होईल. तेव्हा त्यादृष्टीने आपण पावले उचलणार आहात काय ?

श्री. बबनराव पाचपुते : पाढंरी मुसळीची शेती लोक करतात. त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. या वनस्पतींची जगामध्ये मोठ्या प्रमाणात मागणी आहे. अशा वनस्पतींची जगामध्ये सर्वात जास्त निर्यात करणारा देश चीन हा आहे. आपल्याकडे विविध वनस्पतींच्या जाती मोठ्या प्रमाणात आहेत. आपल्याकडे 15 हजार वनस्पती आहेत. परंतु त्यापैकी 500 वनस्पतींचा आपण वापर करतो. बाहेरुन खरेदी करणारे जे लोक येतात त्यांच्यावर आपले कोणतेही बंधन नाही. ते लोक येऊन 1 रुपयाची वस्तू 5 पैशाला विकत घेतात. आपणाला 70 टक्के माल प्रोसेस करुन पाठवायचा असेल तर तो माल कमी पडणार आहे. त्यासाठी शेतक-यांना या वनस्पतींची शेती करावी लागेल. यासाठी आपण महामंडळ करीत आहोत. वनस्पतीची लागवड कशी करावी, किती करावी तसेच ती...

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते........

तोडण्याच्या संदर्भात वन खात्याची परवानगी असते. या संदर्भात आपले धोरण तयार करीत आहेत. ज्यावेळी महामंडळ होईल त्यावेळी हजारो नव्हे तर लाखो लोकांना यामधून मोठया प्रमाणात रोजगार मिळेल आणि पैसाही मिळेल. आपण केलेली सूचना मी स्वत: तपासून घेतो आणि पैसे आले असतील तर ते देण्याबाबत विचार करु.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, सातपुडा पर्वतामध्ये तिखाडी वनस्पती मोठया प्रमाणात उपलब्ध आहे. तिखाडीपासून सुगंधी तेल निर्माण केले जाते. शासनाच्या 500 वनस्पतींच्या यादीमध्ये तिखाडीचा समावेश आहे का? नसेल तर तो समावेश करण्यासंबंधी शासन विचार करील काय?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, हे खरे आहे की, वनस्पतींच्या उत्पादनामध्ये वाढ आणि मागणीमध्ये देखील खूप मोठया प्रमाणात वाढ होत आहे. आवळा, अशोका, अश्वगंधा, सर्पगंधा, तुळस यांना मोठया प्रमाणात मागणी आहे. 2002 मध्ये जी मागणी होती ती 2004 सालात जवळजवळ 20 ते 30 टक्क्यांनी वाढली आहे. जगामध्ये आयुर्वेदाबाबत कॉन्शस वाढला आहे. या वनस्पतींकडे ठेवा म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे. सातपुडा पर्वतामध्ये सर्पगंधा, पिवळी गुगळी, चंदन उपलब्ध आहे. रक्तीचंदन आपल्याकडे मिळत नव्हते. आता चंद्रपूरच्या भागामध्ये काही प्रमाणात रक्तीचंदन सुध्दा मिळायला लागले आहे. जे तोळ्यावर विकले जाते असे चंदन तयार करु शकतो. हे महामंडळ तयार करीत असताना धोरण तयार करणे, कशाप्रकारे उत्पादन केले पाहिजे, कुठे केले पाहिजे याचे मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. काही लोकांना जंगलामध्ये जमीन हवी असेल तर ट्रायपार्टने जमीन देता येईल का याचा विचार झाला. काही कंपन्यांनी सांगितले की, आम्हाला जंगलामध्ये वनस्पतीची लागवड करायची आहे त्यासाठी ट्रायपार्ट ॲग्रीमेंटने जमीन द्यायची तयारी आहे.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, शासनाचे सह्याद्री हर्बल या ब्रॅंड नावाचे उत्पादन सहकारी भांडार आणि डिपार्टमेंट स्टोअर्स येथे विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत काय धोरण आहे? त्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला आहे का?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते : सह्याद्री हर्बल आम्ही स्वत: तयार केले आहे. या संदर्भात एक समिती बनविली होती, दुसरी एक समिती बनविली. या संदर्भात सगळ्यांचे एकमत झाले की, मध्यप्रदेशात विंध्य हर्बल आहे तर आपल्याकडे सह्याद्री हर्बल या ब्रँड नावाने उत्पादन सुरु केले आहे. मध आणि काही वनस्पती आपण तयार करतो. त्याच्या विक्रीपासून जे पैसे गोळा होतात, ते पैसे उत्पादन करणाऱ्या माणसांना मिळतील हे पाहिले आहे. प्रत्यक्षात या क्षेत्रात अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे आणि ते लक्ष दिले आहे.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदयांनी विस्तारीत उत्तर दिले आहे. मी एक सूचना करु इच्छितो. निवेदनात काही ठिकाणी औषध आणि काही ठिकाणी वनस्पती असा उल्लेख केलेला आहे. ते योग्य आहे. कच्च्या मालावर प्रक्रिया करुन औषध निर्माण होते. आपल्याकडे विको वज्रदंती आहे. त्यांना फार मोठया प्रमाणात वनस्पती लागते. डाबर, वैद्यनाथ या कंपन्या आहेत. राज्य शासनाच्या आयुर्वेद विभागामार्फत जे परंपरागत आजार आहेत, खोकला, सर्दी, ब्राँकॉयटीस, कावीळ यावर उत्तम वनस्पती औषध उपलब्ध आहे. या संदर्भात संलग्न विचार करण्यासाठी आयुर्वेद विभाग आणि आपले महामंडळ यांनी एकत्रित विचार करुन शासनाचा निर्णय किंवा धोरण आखण्यात येईल काय?

श्री.बबनराव पाचपुते : सध्या आयुर्वेद विभागाशी संपर्क साधलेला नाही. आयुर्वेदिक औषधे निर्माण करणाऱ्या महाराष्ट्रातील सगळ्या उत्पादकांबरोबर दोन बैठका घेतल्या. त्या सगळयांना एकत्रित बोलावले आणि त्यांची समिती तयार केली. त्यांचे प्रश्न आणि त्यांच्या अपेक्षा या दोन्ही गोष्टींचा एकत्रित विचार केला आहे. काही वनामध्ये निर्माण होणाऱ्या वनस्पती ते बाहेरुन आयात करतात त्या आम्ही देऊ.......

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. बबनराव पाचपुते ....

संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी लक्ष घातले जाईल. परंतु यासंदर्भात अद्यापपावेतो डिपार्टमेंटशी संपर्क केला गेला नाही परंतु यासंदर्भात एकत्र बसून निश्चितपणे चर्चा करण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मला या विषयाच्या संदर्भात एक दोनच सूचना करावयाच्या आहेत. जसे हळदीच्या पेटन्टच्या संदर्भात झाले तसा प्रकार या वनऔषधांच्या संदर्भात होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. सन्माननीय मंत्रीमहोदयांनी देशसेवेचे फार मोठे काम करण्याचा निर्णय घेतल्यामुळे मी सन्माननीय मंत्रीमहोदयांनी अभिनंदन करतो. वन औषधांसाठी जे स्वतंत्र महामंडळ केले जाणार आहे त्यासाठी किती निधी लागणार आहे? सभापती महोदय, आपण जे महामंडळ तयार करणार आहात त्या महामंडळामध्ये अध्यक्ष आणि सदस्य हे राजकीय नसावेत. या महामंडळातील अध्यक्ष आणि सदस्य हे वनस्पती शास्त्रात तज्ज्ञ आहेत, जाणकार आहेत, ज्यांना वन्स्पती शास्त्रात रस आहे अशाच लोकांना या महामंडळामध्ये आपण नियुक्त करणार का ? तसेच पेटंन्ट बाबत आपण काळजी घेण्याचा निर्णय घेतला आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी ज्या बाबींचा या ठिकाणी उल्लेख केलेला आहे तो उल्लेख माझ्या अहवालात आहे. या अहवालामध्ये आम्ही यासंदर्भात खबरदारी घेतलेली आहे परंतु तरी सुध्दा यासंदर्भात आपल्या काही सजेशन किंवा सूचना असतील तर त्या सूचनांचा मंडळ करण्याच्या आधी त्याच्यामध्ये जरुर समावेश करु.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, वन औषधीच्या संदर्भात आपला जो अहवाल आहे त्या अहवालाची प्रत जर सर्व सन्माननीय सदस्यांना मिळाली तर त्यांना आपली मते किंवा सूचना मांडण्याची चांगली संधी मिळू शकेल.

**सभापती** : सन्माननीय वन मंत्र्यांचे मी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या मार्फत अभिनंदन करतो. या विषयाच्या संदर्भात सीपीए मार्फत तसेच वन विभागामार्फत एखादे चर्चा सत्र जे किमान अडीच-तीन तास होईल या अनुषंगाने आपल्या विभागाच्या सहकार्याने येत्या दोन महिन्यात कसे काय करता येईल यादृष्टीने मी लक्ष घालीन.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : वर्धा जिल्हयातील सहा शाळेतील शिक्षकांना गेल्या सहा महिन्यांपासून वेतन न मिळणे.

**मु.शी.**: : वर्धा जिल्हयातील सहा शाळेतील शिक्षकांना गेल्या सहा महिन्यांपासून वेतन न मिळणे याबाबत सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे, प्रा. बी.टी.देशमुख, श्री.वसंतराव खोटरे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे, प्रा. बी.टी.देशमुख, श्री.वसंतराव खोटरे यांनी "वर्धा जिल्हयातील सहा शाळेतील शिक्षकांना गेल्या सहा महिन्यांपासून वेतन न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्याप्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस: येथे सोबतचे निवेदन छापावे. )

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

29-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) WW-1

SGJ/ D/ KTG/ MMP/ प्रथम श्री. भोगले... 14:40

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, या ठिकाणी अतिशय गंभीर स्वरुपाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. मी दिलेल्या नोटीसमध्ये सहा शाळांची नावे आहेत परंतु वर्धा जिल्हयातील 9 शाळेतील शिक्षकांना गेल्या 3-4 महिन्यांपासून पगार मिळाले नाही. एका शाळेला 12 महिन्यांपासून पगार मिळालेला नाही. हा विषय मी 6.11.2007 च्या डिपीडीसीमध्ये मांडला होता. वर्धा जिल्हयाचे पालक मंत्री त्यांनी शिक्षण अधिका-यांना सूचना केली की, दिवाळी पूर्वी या शिक्षकांचे पगार झाले पाहिजेत. परंतु या ठिकाणच्या शिक्षण अधिका-यांनी ज्या शिक्षकांचा दोष नाही, मुख्याध्यापक किंवा मॅनेजमेंटमध्ये काय वाद असेल तो आपण या ठिकाणी दिलेला आहे. माझअसा प्रश्न आहे की,ज्या शिक्षकांचा, कर्मचा-यांचा अजिबात दोष नाही त्यांना वेतनापासून इतक्या महिन्यांपासून वंचिंत ठेवता हे काही बरोबर नाही. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, आपण एक आठवडयाच्या आत यांचे वेतन देयके मंजूर कराल काय? तसेच ऑक्टोबर महिन्यामध्ये या ठिकाणच्या शिक्षण अधिका-यांनी मान्यता देण्याच्या संदर्भात कॅंप घेतला होता. याकॅंप मध्ये फार मोठया प्रमाणात अनियमितता करुन माया जमविण्यात आलेली आहे अशा प्रकारच्या तक्रारी मला प्राप्त झालेल्या आहेत. या कॅंपमध्ये ज्या मान्यता दिलेल्या आहेत त्या पुन्हा तपासण्यात याव्यात. शिक्षण अधिकारी तर 15-15 दिवस कार्यालयात उपस्थित राहत नाहीत, कोणत्याही निवेदनावर चर्चा करीत नाहीत. म्हणून या शिक्षण अधिका-यांची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल काय तसेच कॅंपमध्ये ज्या मान्यता दिलेल्या आहेत त्या पुन्हा तपासण्यात येतील काय?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, या ठिकाणच्या सहा शाळा तसेच अन्य ज्या शाळा आहेत त्यांना 4 महिने, 5 महिने, 11 महिने रोखने हे बरोबर नाही. म्हणून या शिक्षकांना वेतन देण्याच्या संदर्भात तातडीने दखल घेतली जाईल. दुसरा प्रश्न असा आहे की, विविध प्रकारच्या शिक्षकांना वेठीस धरणे किंवा आलेल्या माहितीच्या आधारे चुकीची किंवा अन्यायकारक कारवाई करणे हे बरोबर नाही.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके..........

मी सभागृहाला आश्वासन देतो की, दीड महिन्यात एका उच्च स्तरीय अधिकाऱ्यामार्फत याची सखोल चौकशी केली जाईल व त्यामध्ये जे दोषी असतील त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल.

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे : सभापती महोदय, शिक्षकांना 11-11 महिने पगार मिळत नाही....

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, हा प्रश्न लवकरात लवकर निकालात काढला जाईल असे मी उत्तरात सांगितले आहे.

---------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अमरावती जिल्ह्यातील गणोरी गावात कपाशीच्या पिकावर पडलेल्या लाल्या रोगामुळे शेतीचे झालेले नुकसान

**मु. शी.** : अमरावती जिल्ह्यातील गणोरी गावात कपाशीच्या पिकावर पडलेल्या लाल्या रोगामुळे शेतीचे झालेले नुकसान याबाबत सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेधे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.राणा जगजितसिंह पाटील ( कृषि मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेधे यांनी "अमरावती जिल्ह्यातील गणोरी गावात कपाशीच्या पिकावर पडलेल्या लाल्या रोगामुळे शेतीचे झालेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, शेतकऱ्यांना काहीतरी अनुदान मिळेल या उद्देशाने आम्ही नियम 93 ची सूचना दिली होती. परंतु निवेदनात अनुदानाचा उल्लेख कोठेही करण्यात आलेला नाही. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, सन 2006-07 व 2007-08 या दोन वर्षात शेतकऱ्यांना किती अनुदान देण्यात आले ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सन 2006-07 मध्ये मौजे गणोरी ता. भातुकली गावात 516 शेतकऱ्यांना 701 हेक्टरच्या अनुषंगाने 10 लाख 53 हजार रुपयांची विशेष आर्थिक मदत करण्यात आलेली आहे. गेल्या वर्षी काही शेतकऱ्यांच्या बाबतीत अडचण निर्माण झाली होती. 40 शेतकऱ्यांनी तहसिलदारांकडे तक्रार केली होती. त्यापैकी 28 शेतकऱ्यांच्या 7/12 उतारावर कापसाची नोंद होती. या 28 शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे ठरविले आहे व त्याप्रमाणे मदत दिली जाईल. या वर्षी शेतीचे 50 टक्केपेक्षा जास्त नुकसान झालेले नाही, त्यामुळे शासनाकडून वेगळी मदत देणे शक्य होणार नाही.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, मागील वर्षी काही शेतकरी अनुदानापासून वंचित राहिले होते त्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी विशेष लक्ष दिले जाईल काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, 28 शेतकऱ्यांना तातडीने मदत दिली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कापूस पिकविणाऱ्या बुलढाणा, अमरावती,अकोला या भागातील पिकांवर लाल्या रोगाचा प्रादूर्भाव मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. त्यामुळे शेती उत्पादनात घट झालेली आहे. 25 टक्के सुध्दा उत्पादन झालेले नाही. तेव्हा या भागातील शेतकऱ्यांना शासन मदत घोषित करणार काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, या संदर्भात चौकशी करण्यात येईल. जर 50 टक्केपेक्षा जास्त नुकसान झाले असेल तर शेतकऱ्यांना निश्चितपणे मदत देण्यात येईल.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, लाल्या रोगाचा प्रादुर्भाव फक्त विदर्भात झाला असे नाही तर खानदेश व मराठवाड्यात सुध्दा झालेला आहे. त्यामुळे शासनास शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्याबाबत विचार करावा लागेल. या रोगामुळे शेती उत्पादनात फार मोठ्या प्रमाणावर घट झालेली आहे. तेव्हा या संदर्भात त्वरेने सर्व्हेक्षण घेऊन शासन शेतकऱ्यांना आर्थिक मदत करणार काय ?

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, उपलब्ध माहितीनुसार तिसऱ्या वेचणीपर्यंत लाल्या रोगाचा प्रादूर्भाव नव्हता. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.अरुण गुजराथी आणि माननीय विरोधी पक्ष नेता यांनी सुचविल्याप्रमाणे सर्व्हे करण्यात येईल. जर 50 टक्केपेक्षा जास्त नुकसान झाले असेल तर शेतकऱ्यांना योग्य ती मदत जरूर दिली जाईल.

---------------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नापिकी क्षेत्रातील शेतकऱ्यांना पिवळी रेशनकार्ड देण्याबाबत

**मु. शी.** : नापिकी क्षेत्रातील शेतकऱ्यांना पिवळी रेशनकार्ड देणे याबाबत श्री जयंत पाटील, प्रा.शरद पाटील व श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सुनील तटकेर ( अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र.पाटील, प्रा.शरद पाटील व श्री.कपिल पाटील यांनी "नापिकी क्षेत्रातील शेतकऱ्यांना पिवळी रेशनकार्ड देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...6. ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, अलिबाग तालुक्यात 12779 लाभार्थ्यांना पिवळ्या शिधापत्रिकांचे वाटप झालेले आहे त्याचे निकष कसे लावण्यात आले ? मागील दहा वर्षापासून अलिबाग भागात समुद्राचे खारे पाणी शिरून जमिनीचा पोत नष्ट झालेला आहे. त्यामुळे शेती नापिकी झालेली आहे. शेतकऱ्यांना एकवेळचे जेवणसुध्दा मिळत नाही. तेव्हा मानवतेच्या दृष्टीकोनातून 2061 शेतकऱ्यांना पिवळी रेशनकार्ड देण्यात येतील का ?

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, दारिद्रय रेषेखालील लोकांसाठी 15 हजार रुपयांची कमाल मर्यादा आहे. त्याआधारे त्यांचा समावेश त्यामध्ये होतो. लक्ष्य निर्धारित अन्नधान्य वितरण व्यवस्था झाल्यानंतर आपल्या राज्यास 64 लाखांचा इष्टांक देण्यात आलेला आहे. या योजनेंतर्गत आपण जवळपास 74 लाख लाभार्थ्यांना फायदा देत असतो. सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी सांगिल्याप्रमाणे, नापिकीमुळे ज्यांचे नुकसान झाले, त्यांच्याबाबतीत केवळ अपवादात्मक परिस्थितीमध्ये एक खास बाब म्हणून 159 कुटुंबाना कार्डे देण्यात येतील.

-----

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, मी परवा नियम 93 अन्वये सूचना दिली होती व ती मान्यही झालेली आहे. सभापती महोदय, कदाचित एक-दोन दिवसांमध्ये अधिवेशन संपले तर चिखलदऱ्यासारख्या आदिवासी भागामधील शाळेच्या बांधकामासाठी परवानगी नाकारण्यात आलेली आहे. त्यामुळे त्याबाबतीतील निवेदन लवकर चर्चेस आले पाहिजे.

**उपसभापती** : यासंदर्भातील निवेदन शासनाने लवकर सादर करावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, गृहनिर्माण विभागासंदर्भातील अतिशय महत्वाचा विषय मला मांडावयाचा आहे. मुंबईतील एसआरए स्कीमच्या माध्यमातून म्हाडाच्या जागेवर लोकांनी सोसायटया उभ्या केल्या, त्यासंदर्भात काल अचानक म्हाडाचे व्हीपी व त्याच एसआरएचे सीईओ व श्री.गुरुदास कामत साहेबांच्या आवडत्या श्री.चंद्रशेखर साहेबांनी म्हाडाच्या जमिनीवरील ज्या काही 239 सोसायडया आहेत, त्या एसआरए डेव्हल्प करणार नाही तर त्या आता म्हाडा डेव्हल्प करणार अशाप्रकारचे एक पत्रक काढलेले आहे. सभापती महोदय, सध्या अधिवेशन चालू असून हा धोरणात्मक निर्णय आहे. आज अशाप्रकारे अधिकारी परस्पर निर्णय घेत आहेत, हे योग्य नाही. कायद्याने त्यांना हे करता येणार नाही, याची मला कल्पना आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, ज्यांना एलवाय मिळाली नाही. परंतु त्या आधी स्कीम सबमिट करणे, त्यानंतर हेअरिंग पूर्ण करणे असे असताना सीसीएनएलआयसाठी हे थांबले आहे. या लोकांनी हे सर्व पूर्ण केलेले असून हे त्यांच्याकडेच पेंडींग आहे, त्यांच्या अधिकाऱ्यांनी मुद्दामहून हे दिलेले नाही. माननीय चंद्रशेखर साहेब, दोन्ही ठिकाणी असल्यामुळे त्यांनी अशाप्रकारचे पत्रक काढले व नंतर दुसऱ्या दिवशी एसआरएचे पत्रक काढले, ती दोन्ही पत्रकं माझ्याकडे आहेत. यामध्ये 33 (10) चा जो स्लम रुल आहे, त्याप्रमाणे कोर्टात गेल्यानंतर हे करताच येणार नाही. परंतु मधल्या काळात यातून अधिकाऱ्यांचा लक्ष्मीदर्शनचा उद्देश आहे. सभापती महोदय, अजून गृहनिर्माण धोरण फिक्स झालेले नाही. असे असताना अशाप्रकारची पत्रक काढणे योग्य नाही. त्या माध्यमातून काही हजार कोटी रुपयांचे प्रकल्प होणार आहेत. मग, अशाप्रकारे कोणी तरी चंद्रशेखर येऊन त्यांची अशाप्रकारची मनमानी चालली आहे का ? याबाबतीत शासनाचे काही धोरण ठरले आहे का ? अधिवेशन सुरु असताना जर अशाप्रकारे अधिकारी धोरणात्मक निर्णय घेऊन जर अशाप्रकारची पत्रक काढत असतील तर हा आपला अवमान आहे, असे मला वाटते. त्यामुळे याबाबतीत आपण शासनास त्वरित निवेदन करण्यास सांगावे, अशी माझी आपल्यामार्फत शासनास विनंती आहे. (..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी उपस्थित केलेल्या मुद्दासंबंधी शासनाने आज सायंकाळपर्यंत निवेदन करावे.

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, होय.

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.रोझेकर....

**दिवसाच्या कामकाजाच्या क्रमाबाबत**

**उपसभापती** : माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीसाठी जायचे असल्यामुळे कार्यक्रम पत्रिकेत क्रमांक तीनवर दाखविलेली लक्षवेधी सूचना अगोदर घ्यावी, अशी विनंती त्यांनी केली आहे. त्यांची विनंती मी मान्य करतो. प्रथम तिस-या क्रमांकाच्या लक्षवेधी सूचनेवर चर्चा होईल.

----------------

....2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अनियंत्रित वाहतुकीमुळे वर्धा शहरात होणारे अपघात

**मु.शी.**: अनियंत्रित वाहतुकीमुळे वर्धा शहरात होणारे अपघात या संबंधी श्री व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.वसंतराव खोटरे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"वर्धा जिल्ह्यात अनियंत्रित वाहतूक, ट्राफिक पोलिसांची अकार्यक्षमता व आर.टी.ओ विभागाकडून वसुलीला दिले जाणारे महत्व या कारणाने नोव्हेंबर, 2007 मध्ये झालेल्या अनेक अपघातात 5 निरपराधांचा मृत्यू व 10 ते 12 जण जखमी झाले असणे, नागपूर यवतमाळ बायपास मार्गाचे लोकार्पण झाले असतांना वर्धा शहराच्या मध्यभागातून जड वाहनांची वाहतूक सुरु असल्यामुळे वाहतूकीची कोंडी झाल्याने अपघात घडले असणे, शहरातील बजाज चौक, शिवाजी पुतळा चौक, आर्वी नाका व भीम नगर परिसर अपघाताचे स्थळ बनले असणे, दिवाळीच्या मोसमातील अवघ्या सहा दिवसात पाच बळी व 10 ते 12 जण जखमी झाले असणे, जिल्ह्यातील अनधिकृत वाहतूकीवर नियंत्रण नसणे, वाहन चालक, ट्राफिक पोलिस विभाग व आर.टी.ओ कार्यालय यांचे कडून वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन केल्या जात असणे, या अनुशंगाने जिल्ह्यातील व प्रामुख्याने वर्धा शहरातील जनतेत पसरलेली भिती व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई."

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

-------------

....3..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, वर्धा शहर आणि जिल्हयातील वाहतुकीवर कोणतेही नियंत्रण नाही, अशी परिस्थिती आहे. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, "वर्ध्यात नोव्हेंबर 2007 मध्ये 4 अपघात झाले असून त्यात 5 जणांचा मृत्यू झाला आहे व इतर दोन अपघातात 3 व्यक्ती जखमी झाल्या आहेत." मी अशी माहिती देऊ इच्छितो की, वर्धा शहरात सिग्नल्स बसविण्यात आले असून त्यावर नगरपालिकेने साडेसहा लाख रुपये खर्च केले आहेत. परंतु, हे सिग्नल्स अद्याप सुरु झालेले नाहीत. हे सिग्नल्स ताबडतोबीने सुरु करणार काय ?

सभापती महोदय, आरवी नाका येथे गुंड प्रवृत्तीच्या लोकांची वर्दळ असते. या ठिकाणी पोलीस चौकीची अत्यंत आवश्यकता आहे. मागील अधिवेशनात गृह विभागाने पोलीस चौकी स्थापन करण्याचे मान्य केले होते. सध्या पोलीस त्या ठिकाणी टपरीमध्ये खुर्च्या टाकून बसतात. तरी त्या ठिकाणी पोलीस चौकशी स्थापन करणार काय ?

सभापती महोदय, वर्धा शहराबाहेरुन बायपास रस्ता तयार करण्यात आला असला तरी अजूनही जड वाहनांची वाहतूक शहरामधून होते व शहराच्या वाहतुकीवर त्याचा प्रचंड ताण पडतो. त्यामुळे जड वाहनांची वाहतूक बायपास रस्त्यावरुनच करण्याबाबत व शहरात वाहने येणार नाहीत अशाप्रकारचे सक्त आदेश संबंधितांना देण्यात येतील काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी तीन प्रश्न विचारले आहेत. बायपास रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. यापुढे जड वाहने शहरात येणार नाहीत, अशाप्रकारची सक्त ताकीद देण्यात येईल.

सभापती महोदय, आरवी नाका येथे पोलीस चौकी स्थापन करावी, अशी सूचना सन्माननीय सदस्यांनी केली आहे. गेल्यावर्षी 78 व यावर्षी 129 याप्रमाणे गेल्या दोन वर्षात 207 पोलीस कॉन्स्टेबल वर्धा जिल्हयाला मंजूर करण्यात आले आहेत. वर्धा जिल्हयासाठी वाहतूक शाखेला मान्यता नव्हती. आता ती देण्यात आली आहे. वाहतूक शाखा मिळाली असल्यामुळे तसेच बायपास रस्ता पूर्ण झाला असल्यामुळे वर्धा शहरातील अपघात निश्चितपणे कमी होतील.

नगरपालिकेतर्फे लावण्यात आलेले सिग्नल्स बंद असल्याची तक्रार सन्माननीय सदस्यांनी केली आहे. याबाबत चौकशी करण्यात येईल, आवश्यकता असेल तर नगरपालिकेला मदत केली जाईल व सिग्नल्स चालू करणे, ते वाढविणे यास प्राधान्य देण्यात येईल.

-----------------

..4....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई एअरपोर्ट ॲथॉरिटीच्या जमिनीवरील झोपडयांचे पुनर्वसन करणे

**मु.शी.**: मुंबई एअरपोर्ट ॲथॉरिटीच्या जमिनीवरील झोपडयांचे पुनर्वसन करणे या संबंधी सर्वश्री विनोद तावडे, मधुकर चव्हाण, संजय केळकर, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई विमानतळालगतच्या एअरपोर्ट ॲथॉरिटीच्या जमिनीवरील झोपडयांचे पुनर्वसन करतांना मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा.लि.या कंपनीने नुकत्याच निविदा जाहिर करणे, माननीय मुख्यमंत्री यांच्या दालनात घेण्यात आलेल्या लोकप्रतिनिधींच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार एम.एम.आर.डी.ओ.मार्फत सर्वेक्षण करुन पुनर्वसनाचा आराखडा लोकप्रतिनिधीसमोर मांडून नंतर झोपडपट्टीवासीयांच्या स्थलांतराबाबत निर्णय घेण्याचे ठरणे, एअरपोर्ट ॲथॉरिटी संघर्ष समितीने केलेल्या मागणीनुसार सदर झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन लगतच्याच परिसरात करण्याची स्थानिक नागरिकांची मागणी, एअरपोर्ट जवळच्या चांदिवली मरोळ येथील महाराष्ट्र शासनाच्या जमिनी कलिना येथील मुंबई विद्यापीठाची जमीन या प्रकल्पबाधितांना देण्याची आवश्यकता, शासनाने पुनर्वसन धोरणाचे एम.एम.आर.डी.ए.मार्फत पुनर्विलोकन करुन नवीन सर्वेक्षण करण्याच्या दिलेल्या आश्वासनानुसार कार्यवाही न केल्यामुळे झोपडपट्टीवासियांमध्ये निर्माण झालेला असंतोष, संघर्ष समितीने दिलेला आंदोलनाचा इशारा व यावर शासनाची कार्यवाही तसेच भूमिका."

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

------------

....5..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मुंबईतील विमानतळाच्या बाजुला राहणारे हजारो लोक आपली घरे मुंबईच्या व देशाच्या विकासासाठी देणार आहेत. या पार्श्वभूमीवर मला सन्माननीय मंत्री महोदयांना दोन प्रश्न विचारावयाचे आहेत. मागच्या पावसाळी अधिवेशनाच्या वेळी केंद्रीय हवाई उड्डाण मंत्री श्री.प्रफुल्ल पटेल व राज्याचे मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत बैठक झाली होती. त्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, त्या ठिकाणी राहणा-या लोकांचे सर्वेक्षण केले जाईल. सर्वेक्षण झाल्यानंतर लोकप्रतिनिधींसमोर अहवाल ठेवण्यात येईल. हे आश्वासन कधी पूर्ण होणार आहे ? सर्वेक्षणाचे काम एमएमआरडीए ने पूर्ण केले आहे का ? यापूर्वी ज्या झोपडया तोडण्यात आल्या त्या जागांवर विशेषत: कुर्ला परिसरात पुन्हा झोपडया उभारुन पुनर्वसनातील घरे मिळविण्याचा प्रयत्न होत आहे. पक्षाच्या कार्यकर्त्यांना घरे विकत देण्याचा प्रयत्न असतो. त्यामुळे ज्यांना खरोखर घरांची आवश्यकता आहे त्यांच्यावर अन्याय होत आहे. हे सर्व प्रकार थांबविण्यासाठी कोणते कडक उपाय योजले जातील ?

सभापती महोदय, मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट कंपनीने एच.बी.आय.कंपनीला काम दिले आहे. शासनाच्या नियमाप्रमाणे झोपडया विकत घेतात, टीडीआर घेतला जातो आणि बांधकाम करावे लागत नाही म्हणून ज्या झोपडया विकासकांनी विकत घेतल्या त्या पीएपी म्हणून एमएमआरडी ताब्यात घेईल काय ? कारण त्या जागा रिकाम्या ठेवल्या तर बांधकामाचा पैसा वाचेल आणि टीडीआर घेतील, असे होऊ नये.

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे .........

त्या भागात इतर प्रकल्प होत आहेत. आपल्याला तेथील जागा पी.ए.पी.साठी वापरता येतील. म्हणून पी.ए.पी. साठी एम.एम.आर.डी.ए. जागा ताब्यात घेईल काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी तीन प्रश्न विचारले. मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट ही कंपनी स्थापन करण्यात आलेली आहे. या ठिकाणी एम.एम.आर.डी.ए. ला नोडल एजन्सी म्हणून नेमलेले आहे. एम.आय.एल. चा उद्देश आणि रोल असा आहे की, त्यांनी अक्शन प्लॅन तयार करावयाचा आहे. जमीन कोठे घेणार आणि बांधणार या सर्व गोष्टींचा ॲक्शन प्लॅन मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट कंपनी ठरविणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी पहिला प्रश्न सर्वेक्षणाबाबत विचारलेला आहे. सर्वेक्षण करण्यासाठी एम.एम.आर.डी.ए. ला नेमलेले आहे. एम.एम.आर.डी.ए. कंपनी नेमून सर्वेक्षणाचे काम लवकरात लवकर सुरु करणार आहे.

दुसरा प्रश्न झोपडपट्टया बांधण्यासाठी प्रतिबंध करण्याबाबत विचारलेला आहे. आता ही सर्व जमीन एम.आय.एल. ची झालेली आहे, एका लिमिटेड कंपनीची झालेली आहे त्यांना याबाबत सूचना करण्यात येईल. एम.एम.आर.डी.ए. नोडल एजन्सी म्हणून दक्षता घेईल की, या ठिकाणी झ ाोपडपट्टी वाढू नये.

तिसरा प्रश्न विचारण्यात आला की, एम.एम.आर.डी.ए., पी.ए.पी. साठी ज्या सदनिका होतील त्या ताब्यात घेईल काय ? तर नोडल एजन्सी म्हणून एम.एम.आर.डी.ए. च्या माध्यमातून पी.ए.पी. ताब्यात घेण्याच्या दृष्टीकोनातून कारवाई केली जाईल.

ॲड.अनिल परब : सभापती माहोदय, या भागामध्ये पुरातन काळापासून चर्च आहेत. ती प्रार्थनास्थळ हलविण्याची काही आवश्यकता नाही. याबाबत शासनाचे धोरण काय असेल ? त्या भागामध्ये पूर्वी पासून ख्रिश्चन लोक राहत होते. त्या भागातील लोक संवेदनशील होऊन काल तेथे भांडणे झाली. फार वर्षापूर्वीच्या ज्यांच्या जास्त जागा आहेत अशा लोकांना शासन मार्केट रेटने पैसे देणार काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी चर्चचा प्रश्न उपस्थित केला. सोशल इकोनॉमिक सर्वे स्वतंत्र एजन्सीमार्फत करण्यात येईल. मुंबईमध्ये आज अनेक ठिकाणी पुनर्वसनाचे काम सुरु आहे. त्या ठिकाणी चर्च, मंदिर, मस्जिद असतील या सर्व गोष्टीसंदर्भात एकत्र बसून कोणाच्याही धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत याची काळजी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे ..........

घेऊन पुनर्वसन केले जाते. त्याच अनुषंगाने पुनर्वसन केले जाईल. सभापती महोदय, कायद्याप्रमाणे आपण 1995 पूर्वीच्या झोपडपट्टयांना संरक्षण दिलेले आहे. त्या अनुषंगानेच आपण पुनर्वसनाचा निर्णय घेत असतो. यासंदर्भात शासनाचे जे नियम आणि धोरण आहे त्या धोरणानुसार निर्णय घेतला जाईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, चर्च तोडण्याबाबत शासनाने नोटीसेस दिलेल्या आहेत. जर आपण निर्णय घेणार असाल तर त्याला त्वरित स्थगिती देणार काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, खाजगी जमिनीवर झोपडया आहेत त्या 1995 पूर्वीच्या आहेत त्यांना आपण संरक्षण देणार काय ?

श्री.राजेश टोपे : सभपती महोदय, मी आताच सांगितले की, एम.एम.आर.डी.ए.ने सर्वेक्षणाचे काम सुरु केलेले आहे. नोटीस जरी दिली असली तरी आधी सर्वेक्षणाचे काम पूर्ण केले जाईल आणि त्यानंतरच याबाबतचा निर्णय घेतला जाईल.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सर्वेक्षण कोण करणार आहे ? जागतिक बँकेच्या गाईड लाईन्स प्रमाणे सर्वेक्षण करतांना उपलब्ध असलेले स्ट्रक्चर मग काल परवा जरी कोणी झ ोपडी बांधली तर ती सुध्दा त्यामध्ये येईल. म्हणून आपण त्याची गंभीर दखल घेऊन 1995 पूर्वीच्या झोपडयांनाच पुनर्वसन लागू करु अशा प्रकारची सक्त ताकीद सर्वेक्षण करणा-यांना द्याल काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सर्वेक्षण करण्यासाठी एम.एम.आर.डी.ए. जरी नोडल एजन्सी असली तरी एम.एम.आर.डी.ए.च्या वतीने सुध्दा जाहीरात देऊन एखादी सक्षम एन.जी.ओ. ज्याला या सर्व रिसेटलमेंट आणि रिहॅबिटेशनचा अनुभव आहे अशा प्रकारची एजन्सी सर्वेक्षणासाठी नेमण्यात येणार आहे. मी सुरुवातीलाच सांगितले की, शासनाचे जे धोरण आहे त्या धोरणाप्रमाणे पुनर्वसन केले जाते.

यानंतर कु.जयश्री........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ MMP/ प्रथम श्री.गागरे......... 15:05

श्री.राजेश टोपे.....

आज सभापती महोदय,सन 2000 च्या अगोदर जेवढे स्ट्रक्चर्स असतील त्यांना प्रोटेक्ट केले जाणार आहे. सन 2000 नंतरच्या झोपडया उठविण्यात येणार आहेत. त्यामुळे जे काही एम.यु.टी.पी मध्ये कधीचीही झोपडी असली तरीसुध्दा शासन त्यांना सिक्योर करते, अशा पध्दतीचे धोरण निश्चितपणे नाही.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय मंत्रिमहोदयांनी चर्चच्या बाबतीत जे उत्तर दिलेले आहे त्यासंबंधात बोलावयाचे झाले तर एअरपोर्टच्या जमिनीवरती जे अतिक्रमण आहे, ती जमीन एम.आय.एल.या कंपनीने विकत घेतलेली आहे,असे सांगण्यात आले, ते आपण समजू शकतो. परंतु हे चर्च गावठाणाच्या जमिनीवर आहे, यासंदर्भात सिटी सर्व्हेची ज्यावेळी ॲक्विजिशनची सर्वेसाठी नोटीस आली, त्यावेळी जनसामान्यांमध्ये अशी घबराटी होती की, चर्चची जमीन गावठाणची आहे की एअरपोर्टची आहे याचा सर्वे चालला असेल, परंतु जी नोटीस दिलेली आहे, ती एविक्शनच्या अंडर असल्यामुळे गावठाणावर जर चर्च असेल आणि ती जमीन एअरपोर्टसाठी जर त्यांना हवी असेल तर यासंदर्भात शासन काय भूमिका घेईल ? यासंदर्भात जनतेला संभ्रम आहे. ज्याप्रमाणे मिहानची प्रायव्हेट जमीन ताब्यात घेऊन त्यांना रेडी रेकनरप्रमाणे मोबदले दिले. त्याचप्रमाणे शासन यासंदर्भात कोणती भूमिका घेणार आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, चर्चच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना या ठिकाणी व्यक्त केलेल्या आहेत. यासंदर्भात मी स्वत: जातीने लक्ष घालून माझ्या दालनात बैठक घेऊन उचित तोडगा काढण्याचा प्रयत्न करीन.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देतांना सन 2000 पर्यंतच्या झोपडयांना संरक्षण दिले जाईल, असे एक निवेदन केलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, तशा प्रकारचा कायदा या सदनामध्ये पास झालेला आहे का ? हा निर्णय ज्यावेळी शासनाने घेतला त्यावेळी शासनाने यासंदर्भात कोणता कायदा बनविलेला आहे का ? ज्या एन.जी.ओं.कडे आपण हे काम देणार आहात, त्या एन.जी.ओ.चे नाव स्पार्क नाही ना ? कारण स्पार्क नावाची एन.जी.ओ.सर्वेक्षण करते आणि बोगस झोपडया पाडावयाला लावून त्यांना

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार......

अधिकृतपणे शासनाच्या योजनेतून घरे पुरविते. अशाप्रकारच्या एन.जी.ओं.ची नेमणूक करुन आपण महाराष्ट्रातील जनतेची फसवणूक करीत आहात. हा प्रश्न गंभीर आहे,याची आपल्यालाल जाणीव आहे का ?

श्री.राजेश टोपे : या ठिकाणी एअरपोर्ट ऑथॉरिटी आणि ही जी प्रायव्हेट एम.आय.एल. नावाची कंपनी आहे, यांच्यामध्ये शेअर होल्डिंग आहे. शेवटी ही सगळी जमीन एम.आय.एल.या कंपनीकडे ट्रान्सफर झालेली आहे. यामुळे आज पुनर्वसनाच्या दृष्टीकोनातून जे ॲग्रीमेंट शासन आणि या कंपनीमध्ये झालेले आहे या ॲग्रीमेंटच्या माध्यमातून सन 2000 पासूनच्या सर्व झोपडयांना संरक्षण देण्याचा निर्णय झालेला आहे. हे जरुर आहे की, सन 1995 पर्यंतच्या झोपडया संरक्षित करण्याबाबतचा कायदा आहे आणि सन 2000 पर्यंतच्या झोपडया संरक्षित करण्याबाबतचे मॅटर अद्यापि सबज्युडाईज्ड आहे. स्पार्क नावाची संस्था आतापर्यंत काम करीत असेल, परंतु मी माझ्या पूर्वीच्या प्रश्नाचे उत्तर देतांना सांगितले की, जाहिराती देऊन एन.जी.ओ.ची जी नेमणूक केली जाणार आहे. ती स्पार्क या संस्थेचीच केली जाईल असे नाही. हे काम एम.एम.आर.डी.ए.च्या माध्यमातून केले जाणार आहे. यासंदर्भातील योग्य ती कारवाई शासनातर्फे निश्चितपणाने केली जाईल.

श्री.विनोद तावडे : केंद्रीय हवाई उड्डाण मंत्री, श्री.प्रफुल पटेल आणि माननीय मुख्यमंत्री यांची यासंदर्भात एक बैठक झाली होती, त्यामध्ये एम ॲण्ड एम आणि स्पार्क या एन.जी.ओ.ना हे काम दिले जाणार नाही, या संस्थांविरुध्द तक्रारी मांडल्यानंतर हे स्पेसिफिक आश्वासन देण्यात आलेले आहे.

श्री.राजेश टोपे : ठीक आहे.

**उपसभापती** : ही लक्षवेधी संपलेली आहे.

...3



JPK/ MMP/ प्रथम श्री.गागरे......... 15:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनबाबत.</u>**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,एक पॉईंट ऑफ इन्फॉरमेंशनचा मुद्दा आहे. एका घटनेबाबत मी सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की, अंजनगाव सुर्जी नगरपालिकेतील महिला गटनेत्या श्रीमती मंजुषा प्रफुल लोळे यांनी गेल्या चार दिवसांपासून आमरण उपोषण सुरु केलेले आहे.

यानंतर श्री.गागरे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MMP/ MAP/ पूर्वी कु.खर्चे 15:10

श्री.पांडुरंग फुंडकर .....

नगरपालिकेतील प्रशासनाच्या गैरकारभार, भ्रष्टाचारबद्दलच्या निवेदनामध्ये 15 मागण्या केलेल्या आहेत. 15 प्रकारची बेकायदेशीर कृते या नगरपालिकेमध्ये झालेली आहे. त्याची कोणी दखल घेण्यास तयार नाही. 4 दिवसापासून तिकडे कोणी अधिकारी गेलेला नाही. नगरविकास राज्यमंत्री श्री.राजेश टोपे सभागृहात उपस्थित आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, ही महिला चार दिवसापासून आमरण उपोषणास बसली आहे. याची दखल घेण्यासाठी एस.डी.ओ. लेवलचा अधिकारीही जाऊन तिला भेटत नाही. सभापती महोदयांनी याची दखल घ्यावी व जिल्हाधिकारी किंवा संबंधित अधिकाऱ्यांनी तेथे जाऊन त्या महिलेची भेट घेतली पाहिजे व तिचे उपोषण सोडविले पाहिजे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी एक माहिती दिलेली आहे. याबाबत मी अमरावती येथील जिल्हाधिकाऱ्यांना सांगेल की, एस.डी.ओ. किंवा तहसिलदार यांना तेथे पाठवून त्या महिलेने ज्या बाबी निदर्शनास आणून दिलेल्या आहेत, त्याची चौकशी करण्यात येईल व अनुषंगाने कारवाई करण्यात येईल.

-----





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : यानंतर लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. पहिली लक्षवेधी माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी आणि इतर सदस्यांनी दिलेली आहे. परंतु मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, पीठासीन अधिकारी कधी कधी परिस्थिीप्रमाणे मंत्री महोदयांना सवलत देतात, ती गैर आहे असे मी म्हणणार नाही. त्यावेळी तत्कालीन आदेश किंवा संदर्भ असतात. काल परवापासून सरकारचा एक हट्ट चालू आहे की, येथे कोणताही मंत्री उपस्थित असेल किंवा नसेल येथे कायद्याप्रमाणे जो मंत्री उपस्थित असेल तो बोलेल. यावर माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी रितसर तरतूद, कायदे, प्रथा व परंपरा असे सर्व काही सांगितले आहे. तरीसुध्दा सरकारचा हट्ट कायम राहिला आहे असे दिसत आहे. पीठासीन अधिकाऱ्यांनी अगोदर सांगितले आहे की, सभागृहामध्ये संबंधित मंत्रीच हवा असे नाही तर दुसरा कोणीही मंत्री उत्तर देऊ शकतो. त्याचा परिणाम असा झालेला आहे की, आपण त्यांना संवेदनशील सवलत देत आहात. मंत्री महोदय कोठे अडकले असतील, काही कामात असतील किंवा खालच्या सभागृहात असतील याचा गैरफायदा घेऊन अधिवेशन गुंडाळले जात आहे. आम्ही येथे असलो काय नसलो काय, या सरकारला आता कशाचेही गांभीर्य उरलेले नाही. जनतेचे किंवा प्रश्नांचे गांर्भीय नाही येथपर्यत ठीक होते परंतु आता सभागृहाचेही गांभीर्य नसणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. हे सभागृह कशाकरिता चालवायचे हा प्रश्न निर्माण झालेला आहे, ही दुर्देवी बाब आहे. श्री.अरुणभाई गुजराथी हे जेष्ठ सदस्य असून खालच्या सभागृहाचे माजी अध्यक्ष व माजी मंत्री आहेत. ते आपली लक्षवेधी मांडण्यासाठी उभे राहिले असता संबंधित मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत._शासनाची इतकी दुर्दैवी अवस्था झालेली आहे की, मंत्र्यांना आता काही देणे घेणे राहिलेले नाही. त्यांना वाटते की, आम्हाला कोणी काढू शकत नाही, आम्हाला कोणी हलवू शकत नाही. कोर्टात आरोप झाले, भ्रष्टाचार सिध्द झाला तरी ते आहे त्याच जागेवर आहोत अशी मग्रुरीची परिस्थिती निर्माण झालेली आहे. ते कोणाला विचारीत नाही. संसदीय कार्यमंत्री पूर्वी चिडत नव्हते, हल्ली ते या सभागृहात येऊन चिडतात. ही अत्यंत दुर्दैवी व गंभीर बाब आहे. मागील वेळी मंत्री नसल्यामुळे सभागृह किती वेळा बंद पडले हे वाचण्याची पाळी

.....3



PNG/ SBT/ MMP/ MAP/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

या सदनावर आली होती. या प्रवृत्तीच्या विरोधात सभागृहाचा अवमान व निषेध म्हणून माननीय सभापती महोदयांनी तातडीने किमान 10 मिनिटांकरिता सभागृह तहकूब करावे म्हणजे सरकारला किमान जाणीव तरी होईल व 2-3 दिवस तरी कारभार योग्य प्रकारे चालेल, अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.45 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 3.14 ते 3.45 मध्यंतर )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेस प्रारंभ करण्यापूर्वी मला आपणास विचारावयाचे आहे की, या अधिवेशनामध्ये आम्हाला न्याय मिळणार आहे काय ?

उपसभापती : आपल्याला न्याय मिळणार आहे.

**लक्षवेधी सूचना क्रमांक 1 बाबत**

**उपसभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांचे आता पत्र प्राप्त झालेले आहे. त्यामुळे मी लक्षवेधी सूचना क्र. 1 पुढे ढकलीत आहे. आता लक्षवेधी सूचना क्रमांक 2 चर्चेला घेण्यात येईल.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अकोला जिल्हयातील सौ शकुंतला कोठारी यांची भूसंपादन केलेली जमीन त्यांना त्वरित परत करणे

**मु शी.** : अकोला जिल्हयातील सौ शकुंतला कोठारी यांची भूसंपादन केलेली जमीन त्यांना त्वरित परत करण्या यासंबंधी सर्वश्री गोपिकिसन बाजोरिया, दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री अनिल परब, सुरेश जेथलिया, डॉ.निलम गो-हे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. गोपीकिशन बाजोरीया ( अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था ) : अध्यक्ष महाराज, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अकोला जिल्ह्यातील मलकापूर येथील सौ.शकुंतला कोठारी यांच्या मालकीची सर्वे नं.24/2 मधील 20 एकर 28 गुंठे जमीन शासनाने भूसंपादनाच्या नावाखाली संपादन करणे, त्यापैकी शासनाने न वापरलेली 4245 चौ.मी. जमीन परत मिळविण्याकरिता शासनाचे निर्देशाप्रमाणे सर्व पूर्तता जमीन मालकाने केल्यावर तसेच जमिनीचे म्हाडास व्याजासह 1476644.76 रुपये परत केल्यानंतरही आजतागायत शासनाकडून जमीन परत न करणे, सदर जमीन प्रकरणी श्रीमती शकुंतला कोठारी यांनी अकोला येथील दिवाणी न्यायालयात शासनाच्या विरोधी दाखल केलेली याचिका, त्यानंतर दिनांक 20-1-1990 रोजी शासनाने जमीन मालकाला अतिरिक्त जमीन परत देण्याचा घेतलेला निर्णय, परंतु त्या अनुषंगाने विधी व न्याय विभागाचा अभिप्राय मागविण्याचा घेतलेला निर्णय, विधी व न्याय विभागाचा अभिप्राय आला असून तो श्रीमती कोठारी यांना न्याय देणारा असूनही त्यांना जागा परत करण्यात आलेली नसणे, परिणामी त्यांच्यामध्ये पसरलेला असंतोष व संतापाची लाट, या गंभीर प्रकरणी शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, जमीन मालकास जमीन त्वरित परत करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची कार्यवाही तसेच भूमिका."

..3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर ( गृहनिर्माण, राज्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या आहेत. त्यात मी आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाच्या पान क्रमांक 2 वर "आरसीसी ऐवजी आरआरसी" वाचावे व 11.18.19 ऐवजी 15.11.99 वाचावे. मी सुधारल्याप्रमाणे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, या लक्षवेधीच्या निवेदनामध्ये दिलेले उत्तर पूर्णपणे असत्य व दिशाभूल करणारे आहे. ही लक्षवेधी सूचना सभागृहामध्ये तिसऱ्यांदा येत आहे 2006 च्या अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले होते की, एका महिन्यात यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल. उत्तरामध्ये याबाबत सुप्रिम कोर्ट व हायकोर्ट संदर्भातील दोन वेगवेगळी उदाहरणे दिलेली आहेत.या दोन्ही प्रकरणांचा विषय वेगळा आहे. एक विषय हा भूसंपादनाचा आहे तर दुसरा विषय रिस्टोरेशन ऑफ लॅडचा आहे. परंतु उत्तरामध्ये हे दोन्ही विषय संलग्न करुन दिशाभूल करणारे उत्तर देण्यात आले आहे. त्यामुळे श्रीमती कोठारी यांना जमीन परत करावी लागेल असा बोध होणारे उत्तर यामध्ये देण्यात आलेले आहे. अकोला येथील श्रीमती शकुंतला कोठारी सर्व्हे नंबर24/2 मौजा मलकापूर येथील 20 एकर 10 गुंठे जमीन संपादित करण्यात आली होती. तसेच त्यांना 1,11,000 रुपये बक्षिस म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्या महिलेने दिवाणी न्यायालयामध्ये दावा केल्यानंतर त्यांना 4 लाख 90 हजार रुपये देण्यात यावे असा निकाल न्यायालयाने दिला. म्हाडाने देखील हायकोर्टमध्ये केस दाखल केली परंतु कोर्टाने त्यांची केस रिजेक्ट केली. श्रीमती कोठारी यांनी रिट पिटिशन सुप्रिम कोर्टामध्ये दाखल केले. मध्यंतरी दुसरे रिट पिटिशन असे दाखल केले की, 4हजार स्के.मी. न वापरलेली जमीन आहे ती परत करावी . हे दोन्ही वेगळे प्रकरण वेगळया कोर्टामध्ये दाखल असताना शासनाने 18.190 रोजी असा निर्णय घेतला की,दिनांक 15.8.89 रोजी विषयासंबंधी पाठविलेल्या विषयास अनुसरुन असे कळविण्यात येत आहे की, आपला सर्व्हे नं. 24/2 मौजे मलकापूर, जि. अकोला येथील जमिनीपैकी ज्या जमिनीवर प्रशासकीय इमारत व सिमेंट गोडाऊन बांधण्याचा प्रस्ताव आहे, त्यापैकी 3640 चौ.मी. अशी एकूण सुमारे 4245 चौ.मी. जमीन काही अटींवर भूसंपादनातून सोडून देण्याचा तत्वत: निर्णय दि. 18.1.1990 च्या पत्रान्वये घेतला आहे. यासंदर्भात तीन अटी घालण्यात आलेल्या आहे. पहिली अट अशी आहे की, प्रस्तुत प्रकरणी सर्व न्यायालयाविरुध्द, शासनाविरुध्द दाखल केलेल्या सर्व केसेस परत काढून घ्याव्यात. दुसरी अट अशी होती की, आपण न्यायालयातून घेतलेले 5 लाख 70 हजार रुपये महामंडळाकडे व्याजासह तातडीने भरावे. ही सर्व रक्कम श्रीमती कोठारी यांनी भरली आहे.

यानंतर श्री. सरफरे....

अध्यक्षीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. बाजोरिया...

त्यामध्ये म्हाडाने ठराव क्र. 144 नुसार दि.28.10.96 ला निर्णय घेतला. म्हाडाने घेतलेल्या निर्णयानुसार या जागेच्या कागदपत्रांची पूर्तता श्रीमती कोठारी यांनी केली असल्यामुळे शासनाने ही जमीन तात्काळ त्यांना परत केली पाहिजे. याबाबत त्यांनी माननीय गृहनिर्माण मंत्र्यांकडे विनंती केली होती. त्यानंतर म्हाडाने दुसरा ठराव 9/97 मध्ये केला. त्यामध्ये त्यांनी म्हटले की, मोबदला प्रकरणातील रु. 5 लाख 76 हजार 748 ही रक्कम प्रथमत: जमीन मालकाने विनाविलंब मंडळाला परत करावी. त्याप्रमाणे ही रक्कम परत करण्यात आली. त्याचप्रमाणे उक्त जमिनीवरील उच्च न्यालयातील प्रकरण जमीन मालकाव्दारा काढून घेण्यात यावे. त्याप्रमाणे उच्च न्यालयातील प्रकरण जमीन मालकाने परत काढून घेतले. असे असतांना म्हाडाने सर्वानुमते ही जागा परत करण्यासंबंधीचा ठराव केला असतांना व त्यांनी कोर्टामध्ये प्रतिज्ञापत्र दाखल केले असतांना, आणि त्यांनी रिस्टोरेशनसाठी अर्ज दाखल केला असतांना, प्रकरणे मागे घेत असल्यासंबंधी त्यांनी हायकोर्टामध्ये रिटपिटीशन दाखल केले आहे. “Permission is granted. NCA is disposed off as withdrawn.” या प्रमाणे त्यांनी केस मागे घेतली. त्याचप्रमाणे त्यांनी 14.76 हजाराची रिसिट देखील सादर केली. असे असतांना त्यांनी पैसे परत केल्यानंतर, रिसिट दिल्यानंतर व प्रतिज्ञापत्र दाखल केल्यानंतर आपण त्यांना ही जागा परत करणार काय?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, म्हाडाने ही जागा ताब्यात घेऊन त्या महिलेला 1 लाख रुपयांची भरपाई दिली. ती योग्य नव्हती म्हणून ती महिला कोर्टामध्ये गेली. कोर्टामध्ये गेल्यानंतर 1 लाखाचे 4 लाख झाले. त्या महिलेला 4 लाख रुपये 6 टक्के व्याजाने दिल्यानंतर पुन्हा कोर्टामध्ये रिटपिटीशन करण्यात आले. आणि त्यानंतर कोर्टाने 4245 चौ.मी. जागा परत देण्याचा निर्णय दिला. त्या बदल्यात श्रीमती कोठारी यांनी घेतलेले पैसे व्याजासह म्हाडाला परत द्यावेत. त्याचप्रमाणे कोर्टामध्ये जेवढे खटले दाखल केले होते ते सर्व मागे घ्यावे. त्याप्रमाणे त्यांच्याकडून प्रतिज्ञापत्र करुन घेऊन खटले मागे घेण्यात आले. आपल्या हिशेबाप्रमाणे 11 लाख त्या महिलेने भरले आहेत. आणि त्यानंतर म्हाडाने 1996 व 1997 मध्ये दोन ठराव केले. त्या ठरावानुसार जमीन तत्वत: परत करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही 79 वर्षाची वृद्ध महिला असून तिचा शेवटचा टप्पा आला आहे. ही जमीन परत कधी मिळते म्हणून ती गेली 20 वर्षे वाट पहात आहे. या महिलेला न्याय मिळण्याकरिता ही लक्षवेधी सूचना तीन वेळा सदनामध्ये मांडण्यात आली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

श्री. दिवाकर रावते...

माननीय मुख्यमंत्र्यांनी मागील वेळी सांगितले होते की, महिना, दोन महिन्यात या प्रकरणाचे सर्व संदर्भ पाहून निर्णय घेण्यात येईल. माझी आपणास विनंती आहे की, आपण घातलेली अट त्यांनी मान्य केली आहे. त्याप्रमाणे त्या महिलेने 11 लाख रुपये भरले आहेत. आणि तुमच्या निर्णयाची ती वाट पहात आहे. तिने कोर्टामधील सर्व खटले मागे घेतले आहेत. हे सर्व केल्यानंतर म्हाडाच्या ठरावाप्रमाणे या महिलेला जी जागा द्यावयाची आहे त्यामधील तुम्हाला एक हजार चौ.मी. जागा पाहिजे असेल तर तेवढी जागा कमी करा त्याबाबत आपण निगोशिएशन करा. 79 वर्षाच्या वृद्ध महिलेची घेतलेली जागा म्हाडा परत करणार आहे काय?

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषाताई दराडे)**

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदया, माननीय सदस्यांनी याठिकाणी उपस्थित केलेले मुद्दे वस्तुस्थितीला धरुन आहेत. परंतु या संदर्भातील काही बाबी आपणासमोर आणल्या पाहिजेत. एकूण 20 एकर 10 गुंठे जमीन संपादित करुन त्यांना 1 लाख 11 हजार 139.25 पैसे इतका निवाडा दिला होता. परंतु देण्यात आलेली ही रक्कम कमी असल्यामुळे त्यांना कोर्टामध्ये जावे लागले आणि कोर्टाने त्यांना 4 लाख 92 हजार 370 रुपये ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, ही सर्व माहिती लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये आलेली आहे...

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदया, मी थोडक्यात माहिती सांगतो.

श्री. दिवाकर रावते : ही सर्व माहिती आलेली आहे. ही जमीन परत करण्यामध्ये अडचण काय आहे ते सांगा?

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : आपला मुद्दा बरोबर आहे. म्हाडाने 1990 मध्ये ही जमीन परत करण्याबद्दल ठराव घेतला होता, ही वस्तुस्थिती आहे. परंतु त्यावर कार्यवाही झालेली नाही. म्हाडाचे व्ही.पी. बदलून गेले. दुसरे व्ही.पी.आल्यानंतर त्यांनी ते नामंजूर केले. त्यांनी सांगितले की, हे करता येणार नाही. कायदेशीर मत घ्यावे असे ठरले. ही केस हायकोर्टातून सुप्रीम कोर्टात गेली. सुप्रीम कोर्टाने आदेश दिला की, जे जादा पैसे दिले आहेत ते वसूल करावेत. त्यांनी ते पैसे भरले. परंतु ही संपादित केलेली जमीन परत करावयाची काय.....

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देताना असे सांगितले की, आधी म्हाडाने जमीन देण्याचा निर्णय घेतला होता परंतु दुसरे अधिकारी आले आणि त्यांनी तो निर्णय थांबवला. प्रशासकीय प्रकिया एका अधिकाऱ्याच्या भरवशावर चालत नाही. प्रशासकीय प्रक्रिया नियमानुसार चालते. आधीच्या अधिकाऱ्यांनी ती जमीन नियमानुसार परत करण्याचा निर्णय घेतला असेल तर दुसऱ्या अधिकाऱ्याला तो निर्णय बदलण्याचा अधिकार आहे काय ? असे झाले तर अधिकारी बदलत जातील त्याप्रमाणे निर्णय बदलत जातील. 1990 पासून प्रलंबित असलेला प्रश्न आणखी किती वर्षे चालणार आहे ?

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : प्रत्यक्षामध्ये त्याची अंमलबजावणी झालेली नाही. सन 2002 मध्ये हा निर्णय झाला होता. त्यानंतर लिगल डिपार्टमेंटकडे ही केस पाठविण्याचे ठरले. लिगल डिपार्टमेंटने याचिकाकर्त्यांच्या बाबतीत निर्णय घेण्याबद्दल अटी व शर्तींची पूर्तता करण्याबद्दल सांगितले होते. त्यानंतर हे सर्व पैसे परत केले. कोर्टामध्ये जी प्रोसेस सादर केलेली होती ती आम्ही केलेली नाही असे त्यांचे म्हणणे होते. संपादन करण्याच्या भूमिकेला म्हाडा कायम राहिले. संपादित केलेली जमीन परत करता येणार नाही असा निर्णय झाला. वकिलांनी याचिकाकर्त्यांची बाजू सांगितली. याबाबतीत आम्ही एक निर्णय असा घेतलेला आहे की.....

ॲड. अनिल परब : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्रिमहोदय जे उत्तर वाचून दाखवित आहेत ती माहिती असत्य आहे. यामध्ये दोन वेगवेगळ्या केसेस आहेत. पहिली केस यामध्ये जो ॲवॉर्ड झालेला होता तो मान्य नसल्यामुळे कोर्टात केस चालू आहे. दुसरी केस म्हणजे जी 4245 चौरस मीटर जादा जमीन घेतलेली आहे ती परत करण्यासंबंधीचा

..2...

ॲड. अनिल परब ....

वाद आहे. यासंदर्भात म्हाडाने हे मान्य केले होते की, तुम्ही सगळ्या केसेस मागे घ्या, आम्ही तुम्हाला जमीन देतो. आता माननीय मंत्रिमहोदय सुप्रीम कोर्ट आणि हायकोर्टचा दाखला देत आहेत. ही केस पूर्णपणे वेगळी आहे. आम्ही मागणी केली तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य केले होते की, एक महिन्याच्या आत 4245 चौरस मीटर जमिनीच्या बाबतीत निर्णय करु. हायकोर्टात, सुप्रीम कोर्टात जो निर्णय होईल तो ॲवॉर्डबद्दल होईल. जी 4245 चौरस मीटर जागा आहे त्याचे पैसे शासनाने स्वीकारलेले आहेत. ती जागा एक महिन्याच्या आत त्यांना देणार की नाही ? त्यांच्याकडे रिसीट आहे. ते तत्वत: मान्य झालेले आहे. सुप्रीम कोर्टातील विषय वेगळा आहे.

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : तशी वस्तुस्थिती नाही. हे जे पैसे परत केलेले आहेत त्यामध्ये जे जादा पैसे दिलेले होते ते सुप्रीम कोटाच्या आदेशाप्रमाणे परत केलेले आहेत.

ॲड. अनिल परब : यामध्ये 2 वेगवेगळे विषय आहेत. क्रॉम्प्रमाईज झालेले आहे.

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे कॉम्प्रमाईज झालेले नाही. जे जादा पैसे दिले होते ते व्याजासह त्यांना परत करावे लागले. त्यामुळे तो प्रश्न येत नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, कॉम्प्रमाईज झालेले नाही. यासंदर्भात मी एक बाब आपल्या निदर्शनास आणू इच्छितो. मी आपल्याकडे एक पत्र पाठवतो. आपण त्याचे अवलोकन करावे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...)

प्रधान सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य, मंत्रालय यांना उपाध्यक्ष व कार्यकारी अधिकारी यांनी पाठविलेले ते पत्र आहे. सर्व्हे नं. 24/2, मलकापूर जिल्हा अकोला येथील जमीन परत करण्याबाबत जमीन मालकास केलेली विनंती, असा पत्राचा विषय आहे. मी हे संपूर्ण पत्र वाचत नाही ते मी आपणाकडे पाठवितो. पत्रामध्ये शेवेटी असे म्हटलेले आहे की, "शासनाने दिलेल्या अटी च्या अनुषंगाने जमीन मालकाने अट क्र. 2 व 3 बाबतचीय पूर्तता केली ओ. याबाबतची छायांकित प्रती पुढील कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहेत. अट क्रमांक 1 बद्दल ॲफिडेव्हिट दाखल करुन कोटाचे सर्व प्रकरण काढून घेण्याचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. सबब या विषयी शासनाचे पुढील आदेश व्हावेत, ही विनंती " या पत्रानुसार मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये दुरुस्ती करावयास पाहिजे.

श्री. मधुकर चव्हाण : ही घटना झाली त्यावेळी मी म्हाडाचा पदसिध्द सदस्य होतो. निवेदनाच्या पान क्रमांक 2वर असे म्हटलेले आहे की "ही जमीन परत करण्याच्या बाबतीत जमीन मालकाने शासनास विनंती केली होती व त्यास अनुसरुन दिनांक 20.1.1990 अन्वये काही अटी व शर्तीवर सुमारे 4245 चौ.मी. जमीन भूसंपादनातून सोडून देण्याबाबत तत्वत: निर्णय घेतला होता. त्यानंतर म्हाडास सदर जमिनीची आवश्यकता असल्याने शासनाने दिनांक 3.4.2002 च्या पत्रान्वये अर्जदाराची विषयांकित जमीन संपादनातून वगळयाची विनंती मान्य करता येणे शक्य नाही असे कळविले आहे." तेथील ज्या अधिका-यांचे व्हेस्टेड इंटरेस्ट असतात ते अशी कामे करतात. जे चांगले काम करणारे अधिकारी असतात ते जमिनीचा उपयोग करता येत नसेल तर ती परत करतात. जमिनीच्या संदर्भातील निर्णय हा म्हाडाच्या अधिका-याच्या मर्जीनुसार केला जात नाही. तो विषय म्हाडाच्या मंडळापुढे ठेवून निर्णय घ्यावा लागतो. पहिल्यांदा 4245 चौ.मी. जमीन भूसंपादनातून सोडून देण्याचा तत्वत: निर्णय घेतला आणि त्यानंतर 12 वर्षांनी ती जमीन परत घेण्याचा निर्णय घेतला. शासन हे वेल्फेअर स्टेट आहे. वेल्फेअर स्टेट याचा अर्थ सामान्य माणसाचे हित पाहणे. आता ज्यांची लाकडे सरणावर गेलेली आहेत त्याना तुम्ही लढाई करायला सांगता.

..2..

(श्री. मधुकर चव्हाण...)

तुम्ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज यांचे नाव घेता. या महत्म्यांनी तुम्हाला लोकांवर अन्याय करायला शिकविलेले आहे काय ? भूसंपादनातून वगळलेली जमीन पुन्हा 12 वर्षांनी तुम्ही परत घेत आहात. हे योग्य नाही. ही लक्षवेधी राखून ठेवावी. माझा प्रश्न असा आहे की, 12 वर्षानी घेतलेला निर्णय शासन परत घेणार आहे की नाही ?

श्री. प्रीतमकुमार शेगावकर : ही केस हायकोर्टामध्ये प्रलंबित होती.

ॲड. अनिल परब : हायकोर्टामध्ये ही केस प्रलंबित नाही.

श्री. मधुकर चव्हाण : ही जमीन परत करण्याबाबत जमीन मालकाने शासनाला विनंती केली होती.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.3.......... श्री.मधुकर चव्हाण....

व त्यास अनुसरुन शासनाने 20 जानेवारी, 1990 अन्वये अटी व शर्तीवर म्हणजे अटी व शर्ती म्हाडाच्या निर्णयानुसार अधिकारी ठरवितात, सुमारे 4245 चौ.मि.जमीन भूसंपादनातून सोडून देण्याबाबत तत्वत: निर्णय घेतला. तत्वत: याचा अर्थ धोरणात्मक निर्णय असा होतो. तुम्ही कोर्टाचा कुठेही उल्लेख केला नाही. त्यानंतर म्हाडाला सदर जमिनीची आवश्यकता भासणार आहे...त्यानंतर म्हणजे 12 वर्षानंतर? 12 वर्षांनी म्हणजे 3 एप्रिल, 2002 च्या पत्रान्वये अर्जदारास विषयांकित जमीन संपादनातून वगळण्याची विनंती मान्य करता येणे शक्य नाही असे कळविले. 12 वर्षानंतर कळविणार? याठिकाणी कोर्ट कुठून आले? सभापती महोदया, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी अशी मी विनंती करतो.

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदया, 1990 मध्ये हा निर्णय झाला होता. 1991 मध्ये पुन्हा याचिकाकर्त्यांनी केस दाखल केली. पृ.क्र.2 वर म्हटले आहे. याचिकाकर्त्यांनी 20.8.91 ला उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली आणि याचिकेमध्ये नंतर सुधारणा अर्जही दिला. त्यानंतर 1990 चा उल्लेख करुन त्यांनी ही 4245 चौ.मि.जमीन परत मागितली. 1990 मध्ये जरी निर्णय झाला तरी 1991 मध्ये त्यांनी उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली होती.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

यामध्ये स्पष्ट उल्लेख आहे की, 1996 नंतर 1999 मध्ये याचिकाकर्त्यांचे वकील हजर नसल्यामुळे केस निकाली निघाली. त्यांच्याबद्दल निश्चितपणे सहानुभूती आहे. तांत्रिक बाब अशी की, केरळ उच्च न्यायालयाचा निर्णय आहे की, संपादित केलेली जमीन मालकाला परत करु नये. 1997 चा हा निर्णय आहे. शासनाने संपादित केलेली जमीन परत करु नये. याबाबत आम्ही ॲडव्होकेट जनरल यांचा सल्ला घेत आहोत. त्यांचा सल्ला येईल त्याप्रमाणे कारवाई करु एवढे मी सांगू इच्छितो. शासनाला निश्चितपणे सहानुभूती आहे. केरळ उच्च न्यायालयाचा निर्णय आहे की, संपादित केलेली जमीन मालकाला परत करु नये. त्या निर्णयाची आपल्या शासनाकडून अंमलबजावणी होते. अन्यथा पी.आय.एल.दाखल झाल्यास कोर्ट ऑफ कन्टेम्प्ट होईल. मी आश्वासन देतो की, ॲडव्होकेट जनरलचा सल्ला आल्यानंतर त्याप्रमाणे कारवाई करु.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया यांनी या सभागृहात ही जी लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे त्यावर या ठिकाणी बरीच चर्चा झालेली आहे. एकंदरीत जे उपलब्ध कागदपत्र आहेत ते पाहता या महिलेला जमीन परत करावयास पाहिजे. त्याकरिता त्यांनी विनंती अर्ज केला होता. तुमच्या म्हणजे मुख्याधिकारी, प्राधिकरण यांच्याकडून प्रधान सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग यांना 26.11.1999 रोजी पत्र गेले होते त्यानुसार 4245 चौ.मि.एवढी जमीन त्यांना परत करावयाचे त्यांनी मान्य केले आहे. इतकेच नव्हे तर मागील वेळी ही लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्यांनी विचारली होती. त्यावेळी देखील सभागृहात उत्तर दिले गेले की, ही जमीन मूळ मालकाला परत करण्यात यावी. आता पुन्हा नव्याने केरळ हायकोर्टाच्या निर्णयाचा दाखला देऊन जमीन देता येत नाही असे सांगण्यात आले. तो नियम याठिकाणी लागू होत नाही. त्यामुळे ही जमीन शासनाने यापूर्वी कबूल केल्याप्रमाणे येत्या 15 दिवसाच्या आत या महिलेला परत करण्यात यावी अशा प्रकारचे सुस्पष्ट निर्देश मी आपल्याला या सभागृहात देत आहे आणि यावर ॲडव्होकेट जनरलचा सल्ला घेण्याची गरज नाही.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** .....

या निर्णयावर कुठल्याही परिस्थितीत अकौंटन्ट जनरलशी कन्सलटेशन होणार नाही हा सभागृहाचा निर्णय आहे.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : आपल्या आदेशाप्रमाणे मी या ठिकाणी आश्वासन देतो.

**उपसभापती** : आता नववी लक्षवेधी सूचना घेण्यात येईल. नववी लक्षवेधी सूचना सन्माननीय मंत्री श्री. विनय कोरे यांची असून त्यांनी त्यांची लक्षवेधी सूचना प्रथम घेण्याच्या संदर्भात विनंती केलेली आहे त्यामुळे नववी लक्षवेधी सूचना प्रथम घेण्यात येत आहे.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदयांना जसे खालच्या सभागृहात जावयाचे आहे त्याच प्रमाणे मला सुध्दा खालच्या सभागृहात जावयाचे आहे. मी पहिल्या क्षणापासून येथे उभा आहे. आज सायंकाळी 5.00 वाजता माननीय सभापती आणि माननीय अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली बालकामगारांच्या संदर्भात एक बैठक लावलेली आहे. कामगार मंत्री म्हणून मला या बैठकीत उपस्थित राहणे आवश्यक आहे. मघाशी या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सभागृहाचा अवमान होतो म्हणून सभागृहाचे कामकाज स्थगित करण्याची विनंती केली होती त्या प्रमाणे सभागृह 15 मिनीट स्थगित झाले. अधिवेशनाचा बराच काळ अशा विशिष्ट गोष्टीमुळे वाया गेलेला आहे. सभागृहाचा वेळ एक एक मिनिटांनी वाचविणे आवश्यक असतांना या ठिकाणी जे मंत्री हजर आहेत अशा मंत्र्यांच्या बाबी न घेता, हे जे या ठिकाणी चालले आहे ते बरोबर चालले नाही एवढेच मला या निमित्ताने म्हणावयाचे आहे.

**उपसभापती** :आता सन्माननीय मंत्रीमहोदयांनी जे वक्तव्य केले ते अत्यंत चुकीचे आहे. पहिली गोष्ट अशी आहे की, आम्ही दिवसाच्या कामकाजाच्या क्रमानुसारच काम करीत असतो. पण अपवादात्मक परिस्थितीमध्ये जर एखाद्या सदस्यांनी किंवा मंत्रीमहोदयांनी विनंती केली तर ती विनंती आम्ही मान्यही करीत असतो. आमचा चांगुलपणा येथे थांबवावयाचा असेल तर आम्ही तो निश्चितपणे थांबवू शकतो. त्यानंतर मंत्र्यांनी किंवा सदस्यांनी अशा प्रकारची विनंती केली तर आम्ही ती मान्य करणार हे मी येथे स्पष्ट करु इच्छितो. सभागृह तहकूब करण्याचेही कारण तसेच होते. या ठिकाणी सन्माननीय सदस्य सकाळी 10.00 वाजल्यापासून आलेले आहेत. चहासाठीही कोणी गेले नव्हते किंवा मधली सुट्टी देखील देण्यात आली नव्हती. वास्तविक पहिली लक्षवेधी

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** .....

सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांची झाल्यानंतर मला असे सांगण्यात आले होते की, सभागृह अर्धातास तहकूब करा म्हणून. त्यानंतरही मी काही लक्षवेधी वाचल्या. सभागृहात प्रत्येक सेकंदाचा उपयोग करुन घेतला जातो. कित्येक वेळेस मंत्री हजर नसेल तर आम्ही सदस्यांना विनंती करतो की, पुढची लक्षवेधी घेण्यात येईल म्हणून आणि सदस्य देखील त्याला मोठ्या मनाने परवानगी देतात. जर जबाबदार मंत्री महोदयांनी सभापतीच्या आसनावर बसलेल्यांना कामकाजाच्या संदर्भात अशा प्रकारचे उपदेश करु नयेत असे मला सांगावेसे वाटते. आता कामकाजात दाखविण्यात आलेली 9 क्रमांकांची लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येईल.

--------------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सांगली, सोलापूर, सांगोला, सातारा जिल्हयात पवन चक्क्यांच्या जमिनीच्या संपादनात झालेला भ्रष्टाचार

**मु. शी.** : सांगली, सोलापूर, सांगोला, सातारा जिल्हयात पवन चक्क्यांच्या जमिनीच्या संपादनात झालेला भ्रष्टाचार

यासंबंधी सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. प्रकाश शेंडगे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अपारंपारिक ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" सांगली जिल्ह्यातील कवठेमहाकाळ खालपूर, सोलापूर जिल्ह्यातील सांगोला, सातारा जिल्ह्यातील पाटण व नंदूरबार जिल्ह्यातील काही भागात मोठ्या प्रमाणात पवनचक्क्या उभ्या करणे, या पवनचक्क्यांसाठी लागणाऱ्या जमीन संपादनात मोठा भ्रष्टाचार होणे, शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना पवनचक्कीमध्ये नोकरीत सामावून न घेणे, यामुळे या सर्व भागातील शेतकऱ्यांची कुटुंबे उध्वस्त होणे, शेतकऱ्यांच्या जमिनीस योग्य भाव ठरवून न देण्याचे कामी शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे पसरलेला प्रचंड असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

श्री. विनय कोरे ( अपारंपारिक ऊर्जा मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, सांगली जिल्हयातील कवठेमहाकाळ, खालपूर, सोलापूर जिल्ह्यातील सांगोला, सातारा जिल्ह्यातील पाटण व नंदूरबार या दुष्काळी भागात पवनचक्क्यांसाठी हजारो एकर जमीन संपादित करण्यात येत आहे. परंतु शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव दिला जात नाही. 40-40 हजार रुपये नाममात्र किंमत देऊन शेतकऱ्यांकडून बेकायदेशीररित्या जमीन संपादित केलेल्या आहेत. त्यामुळे त्या भागातील शेतकरी उद्ध्वस्त होत आहे. त्यांच्या मुलांना पवन ऊर्जा नोकरीत सामावून घेतले जात नाही. 225 कामगारांना नोकरीतून काढून टाकण्यात आले आहे. त्याठिकाणी जवळपास 400 लोकांचे उपोषण सुरु आहे. पवनचक्कीच्या संरक्षणाकरिता कंपन्यांच्या मालकांनी पाळीव गुंड ठेवले आहेत. त्या ठिकाणी वीज निर्मिती होते परंतु शेतकऱ्यांच्या जीवनात अंधाराचे साम्राज्य होत चालले आहे. मागील तीन अधिवेशनापासून या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधीत आहे. बाजूच्या राज्याने पवनचक्क्यांसाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीसाठी 25 हजार रुपये लीज दिली पाहिजे असा निर्णय घेतलेला आहे. अशाप्रकारचा निर्णय महाराष्ट्र शासन घेणार आहे काय ? निवेदनात म्हटले आहे की, " पवन ऊर्जा प्रकल्प उभारणी योग्य असणाऱ्या जमिनी , जमिनीच्या मालकांकडून विकासकाद्वारे परस्पर घेतल्या जातात. जमिनी खरेदी विक्रीचा व्यवहार हा जमीन मालक व विकासक/गुंतवणूकदार यांच्या राजीखुषीने व कायदेशीररित्या होतो." माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, या भागातील पुष्कळ शेतकरी उद्ध्वस्त होत आहेत. त्या शेतकऱ्यांना योग्य भाव देऊन त्यांना न्याय देणार काय आहात की आत्महत्या सुरु झाल्यानंतर त्यांना भाकड गाई म्हशी देणार आहात. तेव्हा या जमिनीचे संपादन करण्यासाठी शासन शेतकऱ्यांना एक निश्चित भाव ठरवून देणार आहे काय ? शेतकऱ्यांना एकरी 25 हजार रुपये भाव देणार आहे काय ? प्रत्येक पवनचक्कीमध्ये शेतकऱ्यांच्या घरातील दोन कुटुंबियांना नोकरीत सामावून घेणार काय ? या जमीन संपादनाच्या बाबतीत जवळपास 3500 तक्रारी आलेल्या आहेत. सातारा येथे 1917 व कवळेमहाकांळ येथे 1414 तक्रारी आलेल्या आहेत. या संदर्भात बैठका होतात त्या बैठकांना स्थानिक लोकप्रतिनिधींना बोलाविले जात नाही. तेव्हा या संपूर्ण प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात येईल काय ? तसेच माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी सांगितले होते की, शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांना मोक्का लावण्यात येईल. तेव्हा यासंदर्भात मंत्रिमहोदय कोणती कार्यवाही करणार आहे ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, पवन ऊर्जा प्रकल्पासाठी जमीन संपादित करण्यासंदर्भात सांगली जिल्ह्यातून तक्रारी आल्या होत्या. त्या संदर्भात कमिशनर व माननीय मुख्यमंत्र्यांची सुध्दा चर्चा झालेली आहे. जिल्हाधिकाऱ्यांना एक विशेष जलद गती न्यायालय म्हणून अधिकार दिलेला आहे. जमीन संपादनाच्या बाबतीत शेतकऱ्यांची फसवणूक झाली असेल, शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळाला नसेल तर त्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडे आलेल्या तक्रारींना न्याय देण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिलेला आहे. त्याप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांकडून बऱ्याच प्रकरणात निर्णय झालेले आहेत. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी कंपनीने एक कोटी रुपये डिपॉझीट ठेवावे असा निर्णय घेण्यात आलेला आहे. अशा पध्दतीने शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचा आमचा प्रयत्न सुरु आहे. खरे म्हणजे पवन ऊर्जा प्रकल्पासाठी शासनाने जमीन संपादित करुन द्यावी अशी कंपन्यांची मागणी आहे. परंतु शेतकऱ्यांना जमिनीचा योग्य भाव मिळावा यासाठी शासन हस्तक्षेप करीत नव्हते. पण सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेले मुद्दे लक्षात घेता आणि प्रत्यक्ष फिल्डवरील येणारा अनुभव लक्षात घेता भविष्यात वीज निर्मितीचे काही फायदे लीज रुपाने द्यावयाचे काय याबाबत मंत्रालय नवे धोरण घेणार आहे.

यानंतर श्री.पुरी..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, तेथील लोक मलाही भेटलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी जे प्रश्न विचारले त्यासंदर्भात आमचे प्रयत्न चालू आहे, असेच उत्तर माननीय मंत्रिमहोदयांकडून मिळत आहे. परंतु दिनांक 23 मार्च,2007 रोजी जी बैठक झाली त्यामध्ये सन्माननीय सदस्यांना आणि तेथील स्थानिक ग्रामपंचायतीच्या सरपंचांना व त्यांच्या सहकाऱ्यांना स्थानच नाही. त्यामुळे माझा प्रश्न आहे की, सदर कंपनीचे कोणते प्रतिनिधी आपल्याबरोबर चर्चा करतात, त्यांची नांवे आपण सांगावित तसेच सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे व ग्रामपंचायतीच्या सरपंचांना एकत्रित बोलावून आपण त्यांच्यासोबत बैठक घ्यावी. यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांवर कोणाचे तरी दडपण आहे, असे मला वाटते. त्यांच्या वादामध्ये हे शेतकरी भरडले जात आहेत.

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, कंपनीच्या वतीने चर्चेस कोणते प्रतिनिधी येतात, त्यांची नांवे मी पटलावर ठेवतो. जिल्हाधिकाऱ्यांना विशेष न्यायालय म्हणून नियुक्त केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी नेमलेल्या प्रांत अधिकाऱ्यांनी प्रत्येक गावात जाऊन शेतकऱ्यांच्या तक्रारी ऐकून घ्याव्यात व प्रत्यक्ष वस्तुस्थिती पहावी अशा सूचना त्यांना दिलेल्या आहेत. अशाप्रकारे धोरणात्मक निर्णय घेत असताना तेथील लोकप्रतिनिधींना बैठकीस बोलावण्याची जी सूचना सन्माननीय सदस्यांनी केली, ती आम्ही अंमलात आणू.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनात 25 एप्रिल रोजी जी बैठकी झाली त्यामध्ये प्रामुख्याने तीन निर्णय घेण्यात आलेले आहेत. त्यातील दोन क्रमांकाच्या निर्णयामध्ये असे स्पष्ट म्हटले आहे की, "जमिनीचे सर्व व्यवहार स्थानिक एजंटामार्फत न करता कायदेशीररित्या करावेत. आवश्यकता असल्यास जिल्हाधिकारी व त्यांच्या प्रतिनिधी समोर करण्यात यावेत." याचाच अर्थ असा आहे की, एजंटच्या माध्यमातून व्यवहार झाले असतील तर ते भविष्यात होणार नाहीत, याची दक्षता जिल्हाधिकारी कार्यालयाने घ्यावी. आजपर्यंत शेतकऱ्यांच्या ज्या काही जमिनी कंपनीने एजंटमार्फत घेतलेल्या आहेत, त्याबाबत तेथील शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष आहे. त्यानुषंगाने माझा असा प्रश्न आहे की, यासंदर्भात एजंटच्या माध्यमातून शेतकऱ्यांची फसवणूक झाली असेल तर त्याबाबतची चौकशी सीआयडीमार्फत होणार का ? तसेच, या सर्व





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगदीश गुप्ता...

प्रकरणांच्या बाबतीत आपण जलदगती न्यायालय स्थापन केले. परंतु एकीकडे अशाप्रकारे धनाढ्य कंपनीवाले असताना या गरीब कास्तकारांना न्याय मिळणे अवघड झालेले आहे. त्यामुळे याबाबतीत शासनातर्फे शेतकऱ्यांच्या दृष्टीने वेगळी न्याय व्यवस्था केली जाणार का ?

श्री.विनय कोरे : सभापती महोदय,...

**उपसभापती** : मी माननीय मंत्रिमहोदयांना मध्येच थांबवत आहे. विधानसभेकडून एक संदेश आलेला आहे, तो प्रथम घेऊया, त्यानंतर मंत्री महोदयांनी आपले उत्तर पूर्ण करावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक,2007

**मु.शी.**: सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 74 महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक,2007 दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतच्या प्रस्तावास विधानपरिषदेच्या सहमती संबंधी विधानसभेकडून आलेला संदेश व प्रस्तावास सहमती.

**उपसभापती** : विधानसभेकडून एक संदेश आलेला आहे. प्रधान सचिव तो वाचून दाखवतील.

**संदेश**

प्रधान सचिव : महाराष्ट्र विधानसभेने दिनांक 26 नोव्हेंबर,2007 रोजी झालेल्या बैठकीत संमत केलेला खालील प्रस्ताव विधानपरिषदेच्या सहमतीसाठी महाराष्ट्र विधानसभेच्या नियमातील नियम 129 व 198 (2) अन्वये पाठविण्याचा मला निदेश देण्यात आला आहे.

**प्रस्ताव**

"सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 74-महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, 2007 विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 20 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

डॉ.पतंगराव कदम (सहकार मंत्री) : सभापती महोदय, दिनांक 26 नोव्हेंबर,2007 ला झ ाालेल्या सभेत विधानसभेने संमत केलेल्या पुढील प्रस्तावास सभागृहाने अनुमती द्यावी असा प्रस्ताव मी आपल्या अनुमतीने मांडतो.

"सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 74-महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, 2007 विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 20 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देवून विचारार्थ पाठविण्यात यावे."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

(नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, विधानपरिषदेने नियुक्त करावयाच्या प्रस्तावित संयुक्त समितीवर या सभागृहाचे पुढील सदस्य नामनिर्देशित करण्यात यावेत, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो :-

1) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
2) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.
3) श्री.यशवंतराव गडाख, वि.प.स.
4) श्री.दिलीपराव देशमुख, वि.प.स.
5) श्री.वसंत पवार, वि.प.स.
6) श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

---------------

...2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सांगली, सोलापूर, सांगोला, सातारा जिल्हयात पवन चक्क्यांच्या जमिनीच्या संपादनात झालेला भ्रष्टाचार

**मु.शी.**: सांगली, सोलापूर, सांगोला, सातारा जिल्हयात पवन चक्क्यांच्या जमिनीच्या संपादनात झालेला भ्रष्टाचार यासंबंधी सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

**(चर्चा पुढे सुरु**..........

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, खरं तर कायद्याप्रमाणे केलेल्या खरेदी पत्रासंबंधी न्यायालयात वाद होतात, न्यायालयांकडून निकाल वेळेवर लागत नाही व या सर्व प्रक्रियेत शेतक-यांना न्याय मिळत नाही. एक विशेष योजना जलदगती न्यायालयाच्या माध्यमातून तयार केली आहे. शेतक-याची फसवणूक झाल्याचे आढळले तर त्याच ठिकाणी त्या कंपनीवर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करावेत, अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या कंपन्यांना कायद्याच्या कचाटयात आपण पकडू शकणार नाही, याबद्दल माझ्या मनात शंका नाही. या कंपन्यांनी शेतक-यांची फसवणूक केलेली आहे. त्यामध्ये दलित, आदिवासी, गरीब शेतकरी आहेत. कल्याणकारी राज्याच्या भूमिकेतून याबाबत वेगळया प्रकारे विचार केला पाहिजे. या कंपन्यांनी प्रकल्प उभा करण्याबाबत आमची हरकत नाही. परंतु, कवडीमोलाने शेतक-यांच्या जमिनी त्यांनी घेतलेल्या आहेत. यासंदर्भात कंपनीला आवश्यक असणा-या परवानग्या रोखून त्यांना चर्चेला बोलावून प्रत्येक शेतक-याला एक एकरामागे 10 हजार रुपयांचे 5 हजार शेअर्स देऊन त्यांना कंपनी इक्विटीमध्ये मालकी देण्याबाबतचा आग्रह धरण्यात यावा. यायोगे शेतक-यांना कायमस्वरुपी डिव्हिडंडच्या माध्यमातून उत्पन्न मिळू शकेल. या कंपन्यांनी शेतक-यांना फसविले आहे, न्यायालयात दावे दाखल होतील, त्यांना परवानग्या दिलेल्या आहेत, त्यांचा दोष नाही हे सिद्ध होईल व आपण शेतक-यांना न्याय देऊ शकणार नाही. सरकारकडे कंपन्यांना मजबूर करण्यासाठी अनेक मार्ग आहेत. त्या मार्गाचा अवलंब करुन त्या कंपनीचे शेअर्स शेतक-यांना द्यावेत आणि रोजगार उपलब्ध करुन द्यावा. याबाबत मंत्रीमहोदयांना ताबडतोब निर्णय करावा लागेल. यादृष्टीने कल्याणकारी राज्याच्या भूमिकेतून शासन काय करणार आहे ?

....3..........





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, नवीन धोरण ज्यावेळी सांगितले त्यावेळी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नितीन गडकरी हे सभागृहात उपस्थित नव्हते. त्यांनी शेअर्स देण्याबाबतची कल्पना या ठिकाणी मांडली. मी लक्षात आणून देतो की, विंड मिलतर्फे जमिनी घेण्याचे काम वेगळया कंपनीकडून होत असते. जमिनी मिळविणा-या कंपन्या, विंड मिल यांचा काहीही संबंध नसतो. शेतक-याला कायमस्वरुपी उत्पन्न व्हावे यादृष्टीकोनातून विजेच्या उत्पन्नातून काही भाग शेतक-यांना देण्याचे नवे धोरण सरकार आणणार आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदयांना कायदा तयार करुन किंवा अध्यादेश काढून हे करता येऊ शकेल. ज्या शेतक-यांच्या जमिनीवर विंड मिल उभ्या राहणार आहेत त्यांना करोडो रुपयांचा नफा मिळणार आहे. जमीन घेणारी कंपनी वेगळी असेल किंवा मॅन्यूफॅक्चरर कंपनी वेगळी असेल पण जी मूळ कंपनी आहे त्या कंपनीतील एक्विटीत शेतक-यांना सहभागी केले तर शेतक-यांना आयुष्यभर उत्पन्न मिळू शकेल. कंपनीने एक करोड रुपये कमाविले तर शेतक-याला कमीतकमी 10 हजार रुपये तरी मिळतील. आज शेतकरी आत्महत्या करीत आहेत आणि दुसरीकडे त्यांच्याच जमिनीवर कंपन्या उभ्या करुन करोडे रुपये कंपनी कमाविणार आहे, हा कुठला न्याय आहे ? यासंदर्भात आपण कायदा केला तर ते शक्य होईल ?

यानंतर श्री.बोरले.........

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, इलेक्ट्रीसिटी ॲक्ट, 2003 प्रमाणे वीज उत्पादनाच्या क्षेत्रात आपल्याला कोणावरही बंदी आणता येत नाही. तरी सुध्दा जमिनी ॲक्वायर करुन देणे आणि त्या शेतक-याला लाँग टर्म बेनिफिट मिळेल अशा प्रकारचे धोरण आणणे ही कल्याणकारी योजना देशात आपल्या राज्यात आपण पहिल्यांदा मांडणार आहोत. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी या योजनेचे स्वागत करावयास पाहिजे. ही योजना करीत असतांना आपल्याला काही सूचना करावयाच्या असतील तर आपलाही सल्ला जरुर घेतला जाईल.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, हा अनेक वर्षापासूनचा ज्वलंत प्रश्न बनलेला आहे. शेतकरी आजही आंदोलन करीत आहेत. जिल्हाधिका-यांच्या नेतृत्वाखाली आपण जलद गती न्यायालय स्थापन केले. शेतक-यांनी जिल्हाधिका-यांकडे तक्रारी द्याव्यात आणि त्याचे निवाडे जिल्हाधिका-यांनी करावे, असा आदेशही आपण काढलेला आहे. आता पर्यंत किती शेतक-यांना न्याय मिळाला, आता पर्यंत किती शेतक-यांनी दाद मागितली आणि किती शेतक-यांना जिल्हाधिका-यांनी न्याय दिला याची माहिती माननीय मंत्री महोदय सांगू शकतील काय ? मागच्या अधिवेशनामध्ये मी हाच प्रश्न विचारला होता. त्यावेळी असे उत्तर देण्यात आले होते की, आपण नवीन धोरण राज्यात आणत आहोत त्या धोरणानुसार ज्या शेतक-यांच्या जमिनी पवन ऊर्जा प्रकल्पासाठी घेतल्या जातील त्यांना कायम स्वरुपी लाभ मिळेल अशी तरतूद करण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन दिले होते, हा कायदा शासन केव्हा करणार आहे ?

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, शेतक-यांच्या मुलांना नोक-या द्याव्यात अशा सूचना दिलेल्या आहेत आणि त्याप्रमाणे आता पर्यंत ज्या परिसरामध्ये पवन ऊर्जा प्रकल्प उभा राहिला त्या ठिकाणच्या 3,200 स्थानिक लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, सांगलीच्या जिल्हाधिका-यांना जलद गती न्यायालय स्थापन करुन आपण सांगलीच्या जिल्हाधिका-यांना करण्याबाबतचे सर्व अधिकार आपण त्यांना दिलेत त्यानुसार ते जमिनीचे निवाडे करत आहेत. नंदूरबार जिल्हयामध्ये सुध्दा मोठया प्रमाणावर पवन ऊर्जेचे प्रकल्प सुरु आहेत. शेतक-यांच्या 20 ते 25 हजार रुपये एकरने जमिनी खरेदी केलेल्या आहेत. नंदूरबार जिल्हाधिका-यांना सुध्दा जलद गती न्यायालय स्थापन करुन शेतक-यांच्या तक्रारीचे निवाडे करण्यासंदर्भात आपण तात्काळ आदेश देणार आहात काय ?

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, नंदूरबार जिल्हयात सुध्दा अशा प्रकारचा टास्क फोर्स निर्माण करण्याचा निर्णय झालेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, विंड मिलचे प्रोजेक्ट नाशिकमधील घोटी परिसरामध्ये सुध्दा येत आहेत. दोन गावांमध्ये यावरुन दंगली सुध्दा झाल्या. एका सरपंचांनी परवानगी दिली दुस-यांनी ती मिल बंद पाडली. जोपर्यंत सरकार यामध्ये हस्तक्षेप करत नाही तोपर्यंत यामध्ये सर्वसाधारण तोडगा निघणार नाही. माननीय गडकरी साहेबांनी सूचना केलेली आहे यातून जर तुम्ही परमनंट प्रॉफिटूबिलीटी जर त्यांना देऊ शकला तर त्यातून त्या शेतक-यांचे हीत साधले जाईल. एकदा त्या शेतक-यांच्या जमिनी गेल्या की तो देशोधडीला लागतात. हा महाराष्ट्राचा इतिहास आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे आपण कायद्यात बदल करुन प्रॉफिटॅबिलीटीमधील काही पर्सेजेट आपण शेतक-यांना देणार काय आणि जलद गती न्यायालय आपण नाशिक जिल्हयासाधी सुध्दा मंजूर करणार काय ?:

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, यामध्ये 100 टक्के इनकमटॅक्स एक्झमशन आहे. मला आज नागपूरातील एका माणसाने भेटून सांगितले की, मला विंड मिल टाकावयाची आहे. ज्यांना इनकमटॅक्स चुकवायचा आहे ते विंड मिल टाकतात. आणि एश्वर्या रॉय पासून सर्व लोक याचा फायदा घेत आहेत. त्या शेतक-याला दोन-तीन टक्के तरी मालक करावे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी एश्वर्या रॉय वगैरे यांची जी माहिती दिली ती तपासून पाहण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, यामध्ये महाराष्ट्रातील काही मंत्री आहेत, वर्तमानपत्राचे मालक आहेत त्यांना अडीचशे अडीचशे कोटीचे एक्झमशन मिळालेले आहे. त्यायामध्ये आपल्या आजुबाजूचे मोठ-मोठे सहकारी आहेत. त्यांनी याचा फायदा घेतलेला आहे.

यानंतर कु.जयश्री........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा विषय अतिशय गंभीर आहे. माननीय मंत्रिमहोदयांना हा प्रश्न विचारावयाचा आहे की, या माध्यमातून एकूण 3300 लोकांना नोक-या दिल्या असा त्यांनी उल्लेख केला. हल्लीच्या नोक-या देण्याची पध्दत अशी आहे की, सहा महिने ठेवायचे आणि नंतर फेकून द्यायचे म्हणजे नोकरी दिल्याचे त्या व्यक्तीलाही समाधान नंतर काढून टाकल्याचे त्या मालकालाही समाधान होईल. म्हणून प्रकल्पग्रस्त कुटुंबांना कायमस्वरुपी फायदा कसा होत राहिल या दृष्टीकोनातून शासनाने विचार केला पाहिजे. पवनचक्की मालकाला जेवढा फायदा होईल त्याच्या काही पर्सेंटेज फायदा हा प्रकल्पग्रस्त कुटुंबांना देखील दिला गेला पाहिजे. अशा पध्दतीची तरतूद कायद्यात करुन त्यांना संरक्षण देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय आता ठिकठिकाणी मॉल कल्चर उदयाला येत आहे. या कल्चरचा स्थानिक जनतेने मॉल तोडून विरोधही केला होता. यासंदर्भात शासनाने कडक पावले उचलणे आवश्यक आहे. आपण पवनचक्क्यांच्याच बाजून उभे न राहता शेतक-यांच्या बाजूने उभे राहणार हे आम्हाला माहीत आहे. एखाद्या प्रकल्पासाठी जर शेतक-याची जमीन संपादित केली गेली तर तो शेतकरी आयुष्यभरासाठी बेकार होतो. म्हणून या दृष्टीकोनातून आपण काय विचार करणार आहात? याचा खुलासा करावा.

श्री.विनय कोरे : सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन शेतक-यांना सातत्याने काही मिळत राहिले पाहिजे असे नवे धोरण महाराष्ट्र शासन आणत आहे. यासंदर्भात मंत्रिमंडळाच्या गांभीर्याने दोन बैठकाही झालेल्या असून येत्या दोन ते तीन महिन्याच्या आत हे नवे धोरण येईल. आणि मला सन्मानीय सदस्य श्री.गडकरी यांना विशेषत: सांगितले पाहिजे की, राज्यात विजेचा तुटवडा आहे की, राज्यात वीज निर्मिती करण्यासाठी ही एक सुविधा उपलब्ध झालेली आहे. राज्यात जास्तीत जास्त ग्रामीण भागात गुंतवणूक आणण्यासाठी या क्षेत्रामार्फत उपयोग होत आहे. डेप्रिसिएशन बेनिफिट मिळत असला तरी तो केंद्राचा विषय आहे. महाराष्ट्रात या प्रकल्पाचा जास्तीत जास्त फायदा व्हावा म्हणून आपण सर्वांनीच सहकार्य केले पाहिजे.

----

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कमॉडिटी मार्केटला लागू असलेली स्टॅम्प डयूटी वसूल करण्याकरिता मुद्रांक विभागाचे अधिकारी दाखवित असलेली उदासीनता.

**मु.शी.**: कमॉडिटी मार्केटला लागू असलेली स्टॅम्प डयूटी वसूल करण्याकरिता मुद्रांक विभागाचे अधिकारी दाखवित असलेली उदासीनता यासंबंधी सर्वश्री.मधुकर सरपोतदार,दिवाकर रावते,अरविंद सावंत,डॉ.दीपक सावंत,ॲड.अनिल परब,सर्वश्री. गोपिकिसन बाजोरिया,सुरेश जेथलिया,परशुराम उपरकर,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले): अध्यक्ष महोदय,मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो.

"गेल्या तीन वर्षापासून कमॉडिटी मार्केटला स्टॅम्प डयुटी लागू करण्यात येणे, दर दिवशी हजारो कोटी रुपयांची ऑनलाईन आर्थिक उलाढाली असलेल्या कमॉडिटी मार्केटमधून स्टॅम्प

डयुटी वसूल करण्यात येत नसणे, कमॉडिटी मार्केटद्वारे ऑन लाईन सोने, कॉटन, तेलबिया, डाळी, यासर्व वस्तूंची खरेदी विक्री होत असणे, कमॉडिटी मार्केटच्या उलाढालीतून होणाऱ्या व्यापारावरील स्टॅम्प डयुटीची रक्कम वसूल करण्याची जबाबदारी ही राज्याच्या मुद्रांक महानिरीक्षकांवर असून ती वसूल करण्याबाबत त्यानी दाखवलेली उदासीनता, कमॉडीटी मार्केटमधील व्यापारी स्टॅम्प डयुटीची कोटयावधी रुपयांची रक्कम बुडवीत असणे, कमॉडिटी मार्केटमध्ये दररोज किमान दहा कोटी रुपयांची स्टॅम्प डयुटी बुडवीली जात असून मुंबईतील राज्यभर नियंत्रित होणाऱ्या या कमॉडिटी उलाढालीवर मुद्रांक विभागाचे नियंत्रण नसल्याने मुद्रांक महानिरीक्षक पद अस्तित्वात असूनही ते निष्क्रीय असणे, या व्यवहारात मुद्रांक शुल्क विभागातील अधिकारी व कमॉडिटी मार्केटच्या व्यापाऱ्याचे आर्थिक हितसंबध असणे, त्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने जनतेते पसरलेला तिव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता याप्रकरणी शासनाने तातडीने केलेली व करावयाची उपाययोजना."

डॉ.राजेंद्र शिंगणे ( महसूल राज्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज,लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच सदस्यांना आधीच वितरीत केल्य असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.



JPK/ D/ MMP/ प्रथम श्री.बोरले.... 16:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...4

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या लक्षवेधीच्या माध्यमातून जो विषय येथे मांडलेला आहे, तो महाराष्ट्र शासनाला स्टॅम्प डयूटीच्या माध्यमातून जास्त निधी उपलब्ध व्हावा या दृष्टीकोनातून जे काही चालले आहे, त्या संदर्भातील आहे.

डॉ.राजेंद्र शिंगणे : उत्तरामध्ये दुरुस्ती करायची राहून गेली आहे. उत्तराच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये "रुपये 10,000 मूल्याचे व्यवहारास मुद्रांक शुल्क रुपये एक आहे." कमोडिटी मार्केटची वार्षिक उलाढाल ही 11,000 अब्ज रुपयांची आहे. त्याचे कमोडिटी मार्केटमधून रुपये 10 कोटींची अपेक्षा होती. वरील उत्तराऐवजी त्यामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा पाहिजे "एक लाख रुपये मुल्याच्या व्यवहारास मुद्रांक शुल्क रुपये एक आहे."

श्री.मधुकर सरपोतदार : माननीय मंत्रिमहोदयांची दुरुस्ती ऐकण्याच्या आधी मला उत्तर वाचून आश्चर्य वाटले की, आपण ब्रिटीशांच्या जमान्यात तर वावरत नाही ना ? कमोडिटी मार्केटच्या वार्षिक उलाढालीमुळे होणारा, व्यापारामधून स्टॅम्प डयूटी वसूल करण्याची जबाबदारी मुद्रांक निरीक्षकांची असून त्यात त्यांनी दाखविलेली उदासिनता व्यापारी कोटयवधी रुपयांची रक्कम पाठवित असतांना त्यासंदर्भात आपण काही उत्तर दिले नाही. दुसरे मुद्रांक शुल्क अधिकारी आणि कमोडिटी मार्केट मधील व्यापारी यांच्यांमधील आर्थिक हितसंबंध असणे या दोन्ही संदर्भात उत्तराचा उल्लेख केलेला नाही. आपण यामध्ये जे चाललेले आहे ते कसे बरोबर आहे हेच दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

यानंतर श्री.गागरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार .....

यामध्ये आमचे कल्याण होणार नसून तुमच्या खात्याचे व महाराष्ट्र राज्याचे कल्याण होणार आहे. स्टॅम्प डयुटीच्या माध्यमातून जास्त पैसे मिळाले पाहिजेत. याबाबत माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मी माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना विनंती करतो की, त्यांनी पुन्हा एकदा प्रश्न सांगावा.

श्री.मधुकर सरपोतदार : मी माननीय मंत्री महोदयांना लक्षवेधी सूचनेतील एक परिच्छेद पुन्हा वाचून दाखवितो, "कमॉडिटी मार्केटच्या उलाढालीतून होणाऱ्या व्यापारावरील स्टॅम्प डयुटीची रक्कम वसूल करण्याची जबाबदारी ही राज्याच्या मुद्रांक महानिरीक्षकांवर असून ती वसूल करण्याबाबत त्यांनी दाखविलेली उदासीनता, कमॉडिटी मार्केटमधील व्यापारी स्टॅम्प डयुटीची कोटयावधी रुपयांची रक्कम बुडवीत असणे" ही वस्तुस्थिती आहे, त्याबाबत मंत्री महोदयांचे काय म्हणणे आहे ? तसेच या व्यवहारात मुद्रांक शुल्क विभागातील अधिकारी व कमॉडिटी मार्केटच्या व्यापाऱ्यांचे आर्थिक हितसंबंध आहेत अशा प्रकारची निश्चित माहिती माझ्याजवळ आहे, त्यासंबंधी मंत्री महोदयांचे काय म्हणणे आहे ? आपण लेखी उत्तरात याचा खुलासा केलेला नाही.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, अलीकडच्या काळात कमॉडिटी मार्केट ऑनलाईन झालेला आहे, हे आपणास माहिती आहे. मागील 2-3 वर्षात राज्याचा महसूल बुडाला अशा प्रकारची तक्रार माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी व्यक्त केली आहे. कमॉडिटी मार्केटमधून 2005-06, 2006-07 या कालावधीत राज्य सरकारला किती महसूल मिळाला याची आकडेवारी लेखी उत्तरात दिलेली आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, दरवर्षी 10 ते 11 कोटी रुपये राज्य शासनाला कमॉडिटी मार्केटमधून महसूल मिळत आहे. 2007-08 मध्ये आक्टोबरअखेर सुमारे 6 लाख 60 हजार रुपये महसूल मिळाला आहे. 31 मार्चपर्यत 5 ते 6 कोटी रुपयापर्यत यात वाढ होण्याची शक्यता आहे. माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी अशी तक्रार केली आहे की, मुद्रांक शुल्क विभागातील अधिकारी व व्यापारी यांचे आर्थिक हितसंबंध आहेत. याबाबत मी सांगू इच्छितो की, कमॉडिटी मार्केटमधील व्यवहार 2005 पासून ऑनलाईन सुरु असताना

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MMP/ D/

डॉ.राजेंद्र शिंगणे .....

सरकारला दोन वर्षे यातून कमी महसूल मिळाला आहे, हे मी मान्य करतो. आता मी आदेश दिला आहे की, या दोन वर्षांमध्ये कमॉडिटी व्यवहारात मुद्रांक शुल्क बुडविण्यात आले किंवा कसे ? संबंधित अधिकारी व व्यापाऱ्यांनी खात्याचा किती महसूल बुडविला आहे, याबाबत चौकशी करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. याची चौकशी दोन महिन्यात पूर्ण करुन अहवाल प्राप्त केला जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, एकंदरीत आकडेवारी बघितली तर 2006-07 व 2007-08 आक्टोबर अखेर मल्टी कमॉडिटी मार्केट व नॅशनल कमॉडिटी मार्केटमधून मिळणाऱ्या महसूलातून फार वाढ झालेली दिसत नाही. मात्र मंत्री महोदय म्हणत आहे की, महसूलात वाढ झालेली आहे. तुलनात्मकदृष्टया पाहिले तर फार वाढ झालेली दिसत नाही. मल्टी कमॉडिटी मार्केटमधून 2007-08 मध्ये आक्टोबर अखेर 4 कोटी 46 लाख 97 हजार 984 रुपये महसूल मिळाला आहे. पुढील तीन महिन्यात आणखी किती महसूल मिळणार आहे ?. ऑनलाईन पध्दतीमुळे महसूलात वाढ झाली, हे आपले म्हणणे किती योग्य आहे ?. ऑनलाईन पध्दतीमुळे महसूल कसा वाढतो ? यावर मॉनिटरींग सिस्टीम ठेवण्याची आवश्यकता आहे, ही सिस्टीम आपण ठेवणार का ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना चांगल्या आहेत, याबाबत आपण बॉम्बे स्टॉक एक्सचेंज व नॅशनल स्टॉक एक्सचेंज येथून व्यापाऱ्यांकडून स्टॅम्प डयुटी जमा करुन घेण्याचे काम बँक ऑफ इंडिया या शेअरहोल्डींग कंपनीस दिलेले आहे.

..... यानंतर कु.धनश्री.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे.....

MCAX व MCDX एक्स्चेंजमधील व्यापाऱ्याकडून स्टॅम्प डयुटी जमा करण्याचे काम बीओआय या बीओआय कंपनीला देण्यात आले आहे. आपण सांगितल्याप्रमाणे तेथे काम होत आहे अशी शंका निर्माण झाली आहे. त्या ठिकाणी मोठया प्रमाणात तांत्रिक व्यवहार होतात. आपल्याकडे असलेला कर्मचारी हा याबाबत अजून पूर्णपणे प्रशिक्षित नाही.यासर्व गोष्टींचा विचार करण्यात आला आहे.. यासर्व दृष्टीकोनातून व्यापारी पैसे बुडवितात ही गोष्ट खरी आहे. सभापती महोदय, ऑनलाईन व्यवहार आता झाल्यामुळे पुढच्या महिन्याच्या 10 तारखेपर्यंत सर्व व्यवहाराची नोंद करावी लागते. याव्यवहारामध्ये काही चूक होत असेल तर मी मघाशी आपल्याला सांगितल्याप्रमाणे, पुढील 2 महिन्यामध्ये मागील काही व्यवहाराची चौकशी करुन अहवाल मागविण्यात येईल.

...............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी. व मु.शी.** :बाल कामगार प्रथा निर्मूलन संदर्भात कार्यशाळे संबंधी घोषणा.

उपसभापती : आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO)दक्षिण आशियाई कार्यालय-नवी दिल्ली, यशदा, महाराष्ट्र शासन व लोक विकास संस्था तसेच राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने बाल कामगार प्रथा निर्मुलन संदर्भात महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांसाठी एक कार्यशाळा गुरुवार, दिनांक 29 नोव्हेंबर, 2007 रोजी जनसंपर्क कक्ष, पहिला मजला, जुनी इमारत, विधान भवन, नागपूर येथे सांयकाळी 5.00 वाजता आयोजित करण्यात आली आहे.

सदर कार्यशाळेचे उद्‌घाटन महाराष्ट्र विधानमंडळाचे माननीय पीठासीन अधिकारी यांच्या शुभ हस्ते व माननीय कामगार मंत्री, माननीय महिला व बालविकास मंत्री व माननीय शालेय शिक्षण मंत्री यांच्या सन्मान्य उपस्थितीत होणार आहे. तरी सर्व माननीय सदस्यांना विनंती करण्यात येत आहे की त्यांनी कार्यशाळेस उपस्थित राहून व्याख्यानांचा लाभ घ्यावा.

......

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सोलापूर जिल्हयातील उजनी,कनेर, कोयना प्रकल्पाच्या पुनर्वसनाबाबत झालेला गैरप्रकार.

**मु. शी.** : सोलापूर जिल्हयातील उजनी,कनेर, कोयना प्रकल्पाच्या पुनर्वसनाबाबत झालेला गैरप्रकार यासंबंधी सर्वश्री प्रतापसिंह मोहिते पाटील, संजय दत्त,रमेश निकोसे, ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. प्रतापसिंह मोहिते पाटील ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा ) : अध्यक्ष महाराज, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सोलापूर जिल्ह्यातील 109 गावठाणामध्ये उजनी, कनेर, कोयना प्रकल्पातील 17 हजार धरणग्रस्तांचे पुर्नवसन करण्यात आले असून पुर्नवसित गावठाणामध्ये 1 हजार एकर जमिनीच्या व्यवहारात कोटयावधी रुपयांचा गैरप्रकार झाल्याचे माहे 25 ऑक्टोबर, 2007 रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, याप्रकरणाची नागरिकांनी केलेली चौकशीची मागणी याकडे होत असलेले शासनाचे दुर्लक्ष यामुळे जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष व चिडीची भावना लक्षात घेता यासंदर्भात उच्चस्तरीय चौकशी करुन संबंधित दोषींवर तातडीने करावयाची कारवाई व राज्यशासनाची प्रतिक्रिया

डॉ. राजेंद्र शिंगणे ( महसूल व पुनर्वसनमंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, ऑक्टोबर 2007 मध्ये सोलापूर जिल्हयामध्ये, उजनी प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रामध्ये, जमीन वाटप करताना गैरव्यवहार झाल्याचे तक्रार श्रमिक मुक्ती दलाचे सर्वेसर्वा डॉ. भारत पाटील यांनी सोलापूर येथे केली आहे. यासंदर्भामध्ये, धरणग्रस्तांच्या मागणीसंदर्भात पुनर्वसन अधिकाऱ्यांनी एक बैठक घेतली होती. त्यामध्ये 2 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याची तक्रार करण्यात आली होती.

सभापती महोदय, याठिकाणी मला 3 प्रश्न विचारावयाचे आहेत. पहिला प्रश्न असा आहे की, यासंदर्भामध्ये माननीय मंत्रीमहोदय दखल घेऊन यासंदर्भात पुन्हा आढावा बैठक घेण्यात येईल काय ? तसेच या जमिनी ताब्यात घेताना दहशतीचा अवलंब मोठया प्रमाणात केला जातो. यासंदर्भात केल्या जाणाऱ्या तक्रारींची दखल पोलीस स्टेशनमध्ये केली जात नाही. या तक्रारदारांना संरक्षण देण्याचे काम मंत्री महोदय करतील काय तसेच तिसरा प्रश्न असा आहे की, या 109 गावठाणामध्ये ग्रामपंचायत स्थापन करण्यात आली आहे. परंतु त्याला महसुली दर्जा देण्यात आलेला नाही. त्यामुळे या ठिकाणी शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याबाबत शासनाकडून कार्यवाही करण्यात येईल काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मोहिते-पाटील यांनी सोलापूर जिल्हयातील उजनी, कनेर, कोयना प्रकल्पातील धरणग्रस्तांच्या पुनर्ससनाबाबत येथे प्रश्न मांडला आहे. तेथे जमिनी व्यवहारामध्ये कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असल्याची तक्रार करण्यात आली आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, मी स्वत: तेथील अधिकारी, जिल्हाधिकारी यांना फोन करुन माहिती घेण्याचा प्रयत्न केला. यासंदर्भात कोणतीही तक्रार आलेली नाही असे त्यांनी सांगितले. तरी देखील सन्माननीय सदस्यांनी जी तक्रार केली आहे त्याबाबत माहितीच्या अधिकाराअंतर्गत माहिती घेऊन त्याबाबत ताबडतोब कार्यवाही केली जाईल्. त्याचबरोबत ग्रामपंचायतींना महसुली दर्जा देण्याबाबत जे प्रश्न विचारले आहे, त्या संदर्भात तपासणी करुन कारवाई केली जाईल.

डॉ. निलम गो-हे : सभापती महोदय, प्रकल्पग्रस्तांच्या संदर्भात इतर जिल्यांमध्ये प्रश्न निर्माण झाला होता त्यावेळी असा प्रश्न आम्ही उपस्थित केला होता की,धरणग्रस्त लोकांना कोणत्या जमिनी शासनाकडून देण्यात आल्या आहेत ?

यानंतर श्री. सरफरे.......

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे : त्या संदर्भात सुध्दा ताबडतोबीने तपासून कारवाई केली जाईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, प्रकल्पग्रस्तांच्या संदर्भात प्रश्न आला असतांना मी मुद्दा उपस्थित केला होता. जे प्रकल्पग्रस्त आहेत त्यांना आपण कोणती जमीन दिली? या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला आपण उत्तर दिले होते. ते उत्तर या लक्षवेधी सूचनेला लागू आहे. प्रश्न असा आहे की, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन कशाप्रकारे झाले आहे याचे प्रत्येक जिल्हयाचे अहवाल दिले पाहिजेत. कारण आज महाराष्ट्रातून एकेक तक्रारी यायला लागतात. याबाबत सरकारची अधिकृत भूमिका काय आहे? सरकारने त्यांना कोणत्या प्रकारच्या सुविधा दिल्या होत्या याची माहिती स्पष्ट झाली पाहिजे.प्रत्येक जिल्हयामध्ये वेगवेगळे प्रकल्पग्रस्त आहेत. सोलापूर जिल्हयामधील प्रकल्पग्रस्तांचा अहवाल आपण केला आहे काय? केला नसेल तर सोलापूरच्या प्रशासनामार्फत हा अहवाल उपलब्ध करुन आपण तो विधीमंडळ सदस्यांना उपलब्ध करुन देणार काय? जेणेकरुन प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनाबाबतचे चित्र स्पष्ट होईल.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, या ठिकाणी परवाच्या दिवशी कोयना धरणाच्या संदर्भात उपस्थित झालेल्या प्रश्नावर चर्चा करीत असतांना त्या संदर्भातील अहवाल तीन महिन्याच्या आत सभागृहाला सादर करण्याचे आश्वासन दिले होते. सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी केलेली सूचना निश्चितच स्वागतार्ह आहे. राज्यातील अनेक जिल्हयामध्ये अशाप्रकारचे प्रकल्प झाल्यानंतर शासनाच्या माध्यमातून तेथील प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवितांना त्यामध्ये शेत जमीन देण्यासंबंधीचा प्रश्न असेल, घराचा मोबदला देण्याचा प्रश्न असेल, शेतजमिनीचा मोबदला देण्याचा प्रश्न असेल किंवा नवीन गावठाणाचा प्रश्न असेल, प्रकल्पग्रस्तांना दाखले देण्याचा प्रश्न असेल, किंवा नवीन निर्माण केलेल्या नागरी वस्तीमध्ये सुविधा देण्याबाबतचा प्रश्न असेल असे प्रश्न राज्याच्या अनेक भागामध्ये आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे प्रत्येक जिल्हयामध्ये जे प्रकल्प सुरु आहेत, त्या जिल्हयातील सर्व लोकप्रतिनिधी आणि आपल्या सभागृहाच्या माध्यमातून सर्वांना प्रकल्पग्रस्तांच्या प्रगती बाबतचा अहवाल सादर करण्याबाबत शासन नक्कीच विचार करील.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 8 संबंधी**

**उपसभापती** : कामकाजाच्या क्रमातील आठव्या क्रमांकावर असलेली लक्षवेधी सूचना उपस्थित करणारे माननीय सदस्य सर्वश्री भास्कर जाधव, गुरुनाथ कुलकर्णी व जितेंद्र आव्हाड सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. तसेच, संबंधित मंत्रिमहोदय दुसऱ्या कामाकरिता गेले आहेत...

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, संबंधित लक्षवेधी सूचना ही सामान्य प्रशासन विभागाकडे ट्रान्सफर झाली असल्यामुळे संबंधित मंत्रिमहोदयांनी ती नंतर घेण्याबाबत विनंती केली आहे. या लक्षवेधी सूचनेचे संबंधित माननीय सदस्य जाणुनबुजून अनुपस्थित आहेत अशातला भाग नाही.

---

**लक्षवेधी सूचना क्रमांक 9 संबंधी**

**उपसभापती** : माननीय मंत्री श्री. विनय कोरे यांनी त्यांना लवकर जावयाचे असल्यामुळे लक्षवेधी सूचना क्रमांक 9 ही अगोदर घेण्यासंबंधी विनंती केली होती. त्यांच्या विनंतीनुसार लक्षवेधी सूचना अगोदर चर्चेला घेतली. सभागृहामध्ये आपण सर्व माननीय सदस्यांकरिता आणि मंत्रिमहोदयांकरिता जर ते सभागृहात उपस्थित नसतील तर ती लक्षवेधी सूचना बाजूला ठेवून त्यापुढील लक्षवेधी सूचना घेतो. मघाशी माननीय कामगार मंत्री माझ्यावर भडकले आणि त्यांनी मला सांगितले की, हे बरोबर नाही. आपण सभागृहाच्या कामकाजाचा वेळ वाया घालवीत आहात. माननीय सदस्य सकाळी 10.15 वाजल्यापासून सभागृहात उपस्थित असल्यामुळे माननीय सभापतींनी मला सूचना केली होती की, पहिली लक्षवेधी सूचना झाल्यानंतर आपण चहापानाची सुट्टी घ्यावी. त्याप्रमाणे पहिली लक्षवेधी सूचना पुकारल्यानंतर संबंधित मंत्रिमहोदय सभागृहामध्ये उपस्थित नव्हते. त्यानंतर पुढील लक्षवेधी सूचना घेण्याबाबत माननीय सदस्यांकडे विचारणा केली असता, माननीय सदस्यांनी चहापानाकरिता सुट्टी घेण्याची मागणी केली. असे असतांना मंत्रिमहोदयांकडून पिठासीन अधिकाऱ्यांवर आरोप करण्यात आले की, आपण सभागृहाचा वेळ वाया घालविता. हे योग्य झाले नाही असे मला वाटते. आता कमांक 1 वरील लक्षवेधी सूचना चर्चेकरिता घेण्यात येईल.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. व मु.शी. : □म□ज सल्ला□र समितीचा अहवाल सभा□ृहाला सादर □र□
व संमत □रु-ा घे□

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अ-ुमती-े □म□ज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभा□ृहाला सादर □रतो. विधान परिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक गुरुवार, दिनांक 29 नोव्हेंबर 2007 रोजी दुपारी 3.30 वाजता विधान भवन, नागपूर येथे झाली. सदरहू बैठकीत समितीने विचारविनिमय करुन शुक्रवार, दिनांक 30 नोव्हेंबर 2007 व शनिवार, दिनांक 1 डिसेंबर, 2007 पर्यंतचे सभागृहाचे कामकाज पुढीलप्रमाणे असावे असा निर्णय घेतला.

शुक्रवार, दिनांक 30 नोव्हेंबर, 2007 : सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10 ते दुपारी 1.00
या बैठकीत शासकीय विधेयके घेण्यात येतील.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.15 वाजता
1) अंतिम आठवडा प्रस्ताव
2) निवृत्त होणाऱ्या सदस्यांचा निरोप
3) अशासकीय कामकाज (विधेयके)

शनिवार, दिनांक 1 डिसेंबर, 2007 : सभागृहाची बैठक सकाळी 10.00 वाजता
प्रश्नोत्तरे होणार नाहीत. लक्षवेधी, शासकीय विधेयके
यासह सर्व उरलेले कामकाज

**उपसभापती** : □म□ज सल्ला□र समितीचे प्रतिवृत्त सभा□ृहाला सादर झाले आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, □म□ज सल्ल□र समितीचे प्रतिवृत्त सभा□ृहास संमत आहे असा मी आपल्या अ-ुमती-े प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टा□-ा संमत झाला.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MAP/ D/

पृ. शी. : खानदेश विभागातील आदिवासी टोकरी कोळी व महादेव कोळी या समाजाला आदिवासी (एस.टी.) चे दाखले न मिळणे

मु. शी : खानदेश विभागातील आदिवासी टोकरी कोळी व महादेव कोळी या समाजाला आदिवासी (एस.टी.) चे दाखले न मिळणे यासंबंधी श्री. अरुण गुजराथी, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अरुण गुजराथी ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील विविध भागामध्ये विशेषत: खानदेश विभागातील आदिवासी टोकरी कोळी व महादेव कोळी या समाजास आदिवासी (एस.टी) चे दाखले अद्यापही न मिळणे, मागील दहा वर्षापासून खानदेशातील कोळी समाजाला टोकरी कोळी समाजाचे दाखले मिळावेत म्हणून वेळोवेळी केलेले आंदोलने व वेळोवेळी विधायक मार्गाने नोंदविलेले निषेध तरी देखील शासनाचे यासंदर्भात झालेले दुर्लक्ष, नुकतेच जळगांव येथे कोळी बांधवानी केलेले उपोषण तरी देखील शासनाने कार्यवाही न करणे,तसेच गेल्या 20-25 वर्षापासून जे कर्मचारी राज्य शासनाच्या सेवेत नोकरी करीत आहेत त्यांच्या दाखल्यांची आता होत असलेली तपासणी व चुकीचे दाखले दिलेले आहेत असे गृहित धरुन शासकीय सेवेत काम करणाऱ्या कोळी समाजातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर होत असणारी कठोर कारवाई शासनाकडे निदर्शनास आणून देखील शासनाने या संदर्भात कोणतीही दखल न घेणे व दाखले तपासणी सुरु ठेवणे, तसेच ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिकेच्या निवडणुकांमध्ये कोळी, धनगर इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी) समाजाच्या जातीच्या दाखल्यांचे निवडणूकीपूर्वी तपासणी न करता निवडणुकीनंतर जातीचे दाखले अवैध ठरविणे व पुन:श्च निवडणुका घेणे त्यामुळे कोळी व इतर अनुसूचित जाती जमातीमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, यासंदर्भात शासनाचे होत असलेले दुर्लक्ष व करण्यांत येणारी कारवाई."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित (आदिवासी विकासमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

.... ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, जळगाव जिल्हयामध्ये टोकरे कोळी आदिवासी या समाजाला जातीचे दाखले देत असतांना योग्य ती पध्दत आणि नियम यांचा अवलंब होत नाही. एका खोलीतील एका भावाला टोकरे कोळी म्हणून प्रमाणपत्र दिले जाते. आणि दुसऱ्या भावाला नाकारले जाते. ही पध्दत योग्य करण्यासंदर्भात माननीय आदिवासी विकास मंत्री सदनात आहेत. ते जिल्हयाचे पालक मंत्री सुध्दा आहेत. आपल्याला या विषयाची कल्पना आहे. माननीय मंत्री श्री.चंद्रकांतजी हंडोरे याठिकाणी होते. परवाच्या 25-30 हजारांच्या मेळाव्याला ते उपस्थित होते. ही पध्दत योग्यरितीने राबविण्याबाबत शासन विचार करील काय? दुसरा प्रश्न असा की, नोकरीला लावल्यानंतर 5-7 वर्षानंतर आपण त्याचा दाखला तपासतो. ही मर्यादा 2005 पर्यंत आणण्याचा शासन विचार करील काय?

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ D/ MAP/ 16:55

लक्षवेधी सूचना क्र.1.... श्री.अरुण गुजराथी..........

निवडणुकीत निवडून आल्यानंतर आपण म्हणता हा अवैध दाखला आहे. परवाच नागपूर महानगरपालिकेच्या दहा वॉर्डच्या निवडणुका पुनश्च झाल्या. या तीनही बाबत शासन काय विचार करणार आहे?

डॉ.विजयकुमार गावित :जे दाखले दिले जातात, ते नियम आणि पध्दतीनुसार दिले जातात. आतापर्यंत जे काही दाखले दिले गेले आहेत ते साधारपणे जून, 2007 पासून दिले गेले आहेत. याठिकाणी सुप्रीम कोर्टाने काही निर्णय दिले आहेत. सुप्रीम कोर्ट निर्णय देत असताना आपण 15 जून, 1995 चे प्रोटेक्शन दिले ते देता येत नाही अशा प्रकारचा निर्णय दिला असल्यामुळे त्याठिकाणी पुन्हा विधी व न्याय विभागाशी विचारणा करीत आहोत. वैयक्तिक केस होती की जनरल केस होती याची तपासणी करीत आहोत. त्यानुसार जे नोकरीमध्ये लागतात त्यांनी मागाहून जात पडताळणी करावयाची आणि 1995 च्या अगोदर प्रोटेक्शन द्यायचे. असे आतापर्यंत चालू आहे. विधी व न्याय विभागाचा अहवाल आल्यानंतर त्या विभागाकडून ज्या सूचना केल्या जातील त्या सूचनांप्रमाणे कारवाई करावी लागेल. निवडणुकीबाबत जात पडताळणी करुन दाखला दिला पाहिजे. परंतु शासनाने आता निवडणुकीच्या वेळेला सर्व जात पडताळणीची कागदपत्रे सादर करावयाची आणि चार महिन्याच्या आत आपल्याला जात पडताळणी प्रमाणपत्र द्यायचे आहे. ते दिले नाही तर आपोआप वैध ठरणार आहे. म्हणून जात पडताळणीसाठी जी कागदपत्रे लागतात ती सर्व कागदपत्रे दिली तर ताबडतोब जात पडताळणीचा दाखला दिला जाईल.

श्री गुरुमुख जागवानी :सभापति महोदय, जलगांव में कोळी समाज बहुत पिछड़ा है. कोळी समाज को आदिवासी (एस.टी.) की सूची में शामिल किया जाए, इस मांग को लेकर कोळी समाज आंदोलन कर रहा है. इसलिए क्या मंत्री महोदय आश्वासन देंगे कि वे कोळी समाज को एस.टी. की सूची में शामिल करेंगे, दूसरा मेरा यह प्रश्न है कि 1995 के पहले के जिन लोगों के पास जाति प्रमाणपत्र है, लेकिन जांच-पड़ताल नहीं हुई है, उनके प्रमाणपत्रों की जाँच-पड़ताल कब तक की जाएगी और तीसरा मेरा प्रश्न यह है कि 9 प्रतिशत राशि महाराष्ट्र के एस.टी. के लिए बजट में रखी गई है. जलगांव में एस.टी. के लोगों के लिए और कोळी समाज के लोगों के लिए जो खर्च हो रहा है, उसका फायदा कोळी समाज के लोगों को मिल रहा है या नहीं ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.1....

डॉ.विजयकुमार गावित :सभापति महोदय, मैं सम्माननीय सदस्य को बताना चाहता हूं कि कोळी समाज स्पेशल बॅकवर्ड क्लास के अन्तर्गत आता है. इस वजह से उन्हें आदिवासियों को मिलने वाली सुविधा नहीं मिल सकती है. 1995 के पहले जिनकी जात पड़ताल हो गई है वे आदिवासी में ही आते हैं.जिन्होंने जात पड़ताल प्रमाणपत्र के लिए अर्जी की है, वे जाति संबंधी आवश्यक प्रमाणपत्र देंगे तो एक महीने के अन्दर जात पड़ताल प्रमाण पत्र दे दिया जाएगा.

(**सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.उल्हास पवार**)

(नंतर श्री.जुन्नरे...

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ 5.00 वाजेपर्यंत होती परंतु सभागृहाची वेळ सभागृहाचे कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपण सभागृहाची वेळ सभागृहाचे कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे असे सांगितलेले आहे.सभागृहाचे सर्व कामकाज रात्रीचे 12.00 वाजले तरी संपणार नाही. त्यामुळे आमचा याला विरोध आहे. अशा रितीने सदनाचा वेळ वाढवून देणे योग्य नाही. सभागृहाची वेळ रात्रीच्या 8,9 पर्यंत आपण वाढविली असते तर त्याला आमचा विरोध राहिला नसता.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज रोज रात्रीच्या 11,12 वाजेपर्यंत सुरु आहे. या ठिकाणी स्थानिक कार्यक्रम असतात त्या कार्यक्रमांना आम्हाला उपस्थित राहावे लागते. तसेच आम्ही रोज किती तास कामकाज करावे याला सुध्दा काही मर्यादा आहेत. 10-10,12-12 तास काम करणे ही हद् झाली. आम्ही सकाळी 10.00 वाजल्यापासून येथे आलेलो असतो.

**तालिका सभापती** : निवृत्त सदस्यांना निरोप देण्याचा कार्यक्रम आजच्या कार्यक्रम पत्रिकेत दर्शविण्यात आलेला आहे परंतु हा कार्यक्रम आपण उद्या घेणार आहोत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, निवृत्त होणा-या सदस्यांना निरोप देण्यासाठी गेल्या तीन दिवसापासून हिरवळीवर मंडप घालण्यात आलेला आहे.या मंडपाच्या दो-याही सुटलेल्या आहेत आता या मंडपाचे कापडही सुटेल की काय असे वाटावयास लागले आहे. तीन दिवसांपासून आपण कामकाजपत्रिकेत निवृत्त सदस्यांना निरोप देण्याचा विषय देत आहात. परंतु त्यांना काही निरोप दिला जात नाही. त्यामुळे माझी निवृत्त सदस्यांना निरोप देण्याच्या कार्यक्रमांच्या संदर्भात सूचना आहे की, आपण यासाठी एक स्पेशल दिवस ठरवा, येथे नाही तर हा कार्यक्रम बाहेर आयोजित करा परंतु ठरलेल्या दिवशीच निवृत्त सदस्यांना प्रेमाने निरोप द्यावा, कृपया निवृत्त सदस्यांचा अशा प्रकारे अपमान करु नये असे मला वाटते.

**तालिका सभापती** : फेब्रुवारी महिन्यात हे सन्माननीय सदस्य निवृत्त होणार आहेत. मार्चमध्ये पुढील अधिवेशन असल्यामुळे त्यांना त्या अधिवेशनात निरोप देण्यांची संधी मिळणार नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : निवृत्त सदस्यांना निरोप दिला जाणार आहे त्यामुळे त्यांना आपण येथे बोलावता आणि उद्या, परवा, तरवा निरोप दिला जाईल असे सांगता हे काही बरोबर नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताईवर अगोदरच अन्याय झालेला आहे, त्यांना मंत्री न करता राज्यपालांच्या प्रस्तावावर बोलण्याचीच संधी दिली जाते. त्यामुळे सदस्यांना निरोप देण्याचा दिवस काय तो फिक्स करा आणि सदस्यांना त्याच दिवशी प्रेमाने निरोप द्यावा अशी विनंती आहे.

**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

श्री. दिवाकर रावते : लक्षवेधी सूचनेनंतर निश्चित कोणते कामकाज घेतले जाणार आहे याची आम्हाला माहिती नाही. परंतु शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात आम्ही नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला होता त्या प्रस्तावावर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या ठिकाणी उत्तर देण्याची आवश्यकता आहे. विरोधी पक्षाचा प्रस्ताव या ठिकाणी येऊ शकलेला नाही त्यासंदर्भात आम्ही आपल्याला दोष देत नाही. परवा अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा होणार आहे त्यामुळे आम्ही दिलेल्या नियम 289 च्या प्रस्तावावर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आजच उत्तर द्यावे असे आम्हाला अपेक्षित आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जो मुद्दा मांडला त्यावर बोलण्यासाठी उभा आहे.

निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना निरोप हा आता चेष्टाचा विषय झालेला आहे. दिवंगत श्री.प्रमोद नवलकर यांच्या निरोप समारंभाच्यावेळीसुध्दा त्यांची अशी अवहेलना झाली होती. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री उपस्थित राहिले नाहीत. प्रमोद नवलकर जग सोडून गेले पण त्यांची करण्यात आलेल्या अवहेलनाची त्यांना सल होती. यावेळी सुध्दा गेल्या आठवड्यापासून हा प्रकार सुरु आहे, तो कृपया आपण थांबवावा. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप देण्यासाठी एक दिवस निश्चित करावा आणि त्याच दिवशी त्यांना निरोप द्यावा.

**सभापती** : आपण 12 सन्माननीय सदस्यांना निरोप देणार आहोत. हा कार्यक्रम उद्या, शुक्रवार, दिनांक 30 नोव्हेंबर, 2007 रोजी दुपारी 4.00 ते सायंकाळी 6.00 या वेळेत घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आजच्या दिवसाच्या कामकाजाबद्दल मुद्दा उपस्थित झाला. त्यावेळी तालिका सभापतींनी "आजचे कामकाज संपेपर्यंत सभागृह चालेल" असे सांगितले. त्यावरुन हा प्रश्न उपस्थित झालेला आहे. कामकाजाला सुरुवात करण्यापूर्वी आपण किती वाजेपर्यंत कामकाज चालेल याची माहिती आम्हाला मिळाली तर बरे होईल. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी रात्रौ 8.30 पर्यंत कामकाज चालवावे, यावेळेत जेवढे कामकाज होईल तेवढे आपण पूर्ण करु या अशी सूचना केलेली आहे. नंतर आम्ही यावर काही मुद्दा उपस्थित केल्यास सांगण्यात येते की, सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविली त्यावेळी का सांगण्यात आले नाही. म्हणून मला हा विषय मांडावा लागला.

**सभापती** : या संदर्भात कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा झाली. आपल्यासमोर असणारे कामकाज येत्या दोन-तीन दिवसांत पूर्ण करायचे आहे. म्हणून आपण गेल्या तीन-चार दिवसांपासून जास्त वेळ बसून कामकाज पूर्ण करण्यास सहकार्य दिलेले आहे. मी एवढेच सांगू इच्छितो की, आजचे कामकाज पूर्ण करण्याच्या दृष्टीने आपण चर्चेला सुरुवात करु या. ही चर्चा करीत असताना जर एखादे कामकाज पूर्ण होणे शक्य नसेल तर ते कामकाज कसे पूर्ण करायचे याबाबत आपण शेवटी निर्णय घेवू.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**...........

आज कामकाजपत्रिकेवर विनियोजन विधेयक दाखविण्यात आलेले आहे. हे विधेयक विधानसभेत मंजूर झालेले नाही. ते मंजूर होऊन आल्यानंतर याठिकाणी सर्वांच्या संमतीने ते मंजूर केले जाईल.

विनियोजन विधेयकानंतर माननीय मुख्यमंत्र्यांचा 106 अन्वये शासकीय ठराव आहे. त्यावर चर्चा करणार आहोत.

आज विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येणार नाहीत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, राज्यात होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या या विषयावरील माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर आजच घ्यावे अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, यु.एल.सी.वरील अपूर्ण राहिलेली चर्चा आपण प्रथम पूर्ण करु. ही चर्चा लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने आपण सहकार्य करावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, आपण प्रथम शेतकऱ्यांच्या आत्महत्या संदर्भातील प्रस्तावरील माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर घ्यावे. कारण यु.एल.सी.वर कितीही वेळ चर्चा होऊ शकते.

**सभापती** : मी या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांना विचारून घेतो आणि नंतर या संदर्भात निर्णय देतो.

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**....

तोपर्यंत आपण शासकीय ठरावावर चर्चेस सुरुवात करु. युलसीच्या शासकीय ठरावावर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते ऑन-लेग आहेत.

श्री.दिवाकर रावते : शेतक-यांच्या प्रस्तावावर प्रथम निर्णय द्या, तसेच मी सचिवांना पत्र दिलेले आहे, त्यासंदर्भातही आपण निर्णय द्या. त्यानंतर आपण चर्चा करु. विरोधी पक्षास न्याय द्यावयाचा नाही, हे योगय नाही.

श्री.मधुकर सरदोतदार : नियम 289 अन्वये शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंदर्भातील चर्चा सदनामध्ये उपस्थित करण्यात आली, ती चर्चा बराच वेळ चालली. त्यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदय 29 तारखेला उत्तर देतील असे ठरले होते, त्यामुळे आपण प्रथम त्यांच्याकडून उत्तर घेऊ.

श्री.नितीन गडकरी : माननीय मुख्यमंत्री महोदय उत्तर देण्यास तयार असतील त्यांच्याकडून प्रथम आपण उत्तर घेऊ.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, याठिकाणी लक्षवेधी क्रमांक 1 वर चर्चा सुरु आहे. ती संपल्यानंतर मग कोणते कामकाज घ्यावयाचे आहे, ते ठरवावे.

**सभापती** : ठीक आहे. प्रथम आपण लक्षवेधी सूचनेवरील चर्चा पूर्ण करुन घेऊ.

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, कोळी समाजात विविध पोटजाती आहेत. परंतु त्या जातीला आपण एकाच संवर्गात घेतलेले नाही. त्यामुळे कोळी जातीच्या लोकांना जातीचे प्रमाणपत्र मिळण्यामध्ये अनंत अडचणी निर्माण झालेल्या आहेत. आपण काही जणांना ओबीसी म्हणता, काहींना एसटी तर काहींना एसबीसी म्हणता. ही एकच कोळी जमात असून त्या समाजासाठी एकाच जातीचे प्रमाणपत्र मिळाले पाहिजे. आपण वडिलांना एका जातीचे प्रमाणपत्र देत आहात, मुलाला दुस-याच जातीचे देत आहात व भावाला तिस-याच जातीचे प्रमाणपत्र देत आहात, हे कुठेतरी थांबले पाहिजे. आज एकाच कुटुंबातील तीन लोकांना तीन प्रकारचे प्रमाणपत्र मिळत आहेत. त्यामुळे कोळी समाजाच्या लोकांना एकच संवर्गाचे प्रमाणपत्र मिळाले पाहिजे. या समाजाच्या मुलास नोकरी लागल्यानंतर 5-6 वर्षानंतर त्याला नोकरीतून कमी केले जाते. ही अन्यायकारक बाब असून याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा, ही विनंती.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, कोळी जातीमध्ये ढोर कोळी, महादेव कोळी, टोकरे कोळी, मल्हार कोळी अशा वेगवेगळया जाती असून त्यांच्या चालीरितीमध्ये, संस्कृतीमध्ये विभिन्नता आहे. याबाबतीतील जात पडताळणीच्या दृष्टीने जे निकष आहेत ते निकष पूर्ण करत असतील तर त्यांना त्या जमातीचे प्रमाणपत्रे निश्चितपणे मिळतील. त्यानंतर दिनांक 15 जून,1995 च्या अगोदर ज्यांनी एसटी जातीचा आधार घेऊन दाखला घेतला असेल तर त्यांना प्रोटेक्शन आहे, ते आजपर्यंत प्रोटेक्शन आहे. परंतु रिसेंटली सुप्रीम कोर्टाने एका केसमध्ये निर्णय दिलेला आहे की, आता अशाप्रकारचे कुठलेही प्रोटेक्शन त्यांना देता येणार नाही. तरीसुध्दा यासंदर्भात आपण विधी व न्याय विभागाकडून निर्णय मागितलेला आहे, त्याबाबतीतील निर्णय आल्यावर त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, अगोदर बीड जिल्हयामध्ये महादेव कोळी जातीची प्रमाणपत्रे मिळत होती, परंतु हल्ली बीड जिल्हयात महादेव कोळी समाजच नाही अशाप्रकारचा समज करुन तेथील या समाजाच्या लोकांना प्रमाणपत्र दिले जात नाही, त्यामुळे याबाबतीत शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, औरंगाबाद विभागाची माहिती माझ्याकडे आहे. याबाबतीतील बीड जिल्हयाची माहिती मी पटलावर ठेवतो. महादेव कोळी जातीची 27 प्रकरणे औरंगाबाद विभागामध्ये वर्ग केलेली असून महादेव कोळीची 1094 प्रमाणपत्रे देण्यात आलेली आहेत व 42 प्रकरणे ही अवैध ठरलेली आहेत.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, जात पडताळणी प्रमाणपत्रांच्या बाबतीत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. पैसा कमाविण्याचे काम जोरात सुरु आहे. मी आपल्याला उदाहरण म्हणून देतो की, सोनार ही जात आहे, त्यांना देवेज्ञ ब्राम्हण असेही म्हटले जाते. पण सोनार म्हणा किंवा देवेज्ञ ब्राम्हण म्हणा दोन्ही एकच आहे. त्याचप्रमाणे वैश्य वाणी आणि वाणी या दोन जाती नाही तर एकच जात आहे. ही वस्तुस्थिती असतांना या समित्या कोणते संशोधन करतात माहित नाही पण अशा अर्जांना डिसक्वालिफाय केले जाते. पैसे कमाविण्याचा एक धंदा या निमित्ताने सुरु आहे. जात प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे अनेक उमेदवार कोर्टात जातात, कोर्टातून निकाल लागण्यास वेळ लागतो व त्यांचे लाखो रुपये खर्च होतात. हे काय चालले आहे ? जात पडताळणी समितीकडून कोणते निकष लावले जातात, याची कल्पना नाही. हे सर्व निकष तपासून बघितले पाहिजेत. सन्माननीय सदस्य श्री.धोंडिराम राठोड यांनी जो प्रश्न विचारला आहे तो याच स्वरुपाचा आहे. सध्या ज्या केसेस कोर्टात आहेत त्याची तपासणी करुन कोणते निकष लावले आहेत हे एकदा तपासून बघितले पाहिजे. मात्र खर्च केला तर प्रमाणपत्र लगेच उपलब्ध होते. या समितीला जात प्रमाणपत्र देण्याचे अधिकार आहेत, जात बदलण्याचे अधिकार नाहीत. मी आपल्याला यासंदर्भात एक उदाहरण देऊ इच्छितो. एका उमेदवाराला जात प्रमाणपत्र नाकारले गेले व नंतर त्याच उमेदवाराला ते प्राप्त झाले, हा काय धंदा चालू आहे ? निवडणुकांचे अर्ज जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी पाठविले जातात, नाकारले तर गरीब उमेदवाराला कोर्टात जावे लागते, त्यांना हा खर्च परवडणारा नसतो.

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, कोणत्या समाजाला जातीचे दाखले दिले जावेत यासंबंधीची मार्गदर्शक तत्वे ठरलेली आहेत. त्या निकषानुसारच प्रमाणपत्र दिले जाते.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, आमच्या भागात ठाकर समाज आहे. जुनी संस्कृती जपण्याचे काम ते करतात. पूर्वी त्यांचा एस.सी.मध्ये समावेश होता. यामधील काही लोक जिल्हा परिषदेमध्ये नोकरीला आहेत, त्यांच्याकडून बॉण्ड घेण्यात आला होता. आता त्यांना नोटीस काढण्यात आली असून सेवेतून काढून टाकण्याबाबत कळविले आहे. यासंबंधीचा खुलासा मंत्रीमहोदयांनी करावा. त्याचप्रमाण वैश्यवाणी किंवा वाणी यांचा समावेश ओ.बी.सी.मध्ये होता. परंतु, यासंदर्भातही अनेक लोकांना प्रमाणपत्र नाकारले जाते. यासंदर्भातही मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा.

...2.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेले प्रश्न मूळ लक्षवेधी सूचनेशी संबंधित नाहीत.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये अनेक जिल्हयांमध्ये कोळी समाज आहे, आमच्याही जिल्हयात आहे. 25 वर्षांपासून हे लोक शासकीय सेवा करीत आहेत. परंतु, आज त्यांना नोटीस काढण्यात आली आहे. हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. हा प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्याच्या दृष्टीने त्या त्या जिल्हयातील स्थानिक आमदारांबरोबर बैठका घेऊन किंवा समिती स्थापन करुन प्रश्न तातडीने सोडविण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्न करणार काय ?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, 15 जूनच्या आदेशानुसार या लोकांना प्रोटेक्शन देण्यात आले आहे. कास्ट व्हॅलिडेटी कमिटी कार्यरत असल्यामुळे दुसरी समिती नेमता येणार नाही. यापूर्वी ब-याच समित्या नेमण्यात आल्या होत्या व त्यांचे अहवालही प्राप्त झाले आहेत.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, जात पडताळणी समितीमध्ये तीन अधिकारी असतात. त्यापैकी दोन अधिकारी शासनाच्या अखत्यारीत येतात. काही वेळा या अधिका-यांवर दबाव टाकून बरेच उमेदवार डिस्क्वॉलिफाय झालेले आहेत. शासनाचा जी.आर.आहे की, जात निश्चित करतांना समितीला संशय वाटला तर आजुबाजूला तपासणी करुन त्याची जात निश्चित करावी. परंतु आदेश बाजूला ठेऊन सक्षम दर्जाचा अधिकारी न नेमता मुंबई महानगरपालिकेतील ब-याच नगरसेवकांचे नगरसेवक पद रद्द करण्यात आलेले आहे. सक्षम दर्जाचा अधिकारी नेमून आपण पुन्हा त्यांची जात पडताळणी करणार आहात काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, आपण दक्षता पथक नेमलेले आहे. जात पडताळणी करत असतांना ज्यावेळी समितीला संशय वाटतो त्यावेळी दक्षता पथक ज्या उमेदवाराची जात पडताळणी करावयाची आहे त्याच्या गावी जाऊन माहिती घेतात. त्या उमेदवाराने सादर केलेले कागदपत्र आणि दक्षता पथकाने दिलेला अहवाल तपासून त्या उमेदवाराला जात पडताळणी प्रमाणपत्र दिले जाते. जात पडताळणी प्रमाणपत्र देणारा अधिकारी शासनाचा असतो आणि त्यांना क्वॉसी ज्युडिशीयल पॉवर्स असतात.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित आहेत. मी त्यांना विनंती करतो की, जात पडताळणीच्या संदर्भात निकष बदलून यातून काही मार्ग निघतो काय हे त्यांनी बघावे. कोळी समाज, हलबा समाज परवा धनगर समाजाने मोर्चा काढला होता याची योग्य पद्धतीने पुनर्रचना करुन शासनाने योग्य तो मार्ग काढावा. तामिळनाडू शासनाने 7 टक्के आरक्षणाचा प्रस्ताव केलेला आहे. ज्यांना आदिवासी म्हणून, अनुसूचित जमाती म्हणून आरक्षण मिळत नाही त्यांना तामिळनाडू प्रमाणे 7 टक्क्याचे आरक्षण द्यावे. यासाठी शासनाला संविधानात तसा बदल करावा लागेल. यासाठी राज्य शासन केंद्र शासनाला विनंती करेल काय ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी जो प्रश्न विचारला तो अतिशय महत्वाचा आहे. कारण जात ठरविण्याचा अधिकार सरकारचा नाही. आपण आयोग नेमलेला आहे, तो आयोग यासंदर्भातील सर्व माहिती घेऊन कोणती जात आहे हे ठरविले जाते. राज्य शासनाकडे ओ.बी.सी. पर्यंतचे अधिकार आहेत. एस.सी., एस.टी. चे अधिकार

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख .........

राज्य शासनाकडे नाहीत. राज्य शासन त्यासंदर्भात शिफारस करु शकते. जाती संदर्भात आता नवीन नवीन वाद निर्माण झालेले आहेत, ही गोष्ट खरी आहे. मला हलबा समाजाचे शिष्टमंडळ भेटले होते. टोकरे कोळी, कोळी, महादेव कोळी असे अनेक वाद महाराष्ट्रात आहेत. तामिळनाडू राज्याने जी पद्धत स्वीकारलेली आहे त्याचा अभ्यास करुन राज्य शासन त्याचा जरुर विचार करेल.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>कामकाज पत्रिकेतील क्रमाबाबत.</u>

**सभापती** : विधानसभेतून विनियोजन विधेयक आल्यानंतर ते विधेयक या सभागृहामध्ये मांडावे, अशी सूचना मी मघाशी केलेली आहे. त्यानंतर माननीय मुख्यमंत्री महोदयांचा महाराष्ट्र विधानपरिषद नियम 106 अन्वये जो ठराव आहे तो चर्चेला घ्यावा, अशी मी मघाशी सूचना केली होती. तसेच, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 97 अन्वये राज्यातील विशेषत: विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्या या विषयावरील अल्पकालीन चर्चेचे उत्तर पूर्ण करावे, अशी विनंती केलेली आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, त्या आधी विशेष उल्लेख घ्यावेत.

**सभापती** : आज विशेष उल्लेख घेण्यात येणार नाहीत.

यानंतर कु.जयश्री........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी : माननीय उपसभापती )**

**पृ. शी.** : विदर्भात गेल्या वर्षभरात 1500 च्या वर शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या

**मु. शी.** : विदर्भात गेल्या वर्षभरात 1500 च्या वर शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, मधुकर चव्हाण, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री सय्यद पाशा पटेल, प्रकाश शेंडगे, गोपीकिसन बाजोरिया, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री अरविंद सावंत, ॲड.अनिल परब, सर्वश्री विनोद तावडे, जगदिश गुप्ता, केशवराव मानकर, सागर मेघे, सुरेश जेथलिया, परशुराम उपरकर, संजय केळकर, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली चर्चा.

( चर्चा पुढे सुरु........

श्री.बाळासाहेब थोरात ( कृषी मंत्री ) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी आणि अन्य सदस्यांनी शेतक-यांच्या प्रश्नावरील चर्चा या सभागृहामध्ये उपस्थित केली आणि दोन दिवस या सभागृहामध्ये चर्चा झाली. अनेक सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये भाग घेतला होता. या चर्चेमधून शेतीसंबंधातील अनेक मुद्दे या ठिकाणी उपस्थित झालेले आहेत. त्याचे उत्तर देण्याकरिता मी उपस्थित आहे. यामध्ये सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी एक महत्वाचा मुद्दा उपस्थित केला आणि महाराष्ट्रातील शेतीच्या संदर्भातील अनेक महत्वाचे मुलभूत मुद्दे या निमित्ताने मांडलेले आहेत. सभापती महोदय या निमित्ताने मी सांगेन की महाराष्ट्रातील जी शेती आहे ती सबंध अडचणीची शेती राहिलेली आहे. कारण आपण जर महाराष्ट्रातील सिंचन पाहिले तर ते फक्त 16 टक्के आहे. ते सिंचन धरणावर तसेच शाश्वत पाणी देणारे अशा प्रकारचे 16 टक्केच आहे. उर्वरित सर्व शेती पूर्णपणे पावसावर

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात.......

अवलंबून आहे आणि पाऊस हा लहरी मान्सूनवर अवलंबून आहे. त्यामुळे शेतक-याला दुष्काळी परिस्थिती, महापूराच्या परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. देशातील ज्या राज्यांची सिंचन क्षमता 40 किंवा 50 टक्क्यांच्या वर आहे त्यांना अशा प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागत नाही. महाराष्ट्राची सिंचन क्षमता ही 40 टक्क्याच्याही खाली म्हणजे फक्त 16 टक्के असून पावसावर आधारित शेती आहे. महाराष्ट्रातील शेतीच्या कमी उत्पादकतेला आणि ती त्रासदायक होण्याला आणखी एक घटक कारणीभूत आहे. महाराष्ट्रातील मातीचा जो पोत आहे तो अतिशय हलका आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतीला सातत्याने अडचणी निर्माण होत आहेत. यावर्षी संपूर्ण महाराष्ट्राच्या बियाण्यावर संपूर्ण लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या वर्षी महाराष्ट्र शासनाने 44000 गावामधील 10 मातीचे नमूने घेऊन तपासणी करुन तसेच त्याच्याही पलीकडे जाऊन त्यामधील खनिजांची व क्षारांची तपासणी करुन प्रत्येक गावाच्या मातीचा इंडेक्स आम्ही निर्माण केलेला आहे. आणि तो प्रत्येक गावामध्ये लावलेला आहे. मुख्यमंत्री महोदयांनी आणखी एक सुचविलेले आहे त्याचा उपयोग आम्ही करीत आहोत. एखाद्या गावची माती कशी आहे ? याची माहिती असलेले इंडेक्स त्या गावच्या सात बारावर टाकण्याचा निर्णय घेतलेला आहे. पाण्याच्या दृष्टीने जलसंधारणाच्या कार्यक्रमाला जास्तीत जास्त चालना देण्याचा प्रयत्न केलेला आहे. मराठवाडयामध्ये 3 ते 4 वर्षापासून दुष्काळी परिस्थित् आहे, तेथे हजारो मजूरांनी काम जलसंधारणाचा चांगल्या प्रकारचे काम केले परंतु विदर्भामध्ये मजूर येत नाहीत. जेथे मजूर येत नाहीत तेथे मशिन्स लावून काम करुन जलसंधारणाच्या कामांना चालना देण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. पाणी हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. यामुळे महाराष्ट्रातील त्याचप्रमाणे विदर्भातील शेतकरी अडचणीत असतो व त्याला ती शेती परवडत नाही. जलसंधारणाला महत्व देण्याच्या संदर्भामध्ये आम्ही कार्यशील आहोत. हे सत्य यानिमित्ताने मी सांगत आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी बियाणाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. शासनाने यावर्षी बियाण्यावर जास्त लक्ष केंद्रित केले व प्रत्येक गावामध्ये असे सांगितले की,बियाणे जे आहे, ते प्रत्येक गावाने स्वत:चे निर्माण करावे.

यानंतर श्री.गागरे....

श्री.बाळासाहेब थोरात .....

व इतर गावकऱ्यांना द्यावे अशी योजना आहे. अशा प्रकारे शेतकऱ्यांनी पाच लाख क्विंटल बियाने स्वत: तयार केले आहे. हा अत्यंत महत्वाचा उपक्रम शेतकरी राबवित आहेत. महाराष्ट्रातील एक चांगला उपक्रम म्हणून त्याचे नाव देशपातळीवर घेतले जात आहे, हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. शेतीला उद्योगाचा दर्जा देण्यासाठी सूचना माननीय सदस्यांनी केली आहे. शेतीला उद्योगाचा दर्जा देणे म्हणजे नेमके काय करावे, हा विचार करीत असताना उद्योग आणि शेती याची तुलना व विचार केला पाहिजे. शेतीचा उद्योग म्हणून विचार केला तर इनकम टॅक्स वगैरे हया सर्व गोष्टी समोर येतात. परंतु त्या शिवाय शेतीमध्ये जास्तीत जास्त प्रक्रिया उद्योग कसे सुरु करता येतील, हा विचार आपण करीत आहोत. नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिलची बैठक झालेली आहे. त्यामध्ये विकास दर चार टक्के करण्याच्या दृष्टीने काही निदेश देण्यात आलेले आहेत. त्यामध्ये जिल्हावार कृषी आराखडा निर्माण करण्याच्या संदर्भात सूचना देण्यात आलेल्या आहेत. तेथे उपलब्ध असलेली माती, पाणी, हवामान पाहिले जाते. तेथे जे पीक घ्यायचे आहे, त्यावर आधारीत कोणत्या प्रकारचे उद्योग करता येतील, त्याला मार्केट कसे उपलब्ध करु देऊ शकतो, हया सर्व सूचना त्यामध्ये आलेल्या आहेत. प्रक्रिया उद्योगाला चालना देण्याचे काम यापुढील काळात होणार आहे. एस.ई.झेड सारखे कृषी विभागाचे टर्मिनल 8 विविध ठिकाणी शासन उभे करीत आहेत. त्याद्वारे विविध अशी माहिती मिळणार आहे. केशर आंबा, डाळींब, जळगावला केळी, नागपूरला संत्री अशा ठिकाणी उद्योग व्यवसाय सुरु होतील. या दृष्टीने संपूर्ण महाराष्ट्रात आठ ठिकाणी क्षेत्र निर्माण करीत आहोत. उद्योगामध्ये काही फायदे असतात, तसेच काही अडचणी असतात. उद्योगामध्ये विविध कर व इनकम टॅक्स आहे. त्यातून शेतीला कसे संरक्षण देता येईल, या दृष्टीने विचार सुरु आहे. माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी मार्केटींगच्या क्षेत्रासंबंधी सांगितले. मार्केट कमिटी ॲक्टमध्ये आपण केलेला बदल हा अत्यंत महत्वाचा आहे. आता आपण मार्केटींगमध्ये खुली व्यवस्था करीत आहोत. त्याचा फायदा शेतकऱ्यांना निश्चितप्रमाणे मिळणार आहे. कॉन्ट्रॅक्ट फॉर्मींगला आपण चांगल्या प्रकारची गती दिलेली आहे. विशेषत: पुणे व सांगली जिल्हयामध्ये बटाटयाची कॉन्ट्रॅक्ट फॉर्मींग चांगल्या प्रकारे होत आहे. संपूर्ण विदर्भात कापसावर





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ SBT/

श्री.बाळासाहेब थोरात .....

आधारीत असलेल्या कॉन्ट्रॅक्ट फॉर्मींगमध्ये जवळपास 1 लाख हेक्टरपर्यत क्षेत्र आणलेले आहे. कापसाला  चांगला भाव कसा मिळेल यादृष्टीने आम्ही प्रयत्नशील आहोत, हे मी या निमित्ताने आपणास सांगू इच्छितो. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी स्वामीनाथन समितीच्या अहवालाबाबत महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. कृषी आयोग स्थापनेबाबतच्या सूचनेवर काय झ ाले असा त्यांनी प्रश्न विचारला आहे. नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिलची मिटींग झाल्यानंतर त्यामध्ये नवीन पध्दतीने काही सूचना येत आहेत. कृषी धोरण कशा प्रकारचे असावे, हे पाहिले जात आहे, अशा वेळी  आयोगाच्या स्थापनेच्या संदर्भात चर्चा होत आहे. या धोरणामध्ये आयोगाच्या स्थापनेसंबंधी काही ठरल्यास हा आयोग स्थापन करण्यात येईल. अन्यथा बदलत्या धोरणाचा विचार होऊन आयोगाबाबत केंद्र सरकार ज्या सूचना करील त्या पध्दतीने पुढे जाण्याच्या विचार चालू आहे हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांनी अनेक प्रश्न चांगल्या पध्दतीने येथे उपस्थित केलेले आहेत. त्यांनी सांगितले की, कृषी विभागाचा वेगळा अर्थसंकल्प असला पाहिजे. बियाणाचा त्यांनी मुद्दा मांडला आहे. शेतकरी कर्जबाजारीच होणार नाही या पध्दतीची शेतीची व्यवस्था असावी हा मुद्दा त्यांनी प्रकर्षाने येथे मांडला आहे. त्याबाबत मी सांगतो की, शेतकरी कर्जबाजारी होऊ नये याकरिता शेतीवरील खर्च कमी करुन उत्पादकता कशी वाढविता येईल. यादृष्टीने आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. त्यात ऑरगॅनिक फार्मींग, साधनसामुग्री शेतकऱ्यांनी कशी वापरायची, त्यातून जादा उत्पादकता कशी निर्माण करावयाची याकरीता प्रयत्न चालू आहेत. महापीक अभियानांतर्गत शेतीच्या उत्पादकतेवर जादा भर दिला आहे. यातून खर्च कमी होईल व उत्पादकता वाढेल हा प्रयत्न आम्ही करीत आहोत. तसेच त्यांनी पीक विम्याबाबत मुद्दा मांडला आहे. माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांचे भाषण अतिशय चांगले झाले आहे असे मला समजले. हे भाषण मला ऐकता आले नाही, परंतु अत्यंत चांगले मुद्दे त्यांनी उपस्थित केले आहेत.

यानंतर कु.धनश्री.....

अशुध्दित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात ....

पीक वीमा योजने मधून अनेक शेतकऱ्यांना मदत देण्यात येत आहे. ज्या ठिकाणी शेतकऱ्याला आवश्यकता आहे त्याठिकाणी शेतकऱ्याला पीक वीमा योजनेचे संरक्षण मिळाले पाहिजे. ही योजना सर्वंकष कशी असेल याबाबत अनेक प्रयोग करण्यात आलेले आहे. 1985 सालापासून या योजनेमध्ये अनेक इतर योजनांचा समावेश केलेला आहे. परंतु तरीही ही योजना सर्वंकष योजना होऊ शकली नाही ही वस्तुस्थिती आहे. या योजनेमध्ये सर्कलवाईज क्रॉप कटींग घेतले जाते. त्यामुळे एखाद्या ठिकाणी पीकाचे नुकसान झाले तर संपूर्ण सर्कलला त्याचा लाभ होतो अन्यथा कोणालाही लाभ मिळत नाही. याठिकाणी व्यक्तिगत शेतकऱ्याला लाभ कसा मिळेल याबाबत विचार मांडण्यात आले. याबाबत आतापर्यंत अनेक प्रयोग करण्यात आलेले आहे. आतासुध्दा या पीक योजनेमध्ये सर्कलवाईज क्रॉप कटींग केले जाते. त्यामध्ये मंडल नियोग निहाय पाहणी केली जाते. रबी,खरीप अशा पिकांच्या दृष्टीने 1 लाख 85 हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. गाव पातळीवर जरी आपण विचार केला तरी साधारण 25 लाख क्रॉप कटींग आपल्याला करावे लागेल. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्याला फायदेशीर ठरेल अशी योजना कोणत्या पद्घतीने राबवावी याबाबत काही शिफारसी केंद्र शासनाने केलेल्या आहेत. सर्वसामान्य शेतकऱ्याला ज्या योजनेमुळे लाभ होईल अशी योजना आणण्याच्या संदर्भात एक कमिटी नेमण्यात आली आहे. परंतु अद्याप सर्वसमावेशक योजना आणण्यात आलेली नाही ही वस्तुस्थिती मान्य करावी लागेल. शेतकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी वेगवेगळया प्रकारचे प्रयोग करण्यात आले. परंतु अजूनही विम्यासंदर्भात चांगली योजना येऊ शकली नाही. तरी याबाबत राष्ट्रीय पीक वीमा योजनेअंतर्गत शेतकऱ्याला संरख्क्षण देण्यासंदर्भात शासनाचे प्रयत्न सुरु आहेत.

श्री. नितीन गडकरी : तालुक्यामध्ये एका शेतकऱ्याच्या पीकाचे नुकसान झाले तर संपूर्ण तालुक्यामधील शेतकऱ्य्यांच्या पिकाचे नुकसान झाले आहे काय याबाबत चौकशी केली जाते. एखाद्या शिक्षकाने विमा काढला परंतु संपूर्ण शाळेतील शिक्षक मृत पावल्याशिवाय त्यांला विम्याची रक्कम मिळणार नाही यासारखीच ही गोष्ट आहे. पीक विमा योजनेबाबत सुधारणा करणार असे आपण सांगितले परंतु याबाबत काही तरी ठोस उपाययोजना करण्यात येणार आहे त्याबद्दल माहिती देण्यात यावी.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या योजनेअंतर्गत राहूरी तालुक्यामध्ये प्रयोग केले जात आहेत. रानटी जनावरे शेतकऱ्यांच्या शेतामध्ये घुसून फार मोठया प्रमाणामध्य शेतकऱ्याचे नुकसान होत आहे. आपण ज्यावेळी सर्कलमध्ये योजना राबवितो त्यावेळी व्यक्तिगत स्वरुपात शेतकऱ्यांच्या नुकसानीचा विचार केला जात नाही. म्हणून याबाबत आपल्याला काय करता येईल यासंदर्भात शासन विचार करीत आहे. केंद्रशासन देखील याबाबत विचार करीत आहे. अशा प्रकारे व्यक्तिगत स्वरुपात शेतकऱ्यांना संरक्षण देणाऱ्या योजनेविषयी आपण काही सूचना केल्या तर त्या स्वीकारण्याची आमची तयारी आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, गेल्या 3 वर्षापासून या विषयासंदर्भात चर्चा सुरु आहे. विम्याचे संरक्षण मिळण्याकरिता केवळ एखाद्या शिक्षकाचा मृत्यु होऊन चालणार नाही तर संपूर्ण शाळेतील शिक्षक मृत्यु पावले पाहिजे याप्रमाणे ही आहे त्यामुळे तो करार दुरुस्त करावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, कंपनी ही एक एजन्सी आहे त्यामध्ये प्रिमियम गोळा करणे या गोष्टी केल्या जातात. जो विमा मान्य केला जातो त्यापैकी 50 टक्के राज्य शासन व 50 टक्के केंद्र शासन निधी देत असते. ही योजना शासनाची आहे त्यामुळे या योजनेसाठी शासन निधी पुरवित असते. सन्माननीय श्री. शरद पवार व सन्माननीय केंद्रीय अर्थमंत्री श्री. चिदंबरम यांची एक बैठक झाली होती. व्यक्तिगत स्वरुपात शेतकऱ्यांना कशा पद्धतीने मतद करता येईल याचा विचार त्या बैठकीमध्ये करण्यात आला होता.

यानंतर श्री. सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात..

परंतु अद्यापपर्यंत तशाप्रकारची योजना येऊ शकली नाही ही वस्तुस्थिती मी याठिकाणी मान्य करतो. ज्याठिकाणी शेतकरी अडचणीमध्ये येईल त्याला इतर मदतीपेक्षा विम्याच्या योजनेची मदत मिळाली पाहिजे. ज्याप्रमाणे शेतकरी बियाण्यांकरिता खर्च करतो, खत-पाण्यासाठी खर्च करतो, मजूरीसाठी खर्च करतो त्याप्रमाणे त्याने विम्याचे हप्ते भरले पाहिजेत. त्या शेतकऱ्याला स्वाभिमानाने मदत मिळाली पाहिजे हा मुद्दा बरोबर असला तरी अद्यापि तशाप्रकारची मदत मिळू शकली नाही ही वस्तुस्थिती मी याठिकाणी सांगतो.

सभापती महोदय, यानिमित्ताने चर्चा करीत असतांना महत्वाची गोष्ट अशी की, शेतीवरील खर्च कमी करुन आपल्याला शेतीची उत्पादकता वाढविली पाहिजे. त्यादृष्टीने शेतीला आधारभूत किंमत मिळणे हा महत्वाचा मुद्दा आहे. याबाबत मी आपणास असे सुचवू इच्छितो की, महाराष्ट्र शासन जेवढी आधारभूत किंमत सुचविते त्यापेक्षा खूप कमी किंमत त्यांना मिळते ही वस्तुस्थिती आहे. याबाबत विचार करीत असतांना एक गोष्ट लक्षात येते की, आपली आधारभूत किंमत काढण्याची पध्दत आहे. त्याबाबत केंद्र सरकारने कोणत्या पध्दतीने आधारभूत किंमत काढावी यासंबंधी स्पष्टपणे सूचना दिल्या आहेत. त्यामध्ये विद्यापीठे आणि कृषि विद्यापीठांच्या माध्यमातून आधारभूत किंमत काढतांना एकंदर शेतीवरील खर्च धरला जातो. याठिकाणी सांगण्यात आले की, बैलाच्या कामाची मजूरी फक्त 13 दिवस लावण्यात आली. वास्तविक शेतकऱ्याला आपला बैल वर्षभर संभाळावा लागतो. त्यामुळे बैलाने 13 दिवस काम केले म्हणून त्याची 13 दिवसाची मजूरी लावली पाहिजे असे होत नाही. केंद्र सरकारने सूचना दिल्या आहेत, त्यानुसार आधारभूत किंमत काढण्याची पध्दत आहे. इतर राज्यांमध्ये याबाबत विचार करीत असतांना तेथील शेतकऱ्याला हे भाव परवडतात तर आपल्याला कां परवडत नाहीत? यामागील कारणमीमांसा जाणून घेतली तर स्पष्ट होईल की, जगामध्ये जी एकूण उत्पादकता आहे त्यामानाने भारताची उत्पादकता कमी आहे. आणि महत्वाचा भाग असा की, भारतापेक्षा महाराष्ट्र खूप मागे आहे, ही वस्तुस्थिती आपल्याला नाकारता येत नाही. याठिकाणी मी आपणास भाताच्या पिकाचे उदाहरण देतो. एका हेक्टरमध्ये 1765 किलो उत्पादकता होते. आणि आपण 937 रुपये किंमत मागितली असतांना आपल्याला 580 रुपये मिळाले. आंध्र प्रदेशामध्ये एका हेक्टरमध्ये 2939 किलो उत्पादकता आहे, पंजाबमध्ये 3858 किलो उत्पादकता आहे, हरयाणामध्ये 3051 किलो उत्पादकता आहे, बंगालमध्ये 2509 किलो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MAP/

श्री. बाळासाहेब थोरात..

उत्पादकता आहे. असे असतांना आपल्याकडील उत्पादकता कमी आहे. याचे कारण आपल्याकडील भात, कापूस इत्यादी श्ेती ही पावसावर आधारीत आहे.

(यानंतर श्री. भोगले)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात........

दोन पावसामध्ये अंतर पडते. कोकणामध्ये भाताची पेरणी करीत असताना नेमका पाऊस नाही अशी परिस्थिती निर्माण होते. दोन पावसात अंतर पडते त्यामुळे आपली उत्पादकता घटते. ज्याठिकाणी शाश्वत सिंचन आहे त्या राज्यांची उत्पादकता मात्र वाढते. त्यांच्या उत्पादन खर्चाची तुलना करतो, त्यांची जी मागणी असते ती विचारात घेतो. आंध्रप्रदेशने एकूण आधारभूत किंमत 615 रुपये मागितली. पश्चिम बंगालने 590 रुपये मागितली आणि त्यांना 580 रुपये मिळाले. आपली उत्पादकता कमी असल्यामुळे उत्पादन खर्च प्रती क्विंटल वाढतो आणि आपल्याला परवडत नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणून उत्पादकता कशी वाढविता येईल हा जाणीवपूर्वक प्रयत्न कृषि विभागाच्या माध्यमातून आणि विद्यापीठांच्या सहकार्याने आम्ही करीत आहोत. भाताच्या बाबतीत पाहिले तर भंडारा आणि गोंदिया जिल्हयामध्ये सहसा इरिगेशनवर अवलंबून असलेल्या भाताची उत्पादकता चांगली आहे. परंतु जिथे फक्त पावसावर आधारित शेती आहे तेथील उत्पादकता घटते. ज्याठिकाणी लागवड खर्च कमी आणि उत्पादकता जास्त तेथे शेती परवडणारी असते. एका बाजूला दोन गोष्टी आपण करीत आहोत. केंद्र शासनाकडून जास्त आधारभूत किंमत मिळावी यासाठी आग्रही आहोत. जिथे पावसावर आधारित शेती आहे त्यांच्याकरीता वेगळा झोन करावा, तेथे आधारभूत किंमत जादा द्यावी हा आग्रह सातत्याने धरला आहे. आपली उत्पादकता कमी खर्चात अधिक कशी येईल हा सुध्दा प्रयत्न सातत्याने करीत आहोत. ज्यामधून शेतकऱ्यांना पूर्ण मदत होईल असा प्रयत्न आहे.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, शेतामध्ये काम करणाऱ्या माणसाची मजुरी आणि शहरामध्ये काम करणाऱ्या माणसाची मजुरी यामध्ये फरक आहे. गावामध्ये पैसा जायचा असेल तर दोन माध्यमे आहेत. एक म्हणजे श्रम आणि त्या मालाचा खर्च या दोन बाबी विचारात घेतल्या पाहिजेत. मालाची किंमत आणि माणसाच्या श्रमाचे मूल्य या दोन गोष्टीतूनच मुंबई, दिल्ली, कोलकाता यासारख्या शहरातील पैसा गावात जाईल. गावातील माणसाला मजुरी कमी आणि शहरातील माणसाची मजुरी जास्त असेल तर सर्व पैसा शहरातच राहील. यामुळे गावे लुळीपांगळी होतील. आता तेच होत आहे. सर्व गावांना पॅरालिसीसचा अटॅक आलेला आहे. महाराष्ट्रातील जमिनींची उत्पादकता किंवा पिकांची उत्पादकता आणि पंजाब व पश्चिम बंगालमधील उत्पादकता यांची तुलना मंत्रीमहोदय करीत आहेत. कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या सगळ्यात जास्त

श्री.पाशा पटेल....

आत्महत्या आंध्रप्रदेश आणि महाराष्ट्रात होत आहेत. नैसर्गिक पाण्यावर अवलंबून शेती केली जाते तेथील शेतकऱ्यांनी मरावे का? दोन-तीन महत्वाच्या गोष्टी आहेत. तुम्ही जो भाव केंद्राला सुचविला आहे तो इतर कोणत्याही राज्यांनी सुचविलेला नाही. महाराष्ट्रातील चार कृषि विद्यापीठांच्या अखत्यारितील वेगवेगळया कृषि महाविद्यालयांनी आपापल्या भागामध्ये जो खर्च लागतो तो ग्राह्य धरुन किंमती सुचविलेल्या आहेत. या किंमती शेतकरी ज्या पध्दतीने शेतामध्ये खर्च करतो तो खर्च सोडून धरलेल्या नाहीत. त्यामध्ये खूप फरक आहे. मूळ खर्च वेगळा आहे. तुम्ही काढलेला वेगळा आहे, सुचविलेला वेगळा आणि मिळालेला वेगळा आहे. त्यामुळे इतर राज्यांची तुलना करुन या राज्यातील आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढवायची आहे का? आज याबाबत ठोस विचार झाला पाहिजे. गावामध्ये पैसा जायचा असेल तर गावातील माणसाच्या मजुरीच्या किंमतीमध्ये वाढ झालीच पाहिजे. एक तर कौटुंबिक मजुरी आणि रोजंदारीची मजुरी या दोन गोष्टी ग्राह्य धरल्या आहेत. या देशातील गावे उद्‌ध्वस्त होऊ लागली आहेत. शेतीमालाच्या उत्पादन खर्चामध्ये मजुरी धरली गेली नाही तर शेतकरी आपल्या घरातून देणार का? त्या मालाच्या किंमतीमध्ये जर मजुरी ग्राह्य धरली गेली नाही तर शेतकरी आपल्या घरातून मजुरी देणार नाही. म्हणून या देशातील सगळ्यात मूळ रोग ग्रामीण भागामध्ये काम करणाऱ्या माणसाच्या श्रमाच्या मूल्याचा आहे. श्रममूल्याचा विचार होत नाही तोपर्यंत गावे जगण्याची सुतराम शक्यता नाही.

श्री.बाळासाहेब थोरात : सन्माननीय सदस्यांचा मुद्दा रास्त आहे. ही आधारभूत किंमत काढताना मजुरीची किंमत जास्त धरली पाहिजे ही वस्तुस्थिती आहे. त्यांनी काही मार्गदर्शक सूचना केलेल्या आहेत. महाराष्ट्र राज्यातर्फे आधारभूत किंमत मागत असताना आपण आपल्या काही गोष्टी त्यामध्ये अंतर्भूत करीत असतो. मागणी अधिक केली तरी ज्यावेळी चर्चेला बसतो त्यावेळी केंद्र शासनाचे अधिकारी त्याचा विचार न करता ती मागणी बाजूला काढून ठेवतात. आम्ही ज्या सूचना करतो त्यांचा तुम्ही विचार करावा हा सुध्दा आपला आग्रह असतो. आपली आधारभूत किंमत जादा मागतो. काही गोष्टी नॉर्मच्या पलिकडे मागण्याचा सातत्याने प्रयत्न असतो. परंतु सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना बरोबर आहे. ही सूचना आम्ही मुद्दाम केंद्र शासनाची समिति आहे त्या समितीपुढे नेण्याचा प्रयत्न निश्चितपणे करु याची ग्वाही देतो.

..3..



SGB/ MAP/ 17:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात........

सभापती महोदय, सन्माननीय पंतप्रधान श्री.मनमोहन सिंग यांनी राष्ट्रीय विकास परिषद घेतली. त्यामध्ये देशातील काही मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समित्या गठीत केल्या आहेत. सन्माननीय मुख्यमंत्री श्री.विलासरावजी देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली सिंचन संदर्भात समिती केली. इतर समित्या होत्या. राष्ट्रीय विकास परिषदेने त्यावेळी ठराव पारित केला. संपूर्ण देशाचा विकास 4 टक्क्यापर्यंत कसा न्यायचा याबाबत विचार झाला. इतर सेवा क्षेत्रामध्ये, उद्योग क्षेत्रामध्ये 9 टक्क्यावर जात असताना कृषि क्षेत्र घटलेले दिसते ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. कशा पध्दतीने कृषि क्षेत्र पुढे न्यायचे हा विचार करावयाचा आहे. एक हरितक्रांती झाली. पुन्हा शेतीमध्ये अडचण आलेली दिसते. पावसावर आधारित शेती आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात .....

त्यामुळे विकास दर खाली जात आहे. पंजाब, हरियाणा या राज्याचा विकास दर सुध्दा कमी होत आहे. त्या ठिकाणी अनेक पिके घेतली जात असल्यामुळे तेथील मातीचा पोत कमी झालेला आहे व पर्यायाने तेथील माती थकल्यामुळे विकास दर सुध्दा कमी झालेला आहे. त्यामुळे विकास दर वाढवण्याच्या यासंदर्भात देशामध्ये पुनर्विचार सुरु झालेला आहे. माहननीय पंतप्रधान मुंबईमध्ये येऊन यासंदर्भात त्यांनी एक बैठक सुध्दा घेतली होती. देशाचा विकास दर 4 टक्के आहे त्यामुळे महाराष्ट्राला सुध्दा त्याचा विचार करावा लागणार आहे. या बैठकीमध्ये जलसंधारणाच्या कामाला जास्त महत्व दिले पाहिजे असा निर्णय झाला आहे तसेच चांगले बियाणे, मातीचा पोत सुधारण्यासाठी सुध्दा प्रयत्न करावे लागतील असा निर्णय झालेला आहे व त्यासंदर्भात आपण अंमलबजावणी सुध्दा सुरु केलेली आहे. त्यासाठी आपण प्रत्येक जिल्हयाचे आराखडे तयार करीत आहोत. यांअंर्तत धान्याला भाव वाढवून देणे, फलोत्पादन वाढविण्यात यावे, जोडधंदे उपलब्ध करुन द्यावे, मार्गदर्शन करावे यासाठी पूर्ण जिल्हयात आराखडे तयार करण्याच्या कामाला सुरुवात झ ालेली आहे. यासंदर्भात केंद्रशासनाने 25 हजार कोटीचे पॅकेज सुध्दा दिलेले आहे. शेतीच्या विकासाचा दर 4 टक्के करावयाचा असल्यामुळे त्याचा फायदा महाराष्ट्र राज्य निश्चितपणे उचलेल याची ग्वाही मी या ठिकाणी देतो. या चर्चेच्या अनुषंगाने सदस्यांनी सहभाग घेऊन चांगल्या सूचना केल्या त्यांचे आभार मानतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------------

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. पंतगराव कदम (सहकार मंत्री ) : सभापती महोदय, अतिशय महत्वाच्या विषयावर गेल्या दोन चार दिवसापासून सविस्तर चर्चा झालेली आहे. या चर्चेमध्ये महाराष्ट्रसारख्या पुरोगामी राज्यामध्ये शेतकरी आत्महत्या करीत आहेत हे पुरोगामी महाराष्ट्राला लांच्छनास्पद आहे. या चर्चेदरम्यान सरकार आणि विरोधी पक्ष यांनी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केलेले आहेत. परंतु शेतक-यांच्या आत्महत्या हा चिंतेचा विषय आहे. त्यामुळे या राज्याने कर्जाच्या बाबतीत काही ठोस निर्णय घेतलेले आहेत, कर्ज माफ केलेले आहे. सहकार बँकाना तसेच अर्बन बँकाना, भूविकास बँकाना वन टाईम सेटलमेंटच्या संदर्भात सूचनाही केलेल्या आहेत, कर्जाची मर्यादाही वाढविलेली आहे. परंतु परत असे घडले आहे की, कर्जाची मर्यादा वाढवून सुध्दा50 टक्के लोक परत डिफॉल्टर झालेले आहेत. या सगळयांचा विचार केल्यानंतर निरनिराळ्या लोकांनी निरनिराळया कल्पना मांडल्या. शेतक-यांना काही अल्टरनेटीव्ह उद्योग दिले पाहिजेत. कोणाच्या तरी सुपीक डोक्यातून अशी कल्पना आली की, शेतक-यांना जर्सी गाई देऊन टाका. परंतु मला सांगा नागपूर सारख्या उष्ण भागात या जर्सी गायी टिकतील का हो ? जर्सी गायींना थंड हवामान असले तरच त्या जास्त दूध देऊ शकतात. भावनेच्या आहारी जाऊन अशा प्रकारचे काही निर्णय घेतले. परंतु भावनेच्या आहारी जाऊन निर्णय घेता कामा नये. यासंदर्भात अनेक कमिटया तयार केल्या गेल्या, त्यांचे अनेक अहवाल आले परंतु त्याचा पाहिजे त्या प्रमाणात उपयोग झालेला नाही. माननीय पंतप्रधानांनी शेतक-यांच्या आत्महत्या रोखाव्यात यासाठी पॅकेज दिले व या ठिकाणी दोन दिवस मुक्काम ठोकून माहिती सुध्दा घेतली. त्यामुळे आत्महत्येच्या संदर्भात स्लोगन तयार करणे हे काही बरोबर नाही. या देशाचे पंतप्रधान येथे येतात, योजना सांगतात, पॅकेज देतात परंतु एक गोष्ट खरी आहे की, या पॅकेजचा उपयोग शेतक-यांना न होता तो बँकानाच अधिक प्रमाणात झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. या विषयाच्या संदर्भात नेमके काय केले पाहिजे याचा विचार तुम्ही आम्ही सगळयांनी करण्याची आवश्यकता आहे. अर्थतज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. त्यांनी सांगितले होते की, कर्ज माफी हा काही या प्रश्नावरील पर्याय नाही. अर्थात त्यातील एक भाग होऊ शकतो तो म्हणजे कर्ज माफीच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री केंद्राशी चर्चा करीत आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम.....

केंद्रात माननीय पंतप्रधान, माननीय कृषि मंत्री व इतर मंडळी त्याचा विचार करीत आहेत. राज्यात होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा विषय फक्त आपल्या राज्यापुरता मर्यादित आहे असे नसून इतर राज्यातही शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. त्यामुळे कर्जमाफी हा एक भाग झाला. आपण शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी त्यांचे व्याज माफ केले, कर्ज वाढवून दिले असे असताना शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतच आहेत. शेती म्हटली की, पाण्याचा विषय आला, विजेचा विषय आला, त्याच्या मालाला बाजारपेढ मिळण्याचा विषय आला असे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न आहेत. शेवटी आपणास यातून मार्ग शोधला पाहिजे. शेतकऱ्यांचे आत्मबळ कसे वाढेल यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. विधानसभा सभागृहात एका सन्माननीय सदस्याने भाषण करताना सांगितले की, एका तरुण शेतकऱ्याचे लग्न झाले. पहिली दिवाळी आली, परंतु बायकोला पहिल्या दिवाळीची भेट म्हणून साडी खरेदीसाठी त्याच्याकडे पैसे नव्हते म्हणून त्याने आत्महत्या केली. आत्महत्या करण्याचे हे कारण झाले काय ? त्याने आत्महत्या केल्यामुळे त्याच्या पाठीमागे त्याच्या कुटुंबाचे काय झाले, त्याच्या पत्नीवर कोणता प्रसंग ओढवला, आत्महत्या हा पर्याय आहे काय ? शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यापासून रोखावयास हवे, त्यांची विल पॉवर कशी वाढेल याचा आपण सर्वांनी विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, आपणा सर्वांना माहीत असेलच, सन 1972 मध्ये पश्चिम महाराष्ट्रात दुष्काळ पडला. आपणास कल्पना असेल त्यावेळी चांगल्या चांगल्या घरातील लोक कामावर जात होते आणि येईल त्या परिस्थितीला धैर्याने तोंड देऊन त्यातून बाहेर पडले. आपण शेतकऱ्यांची कर्जे माफ करुन, व्याज माफ करुन प्रश्न सुटणार नाही. ही फक्त वरवरची मलमपट्टी झाली. शेतकरी मेला बरे झाले त्याच्या कुटुंबाला एक लाख रुपये मिळतात. हा विषय आता चेष्टेचा होऊ लागला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

डॉ.पतंगराव कदम.....

याठिकाणी सन्माननीय कृषि मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांनी सांगितल्याप्रमाणे शेती, शेतीचे उत्पादन, त्यास मिळणारी बाजारपेठ या सर्वांचा हिशोब काढला तर शेतकरी शेती का करतो याचे उत्तर सांगणे कठीण आहे. आपणास यादृष्टीने विचार करुन ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. यासाठी आपण अनेक समित्या नेमल्या. डॉ.नरेंद्र जाधव या अर्थतज्ज्ञाची कमिटी नेमली. ते तळागाळातून आलेले असल्यामुळे त्यांना गरिबीची जवळून पाहिलेली आहे. त्यांनीसुध्दा कर्जमाफी हा उपाय नाही असे सांगितले. मी त्यांना फोन करुन विचारले मग नेमका कोणता उपाय आहे ते सांगावे.

सभापती महोदय, राज्यात मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या आत्महत्येमुळे संपूर्ण देशात महाराष्ट्राची नाचक्की होत आहे. सन्माननीय सदस्य इतर राज्यांतील आकडेवारी देतात. माझ्याकडे छत्तीसगड व मध्य प्रदेशातील आकडेवारी आहे. मी जस्टीफिकेशन करीत नाही.

लिफ्ट इरिगेशनच्या संदर्भात मी माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चार्च केली त्यामध्ये शेतकऱ्यांना 25 टक्के सबसिडी देण्याचा निर्णय मान्य केला. परंतु पॅकेजच्या संदर्भात कर्जमाफीचा निर्णय घ्याववयाचा असेल तर तो विषय मंत्रिमंडळापुढे न्यावा लागेल....

श्री.दिवाकर रावते ( बसून ) : माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर कोणती चर्चा झाली ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, लिफ्ट इरिगेशन कर्जाच्या संदर्भात माझ्याकडे एक बैठक झाली. त्या बैठकीमध्ये जलसंपदा मंत्री श्री.अजित पवार व सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी हे उपस्थित होते. आपण शेतकऱ्यांना 25 टक्के सबसिडी देतो, ती दिलेली नाही ती सबसिडी द्यावी, ओटीएस करावे असे विषय चर्चेला होते. परंतु कर्ज माफ करायचे असेल तर त्यासाठी आम्हाला मंत्रिमंडळापुढे जावे लागेल.....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्या नावाचा उल्लेख झाला म्हणून सांगतो की, 2200 कोटी रुपये लिफ्ट इरिगेशनसाठी कर्ज मिळाले. या कर्जावर जिल्हा बँकेने जवळपास 49 कोटींचे व्याज वसूल केले. त्यात सबसिडी होती. सचिव सात कोटी सांगत आहेत. या योजनेस दहा वर्षे झाली. शेतकऱ्यांना सबसिडी कबूल केली, परंतु ती दिली नाही.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ पूर्वी श्री.अजित... 18:00

श्री.नितीन गडकरी..

25 टक्क्यांवर व्याज घेतलेले आहे, ते तरी आपण जस्टीफाय करा. 25 टक्क्यांवर आपण 49 कोटी रुपयांचे व्याज घेतले. अगोदरच आपण 10-12 वर्षे सबसिडी दिलेली नाही. सबसिडीवर आपण व्याज लावले व शेतकऱ्यांच्या जमिनी लिलावात निकाली काढल्या.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे ठेवण्यात येईल व त्यावर मंत्रिमंडळ सहानुभूतीपूर्वक विचार करेल.

सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी 6 टक्क्याने कर्जपुरवठा करण्याबाबत विचारले. याबाबत मी सांगू इच्छितो की, यासंबंधी सरकारने ठामपणाने निर्णय घेतलेला असून गेल्यावर्षी आपण 79 कोटी रुपये दिलेले आहेत. याबाबतची जबाबदारी आम्ही बँकेवर टाकत नाही. नाबार्डचे पैसे आहेत, बँकांच्या कामांसाठी आम्ही 130 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे....(अडथळा) आम्ही आढावा घेत आहोत. कोणत्या जिल्हयात मिळाले नसतील तर आम्ही त्याबाबत आढावा घेत आहोत. डेप्यूटी डायरेक्टरांच्या बैठका होत असून कुठल्या जिल्हयात पैसे मिळाले नाहीत याबाबत मी विचारणा करीत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रत्यक्षात माझ्या डोळयांनी मी जे पाहिले व ऐकले त्याबाबत मी बोलत आहे. 6 टक्क्यांप्रमाणे कर्ज मिळात नसल्याचे कास्तकारांनी ई.टी.व्ही.वरील मुलाखतीच्यावेळी सांगितलेले आहे. त्यांची मुलाखत झाल्यानंतर लगेच अधिकाऱ्यांच्या मुलाखती झाल्या. त्यावेळी त्यांनी सांगितले की, 6 टक्क्यांप्रमाणे कर्ज द्यावे, अशाप्रकारचे कुठलेही आदेश शासनाकडून प्राप्त झालेले नाहीत. त्यानंतर आपली मुलाखत झाली, त्यावेळी आपण सांगितले की, 6 टक्क्यांप्रमाणे कर्ज कोणाला मिळाले नसेल तर त्याबाबतची चौकशी करुन कारवाई करण्यात येईल. माननीय मंत्रिमहोदय ती मुलाकत मी स्वत: पाहिलेली आहे. याठिकाणी स्पष्ट झाले की, 6 टक्क्यांने शेतकऱ्यांना कर्जपुरवठा झालेला नाही. विदर्भातील 6 जिल्हयातील शेतक-यांना अजूनही 6 टक्क्यांप्रमाणे कर्ज मिळालेले नाही, हे सत्य आहे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, या संबंधीची कार्यवाही झालेली आहे. 6 जिल्हयांची माहिती मी पटलावर ठेवतो. परंतु याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, विदर्भातील शेतकऱ्यांना त्याप्रमाणे कर्ज मिळाले नाही, तसेच राज्यातही मिळाले नाही, ही सन्माननीय सदस्यांची माहिती तात्पुरती मी मान्य करतो व प्रत्यक्षात किती शेतकऱ्यांना कर्ज दिले, याबाबतची माहिती तपासून चौकशी करतो. 6 जिल्हयातील प्रत्येक... (..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : राज्यातील किती शेतकऱ्यांना आपण 6 टक्क्यांप्रमाणे कर्ज दिले ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, आम्ही पैसे दिलेले आहेत. बँकेवर आम्ही भूर्दंड टाकलेला नाही. याबाबतीत आम्ही तसुभरही मागे राहणार नाही.

श्री.नितीन गडकरी : 275 कोटींचा घोटाळे, 150 कोटींचे घोटाळे होऊनही ते मोकाट सुटलेले आहेत.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, सहकारातील कुठल्याही घोटाळयास शासन पाठिशी घालणार नाही. यासंदर्भात कोर्टातून स्टे मिळालेला आहे. ती कोणाची बँक आहे, त्याठिकाणी कोण बसले आहे, याचा विचार आमच्याकडून होणार नाही.

श्री.दिवाकर रावते : आम्ही म्हणजे कोण ?

डॉ.पतंगराव कदम : सहकार खात्याची माझी डायरेक्ट जबाबदारी असून शासन म्हणून माझी संयुक्त जबाबदारी आहे.

श्री.दिवाकर रावते : मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिलेली आहे का ?

डॉ.पतंगराव कदम : गेल्या तीन वर्षामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी माझ्या एकाही प्रकणांमध्ये स्थगिती दिलेली नाही. मी माझ्या राज्यमंत्र्यांना व अधिकाऱ्यांनाही सांगितले आहे की, यापूर्वी कोणी स्थगिती दिली असेल तर ती व्हेकेट करा.

**सभापती** : माननीय मुख्यमंत्री महोयांनी उत्तरास सुरुवात करावी.

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, अतिशय महत्वाच्या विषयावर सदनाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतलेला आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यामध्ये शेतकरी दुर्दैवाने आत्महत्या करीत आहेत, हे राज्याच्या दृष्टीने भूषणावह नाही. अनेक प्रयत्न करुनही...केंद्र सरकारच्या वतीने पॅकेज दिले, राज्य सरकारच्या वतीने पॅकेज दिले,

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख.......

तरीही त्यामध्ये बरीचशी सुधारणा झाली नाही, अशाप्रकारचा दावा अनेक सन्माननीय सदस्यांनी केला आहे. विदर्भामधील 6 जिल्हयांची निवड का केली, असा प्रश्न निर्माण झाला. पूर्व विदर्भ का नाही, मराठवाडा का नाही, इतर जिल्हे का नाहीत, तिकडच्या शेतक-यांनी आत्महत्या वाढविल्यानंतर विचार होणार का ? येथपर्यन्त चर्चा झालेली आहे. मागच्या दोन वर्षापूर्वी पॅकेजवर सभागृहात चर्चा केली त्यावेळी राज्यामध्ये होणा-या आत्महत्यांचे जास्त प्रमाण कोठे आहे याची माहिती घेतली. जेवढया आत्महत्या झाल्या त्यामधील 75 टक्के आत्महत्या या 6 जिल्हयांमध्ये झ ााल्या म्हणून त्यांची निवड पायलट प्रोजेक्ट मध्ये केली. विविध समित्यांमार्फत माहिती घेतली. त्यांनी माहिती अशी दिली की, त्या भागात सिंचनाच्या सोयी कमी आहेत, सिंगल क्रॉप आहे, जोडधंदा नाही म्हणून शेतक-यांना शेती परवडत नाही. कर्जबाजारीपणा वाढला, पिकाला बाजारात किंमत मिळत नाही, उत्पादन खर्चावर आधारीत किंमत मिळत नाही, अशी अनेक कारणे समोर आणली गेली. म्हणून प्रामुख्याने जे पॅकेज राज्याने किंवा केंद्राने दिले त्यातील 80 टक्के रक्कम सिंचनाच्या सोयी वाढविण्यासाठी खर्च पडावे, ही कल्पना आहे. व्याजमाफी करुन 772 कोटी रुपये एवढी रक्कम विविध बँकांमध्ये आपण भरली. चर्चा झाली की, व्याज भरले म्हणजे तुम्ही बँकांचा फायदा केला. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी तर सांगितले की, राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या बँका आहेत म्हणून त्यांच्यासाठी ही व्यवस्था केली. कर्जमाफी केली म्हणजे शेतक-याला फायदा मिळाला, असेही स्टेटमेंट त्यांनी केले. उद्या कर्जमाफी झाली, आपलीही तशी इच्छा आहे आणि इकडच्या बाजुच्या सदस्यांचीही तशीच इच्छा आहे. शेतक-यांना कर्जमुक्ती मिळणार असेल तर कोणाचाही विरोध होणार नाही. एकवेळ मानले आणि कर्जमाफी केली तर आपण असे म्हणणार की, शेतक-यांचे कर्ज माफ होणार, फायदा कोणाचा होणार ? पैसे कोठे जमा होणार ? पैसे बँकेतच जमा होणार. शेतकरी कर्ज भरणार नाही, सरकार भरेल. यात फायदा कोणाचा आहे ? व्याज माफ केले म्हणजे कर्ज तसेच राहणार आणि बँका मोठया होणार. यामध्ये असा प्रयत्न केला की, 712 कोटी रुपयांचे व्याज बँकात भरले, वेगळे कर्ज दिले, पूर्वीचे कर्ज होते ते फ्रिज केले. तीन वर्ष कर्ज शेतक-यांना मागण्यात येणार नाही. पूर्वीच्या काळामध्ये सहा जिल्हयांमध्ये साडेतीन लाख शेतकरी बँकांचे कर्ज घेत होते, ती संख्या वाढवून दहा लाखापर्यन्त नेली. 600 कोटी

...2.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख.......

रुपयांचे कर्ज वितरण होते ते आता 2200 कोटी रुपयांवर आणले. मघाशी माननीय सहकार मंत्र्यांनी सांगतले की, 10 लाख शेतक-यांपैकी 6 लाख शेतकरी पुन्हा थकबाकीमध्ये गेले. प्रश्न असा आहे की, शेवटी कर्जमाफी हे वनटाईम सोल्यूशन आहे. विहिर खोदण्यासाठी, ट्रॅक्टर घेण्यासाठी, इलेक्ट्रिक पंप बसविण्यासाठी कर्ज घेतले असेल आणि ते कर्ज माफ केले तर तो माणूस त्यामधून सुटू शकतो. पण पीक कर्जाचे तसे नाही. प्रत्येक वर्षी शेतक-याला पीक कर्ज घ्यावे लागते. त्यामुळे कर्जमाफी हा कायमचा उपाय होऊ शकत नाही. त्यांनी निर्माण केलेले धान्य किंवा शेतमालाला चांगला भाव, उत्पादन खर्चावर आधारीत मिळाला पाहिजे हेच उत्तर असेल असे जे सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी सांगितले त्याच्याशी मी सहमत आहे. प्रश्नाचे मुलभूत उत्तर शोधले पाहिजे. एखाद्याने कर्ज माफ करा, अशी मागणी केली तर आम्ही नाही म्हणणार का ? कोणीच नाही म्हणणार नाही. कारण जसे तुम्ही लोकप्रतिनिधी आहात तसे आम्हीही आहोत. कोणीही वाईटपणा घेणार नाही. शेवटी कोणत्याही शेतक-याने घेतलेले कर्ज परत करण्याची त्याची इच्छा असते. शेतकरी कोणाचेही कर्ज बुडवितो अशी त्याची मानसिकता नसते. कर्जाचे ओझे वागवत तो जगत असतो. हा शेतकरी मुलाला सांगतो की, माझ्या डोक्यावरचे कर्ज परत केले तरच माझ्या आत्म्याला शांतता मिळेल.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ MMP/ KTG/ प्रथम श्री.रोझेकर ............ 18:10

श्री.विलासराव देशमुख .........

अशा प्रकारची मानसिकता असणारा आमचा बळीराजा आहे. दुर्दैवाने सातत्याने निसर्गामध्ये होणारे बदल, आमची शेती अशाश्वत आहे, पाण्यावर अवलंबून आहे, 16 टक्के इरिगेशन आहे, देशाचा ॲव्हरेज 40 टक्के आहे. आम्ही माननीय पंतप्रधानांना विनंती केली की, महाराष्ट्रामध्ये इरिगेशन वाढवावयाचे असेल तर त्यासाठी वेगळे नियम करावे लागतील. ए.आय.बी.पी. खाली पैसे देत असतांना असे राज्य तुम्ही पहिल्यांदा निवडा की जे राज्ये नॅशनल ॲव्हरेज पेक्षा कमी आहेत. ते राज्य नॅशनल ॲव्हरेज पर्यंत येण्यासाठी त्या राज्यासाठी वेगळी योजना असली पाहिजे. काही राज्ये 40 टक्क्याच्या पुढे आहेत. त्या राज्यांना सुध्दा तोच नियम आणि महाराष्ट्रासारखे जे राज्ये नॅशनल ॲव्हरेज पर्यंत सुध्दा पोहोचलेले नाहीत त्या राज्यांनाही तोच नियम लावला तर कदाचित आमच्यावर अन्याय होईल आणि म्हणून आम्ही त्यांना सातत्याने विनंती करतो की, नॅशनल ॲव्हरेज पेक्षा ज्या राज्यांचे इरिगेशन कमी आहे त्यांना नॅशनल ॲव्हरेज पर्यंत आणावे. शेवटी आम्ही सर्व प्रयत्न केले तरी आम्ही 30 ते 35 टक्क्याच्या पुढे जात नाही. राज्यातील अपूर्ण राहिलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 48 हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे. आपण 48 हजार कोटी रुपयांची व्यवस्था करुन ठराविक काळात हे सर्व इरिगेशन प्रकल्प पूर्ण केले आणि पाणी अडवून सर्व शेती ओलिताखाली आणली तरी 35 टक्क्यापेक्षा जास्त शेती पाण्याखाली येऊ शकत नाही, अशी स्थिती आहे. लिफ्ट इरिगेशन, स्प्रींकलर, पाण्याचा चांगला वापर करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, म्हणून जलसंधारणाशिवाय पर्याय नाही. जलसंधारणावर आम्ही जोपर्यंत जोर देणार नाही, पावसाचे थेंब आणि थेंब पाणी आम्ही जोपर्यंत अडविणार नाही, पाण्याची पातळी आम्ही जोपर्यंत वाढविणार नाही तोपर्यंत या प्रश्नाचे उत्तर मिळेल असे आम्हाला वाटत येत नाही. अतिशय विचित्र परिस्थितीमध्ये या राज्यातील शेतकरी काम करीत आहेत आणि म्हणून कोणताही पर्याय शिल्लक न राहिल्यामुळे दुर्दैवाने त्या शेतक-यावर आत्महत्या करण्याची पाळी येते. जगण्याची उमेद त्यांच्यामध्ये राहिलेली नाही, ती उमेद आम्हाला कशी वाढविता येईल यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. आत्महत्या हा काही पर्याय नाही. परिस्थितीशी लढण्याची जिद्द त्याच्या मनात निर्माण झाली पाहिजे. मला असे वाटते की, शेती हा विषय असा असला पाहिजे की, तो राजकारणापेक्षा वर असला पाहिजे. राजकारण म्हणून या विषयाकडे बघितले तर तो प्रश्न सुटणार

..2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ MMP/ KTG/ प्रथम श्री.रोझेकर ............ 18:10

श्री.विलासराव देशमुख .........

नाही. काही विषय असे असावेत की, ते राजकारणापेक्षा वर असावेत. एकत्रितपणे बसून आपण कशा पद्धतीने शेतक-यांचे भले करु शकतो, अशा प्रकारची व्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे. आज असे सांगण्यात आले की, कर्ज माफी झाल्याशिवाय शेतक-यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत. कर्ज माफी हा आत्महत्यांवरील रामबाण उपाय आहे येथपर्यंत आम्ही आलेलो आहोत. यासंदर्भात केंद्र शासनाने राधाकृष्ण समिती नेमली होती. देशभरामध्ये जाऊन त्या समितीने अभ्यास केलेला आहे. त्या समितीचा रिपोर्ट केंद्र शासनाकडे आलेला आहे. परवा त्यांची पहिली बैठक झाली आणि दुसरी बैठक 7 डिसेंबर रोजी होणार आहे. कर्ज माफीसंदर्भात केंद्र सरकार अतिशय गांभीर्याने विचार करीत आहे. राज्य शासनाने कर्ज माफ करावे करावे, केंद्र सरकारची वाट बघण्याची काही गरज नाही असेही सांगितले गेले. माझी सभागृहाला एवढीच विनंती आहे की, हा विषय अतिशय महत्वाचा आहे. केंद्र सरकार या विषयासंदर्भात गांभीर्याने विचार करीत आहे. यासंदर्भात जो काही विचार होईल त्या विचाराशी सुसंगत अशा प्रकारचे धोरण राज्य सरकार निश्चितपणे स्वीकारेल आणि राज्य सरकारला ते धोरण स्वीकारण्यास कसलीही हरकत नाही, असे मला वाटते. या ठिकाणी उल्लेख केला गेला की, निवडणुकीच्या वेळी तुम्ही जाहीरनाम्यामध्ये जे मान्य केले होते ते तुम्ही शेतक-यांना दिलेले नाही. कापूस एकाधिकार योजना तुम्ही जवळपास मोडीत काढलेली आहे, असेही सांगण्यात आले. आज हा कायदा अस्तित्वात नाही, ही गोष्ट खरी आहे. मी आपल्यापासून माहिती लपवत नाही. त्यासाठी केंद्र सरकारची परवानगी लागते आणि केद्र शासनाची परवानगी मिळाल्यानंतर त्याला एक्सटेंशन मिळते. मुळात म्हणजे ती परवानगीच अद्याप राज्य शासनाकडे आलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. परंतु आम्ही तो कायदा आहे असे गृहीत धरुन जेथे जेथे गरज आहे तेथे कापूस खरेदी केंद्र उघडलेली आहेत. बाजारामध्ये हस्तक्षेप करण्याच्या दृष्टीने आम्ही पावले उचललेली आहेत. केंद्र शासनाने जे दर जाहीर केलेले आहेत त्यापेक्षा 100 ते 150 रुपये दर शेतक-याला त्या ठिकाणी जास्त मिळत आहे. बी.टी. कॉटनच्या लागवडीमुळे उत्पादनामध्ये निश्चितपणे वाढ झालेली आहे. पूर्वीच्या काळामध्ये 5 क्विंटलला 25 रुपये भाव मिळत होता. आज शेतक-यांच्या उत्पादनामध्ये 10 क्विंटलने वाढ झालेली आहे.

यानंतर कु.जयश्री.....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख.......

आणि त्याला आता जरी 2200-2300 रुपये मिळत असतील तर त्या रकमेमध्ये थोडीफार का होईना निश्चितपणे वाढ झालेली आहे, त्याचा तोटा झालेला नाही. आज विदर्भामध्ये सोयाबीन हा नवीन पर्याय स्वीकारलेला आहे. या सोयाबीन पिकाच्या लागवडीखाली एकूण 1.50 लाख हेक्टर जमीन आहे. आणि जवळपास 1800 रुपये क्विंटल त्या सोयाबीनला भाव आहे. लोकांना निश्चितपणे या पिकाच्या लागवडीमुळे फायदा झालेला आहे. शेतक-याच्या मालाला उत्तम किम्मत जर मिळाली तर तो या कर्जमाफीच्या मागे लागणार नाही. म्हणून शेतकऱ्याला उत्पादन खर्चावर आधारित त्याच्या पिकाला किंमत देणे आणि त्याच्या पिकाला विम्याचे संरक्षण मिळाले पाहिजे. आज राज्यसरकारची अवस्था अशी बिकट झालेली आहे की, उत्पादनामध्ये घट झाली की सरकारने पैसे दिले पाहिजे, आम्ही पेरले पण उगवले नाही, याकरिताही शासनाने पैसे दिले पाहिजे. पिकांची किंमत कमी झाली तरी सरकारने पैसे दिले पाहिजे. परवा मी नाशिकला गेलो असता तेथील एक कांदा पिकविणारे शिष्ट मंडळ माझ्याकडे कांद्याचे भाव घसरले म्हणून सरकारने पैसे दिले पाहिजेत ही मागणी घेऊन आले. म्हणजे बाजारभाव कमी झाला म्हणून सरकारने बाजारभावामध्ये हस्तक्षेप करावा आणि शेतक-यांना पैसे द्यावे म्हणजे जे काम विमा कंपनीने करावयाला पाहिजे ते काम सरकारला करावे लागत आहे. प्रत्येक शेतक-याला इंडिव्हिज्यूअली घटक धरुन तालुका घटक धरला सर्कल पर्यंत आम्ही आलेलो आहोत, तसेच आता आम्ही गावापर्यंत देखील आलेलो आहोत. परंतु ज्यांचे नुकसान झालेले आहे त्याला ती भरपाई नाही मिळाली तर तो सरकारच्या समोर येऊन या सगळया गोष्टींची अपेक्षा सरकारकडून करणार म्हणून या विम्याच्या धोरणामध्ये फुलप्रुफ अशी योजना आमच्यासमोर आलेली नाही. आतापर्यंत जी काही पध्दत आलेली आहे ती ट्रायल ॲण्ड एरर अशा पध्दतीचीच आलेली आहे. म्हणजे काही पध्दती राबविल्यानंतर त्याचे सुपरिणाम आणि दुष्परिणाम यांचा अभ्यास करुन मग ती राबवायची की नाही ते ठरविणे अशाच पध्दती आलेल्या आहेत. याचे खरे सोल्यूशन अजूनही शासनाकडे आलेले नाही. हे शेतक-यापर्यंत कसा पोहोचविता येईल, शेतक-याच्या पिकाला कसे संरक्षण देता येईल यासंदर्भात विम्याची चांगली योजना अजूनही विकसित झालेली नाही, हे मी आपल्या सर्वांसमोर

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख ......

प्रामाणिकपणे कबूल करीत आहे. कृषी विभागाचा प्रयत्न असा आहे की, या क्षेत्रामध्ये काम करणा-या अनेक व्यक्तींच्या सूचनांचा स्वीकार केंद्रसरकारने करावा. कारण ही योजना केंद्रसरकारचीच आहे. यासंदर्भात केंद्रसरकारकडे विनंती करण्यात येईल. कारण ही योजना त्यांची असल्यामुळे जे काही प्रिमियम आहे त्यापैकी 50 टक्के पैसे रक्कम केंद्रशासन आणि राज्यसरकार 50 टक्के रक्कम देते. काही जिल्हयांना या विमा कंपन्यांमुळे चांगला फायदा झालेला आहे. आमच्यासारख्या दुष्काळी जिल्हयांना उदाहरणार्थ लातूर, उस्मानाबाद यासारख्या जिल्यांना विमा कंपन्यांमार्फत जवळ जवळ 25 ते 30 कोटी रुपये मिळालेले आहेत. शेतक-यांपर्यंत ही योजना कशी पोहोचेल याचा विचार करावा लागेल. त्याशिवाय या योजनेचा खरा फायदा होणार नाही, आज उथळ शेती मराठवाडयात का वाढलेली आहे, तर एके काळी मराठवाडा हायब्रिड पिकविण्यामध्ये क्रमांक एकवर होता. आज तो मराठवाडा कापसामध्ये क्रमांक एक वर आहे. अतिरिक्त ऊस मराठवाडयामध्ये शिल्लक राहिलेला आहे. मराठवाडयातील शेतकरी अतिरिक्त ऊस मागे राहू नये म्हणून कारखाने खोलण्यासाठी आग्रह करीत आहेत. जेथे फक्त हायब्रिड पिकायचे आणि काळी ज्वारी पिकली म्हणून मोर्चे काढले जायचे तेथे अतिरिक्त ऊस शिल्लक राहत आहे. याचा अर्थ असा आहे की, लोकांना खात्री झाली की, या कारखान्याने 500-700 रुपये जरी दिले तरी नक्की त्यांच्या घरामध्ये पैसे येणार म्हणून ऊस लागवडीकडे त्या शेतक-याचे अधिक लक्ष आहे. विदर्भामध्ये जाणीवपूर्वक साखरकारखाने निर्माण केले, जाणीवपूर्वक सुतगिरण्या निर्माण केल्या. हे प्रयत्न पश्चिम महाराष्ट्रामध्ये आणि मराठवाडयात चालले परंतु मराठवाडयाने साखर कारखानदारीमध्ये आपली जागा निर्माण केली परंतु दुर्देवाने विदर्भामध्ये ते घडू शकलेले नाही. विदर्भामध्ये कारखाने निर्माण केले परंतु ते कारखाने चालविण्यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील लोकांना पाचारण करावे लागते, हे एक आव्हान आहे सन्माननीय सदस्य श्री.गडकरी त्यांनी ते स्वीकारावे त्याकरिता जर काही सहाय्य लागले तर ते देण्यासाठी आम्ही तयार आहोत. जोपर्यंत हे आव्हान स्वीकारुन वातावरण आपण निर्माण करणार नाही आणि कापसापासून ऊसापर्यंत आपला शेतकरी वळणार नाही. अजूनही मराठवाडयामध्ये मेजर इरिगेशन प्रोजेक्ट्स नाही आहेत. मांजरा, जायकवाडी, विष्णुपूरी सोडले तर नाव घेण्याइतके मेजर प्रोजेक्ट्स नाहीत. मराठवाडयामधील

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख ......

पाणी ड्रिप इरिगेशन, स्प्रिन्कलर अशा सिंचनाच्या पध्दतीवरच अवलंबून आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये मराठवाडयाचा शेतकरी त्या ठिकाणी ऊस उत्पादनाकडे वळत आहे. जर विदर्भामध्ये त्या मानाने निसर्ग नाही म्हटले तरी प्रसन्न आहे.

यानंतर श्री.गागरे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख .....

विदर्भात ॲश्युअर्ड रेनफॉल आहे. केवळ बुलढाणा जिल्हयातील काही तालुके सोडले तर एकही डी.पी.ई.पी. तालुका विदर्भात नाही. येथे ॲश्युअर्ड रेनफॉल असून अतिशय उत्तम जमीन आहे. एरिगेशनच्या सोयी अतिशय कमी आहे, हे मी मान्य करतो. त्यासाठी आता खरोखरच पैसा दिला जात आहे. यावर्षी 2 हजार कोटी रुपये विदर्भात एरिगेशनसाठी शासन खर्च करणार आहे. राज्यपाल महोदयांनी जाणीपूर्वक हे केले आहे. पूर्वी असे घडले आहे की, एखाद्या भागावर पैसे खर्च न झाल्यास इतर भागामध्ये वळविले गेले. परंतु आता ती गोष्ट घडणार नाही. पुरवणी मागण्या असो किंवा मुळ बजेट असो. आता कोणताही पैसा राज्यपाल महोदयांच्या परवानगीशिवाय एका विभागातून दुसऱ्या विभागात जात नाही. माननीय पंतप्रधानांनी येथे भेट दिलेली आहे. पर्यावरण खात्याच्या मंजूरीसाठी जे प्रस्ताव प्रलंबित होते हे सर्व आता प्रकल्प मार्गी लागलेले आहेत. मला असे वाटते की, येत्या 2-3 वर्षात विदर्भातील चित्र बदलल्याशिवाय राहणार नाही. येथे एरिगेशन होईल, कारखाने तर उभे केलेले आहेत. फक्त उसाचे क्षेत्र करण्यासाठी कृषी विभाग आणि सर्व संबंधितांना येथे वातावरण निर्माण करावे लागेल. कारण विदर्भातील क्रॉप पॅटर्न बदलणे आवश्यक आहे. जगामध्ये सर्वत्र अन्नधान्याच्या किमती वाढत आहेत. फक्त कापसाच्या किंमती घसरत आहेत. कारण अमेरीका हा प्रमुख कापूस उत्पादक देश आहे. विदर्भातील शेतकरी सतत कापूस पिकविताना दिसत आहे. त्याने थोडे डायव्हर्सीफीकेशन इतर पिकाकडे केले पाहिजे. सोयाबीनचे पीक घेता येईल. ओलिताचे क्षेत्र असेल तेथे ऊस घेता येईल. त्यामुळे इकडे वळाले पाहिजे. आज ऊस उत्पादक शेतकरी अडचणीत आहे, त्याला कारण साखरेचे भाव आहेत. सभापती महोदय, आपणास ऊस उत्पादक व साखर कारखानदारीचा अनुभव असून आपण त्या क्षेत्रातही काम करीत आहात याची मला कल्पना आहे. 1600 रुपये क्विंटलची साखर 1000 रुपयांवर आली व 600 रुपयाचा फटका प्रत्येक क्विंटलमागे बसत असल्यामुळे आज सर्व साखर कारखानदारी अडचणीत आलेली आहे, ही गोष्ट मी नाकारत नाही. त्या सर्व साखर कारखान्यांना शासन मदत करतो तेव्हा म्हटले जाते की, सरकार फक्त ऊसाला मदत करते. इतर पिकाकडे बघत नाही, असा आरोप बऱ्याचदा केला जातो. बहुतेक साखर कारखाने चालविणारे लोकप्रतिनिधी मंत्रिमंडळात असल्यामुळे

.....2

श्री.विलासराव देशमुख .....

या धंदयाला फार मोठे संरक्षण सरकारकडून मिळत आहे, असे पुष्कळदा सांगितले जाते. सभापती महोदय, एक साखर कारखाना असेल तर शेतकरी, सभासदांची कुटुंबे जगतातच. परंतु कारखान्यावर अवलंबून असणारे कामगार, इतर उद्योग, ट्रॅक्टर दुरुस्त करणारा असेल, पंक्चर काढणारा असेल किंवा मजूरी करणारा असेल या सर्वांची कुटुंबे पोसण्याची ताकद एका साखर कारखान्यामध्ये निर्माण होते. कारखाना कोणा एका व्यक्तीच्या मालकीचा नव्हे तर शेतकऱ्यांच्या मालकीचे कारखाने आहेत. मला एवढीच विनंती करावयाची आहे की, विदर्भाच्या शेतकऱ्यांमध्ये क्रॉप डायव्हरसिफिकेशन करावयाचे असेल तर यासाठी विदर्भातील नेतृत्वाने काम करण्याची आवश्यकता आहे. यामध्ये आपण सर्वांनी पुढाकार घेऊन शेतकऱ्यांच्या मनात एक उमेद निर्माण केली तर चांगले होईल. नाही तर आपण शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे फार उदात्तीकरण करायला लागलो आहे. हे उदात्तीकरण घातक आहे, असे माझे स्वत:चे प्रामाणिक मत आहे. हे कोठेतरी थांबविले पाहिजे. लोकांमध्ये आपण उमेद निर्माण केली पाहिजे. ही उमेद निर्माण केली तर मला पूर्ण खात्री आहे की, विदर्भातील शेतकरी हा निश्चितपणे मेहनत करणारा, नवीन काहीतरी करण्याची जिद्द असणारा असल्यामुळे तो आम्हाला नक्कीच सहकार्य करेल. परंतु कोणी काहीच करीत नाही, काहीच होत नाही. आत्महत्येशिवाय दुसरा पर्याय नाही. असे वातावरण आपण  निर्माण करत गेलो तर त्याचे दुष्परिणाम निश्चितपणे होतील. सर्वांनी मिळून हे दुष्परिणाम टाळले पाहिजेत. काही गोष्टी करावयाच्या आमच्याकडून शिल्लक राहिल्या असतील तर त्याचे केवळ भांडवल करणे यापेक्षा आत्महत्या हा विषय थोडया वेगळया पध्दतीने आपण सर्वांनी हाताळला पाहिजे. असे चांगले वातावरण आम्ही निर्माण करु शकलो तर निश्चितपणे या विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या पूर्णपणे थांबविण्यामध्ये राज्यसरकारला यश आल्याशिवाय राहणार नाही. याशिवाय आणखी काही करण्याची गरज असेल आम्ही केंव्हाही चर्चेला तयार आहोत. केवळ तुम्ही सांगता म्हणून आम्हाला मान्य नाही अशी राज्य सरकारची भूमिका नाही. या प्रश्नाच्या संदर्भात तुम्हीही बसून उपाययोजना करावी. आम्ही सर्व उपाय करीत आहोत. कोणतेच औषध अजून लागू होत नाही. आजार जर पूर्णपणे बरा करावयाचा असेल तर सर्व औषधोपचार केले आहेत. आम्हाला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख .....

जेवढी सूचली तेवढी सर्व औषधे दिली आहेत. आता तुम्ही एक शेवटचे औषध सुचवित आहात की, कर्ज माफ करा म्हणजे आत्महत्या थांबतील. त्या औषधाचा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी आम्ही केंद्राकडून या सर्व कामामध्ये मदत मागितलेली आहे. आम्हाला पूर्ण खात्री आहे की, देशाचे पंतप्रधान, देशाचे कृषीमंत्री, देशाचे अर्थमंत्री हे तिघेही एकत्रितपणे बसून यावर तोडगा काढण्याच्या दिशेने ते पावले उचलत आहेत.

यानंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख......

राज्य सरकार यासंदर्भात योग्य ती भूमिका घेईल एवढे मला याठिकाणी आपल्याला सांगावयाचे आहे. सभापती महोदय, मधाशी 6 टक्कयांचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. 4 टक्क्यांची सवलत शेतकऱ्यांना देण्यात येते. एखाद्या शेतकऱ्याने 25 हजार रुपये कर्ज घेतले व त्याने हे पैसे वेळेवर परत केले तर 25 हजार रुपयांना 500 रुपये व्याज आकारण्यात येते. म्हणजेच एकूण रकमेवर 2 टक्के व्याज आकारण्यात येते. याची माहिती सर्व शेतकऱ्यांना देण्यात आलेली आहे. 25 हजार ते 3 लाख रुपये कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना 2 टक्के सवलत व 4 टक्के या दराने व्याज देण्यात येते. तसेच 25 हजार रुपयांपर्यत कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना 2 टक्के दराने कर्ज दिले जाते. शेतकऱ्यांनी घेतलेले पैसे वेळेवर दिले तर त्यांना आणखी 4 टक्के या दराची सवलत देण्यात येते. एखाद्या बँकेने शेतकऱ्यांना कर्ज देण्याच्या संदर्भात जर अडवणुकीचे धोरण घेतले व 6 टक्के या दराचा फायदा शेतकऱ्यांना दिलेला नसेल तर या संदर्भात त्या बँकेवर कडक कारवाई करण्याचे काम राज्य शासन निश्चितच करेल. यामध्ये बँकेचे किंवा सोसायटीचे कोणत्याही प्रकारे नुकसान होत नाही. शेतकऱ्यांना देण्यात येणारी सबसिडी राज्य शासन देत आहे. राज्य सहकारी बँक आणि राज्य शासन या दोघांनी या खर्चाचे ओझे उचलले आहे. शेतक-याना 4 टक्के आणि 2 टक्के यादराने आणखी सबसिडी देण्यात येणार आहे. ही सबसिडी पूर्णपणे राज्य शासन देणार आहे. त्यासाठी एक योजना जिल्हा नियोजनामध्ये होती ती आता राज्य नियोजनामध्ये घेण्यात येणार आहे. या योजनांसाठी राज्य सरकारने तरतूद करावी असा निर्णय आता राज्य शासनने केलेली आहे. 25 हजार रुपयांपर्यंत कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना 2 टक्कयांचे व्याज व 3 लाख रुपयांपर्यंत कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना 4 टक्के या दराने व्याज देण्यात येणार आहे. मला असे वाटते की, ही योजना शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करण्यासाठी अतिशय लाभदायक ठरू शकेल. शेतकऱ्याचा उत्पादन खर्च कमी करावयाचा असेल तर त्याला कमीत कमी दराने कर्ज मिळाले पाहिजे. तसेच घेतलेले कर्ज परत करण्याची मानसिकता आपण तयार केली पाहिजे.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख......

सभापती महोदय, शेतकऱ्याचे थकलेले कर्ज नंतर माफ केले जाते असे वातावरण निर्माण झाले तर जे कर्ज भरणारे लोक आहेत, ते म्हणतील की, आम्ही कर्ज भरून चूक केली. आम्ही कर्ज थकविले असते तर ते माफ झाले असते.केंद शासनाचा देखील यासंदर्भात विचार सुरु आहे. आपण बँकेच्या चेअरमन यांना विचारा, आता लोकांनी पैसे भरणे थांबवून टाकले आहे. लोकांना आता अशी भीती वाटते की, आम्ही जर पैसे भरले आणि नंतर शासनाने ते माफ केले तर कर्जमाफीचा फायदा आम्हाला मिळणार नाही. ही उपाययोजना एकाच वर्षासाठी केली जाईल असे नाही. प्रत्येक वर्षी राज्य शासनाला पैसे द्यावे लागतात व परत करावे लागतात व पुन्हा नवीन कर्ज घ्यावे लागते आणि शेतीचा धंदा करावा लागतो. त्यामळे ही कायमस्वरुपी योजना नाही. केंद्र शासनाने ठरविले की, शेतकऱ्यांना रिलीफ देता येईल, अशा प्रकारचा निर्णय झालातर राज्य शासन त्यामध्ये पुढाकार घेईल. परंतु अशा पद्धतीचे चुकीचे वातावरण तयार केले तर बँकांचा आणि सहकार खात्याचा कर्ज देण्याचा जो व्यवहार आहे तो कोलमडल्याशिवाय राहणार नाही असा इशारा मी आपल्याला या निमित्ताने देऊ इच्छितो. आम्ही आपल्या मताशी पूर्णपणे सहमत आहोत. एकदा तरी शेतकऱ्यांना पूर्णपणे कर्ज माफी आपण दिली पाहिजे. यासंदर्भात येथे सविस्तर चर्चा झालेली आहे. आता येथून मागे जाणे आपल्याला शक्य नाही. तुम्हाला शक्य तर नाहीच पण आम्हालाही मागे जाणे आता शक्य राहिलेले नाही. आपण सर्वांनी मिळून याबाबत शेतकऱ्यांच्या हिताकरीता निर्णय घेणे आवश्यक आहे. शेतीचा धंदा हा फायदेशीर ठरला पाहिजे. शेतकऱ्याची उमेद, इच्छाशक्ती, वाढविण्याचे काम आपणा दोघांनाही करावे लागणार आहे. केवळ आम्ही राज्यकर्ते आहोत म्हणून आत्महत्या झाल्या. आपण सत्तेवर असतो तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या नसत्या हा हिशोब मी करीत नाही. शेवटी ही सर्व जबाबदारी आपणा सर्वांची आहे. आमची याबाबत अधिक जबाबदारी आहे.परंतु आपली देखील याबाबत जबाबदारी आहे. अशा प्रकारे दोघांनी राजकारणा व्यतिरिक्त मिळून करण्याची आवश्यकता आहे.एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अत्यंत हुशारीने, अत्यंत चतुराईने आणि धूर्तपणे माननीय मुख्यमंत्र्यांनी सरकारची केस आज या सदनामध्ये मांडलेली आहे. त्यांनी येथे सांगितलेल्या काही गोष्टींशी मी त्यांच्याशी सहमत आहे. परंतु आता कॅन्सर इतका वाढलेला आहे की, तो तिसऱ्या टप्प्यामध्ये गेलेला आहे. हा आजचा रोग नाही. परवाही यावर चर्चा करीत असताना, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्याकडील शेतकऱ्यांचे मूळ दु:ख जे होते त्याचा महात्मा गांधीजींनी उल्लेख केला होता. हा देश कृषी प्रधान आहे आणि या देशाला खऱ्या अर्थाने उभे करावयाचे असेल तर शेतीकडे चला, ग्रामीण भागाकडे चला आणि शेतीला प्रमुख उद्योगाचे स्थान द्या व खऱ्या अर्थाने शेतकऱ्याला उभे करा असे त्यांनी सांगितले होते. आता या ठिकाणी माननीय कृषी मंत्र्यांनी सांगितले की, शेतीला प्रमुख उद्योगाचा दर्जा दिला तर त्यांना आयकर द्यावा लागेल. मी या दृष्टीने हे म्हटले नाही तर शेतकऱ्याच्या शेतीला तुम्ही पाणी द्या, वीज द्या, त्याला कमी व्याजदरामध्ये कर्ज पुरवठा करा. त्याच्या शेतीमालाला उत्पादनावर आधारित भाव द्या. या गोष्टी आपण अगोदर केल्या असत्या तर आज ही वेळ शेतकऱ्यावर आलीच नसती. मी या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांना प्रामाणिकपणे सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर राजकारण करण्याची आमची कोणाचीही इच्छा नाही, मी तर तसे करीतच नाही. केवळ शेतकऱ्याला न्याय मिळाला पाहिजे या भूमिकेतूनच आम्ही हा प्रश्न येथे मांडलेला आहे. कर्जाच्या बोजामुळे आज शेतकऱ्यांच्या मनामध्ये आत्महत्यकडे वळण्याची प्रवृत्ती वाढत आहे त्यापासून त्याला परावृत्त आपल्याला करायला पाहिजे. आता हे खरे आहे की, एकदा कर्जमाफी देऊन काही आत्महत्या थांबतीलच असे नाही. परंतु ज्या पद्धतीने व्यस्त प्रमाणात त्याला आज शेती करावी लागते आहे आणि यापूर्वीही लागली आहे त्याचा परिणाम म्हणून या आत्महत्या झ ाालेल्या आहेत, होत आहेत. तेव्हा किमान एकदा तरी तुमचे जे काही या संबंधातील धोरणे असतील ती शेतीच्या माध्यमातून लागू करा पण यामुळे जरी आत्महत्या होत असतील तर शेवटी कर्जमाफी हा एकच उपाय सध्या तरी आपल्यापुढे आहे आणि म्हणून एकदा तुम्ही शेतकऱ्याला कर्जमुक्त करा आणि मग तुम्ही आम्ही एकत्रितपणे शेतकऱ्यामध्ये बळ वाढवू, हिंम्मत वाढवू या.

सभापती महोदय, विदर्भातील शेतकऱ्याला आपण ऊस पिकविण्याचा सल्ला देत आहात पण आज विदर्भामध्ये जे काही बोटावर मोजण्याइयतके साखर कारखाने विदर्भात आहेत त्यांची अवस्था काय आहे हे आपण लक्षात घ्या. शिवशक्ती सहकारी साखर कारखाना आपणच एका सोसायटीला

....... 4के 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चालविण्यास दिला आहे त्याची अवस्था काय होती ? त्या ठिकाणी या देशाच्या एक नेत्या श्रीमती सोनिया गांधी कारखाना सुरू करण्यासाठी म्हणून आल्या होत्या तेव्हा ऊसाची मोळी टाकल्यानंतर श्री.दानवे यांच्या कडील साखरेची दोन पोती घेऊन ती सोनिया गांधींच्या माध्यमातून बाहेर दाखविली गेली. ही अवस्था आज विदर्भातील बहुतेक सर्वच साखर कारखान्यांची असली तरी यामागील मुख्य कारण म्हणजे विदर्भामध्ये सिंचनाची व्यवस्था आपण पुरेशी करून दिली नाही. वर्षानुवर्षे विदर्भातील सिंचनाचा बॅकलॉग हजारो कोटीचा निर्माण करून ती व्यवस्था होऊ दिली नसेल तर त्याला जबाबदार कोण आहे ? तुम्ही त्याची जबाबदारी स्वीकारणार असाल तर मग कोठे तरी त्याचे उतराई होण्यासाठी शेतकऱ्यांना आपण कर्जमुक्त केले पाहिजे ही मागणी आम्ही केलेली आहे. मला वाटते आपण या ठिकाणी केंद्रीय अर्थमंत्री, केंद्रीय कृषी मंत्री आणि माननीय पंतप्रधानांचा उल्लेख केला आणि आपल्याला अपेक्षित अशी जी त्यांनी बैठक होणर होती ती बैठक झाली आहे पण त्यांनी या राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देण्यास नकार दिलेला आहे. तेव्हा आता आपण यासाठी पुढाकार घेणार आहात की नाही ? आपण यासाठी पुढाकार घेऊन हे काम केले तर या राज्यातील शेतकरी आपल्याला आयुष्यभर दुवा देणार आहेत. म्हणून माझी आपल्याला आग्रहाची विनंती आहे की, आपण पुढाकार घेऊन या राज्यातील कर्जाच्या बोजाने त्रस्त झालेल्या शेतकऱ्याला कर्जमुक्त करण्याचे पाऊल टाकावे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या संदर्भात राष्ट्रीयकृत बँकांचा विषय आपण केंद्र सरकारकडे सोपवू या. परंतु या बँका कर्जाच्या मुद्दलाचा 25 टक्के, 23 टक्के पर्यंत वन टाईम सेटलमेंट करतात. आपण मागील वेळेसच ओटीएस केले असते तर शेतकरी यापूर्वीच कर्जमुक्त झाले असते. मी आपल्याला सांगतो की, बँकाची वसुली ही मुद्दलाच्या 4-5 पट आहे. माझी विनंती आपल्याला एवढीच आहे की, हे शोषण या सहकारी चळवळीमध्ये आहे. आपण बँक ऑफ बडोदा किंवा स्टेट बँकेत गेलात तर तेथे 8 टक्के व्याजदर आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... 4एल 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

जिल्हा सहकारी बँकांकडून, सेवा सहकारी सोसायटयांकडून घेतले तर 13 टक्के आहे, 5 टक्के नाबार्डचे कर्ज फिरत फिरत 3 टक्के कमिशन खात ते 12 टक्क्यापर्यंत जाते. आपल्याकडील बँका एन.पी.ए. मध्ये असल्यामुळे त्या 6 टक्क्यांनी कर्ज देण्यास तयार नाहीत. आपल्या जवळ दुसरी एजन्सी नाही. माझी विनंती अशी की, कमीत कमी जे उद्योग, व्यापारी क्षेत्राच्या बाबतीत केंद्र सरकारने आणि रिझर्व्ह बँकेने जे तत्व अवलंबिले आहे, ते आपण अवलंबिले पाहिजे. माननीय सहकार मंत्री श्री. पतंगराव कदम यांनी व्याजामध्ये माफी दिली. परंतु तुम्ही असे म्हणता की, 3 लाखाचे कर्ज घेऊन 4 टक्के व्याज नियमित भरा. There are two type of defalcation bona fide and malafide. हे 25 हजाराचे कर्ज तो देऊ शकत नाही. हे बोनाफाईड डिफॉल्केशन आहे. याचे कारण एका एकरामध्ये 3 क्विंटल कापूस झाला. आणि उत्पादन खर्च वजा जाता त्याला त्या कापसामधून काही मिळाले नाही तर तो पैसे कोठून भरणार?

सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, सहकार खात्यामध्ये प्रचलित धोरण आहे की, केंद्र सरकारच्या, रिझर्व्ह बँकेच्या गाईडलाईन्सप्रमाणे राष्ट्रीयकृत बँकांनी अशाप्रकारे केले आहे. तेव्हा तुम्ही कमीत कमी एवढे तरी करा. सहकाराचे कर्ज 100 रुपये मुद्दल असेल आणि त्याने त्यावरील 100 रुपये व्याज भरले असेल तर तेवढे माफ करा. तशी तरतूद तुमच्या कायद्यात आहे. तशाप्रकारच्या केसेस माझ्याकडे आहेत. त्यावर तीन-तीन पट आणि चार-चार पट व्याज घेतले आहे. तुम्ही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहात. सहकार कायद्याप्रमाणे सर्व सहकारी संस्थांना याबाबत डायरेक्शन देण्याचे तुम्हाला अधिकार आहेत. राष्ट्रीयकृत बँकाबाबत आपण दिल्लीमध्ये बोला. परंतु सहकारी कर्जातील हे अमानवीय अशाप्रकारचे शोषण सुरु आहे. ज्यांचे तुम्ही प्रमुख आहात त्या भू विकास बँकेचे कर्ज, सेवा सहकारी सोसायटीचे कर्ज, जिल्हा बॅकेचे कर्ज असेल त्यांच्या बाबतीत तरी आपण सांगा. ते पैसे त्यांनी भरले पाहिजेत हे बरोबर आहे. परंतु ते व्याज चार ते पाच पट झाले आहे, इतके ते अमानवीय झाले आहे.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याबाबत सेवा सोसायटया, जिल्हा बँकांचे धोरण राष्ट्रीयकृत बँकांच्या धोरणाप्रमाणे आहे काय हे निश्चितपणे तपासून घेऊ. या संदर्भात माननीय विरोधी पक्षनेते म्हणाले की, मी आजच माननीय अर्थमंत्र्यांचे स्टेटमेंट वाचले. प्रश्न तो नाही, कालची बैठक झाल्यानंतर पुढील बैठक 7 तारखेला ठेवली आहे. म्हणून याबाबत राज्य सरकारने सर्व बोजा उचलावा असा भाग नाही. केंद्र

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री. विलासराव देशमुख...

सरकार हे पूर्ण देशासाठी धोरण स्वीकारणार असेल तर ठीक आहे. परंतु त्यांनी जर सांगितले की, आम्ही हे धोरण स्वीकारीत नाही. तर मग राज्य सरकार त्याबाबत वेगळा विचार करणार असेल तर त्याकरिता पुन्हा बसावयास तयार आहोत. आपण सांगितल्याप्रमाणे दामदुपटीपेक्षा जास्त रिकव्हरी सेवा सोसायटया करीत असतील किंवा जिल्हा बँका करीत असतील तर त्याबाबत आपल्या सूचनेप्रमाणे निश्चितपणे सहकार विभागाबरोबर बसून ही बाब तपासून घेऊ. आणि त्याप्रमाणे लोकांना जो काही लाभ द्यावयाचा आहे तो देऊ. आपला जो दामदुपटीचा नियम आहे त्याप्रमाणे 100 रुपये मुद्दल असेल तर जास्तीत जास्त 100 रुपये व्याज घेता येईल. 100 रुपया वर 400 ते 500 रुपये व्याज घेता येणार नाही अशाप्रकारचा कायदा आपण राज्यामध्ये केला आहे. आपण म्हणता त्यापध्दतीने कुठे व्याज घेतले असेल तर त्याची चौकशी करु आणि त्या संदर्भात शेतकऱ्यांना नक्की दिलासा देऊ.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री म्हणत आहेत ते बरोबर आहे. तसा राज्य सरकारने कायदा केला आहे. ज्या लोकांनी शेती कर्ज घेतले आहे त्याच्या व्याजावर व्याज घ्यावयाचे नाही असे परिपत्रक सरकारने काढले आहे. परंतु काही बँकांची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही, बँका डबघाईला आल्या आहेत म्हणून त्या व्याजावर व्याज घेत आहेत. तेव्हा अशाप्रकारे ज्या बँका व्याजावर व्याज घेत असतील त्यांच्यावर आपण कारवाई करु असे सहकार खात्याने परिपत्रक काढले आहे. परंतु ज्या बँका व्याजावर व्याज घेत आहेत त्यांच्यावर आपण कारवाई करणार काय?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, सरकारने केलेल्या नियमांच्या बाहेर जाऊन चुकीच्या पध्दतीने कुणी वसुली करीत असेल तर त्या बँकांवर कारवाई केली जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, काही वेळेला शेतकऱ्याला आलेले नैराश्य कसे असते? आजच्या स्थितीत सन्माननीय मंत्रिमहोदयांच्या भाषणामधून आपल्याला अनुभवायला मिळाले. भरल्या पोटी तत्वज्ञान सांगणे ठीक आहे. याठिकाणी रिकाम्या पोटाला आपल्याला घास भरवावा लागत आहे, रिकाम्या पोटी तत्वज्ञान ऐकावयास मिळत आहे. माननीय मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांना मी विनंती करतो की, खेडयामध्ये लोक टी.व्ही. बघतात. त्या टी.व्ही. वरील "खाना खजाना" कार्यक्रम बघून ते लेकरु आपल्या मायला विचारते.

(यानंतर श्री. भोगले)

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MAP/ 18:40

श्री.दिवाकर रावते..........

माय हे बनवून देते का? तिला शक्य आहे का? कृषिमंत्र्यांनी आज आमच्यासमोर जे भाषण केले ते किती उदात्त होते, शेतीची उदात्तता काय असावी? तुमच्याकडे वीज नाही, तुमच्याकडे पाणी नाही, तुमच्याकडे इन्फ्रास्ट्रक्चर नाही, बाजार समित्या केल्या आणि मुक्त धोरण केले त्यामुळे मोठी अडचण निर्माण झाली. या सगळ्या अडचणींमध्ये शेतीतील उदात्तता दाखविली. आज घरी जाऊन चिंतन करा. पंप चालविण्यास वीज नाही. अशा परिस्थितीत गोड स्वप्न दाखविले. आम्ही काय मागायचे? तुम्ही म्हणता, आम्ही कारवाई करुन दाखवू. रेकॉर्ड काढून बघावे. आम्ही एकदा सांगितल्यानंतर तुमच्या खात्याने अशा गोष्टी शोधायच्या नाहीत? सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना सांगावे लागले. माननीय मुख्यमंत्र्यांसाठी ही नामुष्कीची पाळी आहे. त्यांचे मंत्रालय काही करीत नाही. हे सगळे नैराश्य आहे. माननीय मुख्यमंत्र्यांचा याबाबत हातखंडा आहे. मराठवाड्यातील ऊसाबद्दल 15 मिनिटे बोलत होते. त्यांना काय मदत करावी हे सांगत होते. प्रश्न असा आहे की, विदर्भातील 5 जिल्हयांमध्ये आत्महत्या होतात. सुरुवातीला 75 टक्के सांगितले. इतर जिल्हयांचा प्रश्न नाही अशातला भाग नाही. आमची आपल्याकडून अपेक्षा होती. खालच्या सदनामध्ये सांगितले, 27 नोव्हेंबरला केंद्रात बैठक आहे. लोकांना वाटले, मुख्यमंत्र्यांना बोलावणार, निर्णय होणार. कालची बैठक झाली. वर्तमानपत्रातून आम्हाला वृत्तांत वाचायला मिळाला. आपण सांगितले थोडे थांबा. 7 डिसेंबरला बैठक होणार आहे. आमची एकच अपेक्षा होती. तुम्हाला स्पष्ट शब्दात सांगतो. कुठलेही राजकारण आम्हाला करायचे नाही. मागील 4-5 वर्षातील माझी सगळी भाषणे काढून बघा. तुमच्यावर एका शब्दानेही टीका करणारे भाषण न करता शेतकऱ्यांच्या प्रश्नावर भाषण करुन शेतकऱ्यांनी जगायचे कसे हे सांगितले. आपण सांगितले राजकारण करु नका. आम्ही कधीच राजकारण केले नाही. तुम्ही आणि आम्ही मिळून शेतकऱ्यांना सांगू. केंद्राचा निर्णय काहीही होवो किंवा न होवो, हे सरकार शेतकऱ्यांची कर्जमाफी करेल. असा विश्वास तुम्ही दिला असता तर संपूर्ण महाराष्ट्रात चांगला मॅसेज गेला असता. विदर्भामध्ये मागील दोन आठवड्यापासून हे अधिवेशन सुरु आहे. हे झाले तर बघू, ते झाले तर बघू. तुम्ही निर्णय घेत नाही. श्री.अंतुले माफ करु शकले. श्री.शरद पवार माफ करु शकले तर आज मुख्यमंत्री महोदय, तुम्ही एवढी चांगली बॅटिंग करुन अमुक देणार, त्यांना तमुक देणार असे सांगणे योग्य नाही. या निर्णयामध्ये

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

शेतकऱ्यांना अमुक देणार अशी आमची अपेक्षा होती, शेतकऱ्यांचीही अपेक्षा होती. ती अपेक्षा आपण पूर्ण करु शकला नाहीत ही आमची खंत आहे. केंद्राचा निर्णय झाला तर आनंद आहे आणि तसा निर्णय झाला नाही तर आम्ही शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, शेतकऱ्यांचा सन्मान होईल, विधीमंडळाचा सन्मान होईल आणि शेतकऱ्यांना फार मोठा आधार वाटेल असा निर्णय व्हावा एवढीच आमची अपेक्षा आहे.

श्री.विलासराव देशमुख : केंद्र सरकारची बैठक 7 डिसेंबरला आहे. उद्या केंद्राने या संदर्भात नकारात्मक भूमिका घेतली तर त्यानंतर राज्य सरकार या सगळ्या प्रश्नांचा पुन्हा विचार करेल. याचा अर्थ आमची केस ओपन आहे, आम्ही ती क्लोज केलेली नाही. त्यांनी दिले नाही तर आम्ही देणार नाही असे म्हटले नाही, केंद्राने जर नाही दिले तर.....(अडथळा).....पॉझिटिव्हली माझ याकडे बघितले तर तोच अर्थ निघेल.......(अडथळा).....मग माझ्या बोलण्यातील प्रामाणिकपणा तुम्ही चॅलेंज करु शकत नाही. शेवटी जोरात कितीही सांगितले तरी आपल्याला आर्थिक बळ तितक्याच जोरात लागते. म्हणून मी सांगितले की, केंद्र सरकारने उद्या वेगळी भूमिका घेतली तर राज्य सरकार या संदर्भात पुन्हा विचार करेल. मी असे म्हटले नाही की, केंद्राने उद्या हा निर्णय घेतला नाही तर राज्य सरकार काहीच करणार नाही. याचा अर्थ आम्ही 100 टक्के केंद्रावर अवलंबून नाही. या बाबीचा आम्ही सकारात्मक विचार करीत आहोत. अशा वेळी आपण घाई करण्याचे कारण नाही.

**सभापती** : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे.

---------

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात)

**पृ.शी./मु.शी.**: विशेष हक्कभंगाची सूचना.

**सभापती** :सन्माननीय सभासद श्री. दिवाकर रावते यांनी संविधानाच्या अनुच्छेद 252(2) प्रमाणे अर्बन लँड सिलींग अँड रेग्युलेशन अॅक्ट 1976 रद्द करण्याचे अधिकार स्वत:लाही नसतांनाही केंद्रशासनाची कायदा रद्द करण्याची, सक्कतीची शर्त असलेली जबाबदारी घेतली याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांविरुध्द विशेष हक्कभंगाची सूचना दिलेली आहे. सदस्यांना त्यावर आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास त्यांनी ते थोडक्यात मांडावे.

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी यासंदर्भात हक्कभंगाची सूचना दिलेली आहे.त्या बाबतीत आपण निर्णय दिल्या शिवाय या सूचनेवर विचार मांडणे मला अप्रस्तुत वाटते .तेव्हा त्या बाबतीतील निर्णय मला आपल्याकडून अपेक्षित आहे.

**सभापती** : आपण जी विशेष हक्कभंगाची सूचना दिलेली आहे ती आपण मांडल्यावर मी यासंदर्भातील निर्णय देतो. मी यासंदर्भात मी निर्णय जरुर देईन.

श्री. दिवाकर रावते : आपण निर्णय कधी देणार ? हक्कभंगाच्या संदर्भात हा प्रस्ताव आहे.

**सभापती** :प्रथम आपण जी विशेष हक्कभंगाची सूचना दिलेली आहे त्यावर आपल्याला आणखी काही विचार मांडावयाचे असेल तर आपण ते मांडू शकता त्यानंतर मी निर्णय देईन.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपणाकडे नियम क्रमांक 240 अन्वये हक्कभंगाची सूचना दिलेली आहे. ही बाब अशी आहे की, 26 नोव्हेंबर, 2007 च्या विधान परिषदेचा आपण जो प्रस्ताव दाखवला होता या प्रस्तावाच्या संदभ्र्ात मी हक्कभंग दाखल केलेला आहे तो विशेषत: 3 मुद्यावर दाखल केलेला आहे. अर्बन लँड सिलींग रेग्युलेशन 99(2) खाली अर्बन लँड सिलींग रेग्युलेशन 96 रद्द करण्याचे अधिकार हे विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहांना दिलेले आहेत. मुळ कायदा 252(2) अन्वये झालेला आहे. रद्द करण्याचा कायदा हा सुध्दा केंद्रा मध्ये 252(2) अन्वये झालेला आहे. 252(2) अन्वये जेव्हा कायदा होतो त्यावेळेला घटनेच्या तरतूदीमध्ये म्हटले आहे की, विधीमंडळाने या ठरावाला मंजूरी देणे अशा प्रकारे त्यामध्ये स्पष्ट

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

तरतूद आहे. त्यामुळे सरकार हा विषय आस्तित्वात येत नाही. म्हणून हा कायदा रद्द करण्याचा पूर्ण अधिकार या सार्वभौम सभागृहाचा आहे तो अधिकार सरकारचा नाही. जोपर्यंत सरकार या कायद्याप्रमाणे, या सदनामध्ये 257 नुसार प्रस्तुत झालेला प्रस्ताव मंजूर करीत नाही तोपर्यंत सरकारला त्या कायद्याच्या केंद्राने केलेल्या गॅझेट प्रमाणे 252(2) प्रमाणे अंमलबजावणी करता येत नाही. यासंदर्भात कोणताही अधिकार नसतांना सुध्दा केवळ केंद्रसरकारने निधी देतो म्हणून हे करा हे सांगितल्यानंतर त्याकरिता या सरकारने एक एमओयु साईन केला.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

जो एम.ओ.यु.साईन केलेला आहे. तो 'Memorandum of Understanding between The Government of India through The Ministry of Urban Development and The State Government of Maharashtra, through the Department of Urban Development and the Municipal Corporation of Greater Mumbai' असा आहे. त्यात पुढीलप्रमाणे म्हटले आहे की, 'NOW THE PARTIES WITNESSED as follows: 1,2,3,4,5,6,7,8 and 9"केंद्र शासनाच्या वतीने सह सचिव म्हणून श्री.राजनानी यांची सही आहे. नगर विकास विभागाच्या वतीने श्री.पाठक यांची सही आहे जे आता महानगरपालिकेचे आयुक्त आहेत आणि महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून श्री.जॉनी जोसेफ यांची सही आहे जे आता मुख्य सचिव आहेत. सभापती महोदय, यामध्ये अनेक बाबी आहेत ज्या केंद्रशासनाकडून उपलब्ध व्हावयास पाहिजेत. या ॲग्रीमेंटमध्ये मूळ ॲनेक्चर जोडले आहे. त्यात "Mandatory" हा शब्द आहे. त्याचे टायटल मी वाचतो 'Mandatory Reforms at the level of the State Government' याचा अर्थ राज्य सरकारने केलेच पाहिजे, करु असे नाही, आपणास ते बायडींग आहे. याच ॲग्रीमेंटमधील एस-1 एस-2 असे विविध विषय आहेत. त्यातील एस- 5 मध्ये पुढीलप्रमाणे म्हटले आहे

a. "Please indicate if ULCRA has been repealed in the State ? No
b. If the answer to 1 (a) is no, then pleae provide any steps that have been taken in this direction त्यात राज्य सरकारने असे म्हटले आहे,

'However, the State Government has decided to repeal ULCA within one and half year'"

हा अधिकार सदनाचा आहे. या सदनाला गृहीत धरून ही ॲग्रीमेंट केलेली आहे. MOU साईन केलेला आहे. गेल्या एक वर्षापासून ही माहिती पटलावर ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे या सदनाच्या अधिकाराचा भंग झालेला आहे. MOU साईन करताना सचिवांना कोणीही थांबविले नाही. तरतुदीप्रमाणे अगोदर हे सदनात आणले असते तर या MOU ला "येस" उत्तर आले

..2..

श्री.दिवाकर रावते.........

असते "नो" आले नसते. या सदनाला गृहीत धरून MOU वर सही करून अधिकारी मोकळे झाले आहेत. या संदर्भात मी आपणाकडे हक्कभंग प्रस्ताव दिलेला आहे. त्यासोबत दोन बाबी जोडल्या आहेत. त्यातली एक बाब म्हणजे "The Urban Land (Ceiling and Regulation) Repeal Act, 1999" हा जोडला आहे. त्यात केंद्र सरकारचे हा ॲक्ट रिपील करण्यासंदर्भातील पुढीलप्रमाणे उल्लेख आहे. त्यात तीन गोष्टी आहेत त्या मी आपल्याला वाचून दाखवतो,

1. 'This Act may be called the Urban Land (Ceiling and Regulation) Repeal Act, 1999.
2. It applies in the first instance to the whole of the States of Haryana and Punjab and to all the union territories; and it shall apply to other State, which adopts this Act by resolution passed in that behalf under clause (2) of article 252 of the Constitution.
3. It shall be deemed to have come into force in the States of Haryana and Punjab and in all the Union territories on the 11th day of January, 1999 and in any other State which adopts this Act under clause (2) of article 252 of the Constitution on the date of such adoption; and the reference to repeal of the Urban Land (Ceiling and Regulation) Act, 1976 shall, in relation to any State or Union territory, mean the date on which this Act comes into force in such State or Union territory.'

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

स्पष्ट शब्दात सांगितले आहे की, घटनेच्या कलम 252 (2) नुसार राज्याच्या विधीमंडळाने याला मान्यता द्यावी. अशाप्रकारे स्पष्ट शब्दात या गॅझेटमध्ये म्हटलेले आहे. Urban Land (Ceiling and Regulation) Act, 1976 मध्ये अंमलात आला व The Urban Land (Ceiling and Regulation) Repeal Act, 1999 दि.11 जानेवारी, 1999 पासून अंमलात आला. त्यांनी कलम 252 (2) मध्ये असे म्हटले आहे 'Any Act so passed by Parliament may be amended or repealed by an Act of Parliament passed or adopted in like manner but shall not, as to respects any State to which it applies, be amended or repealed by an Act of the Legislature of that State' हे स्पष्ट शब्दात म्हटलेले आहे. कायदे करण्याचे अधिकार विधीमंडळाला आहेत. या ठरावाची जी अवस्था असावयास पाहिजे ती सांविधानिक पध्दतीची असावयास पाहिजे. गर्व्हन्मेंट रेग्यूलेशन हे सरकारचे असते व संविधानिक हे आपले असते, तो आपला अधिकार आहे. मंत्रिमंडळ काहीही निर्णय घेऊ शकते, परंतु त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कायदा या सदनात आणावा लागतो व तो संविधानिकपणे मंजूर झाला तरच तो खरा कायदा असतो. आम्ही ज्यावेळेला निर्णय घेतो तेव्हा गॅझेट काढतो. "The Maharashtra Government Rules of Business, Made under Article 166 of the Constitution of India" मी हक्कभंगासोबत हे सर्व जोडलेले आहे. घटनेच्या 166 कलमानुसार कोणत्या पध्दतीने काम करावे याबाबतसुध्दा बंधन घातलेले आहे. कलम 252 (2) संदर्भात मी जो हक्कभंग दिलेला आहे, त्यासंदर्भात आपण निर्णय द्यावा. या सदनाचा अधिकार गृहीत धरुन आपण एम.ओ.यू. साईन केला, त्यासंबंधीच माझी हक्कभंगाची सूचना आहे. एखाद्या गोष्टीवर सरकारने ऑर्डीनन्स काढणे म्हणजे तो कायदा नाही. याबाबत पान क्रमांक 2 मध्ये तरतूद आहे. अनेक गोष्टीच्या बाबतीत सरकारला ऑर्डीनंस काढून कामकाज करायचा आणि मग कायदा इथे आणून पास करायचा अशी तरतुद नाही आहे अनेक गोष्टीत सरकार निर्णय घेते. आर्डीनंस करते आणि अशा प्रकारचा कायदा मंजुर करण्यासंबंधी विनंती सभागहाकडे विनंती करते आणि हे बील येताते. घटनेच्या कलम 9 मध्ये असे म्हटले आहे की,

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

"9. All cases referred to in the Second Schedule shall be brought before the Council-" त्यासंदर्भात सरकारला मंत्रिमंडळात घेतलेल्या निर्णयासंबंधी ऑर्डिनन्स काढून सभागृहात संविधानिक पध्दतीने कायदा करावा लागतो, अशाप्रकारे जर आपण संविधानिकपणे सभागृहात कायदा आणला व तो मंजूर करुन घेतला तरच मंत्रिमंडळातील निर्णयाची अंमलबजावणी करता येते.

(i) by the direction of the Governor under clause (c) of Article 167;

(ii) by the direction of -

(a) the Chief Minister; or

(b) the Minister-in-charge of the case with the consent of the Chief Minister:"

( नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

मुख्यमंत्र्यांना खास अधिकार घटनेने दिलेले आहेत. शेडयुल टू मध्ये जो रुल 12 दिला आहे तो असा आहे. Proposal for Legislation including the issue of an Ordinance under Article 213 of the Constitution आपण जर 213 रेफर केला तर संपूर्ण अधिकार हे सदनाचे आहेत. जेथे दोन सदन आहेत, विधानसभा आणि विधानपरिषद त्यांना हे अधिकार आहेत, मिनिस्टर ऑफ कौन्सिलला तर अजिबात नाहीत. अशा पद्धतीने घटनेच्या तरतुदींचा भंग झाला आहे. सरकारला कोणी थांबविले नव्हते. ज्यावेळी रिपिल ॲक्ट झाला त्यावेळी......हा ठराव तर चुकीचा आला आहेच, त्याविषयी मी ज्यावेळी ठराव मांडला जाईल त्यावेळी भाष्य करीन..... परंतु अशाप्रकारे घटनाभंग करुन एखादी घटना घडली असतांना सभागृहाला गृहीत धरुन काम झाले आहे. दोन वर्षांपूर्वी झालेल्या एम.ओ.यु.च्या संदर्भात तो कायदा रद्द करण्याच्या प्रस्तावाच्या वेळी चर्चा करावी लागत आहे, हे योग्य आहे की अयोग्य आहे, हे ठरविणे फार महत्वाचे आहे. सरकारने केलेला हक्कभंग अत्यंत महत्वाचा आहे. आपला निर्णय येणे महत्वाचे आहे. तो आल्यानंतर या चर्चेला सुरुवात होणार आहे, मेरिट-डिमेरिट सिध्द होणार आहे. आता सार्वभौम सभागृहाच्या अधिकारांचा, प्रथा-परंपरा, हक्क याबाबतचा निर्णय आपल्याकडे येऊन पडलेला आहे व आपल्याला तो सन्मानीत करावयाचा आहे. राज्यात पहिल्यांदाच मुख्यमंत्र्यांवर हक्कभंग निर्माण झाला आहे. मुख्यमंत्री म्हणून हेड ऑफ दी स्टेट म्हणून त्यांची सही झाली आहे. जोपर्यन्त आपण हा प्रस्ताव मांडण्यास परवानगी दिली नाही तोपर्यन्त मी याची वाच्यता बाहेर कुठे केली नव्हती. वर्तमानपत्रांनी विचारले तेव्हा मी सांगितले की, सभापती महोदय यासंदर्भातील पहिले वाक्य उच्चारत नाही तोपर्यन्त अशाप्रकारची अप्रस्तुत बाब बाहेर सांगण्याचा अधिकार मला नाही, तो मुख्यमंत्री पदाचा प्रश्न आहे, माननीय सभापतींच्या निर्णय क्षमतेचा आणि निर्णयाच्या सन्मानाचा विषय आहे आणि मला मिळालेल्या अधिकाराची अप्रस्तुतरितीने चर्चा करणे संयुक्तिक नसल्यामुळे पूर्ण पावित्र्य राखण्याची माझी जबाबदारी आहे म्हणून आज भाष्य केले. ठराव आल्यानंतर आपल्या कोणालाच याबाबत कुठे वाचावयास मिळाले नाही, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना विश्वासात घेऊन मी हे केले होते, सचिवांशीही मी याबाबत बोलत नव्हतो. त्यामुळे ही चर्चा त्वरित थांबवावी आणि हक्कभंगासंदर्भात आपण आपला निर्णय द्यावा, अशी आपल्याला विनंती आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, आदरणीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री हा ठराव मांडू शकत नाहीत असा मुद्दा मांडत असतांना महाराष्ट्र विधानसभा नियम 240 चा उल्लेख केला आणि तसा त्यांना अधिकार आहे. ते हा आधार घेऊ शकतात. या नियमामध्ये असे म्हटले आहे की, हया नियमाच्या तरतुदीस अधीन राहून, सदस्यास, ज्यात सदस्याच्या किंवा विधानपरिषदेच्या किंवा तिच्या एखाद्या समितीच्या विशेषाधिकाराचा भंग अंतर्भूत असेल असा प्रश्न सभापतींच्या संमतीने उपस्थित करता येईल. आपण यु.एल.सी.ॲक्ट संदर्भात पाहिले तर हा अधिकार राज्यांचा होता. आर्टिकल 249 व 250 यामध्ये जे अधिकार राज्यांना दिलेले आहेत तो कायदा केंद्र शासन करु शकत नाही, लोकसभेमध्ये तो कायदा मंजूर करु शकत नाही. हा कायदा केंद्र शासनाने करावा म्हणून सन 1976 मध्ये राज्याने हा अधिकार केंद्र शासनाला दिला आणि केंद्र शासनाने हा अधिकार वापरुन कायदा केला. त्यानंतर सन 1999 मध्ये केंद्र शासनाने राज्यांना कळविले की, आपण कायदा रिपिल करु शकता.

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी ..........

आणि त्या पद्धतीने अनेक राज्यांनी हा कायदा रद्द केला. आपल्या शासनाने हा कायदा रद्द केला नाही. म्हणून हा ठराव आज आणण्यात आला आहे. मुळत: कायदा पास करणे, कायदा रद्द करणे हे अधिकार विधानसभा आणि विधानपरिषदेस आहेत, आपल्या या मताशी मी सहमत आहे. या दोन्ही सभागृहात कायदा मंजूर झाल्याशिवाय कायदा अस्तित्वात येऊ शकत नाही. पण हा देखील अधिकार मंत्रिमंडळाला दिलेला आहे की, गरज पडेल त्यावेळी आपण वटहुकूम काढू शकता आणि त्यानंतर कायदा अस्तित्वात येतो. त्याचा वापर आपण अनेक वेळा केलेला आहे. कायदा केल्यानंतर आपण तो रायटीफिकेशनसाठी विधानसभेमध्ये आणि विधानपरिषदेमध्ये आणतो. त्याच पद्धतीने हा कायदा रिपील करण्यासंदर्भात मंत्रिमडळात त्यांनी तो अधिकार वापरला असेल, माननीय मुख्यमंत्री महोदय त्यासंदर्भातील माहिती देतील. पण ज्यांना वटहुकूम काढून कायदा करण्याचा अधिकार आहे, तसेच त्या पद्धतीने वटहुकूमाद्वारा किंवा मंत्रिमंडळात ठरले असेल त्याप्रमाणे कायदा रिपील करण्यासंदर्भातील अधिकार मंत्रिमंडळाच्या माध्यमातून माननीय मुख्यमंत्री महोदयांना मिळतो. त्यामुळे या ठरावावर चर्चा करण्याच्या दृष्टीकोनातून काही अडचण येते असे मी मानत नाही. एक मुद्दा देखील त्यांनी या ठिकाणी मांडला की, हा अधिकार माननीय मुख्यमंत्री महोदयांना पोहोचतो की नाही. यासंदर्भात मी आपले लक्ष नियम 2 (के) कडे वेधतो. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, विधानपरिषदेचे सदस्य ठराव आणू शकता पण त्यापुढे जाऊन त्यांनी असे म्हटलेले आहे की, मंत्री देखील, विधानपरिषदेचे सदस्य नसतांना देखील मंत्री ठराव आणू शकतात आणि त्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी हा ठराव आणलेला आहे. हा ठराव राज्याच्या व्यापक हिताचा आहे, त्याचा कायद्याशी संबंध नाही. पण 23-24 हजार कोटी रुपये राज्य शासनाला मिळत असतांना ज्यावेळी अधिवेशन नसेल त्यावेळी हा अधिकार माननीय मुख्यमंत्री महोदयांना आहे त्यादृष्टीकोनातून त्यांनी एम.ओ.यू. मध्ये राज्य शासनातर्फे सही केलेली आहे. हा ठराव मांडण्याच्या दृष्टीकोनातून माननीय मुख्यमंत्री महोदयांना हरकत नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मुळामध्ये सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी जो संदर्भ घेतला तोच चुकीचा घेतला. मी नम्रपणे त्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, केंद्र सरकारने ॲक्ट रिपील केला त्यातील काही मुद्दे मी वाचले त्याकडे आपण थोड लक्ष

..2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

द्यावयास पाहिजे होते. आपण घटनेचे 249 कलम कोट केले, तो कायद्याने त्यांचा अधिकार आहे. परतु केंद्र सरकारने राज्य सरकारला अधिकृत रिपील ॲक्ट पाठविला त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, 'The Gazette of India Extraordinary Part II- Section 1 Published by Authority, Act 15 of 1999, New Delhi, Monday, March 22, 1999/Chaitra 1, 1921 (SAKA), Ministry of Law, Justice and Company Affairs (Legislative Department)' आणि यामध्ये रिपील ॲक्ट करतांना त्यांनी राज्य सरकारला काय सांगितले आणि स्वत:ही काय म्हटले ते मी वाचून दाखविले, आता पुन्हा वाचून दाखवितो. कारण घटनेमध्ये गफलत व्हायला नको. आपण ज्या घटना नमूद केल्या त्या राज्याच्या अधिकाराच्या केल्या आणि मी हक्कभंग निर्माण करीत असतांना येथे मांडलेले आहे की, हे अर्बन लँड सिलींग ॲक्ट 252 (2) नुसार निर्माण झालेला आहे. हा कायदा येथे केला नाही. कायदा केंद्र सरकारनेच केलेला आहे. आपण येथे 71 साली ठराव केला आणि तो ठराव करण्याचा अधिकार या सभागृहाचा आहे, तो ठराव मंजूर करण्याचा अधिकार या दोन्ही सभागृहाचा आहे आणि तशी तरतूद 252 (2) मध्ये आहे. आपण येथे जे नमूद केले ते वेगळया संदर्भात नमूद केले.

यानंतर कु.जयश्री.......

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

परंतु केंद्रसरकारने हा रिपेल ॲक्ट मंजूर केल्यानंतर पुन्हा तो मी वाचून दाखवितो."An Act to repeal the Urban Land (Ceiling and Regulation) Act, 1976. Be it enacted by Parliament in the Fiftieth Year of the Republic of India as follows," यामध्ये फॉलोची प्रोव्हिजन महत्वाची आहे. '(1) This Act may be called the Urban Land (Ceiling and Regulation) Repeal Act, 1999. (2) It applies in the first instances to the whole of the States of Haryana and Punjab' त्याचे मी नंतर विवेचन करणार आहे. 'and to all the Union territories' म्हणजे जे केंद्रशासित प्रदेश आहेत आणि हरयाणा,पंजाब त्यांनी हे ठराव मंजूर करुन सांगितले. कशाच्या आधारावर सांगितले, त्यांनी आपण केलेल्या ठरावावर सर्व सांगितले. केंद्रशासनाने केलेली तरतूद घटनेमध्ये तरतुद स्पष्ट आहे. 'and it shall apply to other State' याबाबत आपण चर्चा करीत आहोत. 'which adopts this Act by resolution passed in that behalf under clause (2) of article 252 of the Constitution.' Not what you have mention 249 आणि 252' याप्रमाणे राज्याचा अधिकार नाही. 252/2 नुसार करावयाला पाहिजे. अशाप्रकारचे केंद्रसरकारच्या रिपेल ॲक्ट मधील स्पष्ट संकेत आहेत आणि म्हणून आपण माझे हे आर्ग्यूमेंट करीत असतांना घटनेच्या कलम 252 नुसार आपण मार्गदर्शन केले तर सन्माननीय सदस्य श्री.गुजराथी साहेब चांगले मार्गदर्शन मला आणि या सभागृहामध्ये आपल्यातर्फे केले जाईल तसेच, आणि तरच आपण दिलेला रेफरन्स येथे ॲप्लिकेबल होईल. दोन मिनिट मला प्रथम बोलू द्या.माननीय सभापतींना हे स्वीकारण्याबद्दल भाग पडेल, अशा घटनात्मक तरतूदीबद्दल आम्हाला मार्गदर्शन करावे. ज्या दिवशी हा ॲक्ट मंजूर झाला. त्या दिवसापासून तो लागू झाला. यात जे म्हटले आहे ते स्पेसिफिक आहे. (3) It shall be deemed to have come into force in the States of Haryana and Punjab and in all the Union territories on the 11th day of January, 1999 म्हणजे ज्या दिवशी तो मंजूर झाला त्याच दिवसापासून तो लागू झाला आणि त्यात असे म्हटले आहे की, and in any other State which adopts this Act under clause (2) of article 252 of the Constitution on the date of such adoption; and the reference to

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......repeal of the urban Land (Ceiling and Regulation) Act, 1976 shall, in relation to any State or Union territory, mean the date on which this Act comes into force in such State or Union territory.' 252 /2 हे स्पेसिफिक आहे, बाकी कोणत्याही कलमाचा विचार करण्याचा संबंध येत नाही.

सभापती महोदय, भारतीय संविधानाचे 252/2 यामध्ये असे म्हटलेले आहे की, जर दोन किंवा अधिक राज्यांच्या विधानमंडळांना, Not the Government अनुच्छेद 249 व 250 मध्ये उपबंधित केले आहे. त्याखेरीज ज्यांच्याबाबत संसदेला राज्यांकरिता कायदे करण्याची शक्ती नाही अशा राज्यांमध्ये संसदेने कायद्याद्वारे विनियमन करणे हे इष्ट आहे,असे दिसून आले आणि त्या राज्यांच्या विधानमंडळांच्या सर्व सभागृहांनी त्या आशयाचे ठराव पारित केले तर...

यानंतर श्री.गागरे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

त्या बाबीचे विनियमन करण्याकरता संसदेने अधिनियम पारित करणे हे विधिसंमत होईल आणि याप्रमाणे पारित झालेला कोणताही कायदा अशा राज्यांना आणि जे राज्य त्याच्या विधानमंडळाच्या सभागृहाने किंवा दोन सभागृहे असतील तेथे त्यापैकी प्रत्येक सभागृहाने तदनंतर त्यासंबंधात पारित केलेल्या ठरावाद्वारे तो कायदा अंगीकृत करील अशा अन्य कोणत्याही राज्यास लागू होईल. म्हणजे खालच्या सभागृहाने मंजूर केले व वरच्या सभागृहाने अमान्य केले तर विधेयक नामंजूर होईल. यातील प्रत्येक शब्दाला महत्व आहे. केंद्राने कायदा केल्यानंतर एखाद्या राज्याला शहाणपण सुचले तर अशा प्रकारचे ठराव त्या विधिमंडळात केल्यानंतर हा कायदा स्वीकारता येईल.

252(2) मध्ये म्हटले आहे की, संसदेने याप्रमाणे पारित केलेला कोणताही अधिनियम, तशाच रितीने पारित केलेल्या किंवा अंगीकृत केलेल्या संसदीय अधिनियमाद्वारे निरसित किंवा विशोधित किंवा सुधारणा करता येईल, परंतु ज्याला तो लागू आहे अशा कोणत्याही राज्याच्या बाबतीत, तो त्या राज्याच्या विधानमंडळाच्या अधिनियमाद्वारे विशोधित किंवा निससित करता येणार नाही. एवढी स्पष्ट घटनात्मक तरतूद केलेली आहे.

मी 249, 250 कलम वाचले आहे हे याला ॲप्लीकेबल नाही. कारण केंद्रसरकारची तशी घटनात्मक तरतूद आहे. त्याला सर्पोटींग म्हणून मी हे मी परत वाचले आहे, ते आपण लक्षात घेतले पाहिजे. घटनेच्या अधीन राहून तुम्हाला व मला आपणा सर्वांनाच काम करावयाचे आहे, तो विषयच नाही. घटनेच्या 166 तरतूदीप्रमाणे विधिमंडळाच्या कामकाजाचे निर्बंध आहेत. त्यांनाही काही मन मानेल तसे काम करता येत नाही. घटनेच्या अधिन राहून सर्व निर्णय घ्यावे लागणार आहेत. म्हणून महाराष्ट्र स्टेट गर्व्हमेंट रुल्स ऑफ द बिझनेस 166 प्रमाणे वाचून दाखविले. परतु त्या बिझनेच्या तरतूदीमध्ये 9 कलमामध्ये असे स्पष्ट शब्दात म्हटले आहे की, थोडया वेळापूर्वी मी वाचले की, 252(2) प्रमाणे काही कायदे राज्याला करता येणार नाही. त्यामध्ये असे म्हटले आहे की, 'All the cases refered to in the second schedule shall be brought before the Council'. या सदनासमोर ते आणले पाहिजे. त्याकरिता सेंकड शेडयुल वाचून दाखविले. सेकंड शेडयुलमध्ये 'The proposal for legislation including the issue of ordinance' असे आहे, त्यामुळे हे करता येणार नाही. Under Article 213 of the constitution, घटनेच्या

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

कलम 252(2), 213 तसेच कलम 166 मधील Conduct of business of the Government of a State मध्ये कोठेही असे म्हटलेले नाही की, सरकारला हे करण्यासाठी कोणतीही फट नाही. याचे पूर्ण अधिकार संसदेचे व विधिमंडळाचे आहेत. परत त्यामध्ये महत्वाची घटना आहे की, ज्या राज्यात दोन सदने असतील तेथे प्रत्येक सदनाचा निर्णय वेगवेगळा असू शकेल. सदनाचा निर्णय भिन्न असेल तर भिन्न निर्णयाची अंमलबजावणी त्या पध्दतीने होईल. विधानसभेत या ठरावाला मंजूरी मिळाली विधानपरिष्ज्ञदेत मिळाली नाही तर रिअपील ॲक्टची नकारात्मक परिस्थिती निर्माण होईल्,अशा प्रकारच्या घटना तेथे आहेत. म्हणून माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांनी जो विषय मांडला तो या संदर्भातील नव्हता म्हणून तेवढयापुरते मी स्पष्ट शब्दात सांगितले आहे. आपण जो सांविधानिक क्लॉज मांडला तो असला पाहिजे. प्रस्तावाच्या वेळी हक्कभंगापुरते मी ही बाब निदर्शनास आणली आहे. हा अधिकार या सदनाचा आहे, तो गृहीत धरुन सरकारने वापरला आहे. म्हणून या सरकारचा हक्कभंग आहे. हक्कभंग किती टक्के झालेला आहे, किती प्रमाणात झालेला आहे. पण हक्कभंग झाला आहे हे नक्की आहे. हक्कभंगाच्या सर्व शिक्षा टोकाच्या शिक्षेपर्यत असतात किंवा नसतात. परंतु हक्कभंग झाला आहे, हे ठामपणे आपल्यासमोर मांडतो.

यानंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, यासंदर्भात मी आपणा मार्फत एक मुद्दा स्पष्ट करु इच्छितो की, याठिकाणी संविधानाचा अनुच्छेद 252(2) फक्त चार ओळींचा आहे त्याकडे मी आपले लक्ष वेघू इच्छितो. संसदेने याप्रमाणे पारित केलेला कोणताही अधिनियम तशाच रितीने पारित केलेला किंवा अंगिकृत केलेला संसदेच्या अधिनियमाद्वारे निरसित करता येईल. किंवा त्यात सुधारणा करता येईल. परंतु ज्याला तो लागू आहे, अशा कोणत्याही राज्याच्या बाबतीत त्या राज्याचा विधान मंडळाच्या अधिनियमाद्वारे सुधारणा करता येणार नाही किंवा निरसित करता येणार नाही. याचा अर्थ असा आहे की, केंद्र शासनाने हा कायदा रिपील करावयाचा नाही असे ठरविले नसते तर या राज्याला हा कायदा रिपील करता आला नसता. सन 1999 मध्ये अशी भूमिका घेतली होती की, हा कायदा निरसीत करता येईल. तो अधिकार प्रदान झालेला आहे. त्या संदर्भात विधानसभा आणि विधानपरिषदेला हा कायदा निरसित करता येईल.

आपला दुसरा मुद्दा आहे तो थोडासा वेगळा मुद्दा आहे. विधानसभेमध्ये बिल पास झाल्यानंतर विधानपरिषदेमध्ये त्याला मंजुरी दिली नाही तर परत विधानसभेमध्ये पाठवतो व तेथे मंजूर झाल्यानंतर ते बिल फायनल केले जाते. या संदर्भात मी आपणास एक मुद्दा सांगू इच्छितो की, विधान परिषदेने हे विधेयक नामंजूर केले तर विधानसभेमध्ये परत जाऊ शकते का, आणि तेथे मंजूर झाल्यानंतर हे विधेयक मंजूर झाले आहे असे समजावयाचे का ? गेल्या 30 ते 40 वर्षाच्या विधानसभा व विधानपरिषदेच्या इतिहासामध्ये फार क्वचितच अशी उदराहरणे असतील. त्यामुळे याठिकाणी मी जो दुसरा मुद्दा मांडला आहे तो ओपन राहतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, यांनी जो विशेष हक्क हक्कभंगाचा प्रस्ताव मांडला आहे त्यावर त्यांनी हा विशेष हक्क भंगाचा मुद्दा कसा होऊ शकतो याचे विश्लेषण त्यांनी याठिकाणी केले आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी जो ठराव मांडलेला आहे, तो ठराव कोणत्या पद्धतीने योग्य आहे याबाबतीत त्यांचे विचार मांडले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी मांडलेल्या मतांच्या अनुषंगाने मी या सभागृहामध्ये माझा निर्णय देतो.

..2...

**सभापती** ....

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते,यांनी दिनांक 26 नोव्हेंबर ,2007 रोजी माननीय मुख्यमंत्र्यांच्या विरुध्द विशेषाधिकार भंगाची सूचना दिलेली आहे. यासूचनेमध्ये प्रामुख्याने नमूद केले आहे की, संविधानाच्या अनुच्छेद 252/2 प्रमाणे, लँड सिलींग अँड रेग्युलेशन ॲक्ट 1976 रद्द करण्याचा अधिकार राज्य शासनाला नसून विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना असतानाही राज्य शासनाने केवळ निधी मिळविण्यासाठी दिनांक 7 ऑक्टोबर 2006 रोजी केंद्र शासनाबरोबर जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन अंतर्गत परस्पर एक करार केला व केंद्र शासनाचा कायदा रद्द करण्याची सक्तीची शर्थ असलेली जबाबदारी घेतली. तसेच एवढा मोठा बदल करण्याची माहिती गेल्या एक वर्षामध्ये सभागृहाच्या पटलावर ठेवली नाही त्यामुळे सार्वभौम सभागृहाच्या विशेषाधिकाराचा भंग झाल्याचे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी दिलेल्या सूचनेमध्ये म्हटले आहे. सन्माननीय सदस्यांनी सूचनेबरोबर अर्बन लँड सिलींग अँड रेग्युलेशन ॲक्ट,1999च्या परिशिष्ट 1ची छायांकित प्रत, संविधानाच्या अनुच्छेद 166 खाली तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र गव्हर्नमेंट रुल्स ऑफ बिझिनेसच्या संबंधित पृष्ठांच्या छायांकित प्रती, दिनांक 26 नोव्हेंबर,2007 रोजीच्या विधान परिषदेच्या दिवसाच्या कामकाजाची प्रत तसेच जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन अंतर्गत भारत सरकार, राज्य शासन व मुंबई महापालिका यांमध्ये दिनांक 7 ऑक्टोबर 2007 रोजी झालेल्या " मेमोरेन्डम ऑफ ॲग्रीमेंट " ची छायांकित प्रत जोडलेली आहे.

सदस्यांची सूचना व त्यासोबतची सहपत्रे मी बारकाईने तपासली.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मा.सभापती** ....

सुचनेसोबत जोडलेल्या मेमोरँडम् ऑफ ॲग्रीमेंटची छायांकित प्रत तपासली. त्यातील पृष्ठ 21 वर "REPEAL OF URBAN LAND CEILING AND REGULATION ACT (ULCRA)" या शीर्षकाअंतर्गत "(बी)" या सदरातील "However, the State Government has decided to repeal ULCPA within one and half year" या विधानाला सदस्यांची हरकत असल्याचे दिसून येत होते.

माननीय सदस्यांची सूचना आणि सूचनेसोबतची सहपत्रे माननीय मुख्यमंत्र्यांकडे पाठवून सदरहू सूचनेत उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने त्यांच्याकडून खुलासा मी मागविला होता. त्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांकडून 28 नोव्हेंबर 2007 रोजी खुलासा प्राप्त झालेला आहे.

माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या खुलाशात प्रामुख्याने नमूद केले आहे की, मंत्रिमंडळाने 12 एप्रिल 2007 रोजी झालेल्या बैठकीमध्ये हा अधिनियम राज्यातून निरसित करण्याचा निर्णय घेतला. सदर निर्णयानुसार शासनाने विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर केंद्र सरकारच्या नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम 1999 राज्याने अंगिकृत करण्याबाबतचा ठराव मांडला.

केंद्र सरकारने जवाहरलाल नेहरू नागरी पुनरूत्थान अभियानांतर्गत निधी उपलब्ध करून देताना काही अटी व शर्तींचा अंतर्भाव केलेला आहे. त्यामध्ये राज्याने नागरी जमीन कमाल धारणा निरसन अधिनियम अंगिकृत करावा या अटीचा अंतर्भाव आहे. या संदर्भात राज्य सरकारने केंद्र सरकारशी सामंजस्य करार (मेमोरँडम ऑफ अंडरस्टँडिंग) केलेला आहे.

जवाहरलाल नेहरू नागरी पुनरूत्थान अभियानाअंतर्गत नागरी भागातील पायाभूत सुविधांसाठी उदाहरणार्थ रस्ते, मलनिस्सारण, पाणीपुरवठा इत्यादीसाठी फार मोठ्या प्रमाणात राज्य सरकारला निधी उपलब्ध होणार आहे. नागरी क्षेत्रामध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध होऊन सदर भागाचा विकास होण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारच्या माध्यमातून हा निधी मिळविण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने सामंजस्य करार केलेला आहे त्यानुसार मार्च 2008 पर्यंत नागरी जमीन कमाल धारणा निरसन अधिनियम अंगिकृत करता येईल अशा प्रकारचे आश्वासन राज्य सरकारने केंद्र सरकारला दिलेले आहे. विधीमंडळ हे सार्वभौम असून कायदा निरसित करण्याबाबत विधीमंडळाला पूर्ण अधिकार आहे याची शासनाला पूर्ण जाणीव आहे. राज्य सरकारने 12 एप्रिल 2007 रोजी

..... 4एक्स 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

मंत्रिमंडळाने नागरी कमाल जमीन धारणा निरसन अधिनियम 1999 अंगिकृत करावा असा ठराव मांडला आहे. त्यानुसार राज्य सरकारने अर्थसंकल्पीय अधिवेशन 2007, पावसाळी अधिवेशन जुलै 2007 आणि आताचे नागपूर येथील हिवाळी अधिवेशन 2007 मध्ये या विषयावर साधक बाधक चर्चा व्हावी म्हणून विधीमंडळात हा विषय ठेवला आहे.

विधीमंडळ हे सार्वभौम असून विधीमंडळाने ठराव पारित केल्याशिवाय निरसित करता येणार नाही ही बाब स्पष्ट आहे. त्यानुसार केंद्र सरकारकडून राज्य सरकारला जवाहरलाल नेहरू नागरी पुनरूत्थान अभियानाच्या माध्यमातून नागरी पायाभूत सुविधा उपलब्ध होणार आहेत आणि त्यासाठी 23 हजार कोटी रूपयांचा निधी केंद्र सरकार कडून राज्याला उपलब्ध होणार आहे. ही बाब लक्षात घेता राज्य सरकारने केंद्र सरकार बरोबर सामंजस्य करार केलेला आहे. यामध्ये विधीमंडळाच्या सार्वभौमतत्वाचा अवमान करण्याचा शासनाचा कोणताही उद्देश नाही.

शासनाने विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर हा ठराव ठेवला आहे आणि त्यावर विधीमंडळात चर्चेअंती निर्णय होणार असल्याने, माननीय सभागृहाचा अवमान किंवा हक्कभंग होत नाही अशी माझी धारणा आहे असे प्रतिपादन माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या खुलाशात केले आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... 4एक्स 1 ..

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

सन्माननीय सदस्यांची सूचना तसेच माननीय मुख्यमंत्र्यांचा खुलासा यांचे मी काळजीपूर्वक अवलोकन केले.

सन्माननीय सदस्यांची सूचना तसेच माननीय मुख्यमंत्री महोदयांचा खुलासा एकत्रितरित्या तपासल्यानंतर माझ्या असे निदर्शनास आले आहे की, अर्बन लँड सिलिंग ॲक्ट हा अधिनियम रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेणे ही सुरुवातीची पायरी आहे. त्यानंतरची दुसरी पायरी म्हणजे, शासन त्या अनुषंगाने अनुच्छेद 252 (2) अन्वये विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात तशा आशयाचा शासकीय ठराव आणणे. तसे ते शासनाने सभागृहामध्ये आणलेलेही आहेत. मेमोरेन्डमच्या पृ.21 वरील मजकुरामध्ये शासनाने सदर अधिनियम एक ते दीड वर्षात रद्द करण्याचे ठरविलेले असल्याचे म्हटले आहे. म्हणजेच वर नमूद केल्याप्रमाणे सुरुवातीची पायरी असलेल्या शासनाने घेतलेल्या निर्णयाबाबत एम.ओ.यू. मध्ये केवळ माहिती दिलेली आहे. थोडक्यात याबाबत जी वस्तुस्थिती आहे, केवळ त्याचीच माहिती एम.ओ.यू. मध्ये दिलेली आहे. संविधानातील तरतुदीप्रमाणे शासनाने दोन्ही सभागृहामध्ये शासकीय ठराव आणलेलेच आहेत. शिवाय एम.ओ.यू. करण्याचा निर्णय व संविधानाच्या अनुच्छेद 252 अन्वयेचा विधीमंडळाचा ठराव करण्याचा अधिकार या दोन स्वतंत्र बाबी असून एक कार्यकारी प्रशासनाचा निर्णय (Executive Wing of Government) व दुसरा विधीमंडळाचे घटनादत्त अधिकार (Constitutional Powers of Legislature) असे असून यामुळे विधीमंडळाच्या घटनादत्त अधिकारावर कोणतेही अतिक्रमण (Encroachment) झालेले नाही. वरील विवेचनावरुन हे स्पष्ट होते की, सभागृहाच्या घटनादत्त अधिकारावर कोणत्याही स्वरुपाचे अतिक्रमण होत नसून यामुळे विशेषाधिकार भंगाचा प्रश्न उद्भवत नाही.

या बाबी विचारात घेता सदर सूचनेस मी अनुमती नाकारीत आहे . माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी माननीय मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या प्रस्तावावर आपले विचार मांडावेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्या निर्णयाचा सन्मान करुन त्याबाबतीत असलेल्या कायदेशीर बाबी तपासण्याचा अधिकार मी कायम ठेवत आहे. सभापती महोदय, संसदीय कार्यपध्दतीतील महत्वाचा मुद्दा मी आपणासमोर मांडतो. माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी साहेबांनी त्यासंबंधी याठिकाणी भाष्य केले आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. सभापती महोदय, मी या संदर्भात आपल्या विधानमंडळाच्या प्रधान सचिवांना एक पत्र लिहिले आहे ते मुद्दाम याठिकाणी निदर्शनास आणून देत आहे. बुधवार, दिनांक 28.11.2007, माननीय श्री. अनंत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ D/

श्री. दिवाकर रावते...

कळसे, प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, विधान भवन, नागपूर, यांसी जय महाराष्ट्र. सभापती महोदय, मुळात नियम 106 अन्वये आलेला प्रस्ताव अयोग्य पध्दतीने आला आहे असे माझे मत असल्याचे या पत्रामध्ये म्हटले आहे. ते मी आपणास वाचून दाखवितो. "महोदय, सभागृहासमोर आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर बाब क्र. 9 नुसार मा. मुख्यमंत्री यांनी 106 अन्वये ठराव मांडला आहे त्या संदर्भात हे पत्र.

नागरी जमीन कमाल धारणा कायदा 251 (2) नुसार केंद्रात मंजूर केला. घटनेच्या तरतुदीनुसार दोन किंवा अधिक राज्याच्या विधानसभा, विधानपरिषदेत त्या राज्याने ठराव मंजूर केला तरच लोकसभा व राज्यसभा यामध्ये हा कायदा अस्तित्वात आणता येतो.

जशी कायदा करण्याची तरतूद आहे, तशीच कायदा रद्द करण्याच्या बाबतीत घटनेची कलम 252 (2) नुसार त्याच पध्दतीची तरतूद संसदीय कार्यपध्दती अंमलात आणते, ही घटनादत्त बाब आहे.

केंद्राने हा कायदा हरयाणा आणि पंजाब या राज्याच्या विधानसभेने केलेल्या ठरावाला अनुसरुन (सरकारने नव्हे) संबंधित कायदा 1999 मध्ये लोकसभेने रद्द केला आणि त्या संदर्भातील राजपत्र सोमवार, दिनांक 22 मार्च, 1999 रोजी जारी केले त्यानुसार हरयाणा, पंजाब आणि सर्व केंद्र शासित प्रदेशाकरीता हा कायदा रद्द करण्यात आला असून इतर राज्यानी घटनेच्या 252 (2) नुसार विधानसभा व विधानपरिषदेत असा ठराव पारित केला तरच तो कायदा रद्द होईल अशाप्रकारची तरतूद राजपत्रात कलम (3) मध्ये स्पष्ट शब्दात केली आहे.

महाराष्ट्र विधानपरिषद नियमात विधानमंडळाचे सन्माननीय प्रधान सचिव आणि सदस्य यांना बंधनकारक असून पीठासीन अधिकाऱ्यांनी याचे निर्णय, अधिकार वापरत असताना या तरतुदी अंतर्गत अधिन राहून ते वापरण्याचे बंधनकारक आहे. मा. सभापतींना त्या संदर्भातील योग्य मार्गदर्शन आणि सल्ला देण्याचे प्रधान सचिव म्हणून आपली जबाबदारी आहे, असे माझे ठाम मत आहे.

(यानंतर श्री. भोगले)

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/ 19:35

श्री.दिवाकर रावते...............

महाराष्ट्र विधानपरिषद नियम 257 नुसार हा प्रस्ताव संविधानिक असल्यामुळे तो नियम क्र.257 नुसार विधानपरिषद सदस्याने मांडणे अशाच प्रकारची तरतूद आहे. सदर प्रस्ताव 106 नुसार मा.मुख्यमंत्र्यांनी विधानपरिषदेत मांडला तोच नियमाचा भंग करणारा आहे कारण केंद्र शासनाने रद्द केलेला एखादा प्रस्ताव हा संविधानिक असून तो सदस्यांनी नियमात आधीन राहून मांडणे आवश्यक होते. मात्र तो 106 नुसार या सदनाच्या सदस्य नसलेल्या माननीय मुख्यमंत्र्यांनी मांडणे हे नियमानुसार नाही, त्यांनी हा प्रस्ताव सभागृहासमोर मांडणे हा नियमांचा भंग आहे त्यामुळे प्रस्ताव अनधिकृत आहे. तसेच महाराष्ट्र विधानपरिषद नियम संविधान सुधारणेचे अधिनियम भाग 13 नुसार 155, 156, 157 ने मी आपल्या खास निदर्शनास आणीत आहे. खासकरुन नियम 155 नुसार आपण पाहणे आवश्यक आहे. सदनात संसद सभागृहाकडून संविधानाची सुधारणा संदेश पटलावर ठेवल्यानंतर, योग्य संधी मिळेल तेव्हा राज्य शासनाला कळविण्याची जबाबदारी आहे. तेव्हा विधानसभा व विधानपरिषदेबाबतच्या कार्यपध्दतीत आपले कर्तव्य स्पष्ट शब्दात दिले आहे.

त्यासंदर्भात पुढील कार्यपध्दती 156, 157 नियमाच्या कामकाजात नोंदविली आहे. या नियम प्रयोजनांतर्गत प्रस्ताव 106 अन्वये मा.मुख्यमंत्र्यांनी मांडणे हे सर्वस्वी अयोग्य आहे. हा प्रस्ताव विधानमंडळाच्या सदनापुढे यावयाचा असेल तर प्रस्तुत प्रस्ताव विधानपरिषद नियमाच्या आधीन राहून प्रस्ताव मागे घेणे आवश्यक आहे.

कृपया या संदर्भात नियमाचा झालेला भंग हा संसदीय कार्यपध्दतीची कळत नकळत झालेली चूक असेल, आपल्या सरकारचा हा प्रस्ताव मांडण्याची घाई लक्षात घेता कदाचित घटना तरतुदीकडे, नियमाकडे दुर्लक्ष झाले असेल हे लक्षात घेता हा प्रस्ताव विधानपरिषदेपुढे ठेवण्यास स्थगिती देणे ही घटनात्मक जबाबदारी असून नियम 155 नुसार या तरतुदीची सर्व कार्यपध्दती आपल्या अधिकारात असल्यामुळे याबाबत ताबडतोब मा.सभापतींनी योग्य तो सल्ला देऊन आजच्या कार्यक्रमातील विषय क्र.9 तहकूब करण्यात यावा अथवा प्रधान सचिव म्हणून संपूर्ण जबाबदारी, संसदीय जबाबदारी आपणाकडून अंमलात न आल्याबद्दलची नोंद योग्य पध्दतीत घ्यावी लागेल हे आपल्या निदर्शनास आणीत आहे. या संदर्भात मी लोकसभेचे गटनेत्यांच्या माध्यमातून लोकसभेचे माननीय महासचिव यांच्याकडून अधिकृत मत घेण्याचा प्रयत्न करीत आहे तसेच घटना तज्ज्ञांच्या माध्यमातून या संदर्भात तरतुदीची योग्य अयोग्य याबाबत अधिकृत मत घेण्याचा मी प्रयत्न करीत





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/ 19:35

श्री.दिवाकर रावते..............

आहे. आपणाकडून सहकार्याची व निर्णयाची अपेक्षा. अशा प्रकारचे पत्र मी माननीय प्रधान सचिवांना लिहिले आहे. आपण आता जो निर्णय दिला त्यामधून हे स्पष्ट झाले की, हे सभागृह सार्वभौम आहे. सभागृहाचा हा निर्णय असला पाहिजे. तेव्हा अशा प्रकारचा संविधानिक प्रस्ताव विचारात घेत असताना नियम 257 असे म्हणतो, "ज्या कोणत्याही सदस्याची सांविधिक प्रस्ताव मांडण्याची इच्छा असेल तो ज्या अन्वये उक्त प्रस्ताव केला जात असेल तो परिनियम किंवा अधिनियमिती यात अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त किंवा संबंधित विभागाच्या प्रभारी मंत्र्यांच्या मताविषयी खात्री करुन, सभापती अन्यथा निदेश देतील त्या व्यतिरिक्त पूर्ण दहा दिवसाची सूचना देईल व त्या सूचनेबरोबर नियोजित ठरावाची प्रत सादर करील." हा प्रस्ताव संविधानिक आहे. तो संसदेने मंजूर केलेला आहे. संविधानिक प्रस्तावाबाबत निश्चित स्वरुपामध्ये आपली नियमावली काय म्हणते? हा प्रस्ताव मी केव्हा मांडणार? मला ज्ञात होईल तेव्हा मांडणार. ज्ञात करण्याची पध्दत स्पष्ट शब्दात याठिकाणी नमूद केली आहे. भाग-तेरा, संविधानातील सुधारणेचे अनुसमर्थन, नियम 155 यात स्पष्ट शब्दात म्हटले आहे की, संसद सभागृहाकडून संविधानातील सुधारणेसंबंधातील अनुसमर्थबाबत संदेश मिळताच, शक्य तितक्या लवकर, सचिव विधेयकासह संदेशाची एक प्रत, सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सरकारचा यात काही संबंध नाही. रिपिल ॲक्ट आपल्या पटलावर ठेवून त्यासंदर्भात सदस्यांना माहिती देणे ही जबाबदारी सचिवांची आहे. दुसरी जबाबदारी अशी आहे की, सचिव, विधेयकासह संसदेची एक प्रत विधेयकासह योग्य संधी मिळताच राज्य शासनाकडे पाठवतील. सभापती महोदय, काल जसे सदस्यांच्या प्रस्तावावर आपले धोरण शासनाने जाहीर केले तसे रिपिल ॲक्टच्या संदर्भातील प्रस्ताव या सदनातील सदस्यांच्या माध्यमातून सरकारची इच्छा असेल तर आणणे भाग होते. यामध्ये मंत्रीमंडळाचा काही संबंध नाही. आता मुख्यमंत्र्यांच्या खुलाशात यासंदर्भातील सर्व माहिती आलेली आहे की, मंत्रिमंडळाने तसा ठराव केला त्यामुळे आता त्याला "चॅलेंज" केले जाणार आहे. म्हणून मी त्यावेळेस सांगितले की, कायद्याच्या संदर्भातील "मी माझा अधिकार राखून ठेवतो." कलम 156 मध्ये असे म्हटले आहे की, "नियम 155 अन्वये संदेश पटलावर ठेवण्यात आल्या नंतर कोणत्याही सदस्याला 3 दिवसाची सूचना देऊन विधेयकाद्वारे प्रस्थापित करण्यात आलेल्या संविधानाच्या सुधारणेस अनुमती देणारा ठराव मांडता येईल". सदस्यांनी अशा प्रकारचा प्रस्ताव दिला तर त्यापुढे असे म्हटले आहे की, "सभापती, सभागृहाच्या नेत्यांशी विचारविनिमय करुन, ठरावातील चर्चेसाठी तारीख निश्चित करतील." त्यापुढे असे म्हटले आहे की, "अशा ठरावास कोणतीही सुधारणा प्रस्तावित करता येणार नाही. सभापतीस, त्यास योग्य वाटेल तर, भाषणांसाठी कालमर्यादा विहित करता येईल.

सभापती महोदय, कलम 157 मध्ये असे म्हटले आहे की, "सभागृहाकडून ठराव संमत करण्यात आला तर, नियम 155 मध्ये निर्दिष्ट केलेला संदेश ज्या संसद सभागृहाकडून आला असेल त्या संसद सभागृहाकडे सुधारणेस परिषदेने अनुसंमती दिल्याबद्दलचा संदेश पाठविण्यात येईल."

सभापती महोदय, या संदर्भात इतक्या स्पष्ट शब्दात सांगितलेले आहे की, रिपिल ॲक्ट 1999 मध्ये झाला व तो येथे आल्यानंतर त्यावेळच्या सचिवांनी तो रिपिल ॲक्ट पटलावर ठेवावयास पाहिजे होता. सरकारला जर हा प्रस्ताव पास करावयाचा होता तर सरकारने 257 अन्वेय प्रस्ताव मांडावयास पाहिजे होता व त्यावर चर्चा करुन जो काही निर्णय लागेल तो निर्णय सचिवांनी संसदेच्या सचिवांना कळवायचा होता. वुई हॅव ॲक्सेप्टेड युवर अमेंडमेंट दि स्टेट हॅज ॲक्सेप्टेड दि अमेंडमेंट. अर्बन सिलींग ॲक्ट हा राज्याचा नसून तो केंद्रशासनाचा आहे. .....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

त्यामुळे यासंदर्भात माझा अधिकृत मुद्दा असा आहे की, नियम 106 अंतर्गत आलेला हा प्रस्ताव तो या सदनाचा प्रस्ताव होऊ शकत नाही. या सदनाचा प्रस्ताव व्हावयाचा असेल तर या सर्व तरतूदी अंतर्गत तो संविधानिकच असला पाहिजे म्हणून हा प्रस्ताव तातडीने मागे घेण्यात यावा व संविधानिक तरतूदी प्रमाणे असा प्रस्ताव सभागृहापुढे यावा व या सभागृहाच्या हक्काचे रक्षण करण्याची मी आपल्याला विनंती करतो.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, एक अकॅडमिक डिस्कश्न म्हणून आपण या विषयाकडे पाहतो आहे. नियम 155,156,आणि 157 हे अमेंडमेंट टू क्वॉन्स्टीटयूशनच्या संदर्भातील आहे. संविधानातील सुधारणेस अनुसंमर्थन. या ठिकाणी घटनेच्या संदर्भात चर्चा नसल्यामुळे नियम 155,156 आणि 157 .....

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते: सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. घटनेमध्ये जे बदल घडतात ते आपल्याकडे कधी येत नाही. सांविधानिक प्रस्ताव, सांविधानिक ठराव, सांविधानिक निर्णय,सांविधानिक कायदा,कॉन्स्टिटयुशनल अमेंडमेंट येथे येते असे सन्माननीय सदस्य सांगत असतील तर ते कठीण आहे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, घटनेला जी अमेंडमेंट आहे, त्या संदर्भात 154, 155, 156, 157 आहेत. आपण त्यास अमेंडमेंड देऊ शकतो असे नाही. त्याचे हेडींग आहे, "संविधानातील सुधारणेचे अनुसमर्थन". 155 मध्ये पुढील प्रमाणे उल्लेख आहे " संसद सभागृहाकडून संविधानातील सुधारणेसंबंधातील अनुसमर्थनाबाबत संदेश मिळताच, शक्य तितक्या लवकर, सचिव विधेयकासह संदेशाची एक प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवतील" हे कॉन्स्टिटयुशनलच्या संदर्भात आहे. मी सन्माननीय सदस्यांचा मुद्दा खोडण्यासाठी उभा नाही. 155,156, 157 हे कॉन्स्टिटयुशन आपल्याला अमेंड करावी लागते आणि राज्यातील विधानसभेची त्याला अनुमती लागते त्यासाठी त्या संदर्भातील हे नियम आहेत हे माझे मत मी मांडले आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी नियम 155, 156 व 157 चा उल्लेख केला. 157 मधील (2) वाचले तर माझ्या लक्षात येईल की, संसदेने केलेल्या घटना दुरुस्तीला राज्याला त्यास विरोध करण्याचा अधिकार नाही. नियम 157 (2) मध्ये म्हटले आहे की, सभागृहाकडून ठराव फेटाळण्यात आला असेल तर विधानपरिषदेने सुधारणेचे अनुसमर्थन केले नसल्याबाबतचा संदेश उपरोक्त प्रमाणे पाठविण्यात येईल. संविधानामध्ये सुधारणा केली असली तरी आपल्याला घटनेमध्ये दुरुस्ती केल्यानंतर त्या घटना दुरुस्तीचे समर्थन अथवा विरोध करण्याचा अधिकार विधानपरिषदेला नाही." आपण जो शब्दप्रयोग वापरला तो 257 संदर्भात वाचला तर आपल्या लक्षात येईल की, हा सांविधिक ठराव आहे. हा ठराव केंद्रातील कायद्यासंबंधात आलेला ठराव आहे म्हणून तो सांविधिक ठराव आहे. अन्यथा राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी कोणताही ठराव मांडला असता तर तो वेगळा ठरला असता. हा सांविधिक ठराव आहे. तो संविधानाच्या संदर्भातील नाही. मराठीत संविधान असे म्हटले जात नाही, मराठीत घटना हा शब्द आहे. संविधान हा शब्द हिंदी आहे.

.2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, मी माझे मत मांडलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी त्यांचे मत मांडलेले आहे. मी नियम 257 देखील वाचलेला आहे. तरी देखील मला वाटते की, नियम 155, 156, 157 हे फक्त अमेंडमेट टू कॉन्स्टिटयुशनच्या संदर्भात आहे असे माझे मत आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला या संदर्भात एकच गोष्ट लक्षात आणून द्यावयाची आहे की, विधानसभा किंवा विधानपरिषदेस कोणत्याही घटनेमध्ये अमेंडमेंट करण्याचा अधिकार या दोन्ही सदनाला नाही, तो अधिकार फक्त संसदेला आहे. Any amendment to the constitution can only be proceeded in the Parliament and not in the Council and Assembly. हे जे नियम बनविले आहेत ते सांविधानिक, वैधानिक नियम आहेत. वैधानिक कामकाजासाठी हे नियम बनविलेले आहेत. They are not applicable to the contistitution at all. यादृष्टीकोनातून मला आपणास विनंती करावयाची आहे की, याठिकाणी संपूर्ण भूमिका मांडलेली आहे. त्यादृष्टीकोनातूनच या सर्व गोष्टींचा उल्लेख व्हावा एवढेच मला सांगायचे आहे. यावर खूप बोलण्यासाठी आहे पण मी आता बोलणार नाही. कारण याठिकाणी सन्माननी सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सविस्तर भूमिका मांडलेली आहे.

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मी संविधानाचे आर्टीकल 368 (2) याकडे सभागृहाचे लक्ष वेधतो. यात असे म्हटले आहे की, " संविधानाच्या विशोधनाचे सूतोवाच संसदेच्या दोहोंपैकी कोणत्याही सभागृहात त्या प्रयोजनाकरता विधेयक प्रस्तुत करता येईल, आणि जेव्हा ते विधेयक प्रत्येक सभागृहात त्या सभागृहाच्या एकूण सदस्य-संख्येच्या बहुमताने व त्या.....तसेच पुढे (ड) या अनुच्छेदाचे उपबंध दिले असून त्यात असे म्हटले आहे की, " यात कोणताही बदल करु पाहात असेल तर, अशा विशोधनाचा उपबंध करणारे विधेयक राष्ट्रपतीला अनुमतीसाठी सादर करण्यापूर्वी ते विशोधन राज्यांपैकी किमान निम्म्या राज्यांच्या विधानमंडळांनी पारित केलेल्या तशाच आशयाच्या ठरावांद्वारे त्या विधीमंडळांकडून अनुसंमत होणेही आवश्यक असेल." हा जो ठराव आहे तो कॉन्स्टिटयूशन अमेंडमेंड नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी प्रधान सचिवांना जे पत्र लिहिले आहे ते दिनांक .....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, समजा घटनात्मक तरतूद असेल आणि ती पटलावर ठेवण्यात आली असेल तर त्याचा ठराव येवू शकतो का ? व तो येथे आला तर तो या सदनाला रिजेक्ट करण्याचा अधिकार आहे का ? याठिकाणी नियमांमध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, "सभागृहाकडून ठराव संमत करण्यात आला तर... किंवा ठरावाची संमती किंवा असंमती हे दोन्ही विषय यामध्ये आलेले आहेत. एखाद्या घटनेमध्ये दुरुस्ती केली तर ती दुरुस्ती सदनामध्ये येते की नाही, हा मुळात प्रश्न आहे. आपण म्हणालात की, हे कॉस्टिटयूशन नाही. मला हा नविन चमत्कार वाटतो. घटना दुरुस्ती झाल्यानंतर ती आपल्याकडे येते, त्यानंतर ती सभागृहाच्या पटलावर ठेवली जाते, त्यानंतर येथे ठराव येतो, त्यानंतर त्यावर संमती, असंमती केली जाते, घटनेची दुरुस्ती 2/3 नेच होऊ शकते, अशी घटनेत तरतूद आहे. 2/3 ने झालेली घटना ही कायम होऊ शकते. तो बदलण्याचा अधिकार राज्यामध्ये किंवा देशामध्ये कोणालाच नाही. आपण तसे रुलिंग द्या, त्याबद्दल मला काहीही म्हणावयाचे नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, यासाठी आमची सूचना अशी आहे की, यासंदर्भातील कॉन्स्टिटयूशन प्रोव्हीजन्स् काय आहेत, याचे मार्गदर्शन करण्यासाठी आपण ॲडव्होकेट जनरल यांना बोलवावे.

....2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : घटना बदलण्याचा आपल्याला अधिकार आहे का ?

( काही सन्माननीय सदस्य एकाच बोलतात.)

श्री.उल्हास पवार : ...तो अस्तित्वात येऊ शकत नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : ज्यावेळी हा प्रस्ताव लोकसभेत आला त्यावेळी मी तेथे होतो. यासंदर्भात लोकसभेत काय चर्चा झाली, कोणत्या राज्यासाठी झाली यासंदर्भात मी जरुर बोलणार आहे. परंतु आम्ही प्राथमिक ऑब्जेक्शन घेतले आहे, विरोध केला आहे आणि जो हक्कभंगाचा प्रस्ताव दिला आहे, त्या हक्कभंगासंबंधी चर्चा सुरु असल्यामुळे मी त्या चर्चेत जात नाही.

**सभापती** : याठिकाणी कोणताही ठराव अथवा प्रस्ताव ज्यावेळी विधान परिषदेमध्ये येतो तेव्हा तो संमत किंवा असंमत करता येतो. माझे असे मत आहे की, तो या सदनातील सन्माननीय सदस्यांचा अधिकार असून चर्चेअंती ते सर्व ठरवतात.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो प्रधान सचिवांना दिनांक 28.11.2007 रोजी पत्र लिहिलेले आहे. त्या पत्राबाबतीत माझा निर्णय मी देणार आहे. त्याअगोदर सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी जी सूचना केली, त्याबाबत ॲडव्होकेट जनरलचे अभिप्राय मागविण्याची मला काही आवश्यकता वाटत नाही.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.........

श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांनी प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमडळ सचिवालय, यांना दिनांक 28/11/2007 रोजी एक पत्र लिहून विधानपरिषद कामकाजातील बाब क्रमांक 9 च्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री यांनी विधानपरिषद नियम 106 अन्वये मांडलेला शासकीय ठराव याबाबत खालील मुद्दे उपस्थित केले.

विधानपरिषद नियम हे विधानमंडळाचे प्रधान सचिव व सदस्यांना बंधनकारक असणे, पीठासीन अधिकाऱ्यांना त्यांचे निर्णय व अधिकार वापरत असताना या तरतुदींअंतर्गत अधीन राहून ते वापरण्याचे बंधन.

माननीय सभापतींना योग्य मार्गदर्शन व सल्ला देण्याची प्रधान सचिव यांची जबाबदारी.

विधानपरिषद नियम 257 अन्वये हा प्रस्ताव संविधानिक ( Statutory ) असल्यामुळे तो या नियमानुसार केवळ विधानपरिषद सदस्यच मांडू शकतात अशाच प्रकारची तरतूद आहे. हा प्रस्ताव नियम 106 अन्वये माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानपरिषदेत मांडला. हा नियमभंग असल्याचे प्रतिपादन करुन सांविधानिक प्रस्ताव सदनाचा सदस्य नसलेल्या माननीय मुख्यमंत्र्यांनी मांडणे हे नियमानुसार नाही आणि त्यामुळे हा प्रस्ताव अनधिकृत आहे.

तसेच त्यांनी विधानपरिषद नियमातील संविधान सुधारणांचे अनुसमर्थन या संबंधात नियम 155, 156 व 157 कडे लक्ष वेधून नियम 155 अन्वये संविधानाचे सुधारणा संदेश सभागृहात पटलावर ठेवण्याची जबाबदारी सचिवांवर आहे असे नमूद केले.

पुढे या संदर्भात त्यांनी नियम 106 अन्वये नागरी कमाल जमीन धारणा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्र्यांनी मांडणे सर्वस्वी अयोग्य असून तो मागे घेणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले.

या बाबींचा विचार करुन कामकाजपत्रिकेतील बाब क्रमांक 9 तहकूब करण्यात यावी अन्यथा प्रधान सचिव म्हणून संपूर्ण संसदीय जबाबदारी आपणाकडून अंमलात न आल्याबाबतची नोंद योग्य पध्दतीने घ्यावी लागेल.

या संदर्भात सदस्य श्री.दिवाकर रावते हे लोकसभेच्या गटनेत्यांच्या माध्यमातून लोकसभेचे महासचिव तसेच घटनातज्ज्ञांच्या माध्यमातून अधिकृत मदत घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. असेही पत्रात पुढे त्यांनी नमूद केले.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

...2.....

**सभापती**..........

या प्रकरणात वस्तुस्थिती अशी आहे की,

1) संविधानाच्या अनुच्छेद 252(2) नुसार विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात नागरी कमाल जमीन धारणा संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी शासकीय ठराव मांडलेला आहे. (नियम 106 अन्वये )

2) शासकीय ठरावाच्या तरतूदी, विधानपरिषद नियम 106 मध्ये दिल्या असून त्यात असे म्हटले आहे की, " ज्या ठरावाची सूचना मंत्री किंवा महाअधिवक्ता यांनी दिलेली असेल या ठरावाला नियम 102 च्या तरतुदी लागू असणार नाहीत. तसेच अशा ठरावात 7 दिवसांची सूचना देणे आवश्यक आहे. म्हणजेच एखाद्या ठरावाची सूचना शासनाकडून प्राप्त झाली असेल आणि ती संविधानाच्या किंवा अधिनियमाच्या तरतुदींना अनुसरुन असेल असे ठराव शासकीय ठराव म्हणून गणले जातात."

हा नागरी जमीन कमाल धारणा ठराव निश्चितच विधानपरिषद नियम 257 अन्वये सांविधानिक प्रस्ताव ( Statutory Motion ) आहे व तो नियम 257 अन्वये कोणत्याही सदस्याला मांडता येतो.

विधानपरिषद नियम 2(के) मध्ये "सदस्य" या संज्ञेची व्याख्या दिलेली असून त्याप्रमाणे विधानपरिषदेचे सदस्य.

परंतु सदस्य नसलेला मंत्री व महाअधिवक्ता यांना विधानपरिषदेच्या कामात भाषण करणे, प्रस्ताव मांडणे व इतर रितीने भाग घेणे या प्रयोजनासाठी आणि तिच्या ज्या प्रयोजनासाठी "सदस्य " म्हणून समजण्यात येईल.

परंतु ज्या नियमांच्या आधारे त्यांना कोणत्याही प्रस्तावावर मत देण्याचा अधिकार, अथवा गणपूर्तीच्या प्रयोजनासाठी तो सदस्य म्हणून समजण्यात येणार नाही.

नियम 2(एम) मध्ये "मंत्री" या संज्ञेची व्याख्या दिली असून त्यात," मंत्री म्हणजे मंत्रिमंडळाचा सदस्य व यात राज्यमंत्र्यांचा, उपमंत्र्यांचा व संसद सचिवांचा समावेश होतो."

नियम 2(डब्ल्यू) मध्ये "सांविधिक प्रस्ताव" या संज्ञेची व्याख्या दिली असून त्यात "अंमलात असलेल्या कोणत्याही संविधीस किंवा अधिनियमितीस ( Any statute or enactment )ला अनुसरुन केला प्रस्ताव."

...3........



SRR/ D/ MMP/ 19:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**........

वरील सर्व नियमांचा एकत्रितपणे विचार केल्यास ही बाब स्पष्ट होते की, कोणत्याही मत्र्यांला, तो विधानपरिषदेचा सदस्य नसला तरी नियम 257 नुसार सांविधिक प्रस्ताव किंवा नियम 106 अन्वये शासकीय ठराव मांडता येतो. नियमाप्रमाणे याला कुठेही बाधा येत नाही. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानपरिषद नियमाप्रमाणे विधानपरिषदेच्या सभागृहात प्रस्ताव मांडलेला आहे.

सदस्यांनी संविधान अनुसमर्थनार्थ याबाबतचे मुद्दे प्रस्तुत केले ते गैरसमजुतीवर आधारित असल्याचे दिसते.

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ...........

कारण या तरतुदी संविधानातील अनुच्छेद 368 अन्वये संविधानाच्या सुधारणा (Amendment to Constitution) या बाबींशी संबंधित असून अनुच्छेद 368(2) अन्वये संविधानातील सुधारणा त्या अनुच्छेदातील (क), (ख), (ग), (घ), (ङ) मध्ये संघराज्याशी संबंधित तरतुदी (Provisions relating to federal nature) संबंधित असल्यास अशा सुधारणांची तरतूद करणारे विधेयक माननीय राष्ट्रपतींकडे अनुमतीसाठी सादर करण्यापूर्वी त्या सुधारणेच्या राज्यापैकी किमान निम्म्या राज्यांच्या, विधानमंडळाने पारित केलेल्या तशाच आशयाच्या ठरावाद्वारे त्या विधानमंडळाकडून समर्थन होणे आवश्यक असेल, या प्रक्रियेशी संबंधित आहे. त्यामुळे नियम 155, 156 व 157 याबाबत माननीय सदस्यांनी प्रतिपादन केलेली वस्तुस्थिती संपूर्णपणे गैरसमजुतीच्या व चुकीच्या गृहितकावर आधारित आहे. या नियमांचा प्रस्तुत बाबीशी कोणताही अर्थाअर्थी संबंध नाही.

या संपूर्ण प्रकरणाचा विचार करता माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानपरिषद नियम 106 अन्वये मांडलेला शासकीय ठराव पूर्णपणे नियमानुकूल असून विधानपरिषदेतील कोणत्याही नियमाचा भंग करणारा नाही.

आता या ठरावावर चर्चेला सुरुवात होईल. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब मागच्या वेळी ऑनलेग होते त्यांनी चर्चेला सुरुवात करावी.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, घटनेतील कायदेशीर तरतुदी आणि नियमासंदर्भात मी सभागृहामध्ये जे मत मांडले होते त्यावर आपण आपला निर्णय दिलेला आहे. आपल्या निर्णयाला सभागृहामध्ये नाकारणे अयोग्य आहे. पण घटनेच्या संदर्भात माझे समाधान झाले असे नाही आणि मला ठामपणे असे वाटते की, 2/3 बहुसंख्येने जी घटना दुरुस्ती होते ती या सभागृहामध्ये येते का हा पहिला प्रश्न आहे. आपण माझ्या निदर्शनास आणून दिले असते तर मला खूप आनंद झाला असता की, आता पर्यंत ज्या 77-78 घटनेच्या तरतुदी बदलल्या त्या येथे आल्या, सभागृहाच्या पटलावर ठेवल्या, त्यासंदर्भात चर्चा झाली आणि त्या स्वीकारल्या अशा प्रकारे जर आपल्या भाष्यामध्ये आले असते तर मला आनंद झाला असता. कारण घटनेला एकदा लोकसभेमध्ये 2/3 बहुमताने जो निर्णय झाला असेल त्या निर्णयाला या सभागृहाला आव्हान देण्याचा, बदलण्याचा अधिकार आहे की नाही ही तांत्रिक बाब आहे. मी आपल्याला विनंती केली होती की, आपण ॲडव्होकेट जनरलला बोलवा. त्यांना सभागृहामध्ये बोलविण्याचा आपल्याला अधिकार आहे. आपण तो अधिकार वापरायला पाहिजे होता. 1999 साली रिपील ॲक्ट झाल्यानंतर 2007 सालापर्यंत या राज्यावर आकाश कोसळले नाही तर महिना-दीड महिन्यांनी काही आकाश कोसळणार नव्हते. पण कायद्याच्या पद्धतीचा आणि नियमाच्या पद्धतीचा विचार करावा लागतो. सभापती महोदय, आपण निर्णय दिलेला आहे. आपल्या निर्णयाला आव्हान देणे गैर राहील. तरीही अजून माझ्या मनाला असे वाटते की, घटना बदलणे वगैरे न पटणा-या घटना आपल्या निवेदनातून आलेल्या आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांच्या खुलाशामध्ये मंत्रिमंडळाच्या बैठकीचा उल्लेख आलेला आहे तो गैर आहे. असे अनेक कायद्यामध्ये बसतील की नाही, कायद्याने मान्यता मिळेल की नाही, कायद्याच्या पद्धतीने त्याला योग्यता मिळेल की नाही, याची शंका आहे. सभागृहामध्ये कायद्याच्या बाहेर जाऊन, कक्षेच्या बाहेर जाऊन, नियमाच्या बाहेर जाऊन एखादे कामकाज करावे आणि आपणच नियमाचा भंग करावा हे मला पटत नाही. अर्बन लँड सिलींग ॲक्टवर दोन-तीन तास चर्चा करता येईल एवढे मटेरियल माझ्याकडे आहे. पण मला यासंदर्भात कायदेशीर विचार केल्याशिवाय पुढे जाता येणे शक्य नसल्यामुळे आणि माझे कायदेशीर समाधान होईल असे मला वाटत नसल्यामुळे मी अत्यंत खेदाने आणि दु:खाने माझ्या अधिकारावर कोठे तरी आक्रमण झाले अशी माझी कळत न कळत धारणा झाल्यामुळे मी या चर्चेमध्ये भाग घेत नाही आणि माझा कायदेशीर हक्क अबाधित ठेवून मी पुढे जातो. धन्यवाद.

यानंतर कु.जयश्री......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ( विधानसभेने निवडलेले ): सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्री यांनी विधानपरिषदेतील नियम क्रमांक 106 प्रमाणे सदर प्रस्ताव मांडलेला आहे. या प्रस्तावावर चर्चा सुरु झाल्यानंतर ज्या पध्दतीची आर्ग्यूमेंट आणि माहिती या सभागृहात दिली गेलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो हक्कभंगाचा ठराव सन्माननीय मुख्यमंत्री यांच्यासंबंधी मांडला आणि तो का मांडतो याच्या विषयीच्या कायदेशीर नियमानुसार माहिती दिली,घटनेला धरुन माहिती दिली. जो एम.ओ.यू.सही करण्याचा अधिकार महाराष्ट्र शासनाला नाही तो सही केला गेला त्याबद्दल संपूर्ण सभागृहाला अंधारात ठेवले गेले आणि आज हा प्रस्ताव सभागृहामध्ये चर्चेला आलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे खरे म्हणजे ऑन लेग होते,पण त्यांना ही सगळी माहिती मिळाल्यानंतर त्यांनी जो प्रस्ताव मांडला त्याच्या समर्थनार्थ आपण निर्णय दिला त्याबद्दल आमचे काहीही म्हणणे नाही पक्ष म्हणून आम्ही यामध्ये सहभागी व्हावे की नाही हा प्रश्न त्यामध्ये येतो सुदैवाने ही चर्चा ज्यावेळी पार्लेमेंटमध्ये झाली होती त्यावेळी मी तेथे होतो. त्या सगळया संदर्भात मला भाष्य करावयाचे होते. पंजाब आणि हरयाण या दोन राज्यांनी याचा सातत्याने पाठपुरावा केला. सात - आठ महिने यासाठी केंद्रशासनाकडे मागणी केली.

**<u>पॉईंट ऑफ प्रोसिजरबाबत</u>**

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, पॉईंट ऑफ प्रोसिजर आपण एवढा बराच वेळ चर्चा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्यासारख्या अनुभवी सदस्य,सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांच्यासारखे अनुभवी की ज्यांना लोकसभा,विधानसभा आणि विधानपरिषद या दोहोंचा अनुभव आहे. यासंदभात चर्चा झाल्यानंतर माननीय सभापतींनी दोन्ही बाबतींमध्ये निर्णय दिल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी असमाधान व्यक्त करुन,हक्क अबाधित ठेवून ते खाली बसल्यानंतर यांनी चर्चेला सुरुवात करावी असे सांगितल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी चर्चेला सुरुवात न करता पुन्हा पुन्हा तेच सांगून सदनाचा वेळ अशा प्रकारे घेणे बरोबर नाही. या अगोदर जो वेळ घेतला तो ॲकॅडमिक डिस्कशनचा होता. ती बाजू काय आणि ही बाजु काय मी येथे बाजू मांडत नसून पॉईंट ऑफ प्रोसिजरचा अत्यंत महत्वाचा मुद्दा मांडत आहे.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : यासंदर्भातील ॲकॅडमिक डिस्कशन आपण पूर्ण केले, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि मधुकर सरपोतदार यांनी त्यांचे याविषयीचे विचार येथे मांडले. घटनेच्या अनुषंगाने त्यांनी अनेक उदाहरणे दिली त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी या ठिकाणी आपले विचार मांडले त्या सगळया विचारानंतर मी प्रथम त्यांच्या विशेष हक्काच्या प्रस्तावावर निर्णय दिला त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी प्रधान सचिव यांना लिहिलेले पत्र होते त्याबद्दल त्यांनी भाष्य केले सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी यासंदर्भात आपले विचार मांडले आणि त्याच्यावर निर्णय आता सुध्दा येथे सांगितला आणि पॉईंट ऑफ प्रोसिजर खरे म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार हे ज्येष्ठ आहेत आणि सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार हेही ज्येष्ठ आहेत. एक निर्णय झाल्यानंतर की आता ठरावाच्या अनुषंगाने आपण विचार मांडणे हेच संसदीय पध्दतील धरुन आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : पॉईंट ऑफ प्रोसिजरबद्दल पण मी पक्षाची भूमिका मांडत होतो. या प्रस्तावावर बोलत नव्हतो. माननीय सभापतींनी दिलेल्या निर्णयाचेही मी स्वागत केले. त्याबद्दल मी आक्षेप घेतलेला नाही. असे असतांना आपण पॉईट ऑफ प्रोसिजर काढलेला आहे. याबदद्दल मला आश्चर्य वाटत आहे.

श्री.उल्हास पवार : आपल्या पक्षाचे प्रमुख,विधानसभा व विधानपरिषद तसेच,लोकसभा आणि राज्यसभेचे अनुभव असलेले श्री.मनोहर जोशी यांनीही याचे त्यावेळी समर्थन केले होते. आपण ज्यावेळी पक्षाची भूमिका मांडतो असे म्हणालात म्हणून मी आपल्या पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी काय म्हटले होते ते सांगितले.

श्री.मधुकर सरपोतदार : यासंदर्भात मीही पार्लेमेंटमध्ये याचे समर्थनच केले होते. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार आपल्याला देखील यासंदर्भात बोलण्याची संधी मिळणार आहे. " You are welcome to do so, after all, it is democracy."

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

विचाराचे अदानप्रदान करणे हा त्यातील एक महत्वाचा भाग आहे. ते केले नाही तर आपण कोठेतरी चुकलो, असा अर्थ होतो. पाकिस्तानमध्ये मुर्शरफ यांनी सुप्रीम कोर्टामध्ये सैन्य घुसविले. हिंदुस्थानात परत इमर्जन्सी वगैरे आणायचा तुमचा काही विचार नाही ना ? तेव्हा कृपा करुन अशी भाषा वापरु नका. याबाबत मी पक्षाची भूमिका मांडत असून आम्ही वेळोवेळी जी भूमिका घेतली होती, तीच भूमिका आज मांडली आहे. त्यावर माननीय सभापतींनी निर्णय दिला आहे. त्या निर्णयावर आम्ही काही प्रतिक्रिया दिलेली नाही. या सदनामध्ये माननीय सभापतींचा निर्णय आम्हाला मान्य करावा लागेल. यावर आमचा कोणताही आक्षेप नाही. या निर्णयाबाबत योग्य त्या व्यासपीठावर आम्ही आक्षेप घेऊ. परंतु आजच्या या चर्चेमध्ये आमचा पक्ष सहभागी होणार नाही हे सांगण्यासाठी मला सर्व पार्श्वभूमी सांगावी लागली. माननीय श्री.उल्हास पवार यांच्यासारख्या जुन्या जाणत्या सदस्याला हे कळू नये याचे मला मोठे आश्चर्य वाटते. याच दृष्टीकोनातून मी म्हणतो की, आम्ही या चर्चेमध्ये भाग घेणार नाही. भारतीय जनता पार्टीने चर्चेमध्ये भाग घ्यायचा की नाही याचा निर्णय तो पक्षच घेणार आहे. आम्ही आमच्या पक्षातर्फे कोणती कायदेशीर लढाई लढायची त्याचा निर्णय नंतर घेऊ. परंतु आजच्या चर्चेत आम्ही सहभागी होऊ इच्छित नाही एवढेच सांगण्यासाठी मी सदनामध्ये उभा आहे. धन्यवाद.

( शिवसेनेचे सदस्य सभात्याग करतात )

-----





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MMP/ MAP/

प्रा.शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर): सभापती महोदय, या सदनात नियम 106 अन्वये जो ठराव मांडण्यात आलेला आहे, त्याला विरोध करण्यासाठी मी उभा आहे. जेष्ठ सदस्य माननीय श्री.दिवाकर रावते यांनी हा ठराव या सदनामध्ये मांडण्यासंबंधी विधानपरिषद नियमाच्या आधारे आक्षेप घेत त्यासंबंधी चर्चा घडवून आणली. माननीय मुख्यमंत्र्यांना या सदनामध्ये हा ठराव मांडण्याचा अधिकार नाही असाही विरोध त्यांनी नोंदवला व हक्कभंग प्रस्ताव त्यांनी दिला. दोन्ही बाबतीत माननीय सभापतींनी निर्णय दिलेला आहे. त्या निर्णयानंतर सदनामध्ये या प्रस्तावासंबंधी जी चर्चा व्हायला हवी होती ती चर्चा करण्यास माननीय श्री.दिवाकर रावते व त्यांच्या शिवसेना पक्षाने नकार दिला. अन्य कोणत्याही सदस्याने या ठरावावर बोलायचे नाही व हा ठराव चर्चेशिवाय मंजूर व्हावा  अशा प्रकारची इच्छा त्यांनी प्रदर्शित केलेली आहे.

**सभापती** : मी माननीय सदस्य श्री.शरद पाटील यांना सांगू इच्छितो की, सभागृहात चर्चेशिवाय हा ठराव मंजूर व्हावा हा आपला गैरसमज आहे. या विषयावर माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते सभागृहात एक तास बोलले आहेत.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, मागील अधिवेशनात माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी चर्चा केली होती. तेव्हा ते ऑन लेग होते, आज मात्र चर्चा होऊ शकलेली नाही. इतर कोणत्याही सदस्याने यासंबंधी मतप्रदर्शन केलेले नाही. आज मी या ठरावाला विरोध करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, 1976 साली स्व.इंदिरा गांधी यांनी नागरी जमीन कमाल धारणा कायदा या देशामध्ये आणला. मोठया शहरातील नागरिकांच्या निवाऱ्याची समस्या तीव्र झालेली आहे.

यानंतर कु.धनश्री......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील .....

मोठ्या शहरांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना निवाऱ्यासाठी जमीन उपलब्ध व्हावी हा उद्देश हा कायदा आणण्यामागे होता. इंदिरा गांधी यांनी 1971 साली जो एक ऐतिहासिक विजय मिळविला होता त्या नंतर देशातील गरीबांच्या हिताचे कायदे करण्याचा त्यांनी सपाटा लावला होता. समाजवादी विचार काँग्रेसने स्वीकारून समाजवादी धोरण या देशात राबविण्याचा त्यांनी एक विडा उचलला होता आणि एक क्रांतिकारक पाऊल गोरगरीबांच्या जिव्हाळ्याचा असा निवाऱ्याच्या प्रश्नाच्या माध्यमातून त्यांनी उचलले आणि मोठ्या शहरातील गोरगरीब लोकांना घरासाठी जमीन उपलब्ध व्हावी यासाठी त्यांनी हा कायदा आणला. 1976 साली महाराष्ट्रातील 9 नागरी समूहांमध्ये हा कायदा लागू झाला. त्या नऊ नागरी समूहामध्ये मुंबई, नागपूर, पुणे या सारख्या मोठ्या शहरांबरोबरच तुलनेने लहान असलेल्या सांगली, कोल्हापूर, सोलापूर या नागरी समूहांना देखील हा कायदा लावण्यात आला. 1976 साली ज्या उदात्त हेतूने इंदिरा गांधींनी हा कायदा आणला त्याची अमलबजावणी या राज्यामध्ये कितपत झाली, या राज्याच्या 9 शहरांमध्ये या कायद्याची अमलबजावणी कशी झाली याची माहिती आपण घेतली तर ती फार उद्‌बोधक ठरेल. खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात मोठ्या शहरांमध्ये मुंबईसारख्या महानगरीमध्ये राहणाऱ्या गोरगरीब जनतेच्या दृष्टीने 'निवारा' हा महत्त्वाचा प्रश्न होता. या शहरामध्ये गरीबांना निवारा उपलब्ध करून देणे महत्त्वाचे होते. असे असताना मुंबई शहरामध्ये हा कायदा लागू झाल्यापासून अगदी परवा पर्यंत म्हणजे 2005 पर्यंत या कायद्यांतर्गत अतिरिक्त ठरलेली अंदाजे 200 एकर जमीन शासनाने संपादित केली आहे. मुंबई शहरामध्ये जवळपास 30 हजार एकर जमीन अतिरिक्त आहे. सभापती महोदय, 1976 ते 2007 या कालावधीत या मुंबई शहरामध्ये केवळ 200 एकर च्या आसपास जमीन शासनाने या कायद्यान्वये संपादित केली. त्यातून किती गरीबांना घरासाठी जागा उपलब्ध करून दिली गेली हा एक संशोधनाचा विषय आहे. हा कायदा अमलात आल्यापासून या कायद्याची अमलबजावणी करा आणि मुंबई शहरामध्ये राहणाऱ्या गोरगरीब लोकांना, मध्यम वर्गीय लोकांना घरे अथवा घरांसाठी जमीन उपलब्ध करून द्या अशी मागणी आमच्या नेत्या श्रीमती मृणाल गोरे आणि श्री.प.बा.सामंत यांनी सातत्याने केली होती. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.वसंतदादा पाटील यांना विनंती करून या सभागृहामध्ये चर्चा घडवून आणून सातत्याने याबाबत पाठपुरावा करून या दोन्ही

...... एफ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील ....

नेत्यांनी मुंबई शहरात गोरगरीब, मध्यम वर्गीय लोकांना निवाऱ्यासाठी 600 एकर जमीन गोरेगावला मिळविली. ही जमीन कनिष्ठ, मध्यम वर्गीयांच्या निवाऱ्यासाठी उपलब्ध झाली आणि जवळपास 6 हजार कुटुंबांची तेथे व्यवस्था झाली आहे. 1985 साली ही जमीन मंजूर झाली आणि योजना नुकतीच पूर्ण झाली आहे. परंतु महाराष्ट्र शासनाने स्वत: पुढाकार घेऊन या कायद्यान्वये अतिरिक्त ठरलेली जमीन ताब्यात घेऊन गोरगरीबांसाठी ती उपलब्ध करून दिली आहे असे उदाहरण सापडणार नाही. मुंबई शहराची अशी अवस्था आहे. मुंबई शहरामध्ये हा कायदा अस्तित्वात आल्यापासून गोरगरीब जनतेला निवारा देण्याची भाषा या राज्यात सत्तेवर आलेल्या आणि येणाऱ्या सर्वांनीच केली आहे. ...

( यानंतर श्री. सुंबरे .... )

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील......

तुमच्या सरकारचा रिमोट कंट्रोल हा श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे आहे. 27 हजार झ ोपडपट्टीवासीयांना मोफत घरे देऊ अशी घोषणा त्यांनी केली होती. या कायद्याच्या माध्यमातून हजारो एकर जमीन गरीबांना निवासासाठी उपलब्ध होऊ शकेल. हे माहीत असून देखील या कायद्याच्या अंतर्गत या जमिनी संपादित करुन गरीबांच्या घरासाठी उपलब्ध करुन देण्याची दानत तुमच्या सरकारने दाखविली नव्हती, ही वस्तुस्थिती आहे. त्याला दोन्ही बाजू जबाबदार आहेत. हा काँग्रेस पक्षाचा नाकर्तेपणा आहेच. 1976 सालापासून आजपर्यंत मुंबई शहरामध्ये राहणाऱ्या गोरगरीबांच्या निवा-यासाठी श्रीमती इंदिरा गांधी यांनी कायदा केला असताना, त्यांचे नाव घेणाऱ्या, दररोज त्यांची इज्जत करणा-या, काँग्रेस पक्षानेही काही केले नाही ही वस्तुस्थिती आहे. तुम्ही देखील काहीही केले नाही. जे काम त्या ठिकाणी झाले आहे ते केवळ जनता दलाच्या नेत्याने शासनाच्या मागे लागून, जमीन ताब्यात घेऊन, गरीबांच्या निवाऱ्यासाठी ती जमीन उपलब्ध करुन दिली. हे काम त्यांनी केले आहे. ते काम कोणी दुस-याने केले नाही.

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगृ इच्छितो की, आज मुंबई शहरातील सामान्य माणूस, झोपडपट्टीमध्ये राहणारा, कनिष्ठ व मध्यमवर्गीय, या जनतेचे लक्ष या कायद्याकडे नसून याठिकाणी विधानमंडळ सचिवालयामध्ये काम करणारे चतुर्थ श्रेणी अधिकारी, तृतीय श्रेणी अधिकारी व कर्मचारी यांचे देखील हा कायदा रद्द होऊ नये असे मत आहे. या कायद्याअंतर्गत अतिरिक्त ठरणारी जमीन शासनाने संपादित करावी आणि लोकांना घरकुलासाठी जमीन उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारची त्यांची मागणी आहे, इच्छा आहे, अपेक्षा आहे. त्यांच्या इच्छा, अपेक्षांवर पाणी फेरण्याचे काम हा कायदा रद्द करुन शासन करीत आहे. ही अत्यंत शरमेची बाब आहे असे मी आपल्याला सांगू इच्छितो.

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये तर हे असे झालेच आहे. आपण सांगली जिल्हयामधील आहात. सांगली नागरी समूहामध्ये अतिरिक्त ठरलेली जमीन आज ताब्यात न घेता एक इंच देखील जमीन शिल्लक राहिलेली नाही. सांगलीला एक न्याय, मुंबईला दुसरा न्याय, पुण्याला तिसरा न्याय, सोलापूरला चौथा न्याय आणि नागपूरला पाचवा न्याय. अशा तऱ्हेने या कायद्याची अंमलबजावणी गेल्या 40 वर्षामध्ये झालेली आहे. पण ज्या उद्देशाने हा कायदा शासनाने त्यावेळी केला होता, तो उद्देश सफल झाला नाही, साध्य झाला नाही. म्हणून आपण कायदा रद्द करत आहोत. पण तो

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील......

कायदा अंमलात आणण्याची इच्छाशक्ती राज्यकर्त्यांची नसेल तर तो उद्देश कसा काय सफल होणार ? गेल्या चाळीस वर्षामध्ये, कायदा अस्तित्वात आल्यापासून कोणत्या सरकारने प्रामाणिकपणे या जमिनी ताब्यात घेऊन गरीबांसाठी या जमिनी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला ? ते सांगावे. तसा प्रयत्न केला नाही. त्यामुळे सांगली, सोलापूर, कोल्हापूर यासारख्या शहरामध्ये गोरगरीबांच्या अतिरिक्त ठरलेल्या जमिनी ताब्यात घेतल्या. या जमिनी शासनाने निरनिराळया संस्थांना दिल्या, म्हाडाला दिल्या. घरबांधणीसाठी दिल्या. काही अंशी त्या कायद्याची अंमलबजावणी झाली. परंतु या कायद्याची अंमलबजावणी करीत असताना भ्रष्टाचाराचे अनेक प्रकार झाले. अनेक अधिकाऱ्यांनी या प्रकरणामध्ये हात धुवून घेतले. हे जरी खरे असले तरी त्यामुळे कायद्याचा जो मूळ उद्देश होता तो सफल झाला नाही. आज याठिकाणी घरबांधणीसाठी जमीन उपलब्ध नाही म्हणून तो कायदा रद्द करावा, जमिनी मोकळया करा असे सांगितले जात आहे. मुंबईतील जमिनीच्या किमती आज गगनाला भिडल्या आहेत. गेले काही दिवस आपण वर्तमानपत्रामध्ये बातम्या वाचतच असतो की, किती कोटीला तेथील जमीन विकली गेली. आज या सगळया अतिरिक्त जमिनीवर धनदांडग्यांचा, बिल्डरांचा डोळा आहे. मध्यमवर्गीयांच्या, गोरगरीबांच्या, कनिष्ठवर्गीयांच्या निवाऱ्यासाठी जमीन उपलब्ध होऊ शकते पण ती जमीन ताब्यात घेण्याची इच्छाशक्ती शासनाकडे नसल्यामुळे आज ती जमीन तशीच राहिलेली आहे. हा कायदा रद्द झाल्यानंतर ही जमीन त्यांच्याकडे उपलब्ध होणार आहे व कोटयावधी रुपये त्यांना या मधून मिळणार आहेत. जे गोरगरीब आहेत ते तेथेच राहणार आहेत. मात्र झोपडपट्टीवासियांना घरे उपलब्ध होणार नाहीत. ज्या जमिनीची किंमत चौरस फूटाला नऊ हजार, दहा हजार, पंधरा हजार अशी असेल तर मंत्रालयातील एखाद्या कारकूनाला किंवा सचिवालयातील कर्मचाऱ्यांना देखील अशाप्रकारे भूखंड घेता येणार नाही.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MAP/ 20:25

प्रा.. शरद पाटील....

आज आपण पुरोगामी महाराष्ट्र म्हणत असतांना आणि आम्ही गोरगरीबांसाठी राज्य कारभार करीत आहोत असा आपण दावा करीत असतांना हा कायदा रद्द करुन धनदांडग्यांच्या घश्यामध्ये जमिनी घालण्याचा प्रयत्न करीत आहात हे अत्यंत चुकीचे, अयोग्य आहे. म्हणून या प्रस्तावाला विरोध करीत असतांना मी काही सूचना करतो.

सभापती महोदय, हा कायदा रद्द होणार आहे. विधानसभेतील सदस्यांनी हा ठराव मंजूर केला आहे. आणि मला माहीत आहे की, या सभागृहामध्ये देखील हा ठराव मंजूर होणार आहे. मी एकटयाने विरोध करुन हा कायदा अस्तित्वात रहाणार नाही हेही मला माहीत आहे. परंतु शासनाने अतिरिक्त ठरलेली जमीन ताब्यात घेतली आहे. त्याबाबत उच्च न्यायालयामध्ये प्रतिज्ञा पत्र दाखल करुन सांगितले आहे की, डिसेंबर अखेर 1 हजार एकर जमीन ताब्यात घेऊ. तेव्हा ही जमीन शासनाने ताब्यात घेतली आहे, ती बृहन्मुंबई नागरी निवारा अभियानांतर्गत ज्या गोरगरीबांनी, मध्यमवर्गियांनी मंत्रालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी, विधानमंडळामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी आपल्या गृहनिर्माण संस्था स्थापन करुन आपल्या निवाऱ्यासाठी जमीन मिळावी अशी मागणी केली आहे. त्या मागणीचा विचार करुन व त्यांची पात्रता विचारात घेऊन जर सर्व निकषांची पूर्तता होत असेल तर त्यांच्या घर बांधणीसाठी ही जमीन शासनाने उपलब्ध करुन द्यावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने मुंबई शहरामध्ये उपलब्ध असलेली अतिरिक्त जमीन ताब्यात न घेतल्यामुळे श्री. प.बा. सामंत आणि श्रीमती मृणाल गोरे यांना मुंबई उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करावी लागली. ही याचिका दाखल केल्यानंतर महाराष्ट्र शासनाने लिहून दिले की, अतिरिक्त जमीन टप्प्या-टप्प्याने आम्ही ताब्यात घेऊ. त्यापैकी 1 हजार एकर जमीन डिसेंबर अखेर ताब्यात घेऊ अशाप्रकारचे प्रतिज्ञापत्र महाराष्ट्र शासनाने उच्च न्यायालयामध्ये दिले आहे. तेवढी जमीन महाराष्ट्र सरकारकडे वर्ग झाली असून ती जमीन बृहन्मुंबई नागरी निवारा अभियानच्या सदस्यांना घरकुलांसाठी उपलब्ध करुन द्यावी अशी माझी मागणी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र सरकारचा अतिरिक्त जमिनी ठरविण्यासंबंधीचा निर्णय घोषित झाला आहे, त्या जमिनी ताब्यात घ्याव्यात आणि अशापध्दतीने गोरगरीबांच्या निवाऱ्यासाठी उपलब्ध करुन द्याव्यात अशी मागणी करुन व या ठरावाला विरोध करुन माझे भाषण संपवितो.

-----

29-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 5 H 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. या ठरावावरील चर्चेमध्ये सभागृहातील कुणीही माननीय सदस्यांनी भाग घेतला नाही असे माननीय सदस्य प्रा. शरद पाटील म्हणाले. तेव्हा सभागृहाच्या रेकॉर्डवर चुकीची नोंद होऊ नये याकरिता मी माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणतो की, या ठरावावर माननीय सदस्य सर्वश्री. गुरुनाथ कुलकर्णी, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण आणि डॉ. नीलम गोऱ्हे बोलल्या आहेत.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, आज या ठरावावरील चर्चेमध्ये कुणीही बोलले नाही असे म्हटले आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी सभागृह संपण्यापूर्वी हे विधान करावयास हवे होते. आपले भाषण झ ााल्यानंतर या ठरावावर कुणी तरी बोलणारे आहेत. सभापती महोदय, या प्रस्तावाला भारतीय जनता पार्टीचा पाठिंबा आहे. मी याठिकाणी व्यक्ती म्हणून विरोध करीत नाही. माननीय सदस्यांबद्दल मला आदर आहे. समाजवाद्यांची अशी स्थिती आहे की, करावयाचे काही नाही, नुसतेच बोंबलत बसावयाचे. याठिकाणी मी कुणा व्यक्तिचे नाव घेतले नाही.

**सभापती** : त्या वाक्यामध्ये आपण जो एक शब्द वापरला आहे तो पाठीमागे घ्यावा.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, "बोंबलत बसावयाचे" हा शब्द मी काढून टाकतो. मी माननीय सदस्यांचे नाव घेतले नाही. याचे कारण असे की, या कायद्याला यासाठी आम्ही पाठिंबा देतो की, ज्यावेळी केद्रामध्ये एन.डी.ए. सरकार होते त्यावेळी या यु.एल.सी. च्या कायद्याचा काहीही फायदा नाही हे लक्षात आले. लोकशाहीमध्ये राज्यकर्त्या पक्षाला आकसाने विरोध करु नये.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

एखादी चांगली गोष्ट सत्ताधारी पक्ष करीत असेल तर त्याला पूर्णपणे पाठिंबा देणे आवश्यक आहे. सभापती महोदय, या कायद्याची नीट अंमलबजावणी झालेली नाही. मुळामध्ये आज या कायद्यानुसार साधारणपणे फक्त 500 हेक्टर जमीन महाराष्ट्र शासनाच्या ताब्यात आली आहे. 10 हजार हेक्टर जमीन अजून शासनाच्या ताब्यामध्ये यावयाची राहिली आहे. गेल्या 30 वर्षात काँग्रेस सरकारने काहीच केले नाही असे माझे मत नाही. स्व.वसंतरावजी नाईक आणि त्यांच्यानंतर महाराष्ट्रामध्ये या कायद्याचा अंमल सुरु झाल्यानंतर मुंबई शहरामध्ये काही नगरे उभी राहिली. उदा. गोरेगावला मोतीलालनगर, कन्नमवारनगर, अभ्युदयनगर अशी नगरे उभी राहिली. परंतु 1980 नंतर आक्रमक प्रवृत्तीचे मुख्यमंत्री या ठिकाणी आले आणि त्यानंतर मंत्रालयामध्ये बिल्डर घुसले ते आजपर्यंत खाली आलेले नाहीत. यू.एल.सी. कायदा मुंबई शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर लागू होणार आहे. पूर्वी मुंबईमध्ये "जागा भाड्याने देणे आहे" असे बोर्ड लागलेले असावयाचे. बॉम्बस्फोट झाल्यानंतर, दंगल झाल्यानंतर मुंबई शहरातील ज्या चाळी होत्या त्या रिकाम्या झाल्या. त्यानंतर सुध्दा लालबाग, चिंचपोकळी, परळ, गिरगाव या कामगार भागामध्ये "भाड्याने जागा देणे आहे" असे बोर्ड लागलेले असावयाचे. लोक भाड्याच्या जागेत राहावयाचे. 1960-70 नंतर काय झाले हे आपण लक्षात घेतले पाहिजे. त्याला तुम्ही-आम्ही सगळेच जबाबदार आहोत. ज्या अतिरिक्त जमिनी होत्या त्या जमिनीवर बेकायदेशीर झोपडपट्ट्या तयार झाल्या. पदपथावर झोपडपट्ट्या उभ्या झाल्या. आपण सगळ्यांनी मताचे राजकारण केले. तुम्हाला सगळ्या नागरी सुविधा मिळो की न मिळो, तुम्ही या ठिकाणी राहा आणि राहिल्यानंतर आम्हाला फक्त मते द्या. त्याचा परिणाम असा झाला की, ज्या अतिरिक्त जमिनी या कायद्यानुसार शासनाच्या ताब्यात येणे आवश्यक होते त्या जमिनी मिळालेल्या नाहीत. आपण मानवतेच्या आधारावर त्या ठिकाणी सगळ्या सोयी दिल्या आणि ते देणे बरोबर सुध्दा होते. ज्यावेळी एखाद्या माणसाच्या घराच्या गॅलरीमध्ये एखादी चिमणी घरटे बांधत असेल, त्यासाठी ती काटक्याकुटक्या जमवत असेल तेव्हा आपल्या गॅलरीमध्ये चिमणीने घरटे बांधू नये असे जर आपल्याला वाटत असेल तर त्या चिमणीला सुरुवातीलाच हाकलून देणे आवश्यक आहे. परंतु ती काटक्याकुटक्या जमवणार, आपले छोटेसे घरटे तयार करणार, त्या ठिकाणी अंडी घालणार,

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

अंडी उबवून पिल्ले जन्माला आल्यानंतर त्यांना पंख फुटून ते आकाशात उडण्यापूर्वीच आपण जर ते घरटे पिल्लांसह फेकून द्यावयाचे ठरवले तर ती अमानुषता असेल. म्हणून आपण त्या त्या वेळच्या झ ोपडयांना मान्यता दिली. शेवटी ही माणसे आहेत. माणसे पोट हातावर घेऊन मुंबई शहरात का आली ? मिळेल तेथे का राहिली ? मी राजकीय अभिनिवेशाने बोलत नाही. आपण ग्रामीण भागामध्ये माणसाच्या हाताला काम, शेतीला पाणी, आरोग्यासाठी औषधे, चालण्यासाठी रस्ते, प्रवासासाठी एस.टी., शिकण्यासाठी शाळा या सगळ्या गोष्टी उपलब्ध करुन दिल्या असत्या तर त्या त्या वेळी ही माणसे मुंबई सारख्या शहरात पोट हातावर घेऊन पोट भरण्यासाठी आली नसती. सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील असे म्हणाले की, आपण काही केले नाही. या ठिकाणी आमचे राज्य फक्त साडेचार वर्षे होते. पण ते करीत असताना आपण कोणत्या जमिनी देणार होतो ? आज सकाळी एअरपोटच्या संदर्भात चर्चा झाली. जगामध्ये मुंबई शहरातील एकमेव विमानतळ असे असेल की ज्या ठिकाणी धोकादायक स्थितीत विमाने उतरत आहेत. त्या ठिकाणी भिंतीच्या पलीकडे उभे राहून कोणी हँड ग्रेनेड किंवा बॉम्ब टाकू शकतो आणि भयानक परिस्थिती निर्माण होऊ शकते. या सगळ्या पापाचे धनी तुम्ही-आम्ही आहोत. राजकारणामध्ये मते मागावयाची असतात. परंतु मते मागताना राज्यकर्त्यांनी पुढच्या 25 ते 50 वर्षाचा विचार करावयाचा असतो आणि त्याप्रमाणे धोरणे आखावयाची असतात. या परिस्थितीला आपण सगळेच जबाबदार आहोत. झोपडया काढू देणार नाही यासाठी आपण मुंबईत मोर्चे काढले नाहीत का ? आता आपल्यामध्ये स्पर्धा लागलेली नाही का ? आपण म्हणावयाचे की, 1975 पर्यंतच्या झोपडयांना मान्यता द्या. मी म्हणावयाचे की, 1980 पर्यंतच्या झोपडयांना मान्यता द्या. तो म्हणावयाचा की, 1985 पर्यंतच्या झोपडयांना मान्यता द्या. दुसरा पक्ष म्हणावयाचा की, 1990 पर्यंतच्या झोपडयांना मान्यता द्या. आम्ही त्यावेळी मोफत घर देण्याबाबत बोललो होतो. त्याचे कारण असे आहे की, मुंबई शहरामध्ये परमेश्वर जरी आला तरी झ ोपडपट्टयांमध्ये जीवन जगणाऱ्या 60 लाख लोकांना आपण घराबाहेर काढू शकतो का ? आपण त्यांच्या झोपडपट्टयांवर नांगर फिरवू शकत नाही. त्यावेळी घरे कशी बांधून देता येतील याबाबत माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी विचार केला. शासनाच्या

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

तिजोरीतून प्रत्येकाला फुकट घर बांधून द्यावे अशी कल्पना कोणाचीही नाही. मग बिल्डरला असे सांगण्यात आले की, त्या ठिकाणी 70 झोपड्यांची झोपडपट्टी असेल तर तुम्हाला 2.5 एवढा एफ.एस.आय. देतो. त्यामध्ये आपण त्या लोकांचे पुनर्वसन करावे.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 20:35

(श्री. मधुकर चव्हाण ...)

पुनर्वसन करायला तुला एक-दोन कोटी रुपये लागतील. कोणताही बिल्डर हा भगवी वस्त्रे धारण करुन लोकांचे कल्याण करायला देवळात बसलेला साधुसंत नाही की, तो फुकट त्या ठिकाणी छापेल. त्यावेळी असे सांगण्यात आले की, तू रिहॅब पोर्शन कर आणि त्याच्या मोबदल्यामध्ये जेवढा तू खर्च केला असशील तेवढा तू त्या ठिकाणी सेलेबल पोर्शन बांध. सभापती महोदय, हा कायदा कालबाह्य झालेला आहे. आपण ह्या जमिनी ताब्यात घेऊ शकत नव्हतो. 1975-1980 नंतर भ्रष्टाचाराला फार मोठे प्रोत्साहन देणारा कायदा झाला. प्रत्येक वेळी आपण मंत्री आणि राज्यकर्त्यांना दोष देत बसलो. त्या ठिकाणी सर्व अधिकारी हे सुध्दा कायदा राबवित होते. सभापती महोदय, मला काही सूचना करावयाच्या आहेत. मुळात हा कायदा कालबाह्य झालेला आहे. आज मुंबई शहरामध्ये ज्या जमिनी उपलब्ध आहेत त्या ठिकाणी लोखंडवाला कॉम्प्लेक्स निर्माण झाले, जेव्हीपीडी स्कीम तयार झाली. मॅनग्रुव्हज हटवून त्या ठिकाणी श्रीमंतांचे बंगले तयार झाले. आज मुंबईसारख्या शहरामध्ये कंडक्टर, ड्रायव्हर, काही अपवाद वगळता आमदार सुध्दा, लोकप्रतिनिधी पोस्टमन, फायरमन, लिफ्टमन, फेरीवाले, भाजीपाला विकणारे, टॅक्सी चालवणारे, बस कंडक्टर, एस.टी.ड्रायव्हर हे मुंबई, पुणे शहरामध्ये 10-15 लाखाची वनरुम किचनची जागा घेऊ शकत नाही हे सत्य आहे. मुंबई शहरामध्ये आज भाड्याच्या जागा मिळत नाहीत. रेल्वे ट्रॅक्स देखील लोकांनी शिल्लक ठेवलेले नाहीत. आमच्या काळातील मी एक उदाहर देतो. आमच्या युतीच्या काळामध्ये आम्ही मानखूर्दपासून चेंबूरपर्यन्त 400 घरे बांधली. मागे होल्गा टेरेस कोर्टामध्ये गेले होते त्याप्रमाणे कोणी तरी पत्रकार कोर्टामध्ये गेला. कोणीतरी 15 पैशाचे कार्ड कोर्टामध्ये टाकले की ते सुमोटो रिट पिटीशन समजून कोर्ट त्यावर निर्णय देते. न्यायालयाबद्दल न बोलणे उत्तम. परंतु हल्ली राज्य हे न्यायालयाच चालवित आहे. म्हणून काही बाबतीत स्पष्ट बोलणे आवश्यक आहे. ते 15 पैशाचे कार्ड रिट पिटीशन समजून हायकोर्टाने चार महिन्यापूर्वी आलेल्या बांगलादेशीयांनी मानखूर्दला ज्या झ ोपड्या बांधल्या होत्या त्यांना उठवायचे असेल तर म्हाडाच्या इमारतीमध्ये त्यांना मोफत जागा द्या असा निर्णय दिला. 400 लोकांना आम्ही फुकट जागा दिल्या आणि त्यांनी त्या दोन-दोन चार-चार लाखाला विकून पुन्हा मानखुर्दला झोपड्या बांधल्या. म्हणून मला असे वाटते की, जर हा कायदा रद्द केल्याने जमिनी मोकळया होतील आणि त्यामुळे घरांचे भाव खाली येतील यावर माझा विश्वास नाही. याचे कारण शासनाने याचा अभ्यास केला पाहिजे.

..2..

(श्री. मधुकर चव्हाण....)

ज्या राज्यांनी हा कायदा रद्द केलेला आहे त्या राज्यातील शहरांमध्ये घरांचे भाव कमी झाले का ? चेन्नई, मद्रास, बंगलोर या शहरामध्ये भाव कमी झाले काय ?हा अभ्यास केला पाहिजे. याबाबतीत अटी घातल्या गेल्या नाहीत तर गरिबांसाठी घरे बांधली जाणार नाहीत. हा कायदा रद्द करीत असताना गरिबांना घरे मिळतील यासाठी काही बंधने घातली गेली पाहिजेत. मी माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो. परवा त्यांनी म्हाडातर्फे न्यू इंडिया मिलमध्ये कामगारांसाठी इमारत उभी करताना घोषणा केली की या पुढे फक्त एलआयजी आणि एमआयजीसाठी 350 आणि 450 चौ.फुटाची घरे बांधली जातील. मला वाटते अशा प्रकारचे प्रपोझल आणून तुम्ही गरिबांसाठी घरे बांधणार असाल तर राजकारणातील मतभिन्नता बाजूला ठेवून भारतीय जनता पक्ष आपणास पाठिंबा दिल्या शिवाय राहाणार नाही. अशा वेळी मी पक्ष बघणार नाही. पक्ष ही राजकीय व्यवस्था असते. आपण जसे बोलाल तसे तुम्ही चालले पाहिजे. 10 बोटांमध्ये 12 अंगठ्या घालणारे बिल्डर मंत्रालयाच्या 6व्या मजल्यावर असतात. त्यांना पहिल्यांदा मंत्रालयाचे दरवाजे बंद करा. तुम्ही योजना जाहीर करा की, आता आमच्याकडे जमीन उपलब्ध आहे. मंत्रालयातले क्लार्क, नंतर पोस्टमन, लिफ्टमन यासारखे जे मध्यमवर्गीय आहेत, श्रमजिवी आहेत, जे पापपुण्याची काळजी घेतात, सरकारी निम-सरकारी कायदे पाळतात असे लोक एकत्र येऊन हौसिंग सोसायटी करत असतील आणि त्यांच्या सोसायटीला घरे बांधण्यासाठी ही जमीन ठेवली जात असेल तरच या सरकारच्या हेतूबद्दल कोणी शंका घेणार नाही. विकासकाला अटी घालाव्या लागतील की तुला जमीन देतो, पण तू 40 टक्के घरे ही गरिबांसाठी बांधली पाहिजेत. मी आपणास उदाहरण देतो. लोखंडवाला कॉम्पेक्स, विहार याठिकाणी रहेजासारख्या मोठ्या बिल्डर्सनी वनरुम किचनचे रुम कोठे बांधलेलेच नाहीत. आज मुंबई शहरामध्ये बाहेर गावाहून आलेले पत्रकार किंवा इलेक्ट्रॉनिक्स मिडियाच्या पत्रकारांना विचारा की, तम्ही मुंबईत कुठे राहाता ?

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**राज्यातील बनावट व भेसळयुक्त औषधे विकणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(३) * ३३६३१ श्री. रमेश निकोसे , श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर गणगणे , श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. धनाजी साठे , श्री.राजन तेली , श्री. गोविंदराव आदिक , श्री.दिलीपराव सोनवणे :** सन्माननीय **अन्न व औषधे प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बनावट व भेसळयुक्त औषधांचे विक्रेते व निर्मात्यांवर छापे टाकून त्यांच्यावर कारवाई करावी असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाने माहे ऑगस्ट, २००७ मध्ये किंवा त्या सुमारास दिलेले आहेत व शासनाने केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने माहे सप्टेंबर, २००७ अखेर किती विक्रेते व निर्मात्यावर छापे टाकून त्यांच्यावर कोणत्या प्रकारची कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अशा घटना राज्यात पुन्हा होऊ नयेत म्हणून शासनाने कोणते कठोर निर्णय घेतले आहेत वा घेण्यात येत आहेत,

(४) अद्याप, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मनोहर नाईक** : (१) होय,

(२) अन्न व औषध प्रशासनाने उत्पादक, ठोक विक्रेते, एजन्ट व वितरक इत्यादींच्या एकूण २६१ तपासण्या केल्या आहेत. तसेच शासकीय, निमशासकीय रुग्णालये, कारागृह, कामगार विमा योजना रुग्णालये व रेल्वे रुग्णालये इत्यादी ठिकाणाहून एकूण ५६० नमुने चाचणीसाठी घेण्यात आले आहेत. त्यापैकी ५१ नमुने अप्रमाणित घोषीत झाले असून त्यांच्याविरुद्ध कायद्यातील तरतुदीनुसार योग्य ती कारवाई करण्यात येत आहे.

(३) व (४) बनावट व भेसळयुक्त औषधांची प्रकरणे शोधून काढण्यासाठी जिल्हास्तरावर यंत्रणा कार्यरत असून त्यामार्फत नियमितपणे औषध उत्पादक, विक्रेते यांच्या तपासण्या करुन औषध नमुने चाचणीकरिता घेतले जातात. अप्रमाणित घोषीत नमुन्यासंदर्भात औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियामांतर्गत कारवाई घेण्यात येते.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ 20:40

श्री.मधुकर चव्हाण........

ते म्हणतात आमचे वास्तव्य पुण्याला आहे. आईवडील पुण्याला असतात. आमची बदली इथे झाली.लोखंडवाला कॉम्प्लेक्समध्ये दहा हजार रुपये दरमहा भाडे देऊन राहतात. मुंबई शहरातील फ्लॅट्स शोधून काढा. दोन नंबरचा पैसा, समाजाला पिळून ज्यांनी मिळविला, ज्यांनी केवळ आपली काळी संपत्ती रिअल इस्टेट प्रॉपर्टीमध्ये गुंतविली आहे असे फ्लॅट शोधून काढा. मोहीम घ्या. ज्यांनी आपला फ्लॅट दोन वर्षे, तीन वर्षे, चार वर्षे भाड्याने दिला असेल असे फ्लॅट शासनाने जबरदस्तीने ताब्यात घ्यावेत आणि शासनातर्फे त्याचे इच्छुकांना वाटप करावे. दरमहा दहा हजार, पंधरा हजार रुपये भाडे घेत आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांच्या 10 टक्के योजनेतून ज्यांना सदनिका वाटप करण्यात आल्या अशा कितीतरी कलाकारांनी त्यांच्या सदनिका दरमहा दहा हजार,पंधरा हजार रुपये भाडयाने दिल्याची उदाहरणे देता येतील. मी तुम्हाला एक उदाहरण देतो. मला त्यांच्याबद्दल आदर आहे. स्व.राजा गोसावी यांच्या कुटुंबातील सर्वच लोकांना सदनिका मिळाल्या. अभिनय त्यांनी काय केला असेल? एखाद्या ऐतिहासिक नाटकामध्ये राणीच्या दासीची भूमिका करणाऱ्या व या विंगेतून त्या विंगेत जाणाऱ्या महिलेला, राणीसाहेब तुमचा पदर पडला एवढे एक वाक्य उच्चारले आणि अभिनय म्हणून सर्टिफिकेट देऊन 10 टक्के कोट्यातून सदनिका मिळविली. उदाहरण म्हणून देतो. त्यांनी सगळया जागा बारा-तेरा हजार रुपये दरमहा भाड्याने दिल्या. माझी सूचना आहे, 500 हेक्टर जमीन तुमच्या ताब्यात येणार आहे आणि मला असे वाटते की, मुंबई शहरामध्ये आता एक इंचही जमीन शिल्लक नाही. रिझर्व्हेशनखाली ज्या जमिनी आहेत या सगळ्या जमिनी झ ोपडपट्टया आणि अनधिकृत बांधकामांनी व्यापल्या आहेत. मुंबई शहरामध्ये हाऊसिंग पॉलिसी येणार आहे. आपण तसे जाहीर केले आहे. यापुढे त्याठिकाणी आम्ही गरीब लोकांसाठीच घरे बांधणार असे उत्तराच्या भाषणामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले तर बरे होईल.

श्री.उल्हास पवार : माननीय सभापती महोदय, कै.राजा गोसावी आज हयात नाहीत. त्यांचा उल्लेख झाला ते वक्तव्य रेकॉर्डवरुन काढून टाकावे.

श्री.मधुकर चव्हाण : तुम्ही रेकॉर्डवरुन काढा. परंतु ते माझे चांगले मित्र होते, ते कलाकार होते. उदाहरण म्हणून मी दिले. त्यांना घर देऊ नये असे माझे म्हणणे नव्हते. गरीब कलाकारांपैकी ते एक कलाकार होते. मी उदाहरण दिले. आज अस्तित्वात असलेले किती कलाकार सांगू?

..2..

श्रीमती उषाताई दराडे : उदाहरण द्यायला आमची हरकत नाही.  परंतु स्त्रीवाचक न देता दुसरे उदाहरण देता येईल एवढीच माझी भावना रेकॉर्डवर घ्यावी.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी उदाहरण दिले होते.  गोरेगाव येथील रॉयल पाम्सच्या हिरानंदानी बिल्डरने एफ.एस.आय.ची चोरी करुन, टीडीआरचा फायदा घेऊन कोणासाठी घरे बांधली? स्व.वसंतदादा पाटील यांनी टीडीआरची कल्पना दिली.  लोकांनी तो मिळविला कोणासाठी? माननीय मुख्यमंत्री महोदय, या सगळ्या लोकांना कधीतरी तुमच्या दालनामध्ये बोलवा आणि तुम्ही सगळ्या हाऊसिंग वसाहती मुंबई शहरात विकसित केल्या त्याठिकाणी फेरी मारा, त्यामध्ये एखादा तरी फेरीवाला, टॅक्सी ड्रायव्हर, कंडक्टर, शिपाई राहतो का? त्याठिकाणी एक तरी वन बीएचकेचा फ्लॅट बांधला आहे का? नाही.  हा कायदा रद्द करीत असताना सर्वंकष अशी चांगली हाऊसिंग पॉलिसी आणली तर त्यामधून मुंबई शहरातील नव्हे तर महाराष्ट्रातील मध्यमवर्गीय माणसाला घर मिळू शकेल.  सामान्य माणसाला घर मिळू शकेल याची काळजी घ्यावी.  अन्यथा कायदा रद्द केला तर तो धनिकांसाठी केला, त्यांच्या फायद्यासाठी केला अशी इतिहासात नोंद होऊ नये असे वाटत असेल तर माननीय मुख्यमंत्री ज्या योजना न्यू हिंद मिलच्या कामगारांसाठी राबविणार आहात, अशा योजनांना भारतीय जनता पक्षाचा पाठिंबा आहे.  हा कायदा आता कालबाह्य झाला आहे.  याचा दुरुपयोग चाललेला आहे.  भ्रष्टाचार चाललेला आहे.  बिल्डर गैरफायदा घेत आहेत म्हणून हा कायदा रद्द झाल्यास घरे कमी किंमतीत मिळतील, घरांचे भाव कमी होतील आणि सामान्य माणसांचे घराचे स्वप्न पूर्ण होईल. एका कविने म्हटले आहे, असावे घरटे अपुले छान, पुढे असावा बागबगिचा, वेली रंगती जाईजुईच्या.......साहित्य वाचून आपले जीवन सुखी होते असे म्हणतात....

(नंतर श्री.जुन्नरे...

अप्रसिद्ध / अस्सुधारित प्रत

श्री. मधुकर चव्हाण...

स्वर्गाची कल्पना स्वर्गाचे वर्णन वाचून करतात त्यामुळे आम्हाला स्वर्ग नका देऊ पण माणसासारखे जीवन जगण्यासाठी आम्हाला घर द्या. युएलसी कायदा रद्द झाल्यामुळे या शासनाने मला घर मिळवून दिले, युएलसी मूळे घरांचे बाजार भाव खाली आले त्यामुळे घर मिळाले असे सामान्य माणसाला वाटू दे. मी आपल्या हेतूबद्दल कोठल्याही प्रकारची शंका घेत नाही परंतु आता आपण भान ठेवून कायदा रद्द करीत आहात परंतु गरीबांसाठी कायद्याची अंमलबजावणी करतांना बेभान होऊन अंमलबजावणी करा. नाही तर तुम्ही बेभान होऊन तुम्ही योजना आखाल व त्यामुळे तुम्हाला त्याची भान ठेवून काळजी करावी लागेल असे व्हावयास नको. राज्यातील गरीब जनतेसाठी आपण जो निर्णय घेतलेला आहे त्याचा फायदा गरीबांनाच होईल व बिल्डरच्या हातात ही योजना जाणार नाही, हे शासन गरीबांसाठी चांगली घरे बांधेल अशा प्रकारचे मनोगत व्यक्त करतो आणि प्रस्तावाला पाठिंबा देतो. धन्यवाद.

---------------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कमलकिशोर कदम (नांदेड स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, या कायद्याला समर्थन देत असतांना शासनास नम्र विनंती करण्यासाठी उभा आहे. आपण नागरी जमीन मर्यादा कायदा निरर्ह करीत आहे. आपण शेतीवरही मर्यादा घातलेल्या आहेत. उद्योग पतींनी 1 लाख कोटी रुपये जमा केले तरी त्यांच्या संपत्तीला मर्यादा नाही. शेतक-याकडे 50 एकर कोरडवाहू जमीन जरी असली तरी प्रमाणाच्या वर जमीन ठेवता येणार नाही यासंदर्भात आपण कायदा केलेला आहे. माझी आपल्याला नम्र विनंती आहे की, हा कायदा निरर्ह करीत असतांना पुढच्या अधिवेशनामध्ये ग्रामीण भागातील शेतीवर जो सिलींगचा कायदा आलेला आहे तो कायदा निरर्ह करण्याचा प्रस्ताव यासभागृहात आला पाहिजे अशी विनंती करुन माझे दोन शब्द संपवतो.

-----------------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्य मंत्री ) सभापती महोदय, मागच्या अधिवेशनामध्ये ठराव मांडतांना मी प्रास्ताविक भाषण केले होते. त्यावेळी मी अतिशय सविस्तरपणे युएलसी ॲक्ट कधी निर्माण झाला आणि आतापर्यंतचा युएलसी ॲक्टचा प्रवासाच्या संदर्भात मी प्रास्ताविक भाषणात सांगितले होते. मागच्या वेळी सुध्दा काही सन्माननीय सदस्यांनी या ठरावावर आपले भाष्य केले होते व आज देखील सन्माननीय सदस्य श्री. शरद पाटील, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी यावर आपलें विचार मांडलेले आहेत. 1976 साली हा कायदा आला आणि 1999 मध्ये युएलसी ॲक्ट हा कायदा केंद्राने रिपील केला. त्यावेळी रिपील करीत असतांना जे वाक्य वापरले 'Act has failed to achieve what is expected from it' हे प्रिएम्बलमधील वाक्य का निरसीत करावे लागले. कारण यामध्ये कुणाचेही दुमत नाही की, हया कायद्यामुळे निश्‍चितपणे गरीबांना घरे उपलब्ध होऊ शकतील. 'equitable distribution of land, equitable distribution of flat' असा या कायद्याचा उदात्त हेतू होता. परंतु याची अंमलबजावणी निश्‍चित प्रकारे करता येऊ शकली नाही हे तेवढेच सत्य आहे. हे कसे घडत गेले यासंदर्भात मी थोडक्यात सांगू इच्छितो. अनेक सन्माननीय सदस्यांनी कायद्याच्या सेक्शन सहा संदर्भात सांगितलेले आहे. जसे आपण इन्कम टॅक्स रिटर्न स्वत: भरतो त्या पध्दतीने प्रत्येक व्यक्तीला आपल्या जमिनीचे स्वत: रिटर्न सेक्शन सहा खाली दाखल करावे लागते. यामध्ये 5 रुपये चौ.फु. या दराने आणि जास्तीत जास्त 2 लाख रुपये पर्यंतचा मोबदला शासनाच्या वतीने दिला जात होता. त्यामुळे महागामोलाची जमीन भुसंपादनामध्ये जास्तीत जास्त किमती पर्यंत जाऊ शकत असेल मग तो कितीही आकार असला तरीही नुकसानीचे वाटत असले तरी बिल्डर लोक या पिक्चरमध्ये आले.

(यानंतर श्री.अजित शिगम..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे...........

अनेक बिल्डर्सनी ॲग्रीमेंट करुन मूळ शेतकऱ्यांकडून त्यांच्या जमिनी घेतलेल्या आहेत. काही लोकांनी वेगवेगळ्या शासनामध्ये बसून सरप्लस लॅन्ड डिक्लेअर करून घेतल्या. काही मोठे धनाढ्य गोदरेज, वाडिया यांच्या या जमिनी होत्या. काही शेकडो एकर जमिनी लिटीगेशनमध्ये गेल्या. मला एवढेच सांगावयाचे आहे की, या कायद्याचा मूळ हेतू खऱ्या अर्थाने साध्य होऊ शकला नाही. या कायद्यान्वये शासनाच्या ताब्यात पाहिजे तेवढ्या जमिनी येऊ शकल्या नाहीत. या कायद्याने काय काय दिले किंवा या कायद्याची अपत्ये म्हटली तर, या कायद्यामुळे मोठ्या प्रमाणावर लिटीगेशन्स झाले, मोठ्या प्रमाणावर झोपडपट्टया वाढल्या. या कायद्याचा डिसॲडव्हान्टेज म्हणजे कोणालाही स्वत:चे पडलेले घर दुरुस्त करायचे असेल तर त्यासाठी युएलसीची एनओसी घेणे क्रमप्राप्त होते. युएलसी कायद्यान्वये 40,50,60 स्वे.फूटचे घर बांधणे बंधनकारक होते. परंतु या तरतुदीचे तंतोतंत पालन करण्याच्या दृष्टीने तेवढा स्टाफ उपलब्ध नव्हता. परिणामी छोटी घरे उपलब्ध होऊ शकली नाहीत ही सत्य परिस्थिती लपवून चालणार नाही म्हणून मी हे जाणीवपूर्वक सांगू इच्छितो.

हा कायदा निरसित केल्यानंतर होणारे फायदे हे मला याठिकाणी विशद केले पाहिजेत. 1976 पासून आतापर्यंत शासनाच्या ताब्यात 14683 एकर जमीन आली. यातील कलम 20 नुसार गृहनिर्माण योजना करु शकतो. 14683 एकर पैकी साधारणत: 7854 हेक्टर जमीन गृहनिर्माणासाठी उपलब्ध झालेली आहे. म्हणजे जवळपास अर्धीजमीन उपलब्ध झालेली आहे. या ताब्यात आलेल्या जमिनीचा चांगल्याप्रकारे उपयोग व्हावा अशी सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केली. माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक घेऊन अगोदरच ठरविले आहे की, म्हाडामार्फत या जमिनींवर एलआयजी आणि एमआयजीकरिता घरे उभारावयाची आहेत. त्या दृष्टीकोनातून याचा निश्चितप्रकारे उपयोग होऊ शकणार आहे.

सभापती महोदय, हाऊसिंग पॉलिसी चर्चेमध्ये आहे. यामध्ये ज्या तरतुदी केलेल्या आहेत त्या तरतुदीसुध्दा.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ही बाब रेकॉर्डवर येणे अत्यंत आवश्यक आहे की, युएलसी कायदा रद्द झाल्यानंतर सरकार काही करणार नाही. पण सरकारच्या ताब्यात आता ज्या जमिनी आहेत, व्हॅकेन्ट लॅन्ड आहेत, त्या जमिनींवर अतिक्रमण किती झालेले आहे, रिकाम्या किती आहेत याची माहिती मंत्रिमहोदयांनी द्यावी. तसेच जे लिटीगेशन्स आहेत त्याबाबत शासन कोणती भूमिका घेणार आहे, हा कायदा रद्द केल्यामुळे आमचे म्हणणे मागे घेत आहोत अशाप्रकारचे कोर्टात ॲफेडेव्हीट करणार आहात की, त्या जमिनी ताब्यात घेणार आहात ? ज्या डिस्पुटेड जमिनी आहेत त्याबाबत शासन कोणती भूमिका घेणार आहे ? ज्या जमिनी शासनाच्या ताब्यात आहेत त्याठिकाणी एमआयजी आणि एलआयजी यांच्यासाठीच घरे बांधणार आहोत असे मंत्रिमहोदयांनी सांगावे अशी माझी आपल्यामार्फत त्यांना विनंती आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, जास्तीत जास्त जमिनी म्हाडाकडे विकसित करण्यासाठी देणार आहोत. या जमिनीवर एलआयजी आणि एमआयजीसाठी घरे बांधली जातील. शासनाच्या ताब्यात असलेली जमीन गृहनिर्माणासाठी आणि प्रामुख्याने गरीब माणसांसाठी वापरण्याचा विचार आहे.

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे...

मी हेही सांगू इच्छितो की, या निमित्ताने किती जमीन असुरक्षित होईल, याची सुध्दा माहिती सभागृहाला झाली पाहिजे. जवळपास 30,745 हेक्टर एवढया जमिनीवर शासनाचे नियंत्रण असणार नाही. ताब्यात आलेली जमीन 14,624 हेक्टर इतकी आहे व ज्याचे 6 (1) अंतर्गत रिटर्न्स दाखल केलेले आहेत, त्या पाईप लाईन्स्च्या जमिनी आहेत. हा कायदा निरसित झाल्यानंतर या जमिनीवर शासनाचे नियंत्रण राहणार नाही. मला सभागृहाला एवढेच सांगायचे आहे की, आपल्याकडे काही सरप्लस लॅण्ड उपलब्ध होणार आहे. आज मार्केट फोर्सेस भरपूर उपलब्ध आहेत. आपण खुली अर्थव्यवस्था स्वीकारलेली आहे, लिबरलायझेशनचे धोरण स्वीकारलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी याठिकाणी प्रश्न विचारला होता की, लिटीगेशनच्या जमिनीचे काय होणार ? असा प्रश्न केला. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, ती जमीन असुरक्षितच राहणार आहे, ती जमीन शासनाच्या ताब्यात येऊ शकणार नाही. त्या जमिनी यु.एल.सी.ॲक्टच्या परव्यूच्या बाहेर राहणार आहेत. त्यामुळे गोदरेज, वाडीया किंवा अन्य लोकांच्या ज्या काही लिटीगेशनच्या जमिनी आहेत, त्या जमिनी ॲक्ट राहिला नसल्यामुळे मार्केटमध्ये येणार आहेत. पर्यायाने जास्तीची जमीन गृहनिर्माणासाठी उपलब्ध होईल, जास्तीची जमीन गृहनिर्माणासाठी उपलब्ध झाल्यानंतर जास्तीचे घरे निर्माण होऊ शकतील, जास्तीचे घरे निर्माण झाल्यानंतर आज घरांच्या ज्या किंमती आभाळाला भिडलेल्या आहेत, हा कायदा रद्द झाल्यानंतर घरांच्या किंमती खाली येण्यास मदत होईल, अशाप्रकारचा अंदाज व्यक्त करण्यास हरकत नाही. खुली अर्थव्यवस्था, लिबरलायझेशन, खाजगीकरणे, ग्लोबिंग रिफॉर्म्स् आपल्या देशाने व राज्याने मान्य केलेले आहे. आपण जून्या काळातील गोष्टी आठवल्या तर आपल्याला समजून येईल की, त्या काळात आपल्याला साधी कार, स्कुटर, टेलिफोन किंवा गॅसचे कनेक्शन घ्यावयाचे म्हटले तर त्यासंबंधी कोटा होता. टेलिफोन खरेदी करण्यासाठी आपल्याला त्यावेळी खासदाराच्या मागे लागून तो उपलब्ध करुन घ्यावा लागत होता. गॅसचे कनेक्शन सहजासहजी मिळत नव्हते. परंतु खुल्या अर्थव्यवस्थेमुळे हे सर्व जनतेला उपलब्ध झालेले आहे. आपल्या देशात विदेशातील लोकांनी सुध्दा मोठया प्रमाणात गुंतवणूक करुन वस्तू बाजारात आणल्या. त्यामुळेच आज सामान्य माणूसही मोबाईल वापरु लागला आहे. आज 100 कंपन्यांच्या 100 प्रकारच्या नववीन कार उपलब्ध आहेत. हे उदाहरण मी

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे .....

यासाठी देत आहे की, मार्केस फोर्सेस ज्यावेळी अप्लाय होतात, त्यावेळी निश्चितप्रकारे कॉम्पिटीशन होते. त्याचप्रमाणे हाऊसिंग इंडस्ट्रीजमध्ये सुध्दा अशा प्रकारे अधिक जास्तीचे फ्लॅट कमी किंमतीमध्ये उपलब्ध होण्यास या माध्यमातून मदत होईल. हा कायदा निरसित करण्याचा सर्वात महत्वाचा मुद्दा हाच आहे. त्यामुळे हाऊसिंग इंडस्ट्रीजमध्ये सुध्दा याचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. जवाहरलाल नेहरु अर्बन रिन्युअल मिशन हे अत्यंत महत्वाकांक्षी मिशन केंद्र सरकारने आपल्याला दिलेले आहे. त्यासंदर्भात आपल्या राज्यातील जवळपास 23 हजार कोटी रुपयांचे प्रस्ताव आपण केंद्र सरकारकडे पाठवलेले आहेत. त्यातील जवळपास 6 हजार कोटी रुपयांचे प्रस्ताव मंजूरही झालेले आहेत. त्यामुळे यासंदर्भातील केंद्र सरकारने पैसे देण्याच्या बाबतीत हा कायदा निरसित करण्याची अनिवार्य अट घातली असली तरी आपल्या राज्याच्या हिताच्या दृष्टीकोनातून, नागरी विभागाच्या विकासाच्या दृष्टीकोनातून केंद्र शासनाच्या माध्यमातून पैसा मिळवणे हा देखील लोकशाही आघाडी शासनाचा हेतू आहे. त्यामुळे यासंदर्भात हा कायदा निरसित करण्याची अट मान्य करण्यासाठी आपण हा ठराव सभागृहात आणलेला आहे. साहजिकच यानिमित्ताने हाही प्रश्न उपस्थित होतो की, ज्या जमिनी खुल्या होतील, त्यावेळी होल्डींग करण्याची कॅपॅसिटी अनेक बिल्डरमध्ये आहे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे.........

अशा प्रकारचा विचार स्वाभाविक आहे. जोपर्यन्त जमिनीची किंमत वाढत नाही तोपर्यन्त गृहनिर्माणाच्या योजना आणणार नाही अशा पद्धतीचे विचार पुढे येत होते. त्यामुळे कुठेतरी लगाम राहिला पाहिजे म्हणून कर्नाटकच्या धर्तीवर, ज्याचा उल्लेख मी माझ्या प्रास्ताविक भाषणातही केला होता की, पुढच्या काळात व्हॅकंट लॅण्ड टॅक्स ॲक्ट आणण्याची आवश्यकता आहे. यु.एल.सी.ॲक्ट आणण्यामागचा हेतू हा होता की, मोकळया जमिनी ताब्यात ठेवण्यास प्रतिबंध असावा. त्यामुळे व्हॅकंट लॅण्ड टॅक्स ॲक्ट आणण्याची आवश्यकता आहे. जेणेकरुन जेवढया जमिनी असतील आणि जेवढा परमिसेबल एफ.एस.आय.असेल त्याला लागणारा प्रॉपर्टी टॅक्स असेल तो काही पटीने वाढवावा लागत असेल, एका वर्षात डेव्हलप केला नाही तर दोन वर्षात डेव्हलप केला नाही तर प्रत्येक वेळी त्या पटीने टॅक्स वाढविण्याची गरज असेल तर तशी तरतूद आपल्याला व्हॅकंट लॅंड ॲक्ट टॅक्समध्ये करावी लागेल. जेणे करुन होल्डिंग करण्याची संभावना आहे ती होऊ नये. यादृष्टीकोनातून सुध्दा पुढच्या काळात ॲक्ट आणण्याची व्यवस्था असू शकणार आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, कलाकारांना, लोकप्रतिनिधींना, अनेकांना सदनिका मिळत होत्या. 5 टक्क्यांमध्ये मिळणा-या सदनिकांबाबत काही सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. याबाबत मी असे सांगू इच्छितो की, 5 टक्क्यांमध्ये मिळणा-या सदनिकांबाबत काही क्रायटेरिया होता. त्या क्रायटेरियाप्रमाणेच सदनिकांचे वाटप करण्यात येते. यामधील सदनिका आहेत त्या 14 हजाराच्या दरम्यान प्रत्यक्ष प्राप्त झाल्या आहेत. तसेच अप्राप्त आहेत त्या 8204 आहेत. त्या सुरक्षित असल्यामुळे आपल्याला मिळणार आहेत. जे जे विकासक कायद्याप्रमाणे वागत नव्हते, शासनाच्या 5 टक्क्यांच्या जमिनी परस्पर विकत होते त्यांना काळया यादीत टाकण्याचे काम झाले आहे. अशा 121 विकासकांना काळया यादीत टाकले आहे. यामधून शासनाला 101 कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला आहे. यामध्ये जे काही फायदे-तोटे होते ते मी सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.शरद पाटील व श्री.मधुकर चव्हाण यांनी एक मुद्दा लक्षात आणून दिला व अशी अपेक्षा केली आहे की, या जमिनीचा उपयोग अशा पद्धतीने व्हावा की जेणेकरुन बाजारातील सदनिकांचे किंवा जमिनींचे मूल्य खाली यावे आणि गरीब व मध्यमवर्गीय माणसांना सदनिका आवाक्याच्या किमतीत उपलब्ध व्हाव्यात. हाच केंद्रबिंदु ठेवून हाऊसिंग पॉलिसी असेल, यु.एल.सी.मध्ये शासनाच्या ताब्यात असलेल्या जमिनी असतील त्यांचा वापर त्यादृष्टीकोनातून केला जाईल. हा हेतू साध्य करण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न राहील. माझी सदनाला विनंती आहे की, हा ठराव सदनाने मान्य करावा.

ठराव मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक

L.A. BILL NO. LXXVI OF 2007

( A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH 2008.)

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2007 चे वि.स.वि.क्र.76 दिनांक 31 मार्च 2008 रोजी संपणा-या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यास अधिकृत मंजूरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास असे आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) व्दारे महाराष्ट्राचे राज्यपाल त्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडशः सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी त्या मांडाव्यात.

( खंड 2 व 3, अनुसूची खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्याच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

-------

.2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक.

**मु.शी.**: सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 28- मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक यावरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 28- मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक यावरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त मी आपल्या अनुमतीने सादर करतो.

**सभापती** : सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 28 यावरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सभागृहास सादर झाले आहे.

--------

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## सभागृहातील कामकाजाबाबत.

**सभापती** : आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर व इतर सन्माननीय सदस्यांचा महाराष्ट्र विधानपरिषद नियम 260 अन्वये प्रस्ताव दाखविण्यात आलेला आहे. हा प्रस्ताव आपण आज चर्चेला घेणार नाही. आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये अर्धा तास चर्चा दाखविलेल्या आहेत. त्या अर्धा तास चर्चा आपण आज घेऊ शकलो नाही तर या अधिवेशनामध्ये त्या घेणे शक्य नाही. तसेच, विचार खंडशः विचार व संमत करणे ही शासकीय विधेयके आपण उद्या सकाळी सभागृहाच्या विशेष बैठकीमध्ये घेणार आहोत.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आजच्या कार्यक्रमपत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेल्या अर्धा तास चर्चा उद्या घेण्यात याव्यात.

**सभापती** : आपण अजून अर्धा-पाऊण तास कामकाज घेऊ. अर्धा तास चर्चेला उत्तर देण्यासाठी मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. अर्धा तास चर्चा आज घेतल्या नाही तर त्या उद्या आपल्याला घेता येणार नाहीत.

सभगृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 30 नोव्हेंबर, 2007 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक रात्री 9 वाजून 9 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 30 नोव्हेंबर, 2007 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही